# महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेंतर्गत ग्रंथालय आणि
माहितीशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध.

संशोधक
श्री. सुनिल राजाराम मंडले

मार्गदर्शक
डॉ. सौ. नमिता बाबासाहेब खोत

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग

जून २०१५

# संशोधकाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री. सुनिल राजाराम मंडले, नोंदणी क्र. (P.R.No.16110004611) प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो कि, "महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास" हा शोध प्रबंध मी प्रा. डॉ. सौ. नमिता बाबासाहेब खोत यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः पूर्ण केलेला आहे. तो इतर कोणत्याही विद्यापीठातील पदवीकरीता अगर परीक्षेकरीता सादर केलेला नाही.

संशोधक

**(श्री. सुनिल राजाराम मंडले)**

ठिकाण : सांगली.

दिनांक : ३०/०६/२०१५

# मार्गदर्शकांचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते कि, “महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास” हा शोधप्रबंध विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीकरीता ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे सादर करणेत आला आहे. हा शोध प्रबंध श्री. सुनिल राजाराम मंडले यांनी, माझ्या पर्यवेक्षण व मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले संशोधन कार्य आहे. माझ्या माहिती व विश्वासानुसार सबंधित संशोधन कार्य हे त्यांनी इतर कोणत्याही विद्यापीठाच्या पदवीकरीता किंवा परीक्षेकरीता वापरले नाही.

मार्गदर्शक

**(डॉ.सौ.नमिता बाबासाहेब खोत)**

ठिकाण : कोल्हापूर.

दिनांक : ३०/०६/२०१५

# ऋणनिर्देश

"महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास" या विषयाच्या संशोधन कार्यासाठी मार्गदर्शक, ग्रंथालय व माहिती शास्त्र विषयातील इतर तज्ञ व्यक्ती, संस्था पदाधिकारी, विविध क्षेत्रातील तज्ञ यांनी सहाय्य केले. तसचे मौलिक माहिती उपलब्ध करून दिली. त्यामुळेच हे संशोधन कार्य पूर्ण होऊ शकले. त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे सदर संशोधक आपले कर्तव्यच आहे असे समजतो.

विद्यावाचस्पती पदवीच्या संशोधन कार्यात प्रस्तुत विषयाचा सखोल अभ्यास करताना माझ्या मार्गदर्शिका प्रा. डॉ. सौ. नमिता बाबासाहेब खोत (ग्रंथपाल, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर कोल्हापूर) यांचे बहुमुल्य मार्गदर्शन मिळाले. संशोधन कार्यात वेळोवेळी अनेक अडचणी आल्या. मात्र त्यांनी 'माऊली' प्रमाणे मार्गदर्शन केल्याने त्या दूर करण्यात आल्या त्यामुळे त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत संशोधनाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा तसेच ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचा व कुलगुरू डॉ. दिपक टिळक साहेब यांचा मी अत्यंत ऋणी आहे. डॉ. उमेश केसकर रजिस्ट्रार टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आणि प्रा. विजय कार्लेकर डीन फॅकल्टी फॉर सोशियल ॲन्ड मोरल सायन्सेस यांचाही मी अत्यंत ऋणी आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथपाल प्रा.डॉ.सौ. धनिष्ठा खंदारे, तसेच पीएच.डी. विभागातील सर्व स्टाफनी केलेल्या योग्य सहकार्यासाठी त्यांचा ही मी अत्यंत ऋणी आहे. पुणे विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. बी. एम. पानगे, उपग्रंथपाल प्रा. डॉ. सौ. अपर्णा आर. राजेंद्र, नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे माहिती तंत्रज्ञान अधिकारी प्रा. डॉ. एन. बी. दहीभाते, यशवंतराव मोहिते कॉलेजचे ग्रंथपाल डॉ. व्ही. एस मुगडे, ग्रंथपाल पाटील पांडुरंग बी. शहाजी कॉलेज कोल्हापूर, ग्रंथपाल विकास खराडे, चितळे महाविद्यालय, भिलवडी, प्रा. निता पाटील, प्रा. विजय गाडे सर यांचेही मार्गदर्शन व सहकार्य मिळाले त्यांचाही मी आभारी आहे.

तसेच या संशोधनासाठी वेळोवेळी मदत केलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथपाल प्राध्यापक तसेच विद्यार्थी आणि ग्रंथालयीन स्टाफ तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथालयातील सर्व फॅकल्टी मेंबर्स आणि स्टाफ यांचाही त्यांनी केलेल्या अविस्मरणीय सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. भारती विद्यापीठाचे

(पुणे) चे सेक्रेटरी डॉ. विश्वजित कदम, भारती विद्यापीठाचे इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट सांगलीचे विद्यमान संचालक डॉ. ओम प्रकाश गुप्ता, जॉईन्ट डायरेक्टर डॉ. एस. बी. सावंत सर, माजी संचालक डॉ. के. सुब्बारामण, प्रा. बी. डी. पाटील डॉ. प्रताप देसाई, ग्रंथालयातील सहकारी स्टाफ श्रीमती शिला सुर्यवंशी यांचेही सहकार्य लाभले व इतर सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे प्रोत्साहन मिळाले. याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. प्रा.एन.एन.लोखंडे, जी.ए.कॉलेज सांगली तसेच प्रा.एन.डी.तडसरे यांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

माझे प्रिय वडील श्री. राजाराम बयाजी मंडले, आई सौ. ताई मंडले तसेच माझी पत्नी सौ. विद्या, चि. नितिन यांनीही या संशोधन कार्यासाठी मोलाचा वेळ देवून प्रोत्साहन दिले. श्री. रविंद्र कुंभार यांनी चांगले टायपिंग करून दिले त्याबद्दल या सर्वांचा मी ऋणी आहे.

या संशोधन कार्यासाठी ज्यांनी-ज्यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत केली, निरपेक्ष भावनेने सहकार्य केले त्या सर्व ज्ञात-अज्ञात व्यक्तींचा मी ऋणी आहे.

संशोधक

**(श्री. सुनिल राजाराम मंडले)**

# अनुक्रमणिका


| प्रकरण | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ<br>संशोधकाचे प्रतिज्ञापत्र<br>मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | |
| | ऋणनिर्देश | I-II |
| | संशोधनाचा सारांश | III-XIX |
| | अनुक्रमणिका | XX-XXIV |
| | सारणींची यादी | XXV-XXVII |
| | आलेखांची यादी | XXVIII-XXX |
| | आकृत्यांची यादी | XXXI |
| | महाराष्ट्रातील आयुर्वेद ग्रंथालयांचा नकाशा | XXXII |
| | संक्षिप्त सूची | XXXII-XXXIV |
| **पहिले** | **प्रस्तावना** | **१ ते २६** |
| १ | प्रस्तावना | |
| १.१ | संशोधन विषयाची निवड | |
| १.२ | संशोधन विधान | |
| १.३ | संशोधन विषयाचे महत्व | |
| १.४ | संशोधनाची उद्दिष्ट्ये | |
| १.५ | संशोधनाची गृहीतके | |
| १.६ | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | |
| १.७ | संशोधन पध्दती | |
| १.८ | संशोधनाची कार्यपध्दती | |
| १.९ | संशोधनाची माहिती, संकलन, साधने | |
| १.१० | माहिती संकलन स्त्रोत | |

| प्रकरण | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्राथमिक माहिती संकलन स्त्रोत. | |
| | व्दितीयक संकलन स्त्रोत. | |
| १.११ | माहिती सादरीकरण संकलन विश्लेषण सादरीकरण | |
| १.१२ | अहवाल लेखन | |
| १.१३ | प्रकरणीकरण | |
| १.१४ | समारोप | |
| **दुसरे** | **संशोधन पूर्वाभ्यास वाचन साहित्य शोध** | **२७ ते ६२** |
| २.१ | प्रस्तावना | |
| २.२ | संबंधित साहित्याच्या समालोचनाची उद्दिष्ठे | |
| २.३ | संबंधित साहित्याचे समीक्षण | |
| २.४ | संबंधित संशोधनाचे समीक्षण | |
| २.५ | पीएच. डी. साठी सादर केलेले शोधप्रबंध | |
| २.६ | एम. फिल. चे लघुशोध प्रबंध | |
| २.७ | एम. लिब. व इतर संशोधन प्रकल्प | |
| २.८ | संदर्भ साहित्याचा आढावा | |
| २.९ | संशोधन विषयाच्या संदर्भात इंटरनेटवरील उपलब्ध वेबसाईटस | |
| २.१० | विविध चर्चासत्रे, परिषदा कार्यशाळांमधील संशोधन पेपर | |
| २.११ | समारोप | |
| | संदर्भ सूची | |
| **तिसरे** | **आयुर्वेदाचा इतिहास व विकास** | **६३ ते १२९** |
| ३.१ | प्रस्तावना | |
| ३.२ | आयुर्वेद अर्थ, स्वरूप व व्याप्ती | |
| ३.३ | आयुर्वेदाचा आढावा | |
| ३.४ | आयुर्वेदाचा इतिहास, उदय व वाढ | |
| ३.५ | आयुर्वेदाची सद्यस्थिती - | |

| प्रकरण | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | ३.५.१. भारताच्या संदर्भातील सद्यस्थिती | |
| | ३.५.२. परदेशातील आयुर्वेदाच्या प्रसाराची सद्यस्थिती | |
| | ३.५.३. महाराष्ट्रातील आयुर्वेदाच्या शिक्षणाच्या प्रसाराची सद्यस्थिती | |
| | ३.५.४. महाराष्ट्र राज्य - | |
| ३.६ | शिक्षण अर्थ व स्वरूप | |
| ३.७ | भारतातील शिक्षण पध्दती | |
| ३.८ | भारतातील वैद्यकिय शिक्षण | |
| ३.९ | महाराष्ट्रातील वैद्यकिय शिक्षण | |
| ३.१० | वैद्यकिय शिक्षण | |
| ३.११ | वैद्यकिय शिक्षणाचे प्रकार | |
| ३.१२ | आयुर्वेद शिक्षण वाढ व विकास | |
| ३.१३ | आयुर्वेद शिक्षणासंबंधी प्रमुख संस्था | |
| ३.१४ | आयुर्वेद शिक्षणासंबंधी प्रमुख समित्या | |
| ३.१५ | संशोधकाने निवडलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांची माहिती | |
| | संदर्भ सूची | |
| **चौथे** | **ग्रंथालय संकल्पना, प्रकार व कार्ये** | **१३० ते १४४** |
| ४.१ | प्रस्तावना | |
| ४.२ | ग्रंथालय संकल्पना | |
| ४.३ | ग्रंथालयाचे प्रकार | |
| ४.४ | आयुर्वेद ग्रंथालय संकल्पना | |
| ४.५ | आयुर्वेद ग्रंथालयाची गरज | |
| ४.६ | आयुर्वेद ग्रंथालयाचे कार्य | |
| ४.७ | वैद्यकीय आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांचे उच्चशिक्षणातील महत्व | |
| | संदर्भ सूची | |

| प्रकरण | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **पाचवे** | **आयुर्वेद ग्रंथालयातील नवे प्रवाह** | **१४५ ते १७२** |
| ५ | प्रस्तावना | |
| ५.१ | वर्तमानातील वैद्यकिय शिक्षण | |
| ५.२ | वैद्यकिय Librarianship | |
| ५.२.१ | बदललेली वैद्यकिय Librarianship संकल्पना | |
| ५.२.२ | वैद्यकिय ग्रंथालय मानके | |
| ५.२.३ | आयुर्वेद ग्रंथालय स्टाफ निश्चिती मानके | |
| ५.३ | संकलन विकास मानके | |
| ५.४ | ग्रंथालयातील डिजीटल सुविधा | |
| ५.५ | वैद्यकिय ग्रंथालयातील करंट ट्रेंडस | |
| ५.६ | भारतातील वैद्यकिय ग्रंथालयांचा विकास | |
| ५.७ | वैद्यकिय ग्रंथालयातील माहिती सेवा | |
| ५.८ | वैद्यकिय ग्रंथालयासमोरील आव्हाने | |
| ५.९ | २१ व्या शतकातील मेडीकल कॉलेज लायब्ररी | |
| ५.९.१ | वैद्यकिय ग्रंथालय मॉडेल | |
| ५.९.२ | आयुर्वेद ग्रंथालयातील माहिती प्रक्रिया | |
| ५.९.३ | आयुर्वेद ग्रंथालयातील माहिती सेवा | |
| ५.९.४ | आयुर्वेद ग्रंथालयातील साहित्य संग्रह | |
| ५.९.५ | आयुर्वेद ग्रंथालयातील संग्रहाचे व्यवस्थापन | |
| ५.९.६ | आयुर्वेद ग्रंथालयातील व्यवस्थापन | |
| ५.१० | आयुर्वेद ग्रंथालय संप्रेषणातील नवे प्रवाह | |
| ५.११ | आयुर्वेद ग्रंथालयातील ग्रंथपालाकडे आवश्यक कौशल्य व कर्तव्ये | |
| ५.१२ | आयुर्वेद ग्रंथालयातील ग्रंथपालांची कामे | |
| | सारांश | |
| | संदर्भ सूची | |

| प्रकरण | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **सहावे** | **माहितीचे संकलन, विश्लेषण व सादरीकरण** | **१७३ ते २७०** |
| ६.१ | प्रस्तावना | |
| ६.२ | माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण | |
| ६.२.१ | तथ्य विश्लेषण व निर्वचनाचा अर्थ | |
| ६.३ | आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयाबाबत माहिती संकलन | |
| ६.३.१ | ग्रंथपाल यांच्याकडून माहिती संकलन | |
| ६.३.२ | अध्यापक यांचेकडून माहिती संकलन | |
| ६.३.३ | विद्यार्थी यांचेकडून माहिती संकलन | |
| ६.४ | समारोप | |
| **सातवे** | **सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी** | **२७१ ते २९८** |
| ७.१ | प्रस्तावना | |
| ७.२ | संशोधनासंबंधी सारांश | |
| ७.३ | संशोधनाचे निष्कर्ष | |
| ७.४ | संशोधन शिफारशी | |
| ७.५ | संशोधनाची उद्दिष्ठांची पूर्तता | |
| ७.६ | संशोधन गृहीतकांची पडताळणी | |
| ७.७ | संशोधनासाठी भविष्यवेध | |
| ७.८ | समारोप | |
| | **संदर्भसूची** | **२९९ ते ३११** |
| | **परिशिष्टे** | ---- |

# सारणीची यादी


| सारणी क्र. | सारणीचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४.१ | राष्ट्रीय ग्रंथालयांचे प्रकार | १३६ |
| ६.१ | ग्रंथालयांचा प्रतिसाद | १७६ |
| ६.२ | आयुर्वेद ग्रंथालयातील प्रशिक्षित ग्रंथपालाची संख्या | १७८ |
| ६.३ | ग्रंथपालांचे कार्यसमाधान | १७९ |
| ६.४ | आयुर्वेद महाविद्यालय स्थापना वर्षे | १८० |
| ६.५ | आयुर्वेद महाविद्यालयांची ग्रंथालये | १८२ |
| ६.६ | आयुर्वेद महाविद्यालयातील अभ्यासक्रम | १८६ |
| ६.७ | आयुर्वेद कौन्सील मान्यता | १८७ |
| ६.८ | प्रमाणीकरण झालेली आयुर्वेद महाविद्यालये | १८९ |
| ६.९ | आयुर्वेद महाविद्यालयातील यु. जी. विद्यार्थी संस्था | १९० |
| ६.९.१ | आयुर्वेद महाविद्यालयातील पी. जी. विद्यार्थी संस्था | १९१ |
| ६.१० | ग्रंथालयातील सेवकांची संख्या | १९३ |
| ६.११ | भाषानिहाय ग्रंथसंग्रह असणारी ग्रंथालये | १९४ |
| ६.१२ | आयुर्वेद ग्रंथालयातील ग्रंथ संग्रह | १९६ |
| ६.१३ | ग्रंथालयातील ई-स्त्रोत साहित्य संग्रह | १९७ |
| ६.१४ | ग्रंथालयातील वाचकांची संख्या | १९८ |
| ६.१५ | ग्रंथालयातील सध्याची वाचकांची संख्या | २०० |
| ६.१६ | ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत | २०१ |
| ६.१७ | ग्रंथालयातील वाचनकक्षाची सोय | २०३ |
| ६.१८ | ग्रंथालयातील उपयुक्त साधन सामुग्री | २०४ |
| ६.१९ | ग्रंथालयातील वाचनसाहित्य | २०५ |
| ६.२० | ग्रंथालयातील मुद्रीत स्वरूपातील साहित्यसंग्रह | २०७ |
| ६.२१ | ग्रंथालयातील अमुद्रीत स्वरूपातील साहित्यसंग्रह | २०८ |

| सारणी क्र. | सारणीचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ६.२२ | ग्रंथालयातील मागील १० वर्षापासूची ग्रंथसंग्रह संख्या | २०९ |
| ६.२३ | ग्रंथालयातील ग्रंथखरेदी | २११ |
| ६.२४ | ग्रंथालयातील नियतकालीकांची संख्या | २१२ |
| ६.२५ | ग्रंथालयातील भाषानिहाय नियतकालीके | २१३ |
| ६.२६ | ग्रंथालयातील वर्गणी भरलेली नियतकालीके | २१५ |
| ६.२७ | ग्रंथालयातील नियतकालीकांचा वार्षीक खर्च | २१६ |
| ६.२८ | नियतकालीकांचे जुने अंक | २१७ |
| ६.२९ | नियतकालीकांची ऑनलाईन सेवा | २१८ |
| ६.३० | नियतकालीकांची ई-जर्नल सुविधा | २१९ |
| ६.३१ | ग्रंथालयात येणारी वर्तमानपत्रे | २२० |
| ६.३२ | वर्तमानपत्रावरील वार्षीक खर्च | २२२ |
| ६.३३ | ग्रंथालयातील ग्रंथालय समिती | २२४ |
| ६.३४ | ग्रंथालय समिती सभासद | २२४ |
| ६.३५ | ग्रंथालय समिती मिटींग | २२५ |
| ६.३६ | ग्रंथालय समितीची कार्ये | २२६ |
| ६.३७ | ग्रंथालयात संगणकाचा वापर | २२८ |
| ६.३८ | ग्रंथालय संगणकीकरण | २२९ |
| ६.३९ | ग्रंथालयातील इंटरनेट सुविधा | २३० |
| ६.४० | ग्रंथालयांवर माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव | २३१ |
| ६.४१ | ग्रंथालयातील लायब्ररी सॉफ्टवेअर | २३३ |
| ६.४२ | ग्रंथालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधा | २३४ |
| ६.४३ | ग्रंथालयात वापरली जाणारी साधने | २३६ |
| ६.४४ | ई-बुक व ई-जर्नलसचा वापर | २३७ |
| ६.४५ | ग्रंथालयीन सेवा देताना येणाऱ्या अडचणी | २३९ |
| ६.४५.१ | अडचणी दूर करण्यासाठी उपाययोजना | २४० |

| सारणी क्र. | सारणीचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ६.४६ | ग्रंथालयातील माहितीचे जतन व प्रसारण | २४१ |
| ६.४७ | ग्रंथालयातील देवाण-घेवाण | २४३ |
| ६.४७.१ | ग्रंथालयातील बुक-बँक योजना | २४४ |
| ६.४८ | ग्रंथालयातील वर्गीकरण पध्दती | २४५ |
| ६.४९ | ग्रंथालयातील तालीकीकरण | २४६ |
| ६.५० | ग्रंथालयातील ग्रंथ परीगणन | २४८ |
| ६.५१ | ग्रंथालय वेळ, कार्यसमाधान आणि कामे | २४९ |
| ६.५२ | ग्रंथालयाला भेट देण्याचे कारण | २५२ |
| ६.५३ | ग्रंथालयातील वाचनसाहित्याची माहिती | २५२ |
| ६.५४ | वाचनसाहित्य संग्रहाबाबत समाधानी | २५४ |
| ६.५५ | ग्रंथालय समिती सदस्य | २५५ |
| ६.५६ | अध्यापकांचा सेवाबाबत अभिप्राय | २५७ |
| ६.५७ | ग्रंथालयाचा वापर | २६० |
| ६.५८ | ग्रंथालय भेटीचे प्रयोजन | २६२ |
| ६.५९ | ग्रंथालयातील स्वतंत्र अभ्यासिका | २६३ |
| ६.६० | ग्रंथालयातील सेवक वर्गाचे सहकार्य | २६४ |
| ६.६१ | वाचनसाहित्य विषयक माहिती | २६५ |
| ६.६२ | ग्रंथालयातील पुस्तक पेढी योजना | २६६ |
| ६.६३ | ग्रंथालयातील सुधारणा | २६८ |

# आलेखांची यादी


| आलेख क्र. | आलेखाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ६.१ | ग्रंथालयांचा प्रतिसाद | १७७ |
| ६.२ | प्रशिक्षित ग्रंथपाल | १७८ |
| ६.३ | ग्रंथपालाचे कार्यसमाधान | १७९ |
| ६.४ | ग्रंथालयाची स्थापना वर्षे | १८१ |
| ६.५ | महाराष्ट्रातील ग्रंथालयांचे प्रमाण | १८३ |
| ६.६ | महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची संख्या | १८४ |
| ६.७ | शहरी भागातील ग्रंथालयांचे प्रमाण | १८४ |
| ६.८ | ग्रामीण भागातील ग्रंथालयांचे प्रमाण | १८५ |
| ६.९ | महाविद्यालयातील अभ्यासक्रम | १८६ |
| ६.१० | आयुर्वेद कौन्सीलची मान्यताप्राप्त ग्रंथालये | १८८ |
| ६.११ | वैद्यकिय महाविद्यालय प्रमाणीकरण | १८९ |
| ६.१२ | महाविद्यालयातील UG विद्यार्थी संख्या | १९० |
| ६.१३ | महाविद्यालयातील PG विद्यार्थी संख्या | १९२ |
| ६.१४ | महाविद्यालयातील ग्रंथालयातील सेवकांची संख्या | १९३ |
| ६.१५ | ग्रंथालयातील भाषानिहाय ग्रंथसंग्रह असणारे ग्रंथालय | १९५ |
| ६.१६ | ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह | १९६ |
| ६.१७ | ग्रंथालयातील ई-स्त्रोत साहित्य संग्रह | १९८ |
| ६.१८ | ग्रंथालयातील वाचकांची संख्या | १९९ |
| ६.१९ | ग्रंथालयातील सध्याची वाचकांची संख्या | २०० |
| ६.२० | ग्रंथालय स्वतंत्र इमारत | २०२ |
| ६.२१ | ग्रंथालयात स्वतंत्र वाचन कक्षाची सोय | २०३ |
| ६.२२ | आयुर्वेद ग्रंथालयातील साधने | २०४ |
| ६.२३ | ग्रंथालयातील वाचन साहित्य | २०६ |

| आलेख क्र. | आलेखाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ६.२४ | ग्रंथालयातील मुद्रीत स्वरूपातील साहित्य संग्रह | २०७ |
| ६.२५ | ग्रंथालयातील अमुद्रीत स्वरूपातील साहित्य संग्रह | २०८ |
| ६.२६ | ग्रंथालयातील ग्रंथसंख्या | २०९ |
| ६.२७ | ग्रंथालयातील ग्रंथ खरेदी | २११ |
| ६.२८ | ग्रंथालयातील भाषानिहाय नियतकालीके | २१४ |
| ६.२९ | ग्रंथालयात नियतकालीकांवर होणारा वार्षीक खर्च | २१६ |
| ६.३० | नियतकालीकांचे जुने अंक | २१७ |
| ६.३१ | नियतकालीकांची ऑनलाईन सेवा | २१९ |
| ६.३२ | नियतकालीकांची ई-जर्नल सुविधा | २२० |
| ६.३३ | ग्रंथालयातील येणारी वर्तमानपत्रे | २२१ |
| ६.३४ | वर्तमानपत्रावरील वार्षीक खर्च | २२३ |
| ६.३५ | ग्रंथालय समिती मिटींग | २२५ |
| ६.३६ | ग्रंथालय समिती कार्ये | २२७ |
| ६.३७ | ग्रंथालयात संगणकाचा वापर | २२८ |
| ६.३८ | ग्रंथालय संगणकीकरण | २२९ |
| ६.३९ | ग्रंथालयातील इंटनेट सुविधा | २३० |
| ६.४० | ग्रंथालय सॉफ्टवेअर | २३३ |
| ६.४१ | ग्रंथालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा | २३५ |
| ६.४२ | ग्रंथालयात वापरण्यात येणारी साधने | २३७ |
| ६.४३ | ग्रंथालयात ई-बुक, ई-जर्नलसचा वापर | २३८ |
| ६.४४ | ग्रंथालयीन सेवा देताना येणाऱ्या अडचणी | २३९ |
| ६.४५ | अडचणी दूर करण्यासाठी उपाय योजना | २४१ |
| ६.४६ | ग्रंथालयातील माहितीचे जतन व प्रसारण | २४२ |
| ६.४७ | ग्रंथालयातील देवाण घेवाण | २४३ |
| ६.४८ | ग्रंथालयातील बुक बँक योजना | २४४ |

| आलेख क्र. | आलेखाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ६.४९ | ग्रंथालयातील वर्गीकरण पध्दती | २४६ |
| ६.५० | ग्रंथालयातील तालीकीकरण | २४७ |
| ६.५१ | ग्रंथालयातील परिगणन | २४८ |
| ६.५२ | वाचनसाहित्य विषयक माहिती | २५३ |
| ६.५३ | वाचनसाहित्य संग्रहाबाबत समाधानी | २५४ |
| ६.५४ | नियतकालीक संग्रहाबाबत समाधानी | २५५ |
| ६.५५ | ग्रंथालय समिती सदस्य | २५६ |
| ६.५६ | अध्यापकांचा सेवाबाबत अभिप्राय | २५७ |
| ६.५७ | ग्रंथालयांचा वापर | २६१ |
| ६.५८ | ग्रंथालय भेटीचे प्रयोजन | २६२ |
| ६.५९ | स्वतंत्र अभ्यासिका | २६३ |
| ६.६० | ग्रंथालय सेवक वर्गाचे सहकार्य | २६४ |
| ६.६१ | वाचन साहित्य विषयक माहिती | २६५ |
| ६.६२ | ग्रंथालयातील पुस्तकपेढी योजना | २६६ |
| ६.६३ | ग्रंथालयातील सुधारणा | २६८ |

# आकृत्यांची यादी



| आकृती क्र. | आकृतीचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१ | वैद्यकिय शिक्षणाच्या पध्दती | ०२ |
| १.२ | अष्ठांग आयुर्वेद | ०३ |
| ३.१ | आयुर्वेद उपचार पध्दती | ६७ |
| ३.२ | आयुर्वेदाची आठ अंगे | ६९ |
| ४.१ | ग्रंथालयांचे प्रकार | १३१ |
| ४.२ | सार्वजनिक ग्रंथालयांचे प्रकार | १३२ |
| ४.३ | शैक्षणिक ग्रंथालयांचे प्रकार | १३३ |
| ५.१ | वैद्यकिय ग्रंथालय मॉडेल | १६३ |
| ५.९.४ | प्राकृतिक लक्षणानुसार वाचनसाहित्याचे वर्गीकरण | १६६ |

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (संलग्नित महाविद्यालये)




नकाशातील महाविद्यालयांची संख्या दि. ३१/१२/२०१२ ची स्थिती दर्शविणारी आहे.

**संक्षिप्त सूची**

**(Abbrevations)**

| | |
|---|---|
| ASLIB | Association of Special Libraries and Information Bureau |
| CC | Colon Classification |
| CAS | Current Awairness Service |
| CDS | Collection Development Standards |
| CCIM | Central Council of Indian Medicine |
| CCRAS | Central Council for Research in Ayurveda and siddha |
| DRM | Descriptive Research Mehtod |
| DDC | Dewey Decimal Classification |
| ERM | Experimental Research Method |
| HRM | Historical Researh Method. |
| ICT | Information Communicatin and Technology. |
| IR | Institutional Repository |
| IAA | International Academy of Astronautics |
| INDMED | Indian Biomedical Journals |
| LISC | Library and Information Science |
| LCC | Library of Congress Classification |
| LOCKSS | Lots of Copies Keep Stuff Safe |
| MUHS | Maharashtra University of Health Science |
| MCA | Medical Control Agency |
| MLS | Medical Library Standards |
| MLA | Maharashtra Library Assciation |
| MEDLARS | Medical Literature Analysis and Retrieval System. |
| MEDLINE | Medical Literature Analysis and Retrieval System Online |
| MCI | Medical Council of India |

| | |
|---|---|
| NAAC | National Assessment and Acreditation Council |
| NEP | New Economic Policy |
| NAMA | National Ayurvedic Medical Association |
| NHP | National Health Profile |
| NLM | National Library of Medicine |
| OPAC | Online Public Aceess Catalouge |
| PUBMED | Public Medline |
| RRRLF | Raja Ram Mohan Roy Library Foundatin |
| SDI | Selective Dissemination of Information |
| UGC | University Grant Commission |
| UNESCO | United Nation's Educaitonal, Scientific and Cultural Organization |
| UDC | Universal Decimal Classifcation |
| WHO | World Health Organization |

# प्रकरण १ ले
# प्रस्तावना

## प्रस्तावना

मानवाच्या व्यक्तीमत्व विकासामध्ये शिक्षणाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. व्यक्तीच्या बौध्दीक, मानसिक, शारिरीक, भावनिक व सामाजिक विकासाला जे कारणीभूत होते ते ज्ञान म्हणजे शिक्षण होय. शिक्षण ही विविध उपयोगी प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे ग्रंथालयाचा उपयोग वाढतो. ज्ञान माहिती आणि तंत्रज्ञानाचे वहन समाजाकडे होताना ग्रंथालय महत्वाची भूमिका बजावते.

महाराष्ट्र हे विद्येचे माहेरघर असलेने येथे शिक्षणाला अत्यंत महत्व आहे. येथे अनेक शिक्षण संस्था कार्यरत आहेत. माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये महाराष्ट्र अग्रेसर बनत आहे. **(दास्ताने, १९९८)**

महाराष्ट्राला ऐतिहासीक आणि शैक्षणिकदृष्ट्या खूप महत्व आहे. शिक्षण म्हणजे 'मानवाला जी स्वावलंबी व निस्वार्थी बनविते त्यास शिक्षण म्हणावे' अशी ऋग्वेदामध्ये शिक्षणाची व्याख्या केली आहे. **(जाधव, २०१२)**

समाजामध्ये आरोग्य शिक्षणाला अनन्य साधारण महत्व आहे. वैद्यकिय शिक्षण हे आयुर्वेदीक, होमिओपॅथीक, ॲलोपॅथीक या वेगवेगळ्या पध्दतीतून देता येते. वैद्यकिय शिक्षणातून उत्कृष्ठ वैद्यक घडविणे हा महत्वाचा उद्देश असतो. प्राचीन काळापासून ऋषी-मुनीनी लिहिलेल्या धर्म-ग्रंथ, देव, उपनिषदातून आयुर्वेद शिक्षणास फार महत्व असल्याचे दिसून येते. तथापी सध्याचे आयुर्वेद शिक्षण फार गतीशील झाल्याचे दिसून येते. समाजाचा आयुर्वेदाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत आहे.

भारतातीलच नव्हे तर परदेशातील विद्यार्थी देखील आयुर्वेदाकडे आकृष्ट झाल्याचे दिसून येते. Ayurved can be described as the science which imports knowledge of Life.




**आकृती क्र. १.१ वैद्यकिय शिक्षणाच्या पध्दती.**

हिता ऽ हित सुख दुःखामायुस्तस्य हिता ऽ हितम।

सात व यरीक्त आयुर्वेदःस उच्चते।

आयुर्वेद हा संस्कृत भाषेतील शब्द असून त्याचा संधी विग्रह आयु + वेद म्हणजेच जीवन + विद्या असा होतो. **(जोशी, १९७६)**

ज्या शास्त्रात आयुष्याबद्दलचे ज्ञान आहे किंवा ज्या शास्त्राच्या उपयोगाने आयुष्य प्राप्त करून घेता येते. ते शास्त्र म्हणजे 'आयुर्वेद'. भारतात प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या वैद्यकिय ज्ञानाची कल्पना आयुर्वेद आणि त्यासारख्या विद्याशाखांमधून येते. आयुर्वेदाला सुमारे ३००० वर्षापासून चालत आलेली व्यापक आणि उत्तुंग परंपरा आहे. आयुर्वेद हा अथर्ववेदाचा एक घटक समजला जातो. तथापी विशेषतः गौतम बुध्द यांच्या आणि त्यानंतरच्या काळात, आयुर्वेदामध्ये अनेक महत्वपूर्ण गोष्टींची भर घालण्यात आली. समुद्र-मंथनातून निघालेले भगवान धन्वंतरी हे आयुर्वेदातील परंपरेनुसार आद्य मानले जातात.

आयुर्वेदाची आठ अंगे आहेत.

१) कायाचिकित्सा २) बालरोग व स्त्रीरोग चिकित्सा ३) शल्यचिकित्सा ४) शालाक्यचिकित्सा ५) दंषचिकित्सा ६) गृहचिकित्सा ७) जरेची चिकित्सा ८) वाजीकरण या सर्वांना मिळून आष्टांग आयुर्वेद असे म्हणतात. (www.ayurbalance.com)




**आकृती क्र. १.२ आष्टांग आयुर्वेद.**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना ३ जून १९९८ मध्ये नाशिक येथे करण्यात आली. या विद्यापीठाचा मुख्य उद्देश आरोग्य विद्यापीठाचा दर्जा उंचावणे, गुणवत्तायुक्त वैद्यकिय शिक्षण देणे आणि संशोधनास प्रोत्साहन देणे हा आहे.

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार यांनी आयुर्वेदातील संशोधनासाठी "सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन आयुर्वेदा ॲन्ड सिद्धा" हा स्वतंत्र विभाग निर्माण केला आहे. या विभागाची देशात वेगवेगळ्या शहरामध्ये ३३ रिसर्च सेंटर्स आहेत. या विभागाने मोठ्या प्रमाणावर आयुर्वेदातील साहित्य प्रकाशित केले आहे. भारतातील सर्व आयुर्वेद महाविद्यालये व संशोधन केंद्र या विभागांशी संलग्न आहेत. भारतात अनेक विद्यापीठीमध्ये व आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये संशोधनाचे व ज्ञानदानाचे कामकाज चालते.

आयुर्वेदाची परंपरा जतन करणाऱ्या महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक ६३ आयुर्वेद महाविद्यालये आहेत, तर देशात २५४ आयुर्वेद महाविद्यालये आहेत.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वैद्यकिय व अन्य क्षेत्रात वेळोवेळी होणाऱ्या घडामोडींची माहिती विविध प्रसारमाध्यमाव्दारे तसेच माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गरजू, अभ्यासू, संशोधन, विद्यार्थी तसेच वाचकांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ग्रंथालयाची आहे. आजची ग्रंथालये ही केवळ ग्रंथालये राहिली नसून त्यांना "माहिती व संदर्भ केंद्र" म्हणून कार्य करावे लागत आहे.

ग्रंथालये ही आपल्या संस्कृती व इतिहासाची रक्षण कर्तेच आहेत. ग्रंथालयाचा विकास व विस्तार हा अनौपचारीक व अविरत शिक्षणाचा एक भाग आहे. ज्ञान व माहितीच्या प्रसारणात त्यांना असाधारण असे महत्व प्राप्त झाले आहे. माहिती विज्ञानयुगामुळे विविध क्षेत्रात अनेक विषयात संशोधन होत आहे. नवसमाज निर्मिती साठी ग्रंथालयांची भूमिका महत्वाची आहे. ग्रंथालयांच्या तांत्रिक विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. ग्रंथालयातील संशोधनामुळे उपलब्ध होणाऱ्या नवनवीन माहिती मधून ग्रंथालयाच्या विकासाला चालना मिळू शकेल म्हणून ग्रंथालय सद्यस्थितीचा व सेवांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत संशोधन कार्याने महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांच्या कामकाजामध्ये तसेच विकासामध्ये सुधारणा होवू शकेल. तसेच ग्रंथालयांच्या सुसंघटीत व नियोजनबद्ध विकासासाठी याची मदत होवू शकेल व ग्रंथालयांची सद्यस्थितीची कल्पना येईल म्हणून ग्रंथालय सद्यस्थितीचा व सेवांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## १.१ संशोधन विषयाची निवड

संशोधकाने प्रथम कोणत्या विषयाचा अभ्यास करावयाचा आहे हे निश्चित केले पाहिजे. शास्त्रीय अभ्यास पध्दतीतील पहिली पायरी म्हणजे समस्या निश्चित करणे होय. समस्या निश्चित न करता संशोधनाची सुरूवात ही शक्य नसते. म्हणून संशोधकाने संशोधनासाठी निश्चित केलेल्या समस्या नेमक्या शब्दांत मांडणे आवश्यक असते.

संशोधकाने या ठिकाणी 'महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास' हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

'आयुर्वेद हे फार प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याने आयुर्वेदिक औषधांना फार महत्व आहे. या महाविद्यालयांतील ग्रंथालयांचा विकास कसा झाला होत गेला आणि ग्रंथालयांची सद्यस्थिती काय आहे हा अभ्यास या संशोधनात अभिप्रेत आहे. नवनवीन माहिती मिळविण्यासाठी विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधकांना हि ग्रंथालये माहितीचे, ज्ञानाचे महत्वपूर्ण केंद्र आहे. म्हणून प्रस्तुत संशोधन कार्य उद्दिष्टांना अनुसरून केले जाणार आहे.

आयुर्वेद या ज्ञानशाखेचा उगम भारतात ३००० वर्षापूर्वी झाल्याचे दिसते. आयुर्वेदावर भारतात मोठ्या प्रमाणावर साहित्य उपलब्ध आहे. ग्रंथालयात येणाऱ्या विविध प्रकारच्या वाचकांना सेवा देताना आयुर्वेदाच्या ग्रंथालयापुढे विविध, अनेक प्रकारच्या समस्या निर्माण

होत आहेत. त्याची माहिती घेणे, त्यावर आवश्यक त्या उपाय योजना व योग्य शिफारशी करणे आवश्यक वाटल्याने या संशोधन विषयाची निवड केली आहे.

## १.२ संशोधन विधान

"महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास" हा संशोधन विषय संशोधनासाठी निवडला आहे. संशोधनाच्या दृष्टीने या संशोधन विषयाचा शोध घेतला आहे. या विधानातील कार्यात्मक व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

**महाराष्ट्र राज्य**

पृथ्वीतलावर आशिया खंडातील भारत एक खंडप्राय देश आहे. या देशात २८ घटकराज्ये व केंद्रशासीत प्रदेश आहेत. या घटक राज्यांमधील महाराष्ट्र एक राज्य आहे. समर्थ उद्योग प्रकाशनाने प्रकाशीत केलेल्या 'पर्यटन मार्गदर्शिका महाराष्ट्र' मध्ये महाराष्ट्राबाबत पुढील माहिती दिलेली आहे. जगाच्या नकाशात महाराष्ट्र राज्याचे अक्षांश हे १५ ग उत्तर ते २२.१ उत्तर दिले आहे. रेखांश हे ७२.६ पूर्वते ८०.९ पूर्व असे दिले आहे. मराठी भाषेच्या आधारे १ मे १९६० या दिवशी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आहे. मराठी ही या राज्यातील बहुसंख्य लोकांची मातृभाषा आहे. वा. गो. आपटे यांनी अनमोल मराठी शब्द रत्नाकर या ग्रंथात महाराष्ट्राची मराठी लोकांचा देश अशी व्याख्या केली आहे. **(आपटे,२००५)**

**आयुर्वेद**

आयुर्वेद हा संस्कृत भाषेतील शब्द असून त्याचा संधीविग्रह (आयुः) जीवन + विद्या (वेद) अशा प्रकारे होती. "ज्या शास्त्रात आयुष्याबद्दलचे ज्ञान आहे. किंवा ज्या शास्त्राच्या आधारे उपयोगाने आयुष्य प्राप्त करून घेता येते ते शास्त्र म्हणजे आयुर्वेद.

आयुर्वेदाची उत्पती ही हिंदूधर्माशी संबंधित मुख्य चार वैदापैकी एक अथर्ववेद या इसवी सनपूर्व सुमारे १२०० मध्ये रचल्या गेलेल्या वेदामधून झाली आहे. **(रानडे, १९८५)**

आयुर्वेद हे भारताचे वैशिष्ट्यपूर्ण असे वैद्यकशास्त्र असून ते पृथ्वीवरील सर्वात प्राचीनतम असे वैद्यकशास्त्र आहे तसेच "आयुर्वेद म्हणजे आयुष्याचे ज्ञान देणारे शास्त्र." **(परांजपे,१९८५)**

आयुर्वेद – 'आयु' म्हणजे आयुष्य आणि 'वेद' म्हणजे सम्यक ज्ञान म्हणून आयुर्वेद हे आयुष्य निरामय आणि आनंदी करण्याचे परीपूर्ण आणि सम्यक शास्त्र आहे. **(तांबे, २०१०)**

**संशोधन विधान**

'शुभं करोती कल्याणम् आरोग्यम् धनसंपदा' या संध्याश्लोकाला भारतात विशेषतः महाराष्ट्रात वेगळे महत्व आहे. प्राचीन काळापासून महाराष्ट्रात आयुर्वेद ही वैद्यक प्रणाली अस्तीत्वात आहे. आयुर्वेद ही स्वतंत्र शाखा झाली असून त्याच्याविषयी शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था व कॉलेजेस महाराष्ट्रात विपुल प्रमाणात आहेत. त्यातून आज नवीन-नवीन आयुर्वेद तज्ञ निर्माण होत आहेत. **(जोशी, १९७६)**

**महाविद्यालयीन ग्रंथालये**

हा शैक्षणिक ग्रंथालयाचा एक प्रकार आहे. वैद्यकिय महाविद्यालयीन ग्रंथालय हा एक प्रयोग शाळाच समजली जाते. वैद्यकिय ग्रंथालये ही शिक्षणप्रक्रियेमध्ये महत्वाची भूमिका बजावतात. वैद्यकिय शिक्षणाचा हेतू असा आहे कि, वैद्यकिय शिक्षणाची माहिती व ज्ञान की ज्यावर विद्यार्थ्यांच्या स्मूती आणि सराव करण्यासाठी ते अद्ययावत प्रगतीसाठी ग्रंथालयावर अवलंबून असतात. त्यांच्यासाठी ग्रंथालय हे एक साधन म्हणून करते. सेवा करते. महाराष्ट्रातील ६३ आयुर्वेद महाविद्यालयांची ग्रंथालये सदर संशोधन अभ्यासासाठी घेतली आहेत.

**अभ्यास**

महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयाचा अभ्यास सदर संशोधनासाठी करण्यात आलेला आहे. त्यापैकी ५१ आयुर्वेद ग्रंथालयाची सद्यस्थितीचा अभ्यास तसेच मागील १० वर्षातील स्थितीची माहिती मिळाली आहे. यामुळे आयुर्वेद ग्रंथालयाचा शैक्षणिक विकास झाला आहे याची माहिती मिळते.

**संशोधन समस्या**

'महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास' ही संशोधन समस्या सदर संशोधकाने या संशोधन कार्यासाठी निवडली आहे.

हा संशोधन विषय निवडण्याबाबतची काही कारणे आहेत. यामध्ये सदर संशोधकास या विषयाबाबत आवड आहे. सदर संशोधकाने २००८ साली 'महाराष्ट्र आरोग्य विज्ञान

विद्यापीठांशी संलग्न असलेल्या पुणे जिल्ह्यातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील नियतकालीकांचा वापर' हा विषय टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या अभ्यासकेंद्रात एम. फिल. साठी निवडला होता. पुणे जिल्ह्यातील आयुर्वेद ग्रंथालयातील नियतकालीकांचा अभ्यास या निमित्ताने चांगला झाला आहे.

सदर संशोधन समस्येबाबत राज्यपातळीवर संशोधन व्हावे, महाराष्ट्रातील आयुर्वेद ग्रंथालयांचा सखोल अभ्यास व्हावा, आयुर्वेद ग्रंथालयाची सद्यस्थिती काय आहे. आयुर्वेद ग्रंथालयात आधुनिकीकरणाचा प्रभाव झाला आहे कि नाही, तसेच आयुर्वेद ग्रंथालयात काय-काय समस्या आहेत हे जाणून घेण्यासाठी, या ग्रंथलयाचा सर्वागीण अभ्यास होवून, त्यांच्यात होणाऱ्या विकासाची, सेवा-सुविधांची माहिती व्हावी, त्यात सुधारणा घडवून आणणेसाठी उपाययोजना कराव्या म्हणून सदर संशोधकाने या संशोधन समस्येची निवड केली आहे.

## १.३ संशोधन विषयाचे महत्व

महाराष्ट्रात आवश्यकतेनुसार वैद्यकिय आयुर्वेद महाविद्यालये स्थापन होत आहेत. ही महाविद्यालये शासकीय तसेच खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविली जातात.

सध्याच्या माहिती व विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात त्याला अनुसरून ग्रंथालयातून वाचकांना सेवा देताना निर्माण होणाऱ्या अडचणींचा, समस्यांचा अभ्यास होणार आहे. सदर महाविद्यालयांच्या ग्रंथालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा-सुविधा यांचे मुल्यमापन व अभ्यास संशोधनाव्दारे होणे गरजेचे असल्याने संशोधकाने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

प्रस्तुत संशोधनातून मिळणारे निष्कर्ष हे भविष्यकाळासाठी अत्यंत उपयोगी असतील. संशोधनामुळे व्यावहारीक जीवनातील समस्या सोडविण्यास मदत होते. अशा संशोधनाचे महत्व समाजाच्या विकासासाठी किंवा प्रगतीसाठी मोलाचे असते. शिक्षण क्षेत्रात ग्रंथालयांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. ग्रंथालये जेवढी समृध्द असतील आणि सेवकवर्ग जेवढा तत्पर सेवा देणारा असेल तेवढा शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होते.

या संशोधनातील निष्कर्षाचा उपयोग ग्रंथपाल, शिक्षक व विद्यार्थी वाचकांना तसेच नवोदित संशोधकांना होईल. ग्रंथालयांना अद्ययावत करणे माहिती व जनसंपर्काचे साधन बनविणे आजच्या युगात महत्वाचे आहे. अशा वेळी ग्रंथालयातील घटकांशी सबंधित संशोधनामुळे ग्रंथालयांच्या विकासाला चालना, गती मिळण्यास मदत होईल.

## १.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये

आधुनिक काळात विविध विषयांच्या माहिती मध्ये, ज्ञानामध्ये सातत्याने भर पडत आहे. आणि ही माहिती वाचकापर्यंत पोहचविण्याचे कार्य ग्रंथालयांना करावे लागत आहे. महाविद्यालयीन दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करीत असतात. आणि म्हणूनच महाविद्यालयातील ग्रंथालयांना शिक्षणाचा आत्मा म्हंटले जाते.

संशोधन क्षेत्रात संशोधन करताना प्रथम संशोधीत समस्येची उद्दीष्टे निश्चित करावी लागतात. एका अर्थाने उद्दीष्ट विरहीत संशोधन म्हणजे दिशाहीन संशोधन होय. म्हणून उद्दीष्टे जितकी स्पष्ट असतील तितकी संशोधनास अचुक दिशा प्राप्त होते. संशोधक आपल्यासमोर काही उद्दीष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक ती माहिती संकलित करतो काही संशोधनाची उद्दीष्टे अनेक असतात व उद्दीष्टाच्या अनुषंगाने संशोधकाला आपले संशोधन पूर्ण करावे लागते.

‘महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास’ या विषयावरील संशोधन करण्यासाठी संशोधकाने पुढील उद्दीष्टे निश्चित केली आहेत.

१) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

२) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांतील विविध समस्यांचा शोध घेणे.

३) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो का याचा शोध घेणे.

४) ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह, वाचक, आणि सेवा यांचा अभ्यास करणे.

## १.५ संशोधनाची गृहीतके

गृहीतक म्हणजे संशोधन समस्येचे मानलेले उत्तर होत किंवा गृहित धरलेले असते. गृहीतकाला इंग्रजीमध्ये “Hypothesis” असे म्हंटले जाते. Hypo म्हणजे गृहीत धरणे व Thesis म्हणजे प्रमेय म्हणून Hypothesis चा अर्थ गृहीत धरलेले प्रमेय असा होतो.

१) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांनी आपली पारंपारीक भूमिका बदलून आधुनिक पध्दतीने सेवा देत आहेत.

२) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयात नवीन तंत्रज्ञान व साधनांचा समावेश होत आहे.

## १.६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा निश्चित केल्याने अभ्यासाचे क्षेत्र, कालावधी निश्चित करता येतो. संशोधकाने आपले क्षेत्र मर्यादीत केले असून संशोधनाची व्याप्ती व मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित केल्या आहेत. ज्या महाविद्यालयाकडून प्रश्नावली भरून मिळाल्या त्यांची यादी पुढे दिली आहे. बी. ए. एम. एस. आयुर्वेद महाविद्यालयांची यादी जोडलेली आहे तसेच एकूण ६३ आयुर्वेद महाविद्यालयांची यादी परिशिष्टामध्ये जोडली आहे.

१) या संशोधन कार्यासाठी महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयाची निवड केलेली आहे. या महाविद्यालयांच्या ग्रंथालयापुरते हे संशोधन कार्य मर्यादीत आहे.

२) या महाविद्यालयांतील माहे एप्रिल २००१ ते मार्च २०११ अशी १० वर्षे या कालावधीतील माहिती संकलित केलेली आहे.

**आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांची नावे व ठिकाण**

| अ.न. | ग्रंथालयाचे नाव | ठिकाण | स्थापना |
|---|---|---|---|
| १ | भारती विद्यापीठाचे आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | कात्रज पुणे | १९९० |
| २ | टिळक आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | पुणे | १९३३ |
| ३ | अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | पुणे | १९३६ |
| ४ | आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय गणेशवाडी | नाशिक | १९५४ |
| ५ | श्री. जी. एस. जी. आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | अहमदनगर | १९१७ |
| ६ | के. व्ही. टी. आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | धुळे | १९७२ |
| ७ | वसंतदादा पाटील आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | सांगली | १९८१ |
| ८ | आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | अहमदनगर | १९९१ |
| ९ | सुमतीबाई शाह आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | पुणे | १९९० |
| १० | कॉलेज ऑफ आयुर्वेद ॲन्ड रिसर्च सेंटर ग्रंथालय | पुणे | १९९० |
| ११ | एस. एस. टी. चे आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | अहमदनगर | १९९२ |
| १२ | सिध्दकला आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | अहमदनगर | १९९२ |
| १३ | आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | वाघोली | १९९८ |
| १४ | सी. एस. एम. आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | औरंगाबाद | १९८९ |
| १५ | शासकीय आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | उस्मानाबाद | १९८६ |

| अ.न. | ग्रंथालयाचे नाव | ठिकाण | स्थापना |
|---|---|---|---|
| १६ | सेठ सी. एम. आर्यगल वैद्यक महाविद्यालय ग्रंथालय | सातारा | १९१३ |
| १७ | सेठ जी. आर. ए. आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | सोलापूर | १९६७ |
| १८ | यशवंत आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | कोल्हापूर | १९८९ |
| १९ | आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय पेठवडगाव | कोल्हापूर | १९८९ |
| २० | गंगा ए. सो. चे आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय रंकाळावेस | कोल्हापूर | १९८९ |
| २१ | के. सी. अजमेरा आयुर्वेदमहाविद्यालय ग्रंथालय | धुळे | १९९० |
| २२ | दादासाहेब एस. एन. आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | धुळे | १९८९ |
| २३ | चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | जळगाव | १९८९ |
| २४ | आर. ए. पोदार आयुर्वेद महाविद्यालय | मुंबई | १९४१ |
| २५ | के. जी. मित्तल पुनर्वसु आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | मुंबई | १९५४ |
| २६ | येरळा मिडीकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | मुंबई | १९९१ |
| २७ | आर. जे. व्ही. एस. आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | सिंधुदुर्ग | १९८४ |
| २८ | नालासोपारा आयु. महाविद्यालय ग्रंथालय | ठाणे | १९९२ |
| २९ | शासकीय आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | नागपूर | १९६५ |
| ३० | श्री. आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | नागपूर | १९५६ |
| ३१ | राधाकृष्ण तोष्णीवाल आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | अकोला | १९५५ |
| ३२ | विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | अमरावती | १९३१ |
| ३३ | श्री. गुरूदेव आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | अमरावती | १९५९ |
| ३४ | डी. एम. एम. आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | यवतमाळ | १९६१ |
| ३५ | ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | अकोला | १९८९ |
| ३६ | लेप्ट एस. आर. सी. आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | बुलढाणा | २००० |
| ३७ | पद्मश्री व्ही. व्ही. पाटील आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | अहमदनगर | १९९६ |
| ३८ | श्री. सप्तशृंगी आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | नाशिक | १९९९ |
| ३९ | कॅप्टन केदारी रेडेकर आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | कोल्हापूर | १९९९ |
| ४० | डॉ. डी. वाय पाटील आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | पिंपरी पुणे | १९९९ |

| अ.न. | ग्रंथालयाचे नाव | ठिकाण | स्थापना |
|---|---|---|---|
| ४१ | शासकीय आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | नांदेड | १९५६ |
| ४२ | ज्युपीटर आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | नागपूर | २००१ |
| ४३ | आण्णासाहेब डांगे आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | आष्ठा | १९९९ |
| ४४ | मांजरा आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | लातूर | २००० |
| ४५ | धन्वंतरी आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | लातूर | २००० |
| ४६ | आश्वीन ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालय | अहमदनगर | २००० |
| ४७ | रामराव पाटील आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | परभणी | २००० |
| ४८ | लोकनेते आर. बी. पाटील आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | इस्लामपूर | २००१ |
| ४९ | रूरल इन्स्टीट्यूट ऑफ आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | मायणी | २००४-०५ |
| ५० | जे. जे. मगदूम आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | कोल्हापूर | २००१-०२ |
| ५१ | महिला उत्कर्ष प्रतीष्ठानचे आयुर्वेद कॉलेज ग्रंथालय | वासीम | २००७-०८ |

**संशोधनासाठी नमुना निवड -**

संशोधनात संशोधन आराखड्याच्या निर्मितीनंतर नमुना निवड महत्वाची असते. संशोधकाला विषयासबंधी माहितीचे सबंधित घटकाकडून संकलन करणे आवश्यक असते. सर्व घटकांपर्यंत पोहचवणे शक्य होत नाही म्हणून काही प्रातीनिधीक घटकांची निवड करून त्याला त्यांच्याकडून माहिती मिळविणे शक्य होते. प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची निवड केलेली आहे. संशोधनासाठी माहिती संकलीत करण्यासाठी ग्रंथपाल, विद्यार्थी व प्राध्यापकांना प्रश्नावली देवून माहिती संकलीत केली आहे. त्यासाठी मॉर्गन टेबलच्या सहाय्याने नमुना निवड केले आहे. **(क्रेझी आणि मॉर्गन १९७०)**

| N | S | N | S | N | S |
|---|---|---|---|---|---|
| 30 | 28 | 260 | 155 | 1600 | 310 |
| 35 | 32 | 270 | 159 | 1700 | 313 |
| 40 | 36 | 280 | 162 | 1800 | 317 |
| 45 | 40 | 290 | 165 | 1900 | 320 |
| 85 | 70 | 440 | 205 | 4000 | 351 |
| 95 | 76 | 480 | 214 | 5000 | 357 |
| 100 | 80 | 500 | 217 | 6000 | 361 |

**Note.-** N is population Size, S is sample Size

## १.७ संशोधन पध्दती

१) संशोधन म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी घेतलेला शोध – चार्ल्स बुशा व स्टीपन हार्टर.

२) संशोधन म्हणजे अत्यंत पध्दतशीरपणे घेतलेला सत्याचा किंवा अज्ञानाचा शोध – एम, एच. गोपाल.

३) सत्य शोधनाची पध्दती म्हणजे संशोधन - मुडी.

४) संशोधन म्हणजे नवीन ज्ञान मिळविण्यासाठी केले जाणारे पध्दतशीर प्रयत्न होत.

लेहमन आणि मोरी, (**सुतार, २०११**)

५) संशोधन म्हणजे एखाद्या विषयांतर्गत वैशिष्ट्ये जाणण्यास केलेला व्यापक स्वरपाचा शोध होय. (**कोण्णूर आणि माणगावकर, २००८**)

- Research Methodology Means "Research methods or techniques refer to the methods, the researchers use in performing reseach operation" **(Kothari, 2004)**
- The term 'Methodology' means "The techniques and frames or reference by which researchers approach and carry act an enquiry." **(Busha, Harter 1980)**
- वस्तुस्थिती जाणून घेणेसाठी एखाद्या विषयाचा बारकाईने केलेला समीक्षात्मक अभ्यास किंवा वैज्ञानिक चिकित्सा म्हणजे संशोधन होय. (**जोशी आणि महाले, २००७**)

डब्ल्यु बेस्ट यांच्या मते, खऱ्या अर्थाने संशोधन म्हणजे वैज्ञानिक पध्दती प्रत्यक्षात कार्यान्वीत करण्याची अधिक नियमबध्द, आकारबध्द, सुव्यवस्थीत आणि सखोल अशी प्रक्रिया आहे.

संशोधनाचे प्रमुख दोन प्रकार आहेत.

१) मुलभूत संशोधन

२) उपयोजित संशोधन

कोणत्याही ज्ञानशाखेत मूलभूत तत्वे प्रस्थापीत करण्याचे काम मूलभूत संशोधनातून होते. मुलभूत संशोधनाच्या आधारे मानवी गरजांची पूर्तता करण्यासाठी साधानांची निर्मिती उपयोजित संशोधनातून केली जाते.

## १) ऐतिहासिक संशोधन पध्दती (Historical Research Method)

ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करताना पूर्वी किंवा ऐतिहासिक काळातील माहिती जाणून घेणेसाठी संशोधन करावे लागते. ऐतिहासिक संशोधन घडलेल्या घटनांचा विचार करते. संशोधक हा भूतकालीन घटनांचा मागोवा घेवून त्याचे सम्यक दर्शन घडवित असतो. ग्रंथालयशास्त्राचा विचार करताना ऐतिहासिक पध्दतीचा उपयोग जास्त होत नाही.

प्राचीन काळाची ग्रंथालयाची व्यवस्था व ग्रंथनिर्मीती मुद्रण वगैरे बाबी अभ्यासासच उपयुक्त ठरतात. कारण ग्रंथालयशास्त्र आता नवनवीन तंत्रज्ञानाने विकसित होत आहे.

ऐतिहासिक संशोधन पध्दती - अंतर्गत गुणविवेचन आणि बाह्य गुण विवेचन हे ऐतिहासिक संशोधन पध्दतीची संबंधित असते.

**ग्रंथालय व माहितीशास्त्रामध्ये ऐतिहासिक संशोधनाचा उपयोग**

ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामध्ये खालील कारणांसाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला जातो.

१) ग्रंथालय प्रणाली आणि सेवांच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी.

२) ग्रंथालय संगणकीकरण, डिजीटल माध्यमे आणि डिजीटल ग्रंथालयाच्या ऐतिहासिक विकासाचा आढावा घेण्यासाठी.

३) ग्रंथालय आणि ग्रंथालय स्त्रोतांच्या विकासाचा अभ्यास करणेसाठी.

४) ग्रंथालय व्यवसायाच्या विकासाचा अभ्यास करणेसाठी.

५) नव्याने उदयास येणाऱ्या आंतरशास्त्रीय विषयाचा ग्रंथालय व माहितीशास्त्रावरील परिणामांचा अभ्यास करणेसाठी. (**सुतार, २०११**)

संशोधन ही एक बौध्दीक प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया समाज विज्ञान तसेच मानव्य विज्ञानात सुरू झाली संशोधन ही संकल्पना व्यापक आहे. जिज्ञासू वृत्तीने निर्माण झालेल्या समस्येतुन संशोधनाला सुरूवात होते. आणि समस्येचे विश्वसनीय प्रमाणभूत उत्तर मिळाले कि संशोधन प्रक्रियेचा शेवट होतो.

कोणत्याही विषयाचे संशोधन करीत असताना सर्वसाधारणपणे पुढील संशोधन पध्दतीचा वापर करावा लागतो.

## २) प्रायोगिक संशोधन पध्दती (Experimental Research Methods)

प्रायोगिक संशोधन हे भविष्यकाळाशी सबंधित असते. प्रायोगिक संशोधन पध्दतीत विशिष्ठ नियंत्रित परिस्थीतीत एवढ्या बदलत्या घटकाचा अभ्यास केला जातो व त्याद्वारे

निष्कर्ष काढले जातात. सामाजिक शैक्षणिक संशोधनासाठी प्रायोगिक पध्दतीचा अवलंब केला जातो. **(Hans Raj, 1984)**

### ३) वर्णनात्मक संशोधन पध्दती (Descriptive Research Methods)

वर्णनात्मक संशोधन पध्दती मध्ये कोणत्याही घटनेचा समाजाच्या, सामाजिक संस्थेचा किंवा एखाद्या उपक्रमाचा सद्यःस्थितीचा सर्वकष अभ्यास करून प्रगतीचा आढावा घेण्यात येतो. व विश्लेषण वर्णन करण्यात येते. सर्वेक्षण पध्दती सद्यस्थितीचा अधिक विचार करते. सर्वेक्षण पध्दतीलाच वर्णनात्मक पध्दती असे म्हणतात.

या संशोधनामध्ये खालील वैशिष्ट्ये आढळतात.

१) वस्तुनिष्ठपणे गोळा केलेली माहिती मिळते.

२) गोळा केलेल्या माहितीचे तंत्रज्ञान व विश्लेषण होते.

३) चिकित्सा होवून चिकित्सेला लाभलेली चिंतनाची पार्श्वभूमी समजते.

**वर्णनात्मक संशोधन पध्दतीचे प्रकार**

१) सहसबंध पध्दत

२) व्यक्ती अभ्यास पध्दत (केसस्टडी)

३) तुलनात्मक कार्यकारण पध्दत

४) सर्वेक्षण पध्दत

प्रस्तुत संशोधनासाठी सदर संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

**सर्वेक्षण पध्दत**

वर्तमानातील अवस्था सद्यस्थिती यांच्या अभ्यासासाठी जी पध्दत वापरली जाते ती म्हणजे सर्वेक्षण पध्दत होय. प्रचलित दृष्टीकोन, वाटचाल परिणाम यांचा अभ्यास या पध्दतीने होतो. या पध्दतीमध्ये सर्वसामान्य परिस्थीतीचा विचार केला जातो. मिळालेल्या माहितीचे व्यवस्थित संगठन, विश्लेषण आणि संकलन केले जाते. वर्तमानाच्या मोठ्या घटकाकडून माहिती मिळविणे हा या पध्दतीचा महत्वाचा विशेष आहे. संशोधक ज्या कालावधीत माहिती सकंलीत करणार तो कालावधी वर्तमानाचा वर्णन करण्याएवढा पुरेसा असावा लागतो.

समुहातील घटक, वस्तू यांचा स्वतंत्रपणे विचार न होता समूहाचा एकत्रितपणे विचार केला जातो. त्यासाठी सांख्यिकीचा वापर केला जातो. **(देशपांडे, २०००)**

वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये सत्यशोधक, तत्वचिंतन आणि ग्रंथालयीन शोध हे सर्व संशोधनाचे प्रकार समाविष्ट होतात.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक व ऐतिहासिक अशा दोन्ही पध्दतींचा वापर केलेला आहे.

सद्यस्थितीचा अभ्यास करणेसाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. त्यासाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आला आहे. काही ठिकाणी प्रत्यक्ष मुलाखतीच्या तंत्राचा अवलंब केलेला आहे. व मागील वर्षातील माहिती जाणून घेण्यासाठी ऐतिहासीक संशोधन पध्दती वापरलेली आहे.

## १.८ संशोधनाची कार्यपध्दती

सदर संशोधकाने संशोधन म्हणजे काय, संशोधन पध्दती संशोधनाची साधने व तंत्रे याबाबतची सखोल माहिती घेतली संशोधन साहित्याचा पुर्वाभ्यास, संशोधनाचा पुर्वाभ्यास केला. त्यांनी यासबंधित विषयाबाबत कोणकोणत्या पध्दती वापरल्या याची माहिती घेतली व सदर संशोधन कार्यास सुरूवात केली.

सदर संशोधकाने तज्ञांच्या मदतीने, मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल, विद्यार्थी व अध्यापक यांच्यासाठी प्रश्नावली तयार केल्या. ग्रंथपालासाठी मुलाखत अनुसूची तयार केली. आयुर्वेद ग्रंथालयांना भेटी देवून संशोधनाच्या अनुषंगाने ग्रंथपाल, विद्यार्थी, अध्यापक यांचेशी प्रत्यक्ष चर्चा केली. त्यांचेकडून प्रश्नावल्या भरून घेतल्या. ग्रंथालयाची पूर्वीची स्थिती कशी होती. मानवी व भविष्यातील स्थिती याबाबत त्यांची मते जाणून घेतली. तसेच काही ग्रंथालयांना मोबाईल व्दारे संपर्क साधून त्यांच्याकडून संशोधनाविषयी चर्चा करून ग्रंथपालाकडून माहिती मिळविली. प्रश्नावली पोस्टाने पाठविण्यात आल्या व प्रश्नावल्या भरून पाठविण्याची विनंती केली व आलेल्या सर्व माहितीचे संकलन केले.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागांना भेटी देऊन या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीशी चर्चा केली. त्यांचेकडून आयुर्वेद ग्रंथालयातील नवीन प्रवाहाबद्दल माहिती घेतली. ग्रंथालयाबाबत त्यांची मते जाणून घेतली. संशोधनाच्या अनुषंगाने माहिती घेतली. या मिळालेल्या माहितीचे योग्य पध्दतीने संकलन करून शास्त्रीय पध्दतीने प्रकरण क्रमांक ६ मध्ये विश्लेषण केले आहे. प्रकरण क्रमांक ७ मध्ये निष्कर्ष व शिफारशी मांडलेल्या आहेत.

## १.९ संशोधनाची माहिती संकलन साधने

संशोधनासाठी निवडलेल्या विषया संबंधी माहिती गोळा करण्यासाठी विविध तंत्राचा वापर करण्यात येतो. माहिती जर तपशिलवार सविस्तर असेल तर त्या माहितीच्या आधारे संशोधन व्यवस्थित करता येते. त्यामुळे संशोधकाचा वेळ, श्रम व पैसा इ. चा अपव्यय टाळण्यासाठी वस्तुनिष्ठ माहितीचे संकलन होणे आवश्यक आहे.

माहिती संकलन करणेसाठी संशोधक विविध साधनांचा वापर करीत असतो. माहिती संकलनासाठी खालील तंत्राचा वापर केला जातो.

१) प्रश्नावली.

२) मुलाखत.

३) निरीक्षण.

### १) प्रश्नावली

मोठ्या समूहाकडून लेखी स्वरूपात माहिती गोळा करण्यासाठी या तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. या पध्दतीत संशोधन कर्ता उत्तरदात्यांना प्रत्यक्ष प्रश्न विचारीत नाही. तर त्यांच्याकडे प्रश्नावली पाठविली जाते. उत्तरदाता त्या प्रश्नावलीतील उत्तरे स्वतः लिहीत असतो. संशोधन कर्ता प्रश्नावली स्वतः तयार करून पोस्टाने सबंधित उत्तरदात्याकडे पाठवितो. उत्तरदाते ती प्रश्नावली भरून संशोधन कर्त्याकडे परत पाठवितात. त्यामुळे संशोधन कर्ता कमी वेळात दूरवर असलेल्या भागातील उत्तरदात्याकडून माहितीचे संकलन करीत असतो. प्रश्नावली हे प्राथमिक तथ्य संकलनाचे एक महत्वाचा स्त्रोत आहे. प्रश्नावलीचे स्वरूप हे लिखित प्रश्न व उत्तर तसेच साक्ष निवेदकांच्या प्रक्रियातून स्पष्ट होते.

**प्रश्नावलीची व्याख्या**

१) **बोगार्डस, (Emory Bogerdus)** यांच्या मते प्रश्नावली म्हणजे विविध व्यक्तीला उत्तर देण्यासाठी तयार करण्यात आलेली एक तालिका होय.

"A questionaries is list of questions to a number a person for them answer."

२) **जोहॅम, ग्रॅस्टंग** यांच्या मते "लिखित प्रश्न व लिखित उत्तर म्हणजे प्रश्नावली होय.

३) **गुड व हंट :** 'सर्वसामान्यपणे प्रश्नावली हे प्रश्नाचे उत्तर मिळवण्याचे असे एक तंत्र आहे कि, ज्यात कागदावरील प्रश्नांची उत्तरे उत्तरदाता स्वतः भरत असतो.

केवळ कोणतीही प्रश्नांची यादी म्हणजे प्रश्नावली नव्हे तर "प्रमाणीकृत प्रश्नाच्या यादीला प्रश्नावली म्हणतात." समस्येबद्दल माहिती जमा करताना निरनिराळ्या प्रकारचे प्रश्न एकत्र करून त्या समस्येविषयी समग्र माहिती देणाऱ्या प्रमाणीकृत प्रश्नाची यादी तयार केली जाते. त्यानंतर ती अभ्यास घटकांकडे माहिती मिळविण्यासाठी पाठवली जाते.

अभ्यासकाचे, संशोधकाचे यश हे प्रश्नावलीच्या बांधणीवर बऱ्याच प्रमाणात अवलंबून असते. सामाजिक शास्त्रातील संशोधनात प्रश्नावलीचे स्थान मोठे आहे. **(आगलावे, २०००)**

**प्रश्नावलीचे फायदे**

१) प्रश्नावलीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे ह्या पध्दतीव्दारे फार मोठ्या व विशाल क्षेत्राचे सामाजिक संशोधन अथवा सर्वेक्षण करता येते.

२) संख्यात्मक माहिती मिळाल्याने विश्लेषण करणे सोपे होते.

३) संशोधकाच्या वेळेत खर्चात आणि श्रमात बचत होते.

४) प्रश्नावलीत प्रश्नकर्ता व उत्तरदाता ह्यांचा प्रत्यक्ष सबंध येत नाही. उत्तरदाता स्पष्ट व स्वतंत्र उत्तरे देऊ शकतो.

**प्रश्नावलीचे तोटे**

१) बऱ्याचवेळा प्रश्नावली भरून परत करण्याचे प्रमाण अत्यल्प असते.

२) प्रश्नावलीमध्ये सर्वसमावेशक प्रश्नांचा अभाव असतो.

३) संशोधकाशी प्रत्यक्ष संपर्क येत नसल्यामुळे उत्तरदात्याला उत्तरे देण्याची भावनात्मक प्रेरणा होत नाही.

४) प्रश्नावलीमध्ये मुक्त स्वरूपाचे प्रश्न विचारल्यास उत्तरदाता त्याच्या विवेक बुध्दीनुसार उत्तरे देतात. **(सुतार, २०११)**

**२) मुलाखत**

प्रयुक्त व्यक्तीचे समस्येच्या संदर्भात समोरासमोर बसून प्रत्यक्ष माहिती मिळवण्याचे प्रमुख साधन होय.

मुलाखतीला इंग्रजीमध्ये Interview असे म्हणतात. Inter म्हणजे अंत व view म्हणजे दृष्टी तेव्हा एक प्रकारची आंतरदृष्टी प्राप्त करून देणारे प्रभावी तंत्र म्हणून मुलाखतीचा उल्लेख करावा लागतो.

मुलाखतीत अभ्यासक व उत्तरदाता यांच्यात प्रत्यक्ष संवाद घडत असतो. ही एक विचारांच्या आदान प्रदानाची दुहेरी प्रक्रिया असते.

व्यक्तीच्या मनातील कोणतीही गोष्ट जाणून घ्यायचे असेल तर त्या करीता मुलाखत होणे आवश्यक आहे. मुलाखती व्दारेच व्यक्तीच्या भावना, विचार प्रवृत्ती इ. ची माहिती प्राप्त होते. **(आगलावे, २०००)**

**मुलाखतीची व्याख्या**

१) **पी, व्ही. यंग** – "मुलाखत ही अशी सुव्यवस्थीत पध्दती आहे कि, ज्यायोगे तुलनेने त्रयस्थ असलेल्या व्यक्तीच्या जीवनात अभ्यासक कल्पनाशक्तीच्या बळावर शिरत असतो."

२) **गुड व हंट** – "मुलाखत म्हणजे मूलतः सामाजिक आंतरक्रियांचीच प्रक्रिया आहे."

३) निरीक्षण - व्यक्ती वा व्यक्तीसमूहाला प्रत्यक्ष पाहून व्यवस्थीत नोंदी करण्याचे तंत्र होय.

प्रश्नावलीप्रमाणेच संशोधनात माहिती संकलनाच्या दृष्टीने निरीक्षणाला फार महत्व आहे. संशोधनाचा प्रारंभ निरीक्षणापासून होतो. निरीक्षण म्हणजे व्यावहारिक अर्थाने अवलोकन किंवा पाहणे होय. निरीक्षण हे नैसर्गिक असू शकते.

डॉ. एस. आर. रंगनाथन यांची फाईव्ह लॉज हे त्यांच्या स्वतःच्या निरीक्षणातून निर्माण झालेली देणगी आहे.

**निरीक्षणाची व्याख्या**

१) **पी, व्ही. यंग** – "पध्दतशीरपणे पाहणे व त्याचबरोबर पाहिलेल्या घटनांची चिकित्सा करणे म्हणजे निरीक्षण होय."

२) **सी, ए. मोझर** – "प्रामुख्याने कान आणि वाणी याहून डोळ्यांचा स्वतंत्र उपयोग करणे म्हणजे निरीक्षण होय."

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी माहिती संकलित करण्यासाठी ग्रंथपाल, विद्यार्थी व प्राध्यापकांना प्रश्नावली देवून माहिती संकलीत केली आहे.

## १.१० माहिती संकलन स्त्रोत

माहिती संकलन ही संशोधनाच्या एकूण आयोजनातील एक शिस्तबध्द प्रक्रिया आहे. ज्या गोष्टींच्या आधारे आपल्याला निर्णय घेता येतो तिला माहिती असे म्हंटले जाते.

संकलित केलेल्या माहितीच्या आधारे सबंधित विषयावर चर्चा करता येते. आणि चिकित्सेअंती निष्कर्ष काढता येतात. ज्या वस्तू स्थितीदर्शक तपशीलाच्या आधारे या क्रिया पार पाडता येतात तिला माहिती म्हणावे. माहिती मिळविण्यासाठी खालील स्त्रोतांचा विचार करावा लागतो.

अ) प्राथमिक माहिती स्त्रोत ब) व्दितीयक माहिती स्त्रोत हे दोन स्त्रोत आहेत.

लक्ष्य समूह या आकाराचे फार मोठा असल्यास माहिती जमा करणेसाठी ज्या समुहाचा किंवा साधनाचा योग्य वापर करतात त्याला माहितीचा स्त्रोत म्हणतात.

**अ) प्राथमिक माहिती स्त्रोत**

प्राथमिक स्त्रोत याचा अर्थ प्रत्यक्ष पाहिलेल्या, अनुभवलेल्या घटना होय. जो त्या घटनेला प्रत्यक्ष साक्षी असतो किंवा त्या घटनेत सहभागी झालेला असतो त्याच्याकडून मिळालेली माहिती हे प्राथमिक स्त्रोत असते. प्राथमिक स्त्रोताचे लिखित व अलिखीत असे दोन भाग पाडले जातात. लिखित स्त्रोतामध्ये समकालीन कागदपत्रे, आत्मवृत्ते, सरकारी कागदपत्रे इ. चा समावेश होतो.

अलिखित स्त्रोतामध्ये भौगोलिक माहिती, पुराणवस्तूंचे अवरोध, शिलालेख, लोकवाङमय, नकाशे इ. चा समावेश होतो. जेव्हा प्राथमिक स्त्रोत नसतात त्यावेळेस दुय्यम स्त्रोत यांचा विचार केला जातो.

**संशोधनासाठी नमुना निवड**

प्रत्येक शास्त्राचा अभ्यास करताना ज्ञानवर्धनासाठी काही भागांचाच अभ्यास करावा लागतो. सर्व अभ्यासक्षेत्राचा अभ्यास करणे प्रत्यक्षात शक्य नाही म्हणून सीमीत भागांचा अभ्यास करण्याचा सोयीस्कर मार्ग म्हणजे नमुना निवड होय. उत्तम नमुना निवड या संकलनेकडे म्हणावे तितके लक्ष संशोधक देत नाहीत असे निदर्शनास आले आहे. **(पोखरापूरकर, २००७)**

“नावाप्रमाणेच नमुना म्हणजे समग्राचा लहानसा प्रतिनिधी होय.” – **गुड आणि हंट**

**पी, व्ही. यंग** – “ज्या समग्रातून नमुना निवडलेला असतो त्या समग्राचे लहान चित्र म्हणजे नमुना होय.”

नमुना निवडीच्या दोन पध्दती आहेत.

### अ) संभाव्यता नमुना निवड

संभाव्यता नमुना निवड पध्दती ही प्रातीनिधीक नमुना निवडीसाठी उपयुक्त अशी एकमेव नमुना निवड पध्दती आहे. संभाव्यता नमुना निवड पध्दतीचे वैशिष्ट्य असे कि, या पध्दतीत संपूर्ण अभ्यास क्षेत्रातील प्रत्येक घटकाचा नमुन्यात समावेश होण्याची संभावता काय आहे हे संशोधक सांगू शकतो.

### ब) असंभाव्यता नमुना निवड

संभाव्यता नमुना निवडीच्या बरोबर उलट असणारी नमुना निवड पध्दती म्हणून या पध्दतीचा उल्लेख करतात. यापध्दतीच्या नमुना निवडीत समग्रातील प्रत्येक घटकाला नमुना म्हणून निवडून घेण्याची संधी किंवा संभाव्यता काय राहील याविषयी काहीच ऋग्वेदात वर्तविना येत नाही. असंभाव्यता नमुना निवडीच्या पुढील काही पध्दती आहेत.

**(पोखरापूरकर, २००७)**

सदर अभ्यासकाने आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथपाल, अध्यापक, विद्यार्थी यांच्याकडून प्रश्नावल्या भरून घेतल्या. प्रश्नावलीच्या मार्फत माहिती संकलीत केली आहे. तसेच जिथे योग्य प्रतीसाद मिळेल तिचे मुलाखत घेवून ग्रंथपालांच्याकडून तसेच विद्यार्थी, अध्यापक यांच्याकडून माहिती मिळविली आहे. सदर माहितीचे विश्लेषण, प्रकरण क्र. ६ मध्ये केलेले आहे.

### ब) व्दितीयक माहिती स्त्रोत –

ज्या साधनात व्दितीयक स्वरूपाची माहिती नोंदविलेली असते, त्या ज्ञानसाधनाला व्दितीयक माहितीस्त्रोत म्हणावे.

१) संशोधनासाठी निवडलेली आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालये, ग्रंथालय व माहितीशास्त्राचे अभ्यासक्रम जेथे राबविले जातात तेथील ग्रंथालयातील संशोधना संबंधित संदर्भ पुस्तके, नियतकालिके, संशोधन अहवाल प्रबंधिका इ. संदर्भ साधनांच्या आधारे माहिती संकलन करणार आहे.

## १.११ माहिती संकलन, विश्लेषण सादरीकरण

माहिती संकलन ही संशोधनाच्या एकूण आयोजनातील एक शिस्तबध्द प्रक्रिया आहे. ज्या गोष्टींच्या आधारे आपल्याला निर्णय घेता येतो तिला माहिती असे म्हंटले जाते.

निर्माण झालेल्या परिस्थीतीची कल्पना आल्याशिवाय संशोधक या परिस्थीती बद्दल अनुमान करू शकत नाही. त्याचप्रमाणे प्राथमिक अनुमान हे बरोबर आहे किंवा नाही या निष्कर्षात पोहचणेसाठी संशोधकाला अधिक माहितीची गरज असते. गोळा केलेली माहिती तशीच्या तशी सादर करण्याजोगी नसते. माहिती विस्कळीत असते. त्या माहितीचा संक्षेप व तिचे संकलन केल्याशिवाय ती अर्थपुर्ण होवू शकत नाही. गोळा केलेल्या माहितीचे प्रथम विश्लेषण करून तिचा संक्षेप करावा लागतो. म्हणजे ती सादर करता येते. संकलनाची ही प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय संशोधकास केलेले अनुमान बरोबर आहे कि नाही हे कळू शकणार नाही. वस्तुस्थितीचा शोध हा माहितीच्या संकलनानंतरच शक्य आहे. माहिती संकलन ही संशोधनातील फार महत्वाची प्रक्रिया आहे.

माहितीचे विश्लेषण केल्यानंतर ती माहिती आकर्षक रीतीने सादर करावी लागते. माहितीचे सादरीकरण केल्यामुळे ती माहिती चटकन समजते व लक्षात राहते. त्यामुळे सादरीकरण जेवढे चांगल्या प्रकारे केले जाते तेवढी ती माहिती वाचकांच्या लक्षात येते व निष्कर्ष काढता येतात.

प्रस्तुत संशोधनात माहितीचे सादरीकरण हे टेबल, पायचार्ट, बारचार्ट याव्दारे केले गेले आहे. व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी काढल्या आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलीत करण्यासाठी ग्रंथपाल, विद्यार्थी व प्राध्यापकांना प्रश्नावली देवून माहिती संकलीत केली आहे. त्यासाठी मॉर्गन टेबलच्या सहाय्याने नमुना निवड केले आहे. **(क्रेझी आणि मॉर्गन १९७०)**

माहितीचे विश्लेषण करण्यासाठी संकलित केलेली विस्कळीत स्वरूपातील माहिती एकत्र गोळा केली जाते. माहितीचे विश्लेषण केल्याशिवाय वस्तुस्थितीचा बोध होत नाही.

माहिती विश्लेषणाचे दोन प्रकार आहेत.

१) संख्यात्मक माहिती विश्लेषण.

२) गुणात्मक माहिती विश्लेषण.

प्रस्तुत संशोधनात दोन्ही प्रकारचा वापर केला आहे. ग्रंथालयीन सेवा संदर्भात गुणात्मक विश्लेषण पध्दतीचा वापर केला आहे. तर ग्रंथाच्या वाढीच्या संदर्भात संख्यात्मक विश्लेषण पध्दतीचा वापर केला आहे.

## १.१२ अहवाल लेखन

संशोधन कार्याचे संपूर्ण विवरण एकाक्रमबध्द रीतीने लिखित स्वरूपात प्रस्तुत करावे लागते. यालाच संशोधन अहवाल म्हणतात. असा सुसंगत अहवाल अभ्यासासाठी फार उपयुक्त असतो संशोधक किंवा अभ्यासक अहवालाच्या व त्यातील निष्कर्षाच्या प्रामाण्याची पूनपरीक्षा करतात. अहवालाच्या निष्कर्षावर शासन व समाज नेते सुधारणेच्या व प्रगतीच्या योजना आखतात.

थोडक्यात संपूर्ण संशोधन कार्याचे लिखित विवरण म्हणजे संशोधन अहवाल होय.

संशोधकाने संशोधन पूर्ण केल्यानंतर ते परीक्षक, वाचक, अभ्यास ह्यांच्या दृष्टीने त्याचे लेखन करणे गरजेचे असते. संशोधन अहवालाचे प्रामुख्याने तीन विभागात लेखन केले जाते.

**विभाग १**

ह्या विभागात मुखपृष्ठ मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र, संशोधकाचे प्रतिज्ञापत्र, ऋणनिर्देश, अनुक्रमणिका, कोष्टकांची यादी, आकृत्यांची यादी इ. गोष्टी येतात.

**विभाग २**

ह्या विभागात संशोधन अहवालाची प्रकरण योजना प्रमुख प्रकरणांचा विचार येतो. सामान्यतः सात प्रकरणात हे लेखन केले जाते.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे - संशोधन पुर्वाभ्यास व वाचनसाहित्य शोध.

प्रकरण तिसरे - आयुर्वेदाचा इतिहास व विकास.

प्रकरण चौथे - आयुर्वेद ग्रंथालये आणि त्यांचे कार्य.

प्रकरण पाचवे - आयुर्वेद ग्रंथालयातील नवे प्रवाह.

प्रकरण सहावे - माहितीचे संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण.

प्रकरण सातवे - सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी.

**आदर्श अहवालाचे विशेष**

अहवालात संशोधनाचे उद्देश, कार्यपध्दती व तिचे फलित याची संपूर्ण माहिती असते. त्यामुळे या माहितीचा उपयोग शासन संस्थेला, सामाजिक संस्था तथा अभ्यासकांना होतो.

संशोधन अहवाल समाज नियोजनासाठी फार महत्वाचे व उपयुक्त असतात म्हणून अहवाल आदर्श व सर्वोत्कृष्ट असावा.

संशोधन अहवाल ही संशोधन प्रक्रियेची शेवटची व महत्वाची अवस्था आहे. म्हणून वरील सर्व गोष्टींचा समावेश हवा असावा प्रस्तुत संशोधनात संशोधन अहवाल लेखन ५ प्रकरणात समाविष्ट केलेले आहे.

## १.१३ प्रकरणीकरण (Conspectus of the study)

सदर संशोधन अभ्यास हा एकुण ७ प्रकरणांमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

**प्रकरण १ - प्रस्तावना**

या प्रकरणात सुरवातीलाच प्रस्तावना दिली आहे. या संशोधनाकडे सदर संशोधक कसा वळला याची माहिती दिली आहे. संशोधन विषय, संशोधनाची गरज व महत्व, संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्ट्ये दिली आहेत. संशोधनाची संशोधन पध्दती, कार्य पध्दती दिली आहे.

**प्रकरण २ - संशोधन पुर्वाभ्यास व वाचन साहित्य शोध**

या प्रकरणामध्ये संशोधकाने संशोधना सबंधित साहित्याचा आढावा घेतलेला आहे. ह्यामध्ये पुस्तके, संदर्भग्रंथ, नियतकालीके, संशोधनासबंधीत लेख, यापूर्वी झालेली विविध शैक्षणिक स्तरावरील संशोधने संशोधनाशी सबंधित एम. फिल. व पीएच. डी. स्तरावरील तसेच इतर संशोधन अहवाल यांचे अवलोकन केले.

**प्रकरण ३ - आयुर्वेदाचा इतिहास व विकास**

या प्रकरणामध्ये आयुर्वद, अर्थ व स्वरूप यांचा अर्थ सांगितला आहे. आयुर्वेदाचा आढावा घेतला आहे. भारतातील आयुर्वेदाविषयी माहिती दिली आहे. तसेच भारतातील व महाराष्ट्रातील वैद्यकिय शिक्षणाची माहिती दिलेली आहे. महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयातील उच्च शिक्षणाचे महत्व विशद केले आहे. यामध्ये आयुर्वेदाचा इतिहास उदय व विकास याविषयी माहिती दिली आहे.

**प्रकरण ४ - आयुर्वेद ग्रंथालये आणि त्यांचे कार्य**

या प्रकरणामध्ये प्रस्तावना ग्रंथालय संकल्पना, ग्रंथालयाचे प्रकार, आयुर्वेद ग्रंथालये व आयुर्वेद ग्रंथालयाच्या कार्याविषयी माहिती दिली आहे.

**प्रकरण ५ - आयुर्वेद ग्रंथालयातील नवे प्रवाह**

या प्रकरणात आयुर्वेद ग्रंथालयातील माहिती सेवा, वाचनसाहित्य संग्रह, माहिती प्रक्रिया ग्रंथालयाचे व्यवस्थापन इ. विषयी माहिती दिली आहे. तसेच या ग्रंथालयातील

ग्रंथपालांकडे आवश्यक कौशल्य त्यांना करावी लागणारी कामे यांचा आढावा घेण्यात आला आहे. या ग्रंथालयातील काही ग्रंथालयांना भेटी देवून ग्रंथपालाची मुलाखत घेतली आहे. प्रश्नावल्या भरून घेतल्या आहेत. आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात सेवा-सुविधा देण्यासाठी कोणकोणत्या नवीन माहिती साधनांचा प्रभाव झाला आहे याची माहिती दिली आहे.

**प्रकरण ६ - माहितीचे संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण**

या प्रकरणात संशोधकाने प्रश्नावल्या मुलाखती निरीक्षण यांच्या आधारे केलेल्या माहिती संकलनाचे विश्लेषण केलेले आहे. संकलीत माहितीचे गुणात्मक व संख्यात्मक स्वरूपात सादरीकरण केलेले आहेत तसेच काही ठिकाणी आलेखाव्दारे तसेच सारणीव्दारे माहितीचे सादरीकरण केलेले आहे.

**प्रकरण ७ - सारांश, निष्कर्ष व शिफारशी**

या प्रकरणात संकलीत केलेल्या माहितीच्या व तथ्यांच्या शास्त्रीय विश्लेषणातून सदर संशोधकाने निष्कर्ष काढले आहेत. हे निष्कर्ष वस्तुनिष्ठपणे मांडले आहेत. संशोधन कार्याचा आयुर्वेद ग्रंथालयांना तसेच संशोधनाना उपयोग होणेसाठी काही शिफारशी केल्या आहेत. संशोधनाच्या अनुषंगाने इतर समस्यांना स्पर्श न करता पुढील संशोधनासाठी नवीन येणाऱ्या संशोधकाना संशोधन कार्य पुढे चालू ठेवणेसाठी व संशोधन विषयाचा उपयोग होणेसाठी भविष्यवेध मांडला आहे.

## १.१४ समारोप

या प्रकरणामध्ये संशोधन विषयाबाबतची प्रस्तावना दिलेली आहे. यामध्ये संशोधनाचे महत्व व गरज संशोधन समस्यात संशोधनाची उद्दीष्ट्ये दिली आहेत. सदर संशोधनातून जे शोधून काढावयाचे आहे तेच उद्दिष्टांमध्ये दिलेले आहे. संशोधनाच्या निष्कर्षाप्रत जाण्यासाठी अनुभवातून समोर आलेली गृहीतके उद्दिष्टाखाली मांडली आहेत. विविध संशोधन पध्दतीची माहिती घेतली. हे संशोधन तात्विक व सामाजिक शालांतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात येत असल्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा आधार घेवून, माहिती संकलनासाठी प्रश्नावली व मुलाखत या संशोधन साधनांचा उपयोग केला. याबाबतची माहिती संशोधन कार्य पध्दतीमध्ये दिली आहे.

# संदर्भ सूची

१) **आगलावे प्रदीप** (२०००) संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे नागपूर : विद्या प्रकाशन पृ. क्र. २२.

२) **आपटे, वा. गो**. (२००५) अनमोल मराठी शब्द रत्नाकर पुणे : अनमोल प्रकाशन पृ. क्र. ४४५.

३) **कोण्णूर, एम. बी.** कोण्णूर सुजाता आणि माणगांवकर उषाप्रभा (नोव्हेंबर २००८) संप्रेषण डायमंड ग्रंथालय आणि माहितीशास्त्र कोश पुणे : डायमंड पब्लीकेशन्स पृ. ३०, २८१.

४) **जाधव, तुकाराम** महाराष्ट्र वार्षीकी २०१२ द युनिक ॲकॅडमी, पुणे.

५) **जोशी, लक्ष्मणशास्त्री** मराठी विश्वकोश खंड २ महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई १९७६ पृ. क्र. १४८.

६) **जोशी, अनंत आणि महाले संजीवनी** (मे २००७) संशोधन म्हणजे काय ? संशोधनाची व्याख्या मुक्त विद्यापीठीय संशोधन पहिले पुष्प नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक पृ. ८.

७) **तांबे, बालाजी** (२०१०) आयुर्वेद उवाच।। भाग १, ३ री आवृत्ती. बालाजी तांबे फाउंडेशन, कार्ला – ४१०४०५. पृ. क्र. ३७.

८) **दास्ताने, संतोष** : भारत एक पाहणी (१९९८), दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे ३०.

९) **देशपांडे, लिना** (२०००) सर्वेक्षण : एक संशोधन पध्दती नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ पृ. क्र. २, ३, १०, ११.

१०) **पोखरापूरकर, राजा** (२००७) संशोधनासाठी नमुना निवड, यशवंतराव चव्हाम महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ पृ. क्र. ३.

११) **सुतार, धनंजय भगवान** (२०११) शैक्षणिक ग्रंथालये. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र ए.बी.एस. प्रकाशन वाराणसी.

१२) **रानडे सुभाष, परांजपे गो. रा.** (१९८५) आयुर्वेदाचा इतिहास व परिचय आवृत्ती २ री अनमोल प्रकाशन पुणे – ०२ पृ. क्र. ९.

१३) **Busha, Charles H. & Harter S. P.** (1980) Research methods in Librarianship : Techniques and Interpretation New Delhi : Academic press P. 62, 63.

१४) **Krejcie & Morgan** (1970) Educational and Psychological measurement 30, 607.610.

१५) **Kothari, C. R.** (2004) Research methodology : Methods and Techniques ($2^{nd}$ ed.) New Delhi: New Age International Publisher. P. 2, 3.

१६) **Young, P. V.** (1973) Scientific social serveys and research New Delhi prentice hall.

१७) www.ayurbalance.com. Dateed 17/01/2013

### प्रकरण २ रे

# संशोधन पुर्वाभ्यास व वाचनसाहित्य शोध

## २.१ प्रस्तावना

संशोधनाविषयीची समग्र माहिती मिळविण्यासाठ सबंधित साहित्याचा आणि पूर्वाभ्यासाचा शोध होणे आवश्यक असते पुर्वाभ्यास हा संशोधन कार्यातील अत्यंत महत्वाचा भाग आहे. यामुळे आपण ज्या विषयावरती संशोधन करीत आहे. त्याची माहिती मिळते त्याविषयी यापूर्वी कोणते आणि किती संशोधन झाले आहे हे पाहिल्यामुळे आपल्या संशोधनालाही पुर्वाभ्यासामुळे दिशा मिळते.

संशोधनाची समस्या स्वरूपीत करणेसाठी संशोधकास समस्येची जाणीव होणे महत्वाचे असते त्या विषयाच्या संदर्भात अडचणीची अनुभूती होण्याकरीता संशोधनासाठी निवडलेल्या विषयाच्या सबंधित साहित्याचे वाचन व चिंतन करणे आवश्यक असते. यासाठी प्रस्तुत संशोधनाशी सबंधित असलेल्या साहित्याचे अध्ययन केल्यामुळे त्या विषयाबाबत मांडलेले सिद्धांत, त्या विषयासंदर्भात झालेली इतर अध्ययने व त्यांचे निष्कर्ष इ. बाबतच्या ऐतिहासीक माहिती आणि नोंदीचे ज्ञान होण्यास मदत झाली. या ज्ञानाच्या साहाय्याने त्या संशोधनविषयाशी संबधित असलेले ग्रंथ, संशोधन अहवाल, संशोधन प्रकल्प, संशोधन प्रबंध, संशोधन निबंध, संशोधन लेख इ. वाचनसाहित्याचा शोध होवून अभ्यास करून साहित्याचे समालोचन केले आहे.

याबाबत समाजसंशोधक भिंताडे म्हणतात, सबंधित साहित्याच्या समालोचनामुळे माहिती तसेच उचित संशोधन पध्दती, संशोनाचे नवे तंत्र याबद्दल निश्चित माहिती मिळविण्यास मदत होते. संशोधनाशी संबधित इतर काही संशोधने झालेली आहेत किंवा नाही याचा अभ्यास करणेसाठी अभ्यासकाने संशोधन पुर्वाभ्यास व वाचन साहित्याचा शोध घेतला. खाली दिलेल्या ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेटी देवून सदर संशोधकाने संशोधन पुर्वाभ्यास व वाचन साहित्याचा शोध घेतला आहे.

१. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथालय पुणे.
२. जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ पुणे.
३. भारती विद्यापीठ युनिव्हर्सिटी, पुणे.
४. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर.

५. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ ग्रंथालय, नाशिक.

६. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सांगली, पुणे, कोल्हापूर केंद्रावरील ग्रंथालयातील संशोधन प्रकल्प.

७. इंटरनेटवरील अभ्यास विषयाच्या अनुषंगाने जे साहित्य उपलब्ध आहे. त्याचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधनाचा विषय ''महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास'' हा असलेने खालील साहित्याचा शोध घेण्यात आला आहे.

१) आयुर्वेद ग्रंथालये.

२) संशोधन पध्दती प्रक्रिया व कार्यपध्दती.

३) महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालये व त्यांची ग्रंथालये.

४) शोध प्रबंध, अहवाल, लघुप्रबंध, संशोधन प्रकल्प व संशोधन पेपर इ.

५) ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील संशोधन साहित्य आणि संवाद शास्त्रातील संशोधन साहित्य.

A literature review will generally be part of a thesis or dissertation, forming an early context setting chapter.

Review of literature is a study of literature available on the problem selected by the researcher and to review the relevant literatures that has been reported earlier in any from of literature. Review of literature suagests new planning approach for the investigations. **(Busha & Harter 1980)**

"A literature review uses as its database, reports of primary or oriqinal seholarship, and does not report new primary scholarship itself. The primary reports used in the literature may be verbal, but in the vast majority of cases reports are written documents. The types of scholarship may be empirical, theoretical, critical / analytic, or methodological in natures. Secoud a literature review seeks to describe summaries, evaluate, clarify and / or integrate the content of primary reports."

## २.२ संबधित साहित्याच्या समालोचनाची उद्दिष्टे

१) संदर्भ साहित्याचा अभ्यास करून स्वतःच्या ज्ञानाची कक्षा, स्तर उंचावणे.

२) संशोधन विषयासबंधी आवश्यक योग्य पध्दती, तंत्रे यांच्याबद्दल माहिती मिळविणे.

३) संशोधन विषयासबंधी गृहीतकृत्याच्या मांडणीबद्दल निश्चित माहिती मिळविणे.

४) संशोधन विषयाविषयी पूर्वी झालेल्या संशोधनाची माहिती मिळविणे व पुनरावृत्ती टाळणे.

५) आधार सामग्री व निष्कर्ष याविषयी तुलनात्मक माहिती मिळविणे, सांख्यिकीय तंत्र व त्यांचा उपयोग आणि निर्वचन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

## २.३ संबधित साहित्याचे समीक्षण

कोणत्याही संशोधकाने संशोधन विषय निवडल्यानंतर तो सुव्यवस्थीतपणे मांडण्यासाठी तसेच संशोधन करण्यासाठी आपल्या विषयासंदर्भात जे साहित्य संबंधित आहे त्याचा सखोल अभ्यास केला पाहिजे. त्याचा संशोधकास एक उत्कृष्ठ मार्गदर्शक म्हणून उपयोग होऊ शकतो. तसेच संबधित साहित्यामध्ये संशोधन पध्दती समस्येसंदर्भात शैक्षणिक समाजशास्त्र, तत्वज्ञान, अध्यापन पध्दती, शैक्षणिक मानसशास्त्र अशा संबधित विषयाचा अभ्यास होतो. संशोधनासाठी साहित्य अभ्यासाचा उपयोग होण्यासाठी वाचन करीत असताना त्याची नोंद ठेवणे आवश्यक आहे. यामध्ये आवश्यक संदर्भ, माहिती, सारांश, महत्वाचे लेख व इतर सबंधित गोष्टींचे वाचन यांचा समावेश होतो.

यापुर्वी झालेल्या संशोधनाची पुनरावृत्ती यामध्ये असू नये. कारण त्यामुळे त्यास संशोधन म्हणता येणार नाही. संशोधनाची कक्षा विस्तृत झाली पाहिजे. ग्रंथालय विषय म्हंटल कि सर्वजण त्याकडे एका विशिष्ठ दृष्टीकोनातून पाहतात. ग्रंथालय हे मानवी जीवनाशी निगडीत असून विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक व समाजाला याची जाणीव झाली पाहिजे. त्यांच्या आयुष्यात ग्रंथालयाचे स्थान महत्वाचे असते.

## २.४ सबंधित संशोधनाचे समीक्षण

सर्वसाधारणपणे संशोधकाने समस्या ठरविल्यानंतर ती स्पष्टपणे योग्य शब्दांत मांडण्यासाठी समस्येची उद्दिष्टे ठरविणेसाठी तसेच संशोधनासंबधीत साधनांची निवडीसाठी

मार्गदर्शक माहिती आवश्यक असते म्हणून संबधित साहित्याच्या अभ्यासाबरोबरच संबधित संशोधनाचा अभ्यास ही महत्वाचा आहे.

बापट, भा. गो. यांनी म्हंटले आहे कि, संशोधकाने आपल्या संशोधनाची उद्दिष्ठे निश्चित केल्यानंतर त्या विषयावरती त्या राज्यात देशात किंवा परदेशात यापूर्वी कोणी संशोधन केले आहे काय केले असल्यास ते स्वतंत्रपणे वा नियतकालीकात प्रसिध्द झाले आहे काय आणि ते संशोधन कोठे उपलब्ध होईल याचा शोध घ्यावा लागतो. असे संदर्भ साहित्य जे कि अप्रकाशित असून विद्यापीठाच्या ग्रंथालयात उपलब्ध होवू शकते. हे ग्रंथालयात बसूनच अभ्यासावे लागते. यामुळे संदर्भ संशोधनाच्या अभ्यासाने संशोधकास पुर्वीच्या संशोधनाचे स्वरूप समजू शकते.

आपल्या संशोधन विषयाशी संबधित कोणकोणती संशोधने झालेली आहेत हे संशोधकाने अभ्यासणे अतिशय महत्वाचे ठरते. हे एडीसन यांनी सांगितले आहे. या अभ्यासाने संशोधनासाठी कोणत्या पध्दती, कसोट्या वापरता येतील याची माहिती मिळते या विषयाच्या क्षेत्रात कोणते संशोधन झाले आहे हे समजते. लेखनाची पध्दत कशी ठेवावी, संशोधन प्रबंध कसा लिहावा हे समजते. थोडक्यात अनेक पुस्तके वाचून आपणास ज्यासंबंधी निश्चित माहिती मिळणार नाही ती माहिती या अहवालामुळे मिळते.

अशाप्रकारे संबंधित संशोधनाचा अभ्यास अनिवार्य असलेने संशोधकाने संशोधनाचा अभ्यास केला आहे. परंतु या विषयावर यापूर्वी संशोधन झालेले नाही.

## २.५ पीएच. डी. साठी सादर केलेले शोधप्रबंध

- **Jamdhade Mohan Laxman** यांनी " A Study of subject Classification in Ayurved faculty according to dewey decimal classification and colon classification. या विषयावरती सन २०१२ मध्ये डॉ. बी. एम. पानगे यांच्या मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पुणे या विद्यापीठास पी.एच डी. प्रबंध सादर केला आहे. या संशोधनामध्ये त्यांनी खालील उद्दिष्टे ठेवली होती.

१) आयुर्वेद वैद्यक विद्याशाखेतील सूक्ष्म घटकांचा विषय वर्गीकरणाच्या दृष्टिकोनातून अभ्यास करणे.

२) कोलन वर्गीकरण पध्दतीनुसा आयुर्वेदासाठी सखोल वर्गीकरण पध्दती विकसित करणे.

३)	वर्गीकरण पध्दतीवर आधारित आयुर्वेदासाठी थिसॉरस तयार करणे.

४)	आयुर्वेद शाखेतील उपविषयांचा सापेक्ष निर्देश तयार करणे.

- **Kemdarne, Suryakan B**. यांनी, "A study of Library Automation and Networking in Dental College Libraries Affiliated to Rajiv Gandhi University of Health Science, Banglore." या विषयावरती सन २०१२ मध्ये डॉ. सौ. नमिता बाबासाहेब खोत यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठास पीएच. डी. प्रबंध सादर केला आहे. हा एक वैद्यकीय ग्रंथालयाचा अभ्यास असल्याने त्याचा संदर्भ या संशोधनात घेतला आहे. या संशोधन प्रबंधात ग्रंथालय संगणकीकरण विषयी माहिती दिलेली आहे.

  या प्रबंधामध्ये संशोधनासाठी खालील उद्दिष्टे ठेवली होती.

1. To study the present status of Library Automation and Networking in Dental College Libraries affiliated to Rajiv Gandhi Health University, Banglore.
2. To study the computer skilled professional staff for Library Automation.
3. To study the provision of Budget for Library Automation and Networking during last three years.
4. To evaluate the Library Software / Hardware adopted by the Dental College Libraries.
5. To find the various barriers in the process the automation and networking faced by Dental College libraries such as inadequate staff, in sufficient budget etc.
6. To study the Housekeeping operation (Acquisition module, Criculation, Cataloguing, serial control, OPAC / web OPAC / Intranet/ Internet)

- **पाटील, पांडुरंग बाळकृष्ण.** यांनी, "महाराष्ट्र राज्यातून प्रसिध्द होणाऱ्या मराठी वृत्तपत्रांच्या माहिती संप्रेषणात वृत्तपत्रीय ग्रंथालयांचे योगदान" या विषयामध्ये सन २०१२ मध्ये डॉ. सौ. नमिता बाबासाहेब खोत यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक

महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठातून पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे. हा एक सर्व्हे होता. सदर अभ्यासाच्या दृष्टीने सदर संशोधन अशा पद्धतीने झाले पाहिजे यासाठी या संशोधनाचा संदर्भ घेतला आहे.

या संशोधन प्रबंधामध्ये त्यांनी खालील उद्दिष्टे समोर ठेवली होती.

१. वृत्तपत्राच्या माहिती संप्रषणात वृत्तपत्रीय ग्रंथालयांचा सहभाग कितपत आहे याचा शोध घेणे.

२. महाराष्ट्र राज्यातून प्रसिध्द होणाऱ्या मराठी वृत्तपत्रातील वृत्तपत्रीय ग्रंथालयांच्या कार्याचा आढावा घेवून त्यांच्या समोरील आव्हानांचा शोध घेणे.

३. माहितीचे जतन व प्रसारण करण्याच्या सुविधांमध्ये झालेल्या वाढीमुळे वृत्तपत्र समुहातील वाचकांना त्याचा काय फायदा झाला याची माहिती घेणे.

४. वृत्तपत्र ग्रंथालयातील माहिती संप्रेषणात येणाऱ्या अडचणींचा शोध घेवून त्यावर उपाययोजना सुचविणे.

सदर संशोधकाने उद्दिष्टांना अनुसरून योग्य ते निष्कर्ष काढलेले आहेत. (**पाटील २०१२**)

- **Sudge, Suresh** यांनी, “Modernization of Libraries Attached to the Defance traning and education. Institutes in India with reference to services and sources” या विषयावर सन जून २०१२ मध्ये Dr. N. B. Dahibhate यांच्या मार्गदर्शनाखाली Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune या विद्यापीठास शोध प्रबंध सादर केला आहे. (**Sudge, 2012**)

## २.६ एम. फिल चे लघु शोध प्रबंध

प्रस्तुत संशोधन अभ्यास करण्यासाठी Case Study Method चा उपयोग केला आहे. संशोधन अभ्यासासाठी आवश्यक माहिती व आकडेवारी गोळा करणेसाठी ग्रंथपाल, प्राध्यापक व विद्यार्थी यांनी प्रश्नावली व मुलाखतीव्दारे माहिती जमा केलेली आहे.

- मंडले सुनिल राजाराम यांनी “महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठांशी संलग्न असलेल्या पुणे जिल्ह्यातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील नियतकालीकांचा वापर” या विषयावरती सन २०१० मध्ये प्रा. डॉ. सौ. अपर्णा राजेंद्र

यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठामध्ये लघुशोध प्रबंध सादर केला आहे. **(मंडले, २०१०)**

या लघुप्रबंधात त्यांनी पुणे जिल्ह्यांतील आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयातून नियतालीकांचा वापर होतो कि नाही याचा अभ्यास केला आहे.

## २.७ एम. लिब. व इतर संशोधन प्रकल्प

- बेगम, रूखसाना. यांनी, "An Evaluation of All Ameen Medical College central Library, Bijapur by the students and teaching staff." हा प्रकल्प सादर केला त्यामध्ये खालील माहिती दिली आहे. चांगल्या ग्रंथालयाच्या उभारणीसाठी चांगला वाचन संग्रह आणि चांगल्या सेवा अत्यंत महत्वाच्या आहेत. त्यांनी खालील निष्कर्ष काढले आहेत.

  १) या ग्रंथालयात दृकश्राव्य साधने फारच कमी वापरली जातात.

  २) ग्रंथालयीन सेवकामध्ये आणि वाचक यांच्यामध्ये हवे तेवढे संप्रेषण नाही.

  ३) नवीन ग्रंथ खरेदीसाठी व ग्रंथालय तालीका अद्ययावत करणे बाबत शिफारस केलेली आहे.

- चव्हाण, माया गणेश. यांनी, "पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांच्या वाचकांना मिळणाऱ्या सेवांचा अभ्यास." या विषयावरती सन २००२-२००३ मध्ये संशोधन प्रकल्प सादर केला आहे.

  या अभ्यासामध्ये पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये वाचकांना कोणकोणत्या सेवा दिल्या जातात व सेवा कशा प्रकारे व प्रमाणीत मानकाप्रमाणे दिल्या जातात काय याचा अभ्यास करण्यात आला आहे. **(चव्हाण, २००३)**

- चोपडे, संदिप उत्तम. यांनी "आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयात माहिती साधन म्हणून होत असलेला नियतकालिकांचा उपयोग" या विषयामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे २००६ मध्ये संशोधन प्रकल्प सादर केला आहे. **(चोपडे, २००६)**

प्रस्तुत संशोधनात पुढील उद्दिष्टे ठेवण्यात आली होती.

१) नियतकालीक विभागातील नियतकालीक संग्रहाचे व्यवस्थापन करणे.

२) नियतकालीक विभागाव्दारे वाचकांना देण्यात आलेल्या विविध सेवांचा अभ्यास करणे.

३) नियतकालीक विभागातील वाचकांच्या समस्या समजावून घेणे.

४) नियतकालीक विभाग समृध्द व प्रगत होण्यासाठी उपाय सुचविणे.

- चौगुले, सुवर्णा मधुकर. यांनी बेळगाव येथील ए. एम. शेख होमीओपॅथीक मेडीकल कॉलेज आणि हॉस्पीटल ग्रंथालय : एक अभ्यास सन २००७-२००८ अभ्यासकेंद्र कोल्हापूर. (**चौगुले, २००८**)

- गवळी, सुभाष केशवराव. यांनी पुर्णा येथील रामराव पाटील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयातील विद्यार्थी वाचकांच्या माहिती विषयक गरजा एक अभ्यास सन २००७-०८ अभ्यासकेंद्र नागपुर (**गवळी, २००८**)

- गवारे, मंदा शामराव. ‘‘कृष्णा वैद्यकिय महाविद्यालय कराड ग्रंथालय संगणकीकरणाची सद्य स्थितीचा अभ्यास करणे’’ सन २००७-०८ यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक.

  या प्रकल्पामध्ये खालील उद्दिष्टे ठेवली होती.

  १) कृष्णा वैद्यकिय महाविद्यालय कराड ग्रंथालय संगणकीकरणाचा सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

  २) प्रस्तुत महाविद्यालय ग्रंथालयातील संगणकीकरणाच्या साहाय्याने व्यवस्थापन कसे चालते ते अभ्यासणे.

  ३) प्रस्तुत ग्रंथालयात संगणकीकरणाव्दारे दिल्या जाणाऱ्या सेवांचा अभ्यास करणे.

  ४) ग्रंथालयातील सेवांविषयी वाचकांचे समाधान व अपेक्षा जाणून घेणे.

  **५)** ग्रंथालय संगणकीकरणातील समस्यांचा अभ्यास करणे. (**गवारे, २००८**)

- जगताप, राजाराम यशवंत. यांनी ‘‘कराड येथील कृष्णा वैद्यकिय महाविद्यालय ग्रंथालयाच्या सद्यस्थितीचा आढावा एक अभ्यास’’ सन २००३-२००४ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक. (**जगताप २००४**)

  या प्रस्तुत संशोधन प्रकल्पामध्ये पुढील उद्दिष्टे ठेवली होती.

१) कृष्णा वैद्यकिय महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना ग्रंथालय सेवा देण्यात येतात का याचा अभ्यास करणे.

२) प्रस्तुत ग्रंथालयात कोणकोणत्या वर्गीकरण पध्दतीचा वापर केला आहे याचा अभ्यास करणे.

३) प्रस्तुत ग्रंथालयाच्या विकासाचा आढावा घेणे.

४) प्रस्तुत ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी कोणकोणत्या सेवा सुविधा उपलब्ध आहेत हे तपासणे.

- कचरे, मृणालिनी आबासाहेब. यांनी, "महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा विकास : एक अभ्यास या विषयावर एम. लिब. ॲन्ड आय. एस्सी. या पदवीच्या पूर्तीसाठी सांगली केंद्रातून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांना संशोधन प्रबंध सादर केला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये शासकीय वैद्यकिय ग्रंथालयांचा सखोल अभ्यास मांडण्यात आला आहे. **(कचरे,२००१)**

- कदम, अर्चना गणेश. यांनी, "मुंबई शहरातील आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयांचा अभ्यास" या विषयावरती सन २०१० मध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथे संशोधन प्रबंध सादर केला आहे. **(कदम, २०१०)**

- मुल्ला, एस. ए. यांनी, "Reading habits of teachers and students in Krishna Institute of Medical Sciences, Karad : A study" Unpublished M. Lib. Project, Shivaji Univesity, Kolhapur येथे १९९९-२००१ मध्ये संशोधन प्रकल्प सादर केला आहे.

  या प्रकल्पामध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी वाचन सवयी, एखाद्या क्षेत्रातील ज्ञान अद्ययावत करणेसाठी आणि व्यक्तीमत्व विकासासाठी ग्रंथालये महत्वाचे कार्य करतात हे या प्रबंधातून स्पष्ट केले आहे. **(मुल्ला, २००१)**

- मोरे, एस. एस. यांनी सन १९९७ मध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे सादर केलेल्या प्रबंधिकेचा विषय "Development plan of Government Medical College Library, Miraj" असून या प्रबंधिकेत मिरज महाविद्यालय मिरज येथील ग्रंथालयांचा विकास आराखड्याबाबत अभ्यास केला आहे.

या अभ्यासाचे उद्दिष्ट ग्रंथालयाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे असा आहे. या अभ्यासामध्ये त्यांनी महत्वाच्या खालील सूचना केलेल्या आहेत.

१. ग्रंथालय इमारत वितरीत करणे आवश्यक आहे.

२. ग्रंथालयाने Medlar and Medline सेवा पुरवाव्यात.

३. ग्रंथालयाच्या मंजूर अनुदानाच्या ६ अनुदान मिळावे **(मोरे, १९९७)**

- महाजन, एस. डी. यांनी, ‘‘कृषी महाविद्यालय, कोल्हापूर या ग्रंथालयातील नियतकालीकांचा वापर एक अभ्यास.’’ अप्रकाशित एम. लिब प्रकल्प, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक २००५-२००६.

  या संशोधन प्रकल्पामध्ये ग्रंथालयातील नियतकालीक विभागामार्फत कोणकोणत्या माहिती सेवा दिल्या जातात याचा अभ्यास केलेला आहे. ग्रंथालयातील नियतकालिकांच्या उपलब्धी बाबतही आढावा घेतला आहे. शिवाय नियतकालीकांचा संशोधनासाठी कसा उपयोग होतो याचाही अभ्यास केला आहे. **(महाजन, २००५)**

- नांगरे, शिवाजी ज्ञानदेव. यांनी, ‘‘पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांचा अभ्यास’’ या विषयावरती सन २००३-२००४ मध्ये एम. लिब ॲन्ड आय. एस्सी या पदव्युत्तर शिक्षक्रमासाठी संशोधन प्रबंध सादर केला आहे. या संशोधक प्रकल्पामध्ये आयुर्वेद महाविद्यालयाची ओळख, त्यांच्या ग्रंथालयांचा सविस्तर अभ्यास तसेच नवीन संशोधकास सुचना व शिफारशी दिल्या आहे. **(नांगरे,२००४)**

- पाटील, संजूताई नामदेव. यांनी, ‘‘कोल्हापूर जिल्ह्यातील वैद्यकिय महाविद्यालयीन ग्रंथालये’’ या विषयावरती यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथे २००५ मध्ये प्रस्तुत प्रबंधिका सादर केली आहे. प्रस्तुत संशोधनात पुढील उद्दिष्टे व निष्कर्ष मांडले आहेत. **(पाटील, २००५)**

  उद्दिष्टे

  १. कोल्हापूर जिल्ह्यातील वैद्यकिय ग्रंथालयांची सद्यस्थितीची माहिती घेणे.

  २. संशोधनाखाली निवडलेल्या ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाचा अभ्यास.

  ३. ग्रंथालय सेवा आणि ग्रंथालयांची आर्थिक स्थिती सुदृढ करण्यास विविध उपाय व शिफारशी सुचविणे.

४. ग्रंथालयांतर्गत वापरात येणाऱ्या ग्रंथालय साधनांचा वापर व अभ्यास तसेच त्यातील उणीवा यांचा आढावा घेणे.

तसेच निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१. एक शासकिय विद्यालय वगळता इतर सर्व महाविद्यालये अशासकिय विना अनुदानीत आहेत.

२. ग्रंथालयांना परिपूर्ण अशा ग्रंथालय इमारती नाहीत मात्र काही ग्रंथालयांना स्वतंत्र इमारती आहेत.

३. ग्रंथालयांचे पूर्णतः संगणकीकरण झालेले नाही.

- सावंत, दिपाली पांडुरंग. यांनी, ‘‘आयुर्वेदीक मेडीकल कॉलेज पेठवडगाव ग्रंथालय एक अभ्यास’’ या विषयामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथे सन २०११ मध्ये संशोधन प्रबंध सादर केला आहे. प्रस्तुत संशोधन प्रबंधामध्ये महाराष्ट्रातील वैद्यकिय शिक्षण तसेच आयुर्वेदाविषयी आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांच्या सद्यस्थितीचा अभ्यास केलेला आहे.

  सदर संशोधनासाठी खालील उद्दिष्टे समोर ठेवली होती.

  १. आयुर्वेद मेडीकल कॉलेजच्या ग्रंथालयाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

  २. प्रस्तुत ग्रंथालयाच्या सेवा व सुविधा याबाबत वाचकांचे मत जाणून घेणे.

  ३. ग्रंथालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेणे.

  ४. ग्रंथालयातील माहिती तंत्रज्ञानाची सद्यस्थिती जाणून घेणे.

  ५. ग्रंथालयाच्या विकासाच्या दृष्टीने मिळालेल्या माहितीचा अभ्यास करणे व निष्कर्ष काढून शिफारशी करणे. **(सावंत, २०११)**

- साळुंखे, विलास यांनी. ‘‘कृष्णा वैद्यकिय महाविद्यालय ग्रंथालय कराड एक अभ्यास’’ या विषयामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथे सन २००३ मध्ये संशोधन प्रकल्प सादर केला आहे. त्यानुसार त्यांनी पुढील निष्कर्ष काढले आहेत. **(साळुंखे,२००३)**

  १. ग्रंथालयाची भूमिका वाचकांच्या दृष्टीने बौध्दीक विकासामध्ये अत्यंत महत्वाची आहे.

  २. ग्रंथालयाव्दारे दिल्या जाणाऱ्या सेवा बाबत वाचक समाधानी आहेत.

३. वैद्यकिय अभ्यासासाठी पाठ्यपुस्तकाची मागणी बहुसंख्य वाचक करतात ते वाचनसाहित्य वाचकांना मिळते.

४. ग्रंथालयांचे अंशतः संगणकीकरण झाले आहे.

- सोने,स्वाती महादेव. यांनी "भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय सावंतवाडी ग्रंथालय एक अभ्यास" या विषयावरती सन २००८ मध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथे प्रबंध सादर केलेला आहे. (**सोने, २००८**)

## २.८ संदर्भ साहित्याचा आढावा

- आगलावे, प्रदीप. संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन २००० नागपूर.

  या पुस्तकामध्ये संशोधकास उपयुक्त माहिती, संशोधन पध्दती व त्यांची माहिती ठळकपणे मिळते. संशोधनाचे प्रकार, संशोधनाची व्याख्या, संशोधनाचे महत्व, संशोधनास आवश्यक अशा महत्वाच्या गोष्टी विषयीची माहिती मिळते.

- बुवा, जी. ए.

  ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह श्री. साई प्रकाशन, जुनी ग्रामपंचायत कार्यालयानजीक, बांदा, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग. ४१६५११. प्रथमावृत्ती २००७.

  या पुस्तकामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्र व्यवस्थापनातील नव्या प्रवाहांविषयी माहिती दिलेली आहे. ग्रंथालय व्यवस्थापनात ग्रंथपालाची भूमिका काय असावी, ग्रंथालय क्षेत्रातील व्यवस्थापनात सातत्यपूर्वक बदलास सामोरे कसे जावे. ग्रंथालयाच्या गुणात्मक विकासासाठी बदलाचे व्यवस्थापन कसे करावे. ग्रंथपालांचे बदलाच्या व्यवस्थापनाचे धोरण काय आहे याविषयी माहिती मिळते. संकरीत आणि इलेक्ट्रॉनिक्स ग्रंथालयातील ग्रंथ संग्रहाचा विकास आणि व्यवस्थापन, प्रश्न व धोरणे यांची माहिती मिळते ग्रंथपाल हा संशोधकांचा मार्गदर्शक आहे या विषयीची माहिती या पुस्तकातून मिळते.

  ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रहाचा विकास, वाचनसाहित्य संग्रह विकासाचे हेतू तसेच वाचनसाहित्य संग्रह विकासाची पार्श्वभूमी आणि वाचनसाहित्य संग्रहविकासाची धोरणे निश्चितीसाठी उपयुक्त असणारी मार्गदर्शक तत्वे या सबंधी

माहिती मिळते. तसेच ग्रंथालयात काम करीत असताना ग्रंथालयाचा सकारात्मक विकास होण्यास ग्रंथपालाची नैतिकता कशी कारणीभूत ठरते याविषयीची माहिती या ग्रंथात उपलब्ध होते. अशाप्रकारे सदर ग्रंथात लेखकाने ग्रंथालय व माहितीशास्त्रातील नवे प्रवाहाविषयी माहिती दिल्याचे दिसून येते.

सदर संशोधकास या ग्रंथातून वाचनसाहित्य संग्रहाचा विकास आणि व्यवस्थापनातील नवे प्रवाह याविषयी तसेच ग्रंथपालाचे बदलाच्या व्यवस्थापनाबाबतचे धोरण याविषयीची माहिती उपयुक्त ठरली आहे. (बुवा, २००७)

- बापट, भा. गो.

  शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शिक्षण विकास, व्हीनस प्रकाशन, पुणे – ०२.

  या पुस्तकामध्ये महाराष्ट्रातील शिक्षणाविषयीची माहिती मिळते.

- Best and Khan – Research in education, prentice hall, New Delhi, 1995.

  या पुस्तकामध्ये संशोधनाशी सबंधित आवश्यक अशी मिळते. संशोधन म्हणजे काय, याची व्याख्या संशोधनासंबधित माहिती कशी संकलीत करावी. विश्लेषन व संशोधनाच्या पध्दती इ. बाबत माहिती मिळते.

- चार्ल्स, बुशा व स्टिफन हार्टर. रिसर्च मेथडस इन लायब्ररीयनशीप, एकॅडेमिक प्रेस, १९८०.

  या पुस्तकामध्ये संसोधन म्हणजे, संशोधनाची व्याख्या व संशोधनाशी सबधित माहिती मिळते.

- CCIM Rules 1996-ISM & H.

  या पुस्तकामध्ये आयुर्वेद महाविद्यालयांना लागू होणाऱ्या नियमांची व्यवस्थित व सखोल माहिती दिली आहे. महाविद्यालयाचा अभ्यासक्रम, हॉस्पीटल अभ्यासक्रम व त्यांना आवश्यक साधन सामुग्री व सेवा यांची माहिती व्यवस्थीतपणे दिली आहे.

- कुंभार, राजेंद्र.

  ग्रंथालय व्यवस्थापन, वाचनसाहित्य संग्रहाचा विकास, नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ या पुस्तकामध्ये वाचन-साहित्य संग्रहाचा विकास, कोणत्या प्रकारे होऊ शकेल याबाबत माहिती दिली आहे. वाचनसाहित्य संग्रह

समतोल आणि अद्ययावत ठेवणे, उपार्जीत करणे, वाचनसाहित्याचे विविध प्रकार याविषयीची माहिती मिळते. वाचनसाहित्याची वैशिष्ट्ये, वाचनसाहित्य निवड, येणाऱ्या अडचणीचे व विविध उपार्जन पध्दतीचे सविस्तर विवरण दिले आहे.

- कर्णिक प्रदिप :-

  संशोधन प्रकल्प स्वरूप व लेखन पध्दती नाशिक या पुस्तकामध्ये संशोधन प्रकल्पाविषयी तांत्रिक माहिती दिली आहे. तसेच शोध साहित्य, संशोधन विषयाची निवड व लेखन तंत्राविषयीची माहिती विशद केली आहे.

- कऱ्हाडे, बी. एम.

  शास्त्रीय संशोधन पध्दती आवृत्ती २ री २००७ पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर. या पुस्तकामध्ये संशोधनासाठी माहिती संकलीत करण्यासाठी आवश्यक अशा प्रश्नावली विषयी सविस्तर माहिती दिली आहे.

- कुलकर्णी, विश्वंभर. / भिंताडे, विनायक रामचंद्र.

  भारतीय आधुनिक शिक्षण : समस्या आणि उपाय श्रीविद्या, प्रकाशन, पुणे. या पुस्तकामध्ये भारताच्या आधुनिक शिक्षणाविषयाची माहिती मिळते.

- कोलारकर, राजेश शिवाजीराव.

  आयुर्वेद इतिहास प्रथमावृत्ती ५ सप्टेंबर २००८, जान्हवी प्रकाशन, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर – ४१६११४.

  या पुस्तकामध्ये ऋग्वेदातील आयुर्वेदाची माहिती मिळते. तसेच आयुर्वेदाचा इतिहास यजुर्वेदातील आयुर्वेद या विषयीची व अथर्ववेदकालीन आयुर्वेद याविषयी माहिती मिळते.

- के, सागर. व पाटील, व्ही. बी.

  महाराष्ट्राचा सर्वांगीण इतिहास, के सागर प्रकाशन पुणे.

  यामध्ये भारतातील व महाराष्ट्रातील शिक्षणाच्या स्वरूपाविषयीची माहिती दिलेली आहे.

- के. सागर अस्सा हा भारत : के. सागर प्रकाशन, पुणे पृ. ३९८.

  या पुस्तकामध्ये शिक्षण विकासाबद्दलची माहिती मिळते.

- केंगे, भाग्यश्री.

आपला आयुर्वेद, सृष्टीरंग २०१३.

या वैज्ञानिक लेखामध्ये सदर लेखकाने भारताचे प्राचीन वैद्यकिय शास्त्र आयुर्वेद याविषयी माहिती सांगितली आहे. आयु म्हणजे जीवन आणि वेद म्हणजे शास्त्र जीवन किंवा शरीराचे शास्त्र जाणणारा आयुर्वेद अतीप्राचीन काळापासून अस्तीत्वात आहे याची माहिती मिळते. आयुर्वेदाचे जनक म्हणून भगवान धन्वंतरी आहेत हे सांगितले आहे. (**केंगे,२०१३**)

http://marathiworld.com/shrushtiranga/science/ayurved.htm

- गावित, विजयकुमार.

दैनिक सकाळ रविवार १३ मे २०१२.

या दैनिक सकाळ वृत्तपत्रामधून आयुर्वेदाविषयी माहितीचा लेख प्रसिध्द प्रकाशित झाला आहे. या लेखातून डॉ. विजयकुमार गावित यांनी प्राचीन काळापासून ऋषीमुनींनी आयुर्वेदाच्या माध्यमातून जनआरोग्यसेवा केली आहे. या महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक आयुर्वेद महाविद्यालयांना “हर्बल गार्डन” बंधनकारक करू हर्बल गार्डन साठी ८० टक्क्यांपर्यंत शासन मदत निधी करून देईल असे स्पष्ट केले आहे. नांदेडच्या आयुर्वेद महाविद्यालयात महाराष्ट्रात कुठेही नाही अशी सक्षम रसशाळा आहे याविषयी संबोधित केले आहे. महाराष्ट्रात आयुर्वेद विद्यापीठ झालेच तर ते नांदेडमध्येच होईल. केंद्रिय विद्यापीठा साठीही राज्य शासनातर्फे शिफारस करू, सक्षम प्रस्ताव आल्यास येथे आयुर्वेदीक ‘सुपर स्पेशालिटी’ रूग्णालयही मंजूर करू अशा ग्वाही त्यांनी दिली आहे. ‘आयुष’च्या प्रचार, प्रसारासाठी विद्यापीठीकडून शक्य ती मदत करण्याची ग्वाही दिली. (**गावित, २०१२**)

website :- http://epaper.esakal.com.

- विकीपीडीया मुक्त ज्ञानकोश :-

विकीपीडीया महाराष्ट्रातील विद्यापीठे ३१ मे २०१३.

सदर विकीपीडीया, मुक्त ज्ञानकोशातून महाराष्ट्रातील विद्यापीठांची परंपरा इ. स. १८५७ पासून अस्तीत्वात आली याविषयी माहिती मिळते. महाराष्ट्रात उच्च शिक्षणाची सुरूवात मुंबई विद्यापीठाच्या स्थापनेपासून झाली असे सांगितले आहे. नाशिक येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आहे. राज्यातील सर्व वैद्यकिय

ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, दंतवैद्यक, सुश्रुषा विषयांची महाविद्यालये त्याला संलग्न आहेत.  विकीपीडीया २०१३

- Govt. of India – Ayush in India 2003, New Delhi

  या पुस्तकामध्ये भारतातील सर्व आयुर्वेद महाविद्यालयांची सखोल माहिती दिलेली आहे. तसेच आयुर्वेद महाविद्यालयांतील विद्यार्थी संख्या व इतर आवश्यक बाबींचा समावेश करण्यात आला आहे. सांख्यिकी माहितीसाठी या पुस्तकातून मार्गदर्शन होते.

- जोशी, भीमसेन रंगाचाय., पोंक्षे, दत्तात्रय.

  सामाजिक शास्त्रांमधील संज्ञा सिध्दांताचा स्पष्टीकरणात्मक कोश (शिक्षणशास्त्र) प्रथमावृत्ती जानेवारी २००७, डायमंड पब्लीकेशन्स, सदाशिव पेठ, पुणे – ३०.

- जोशी महादेवशास्त्री :- भारतीय संस्कृती कोश खंड - १. या पुस्तकामध्ये आयुर्वेदाबद्दल माहिती मिळते.

- जोगळेकर, श्री. वा. वैद्यकिय शब्दकोश, आवृत्ती २००१.

  ओरिएंट ब्लॉगमन लिमिटेड, आर. कामानी मार्ग मुंबई – ०१.

- जोशी, तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री.मराठी विश्वकोश खंड २,

  महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई १९७६.

- जाधव, तुकाराम. महाराष्ट्र वार्षिकी २०१२ युनिक ॲकॅडमी, पुणे.

  या पुस्तकामध्ये महाराष्ट्रातील शिक्षणाविषयी माहिती मिळते.

- जोशी, तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री. लेखसंग्रह, खंड १.

  आवृत्ती १९९४ श्री. विद्या प्रकाशन २५०, शनिवार पेठ, पुणे-३०.

- तांबे, बालाजी. आयुर्वेद उवाच भाग १ २०१० बालाजी तांबे फाउंडेशन, कार्ला - ०५.

  या पुस्तकामध्ये आयुर्वेदाचा इतिहास या संबंधित माहिती मिळते.

- दळवी, दिपक. डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड १ डायमंड पब्लीकेशन्स २००७, पुणे.

या पुस्तकामध्ये शिक्षण या शब्दाचा अर्थ खूपच व्यापक आहे हे पटवून दिलेले आहे. शिक्षण म्हणजेच मानवाचा विकास हि एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. मानवाच्या क्षमता व वर्तन विकसीत करणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण. **(दळवी २००७)**


- दळवी, दिपक. डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड २ डायमंड पब्लीकेशन्स २००७, सदाशिव पेठ, पुणे


सदर पुस्तकामध्ये आधुनिक काळातील शिक्षणाचे विशेष महत्व सांगितले आहे. शिक्षणाविषयीचा विचार प्राचीन काळापासून जगामध्ये सर्वत्रच झालेला होत आलेला आहे. प्रत्येक कालखंडात व प्रत्येक ठिकाणी शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात बदल झालेला दिसून येतो. प्रबोधनाच्या कालखंडात आज शिक्षणाचा जेवढा विकास व प्रचार झालेला आहे. तेवढा प्राचीन व मध्ययुगीन काळात दिसून येत नाही. **(दळवी, २००७)**


- दिक्षित, दुर्गा. डायमंड महाराष्ट्र संस्कृती कोश, डायमंड पब्लीकेशन्स १९९१, सदाशिव पेठ, पुणे ३०.


सदर पुस्तकामध्ये शिक्षणाच्या मध्ययुगीन परंपरेविषयी माहिती मिळते. मध्ययुगीन महाराष्ट्रात यवनांचे राज्य होते. सैनिक राज्य असलेने शिक्षणाकडे काहीच लक्ष दिलेले दिसून येत नाही. इ. स. १८४० मध्ये मुंबईत बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना झालेली दिसून येते. १८५५ मध्ये कलकत्ता, मद्रास व मुंबई विद्यापीठांची स्थापना झाली. शिक्षण खात्याच्या रचनेमुळे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण व्यवस्था अस्तीत्वात आली. महाराष्ट्रात १९६० नंतर सामान्यांपर्यंत शिक्षण पोहोचले. **(दिक्षित, १९९१)**


- दास्ताने,संतोष. महाराष्ट्र २००३.


या पुस्तकामध्ये महाराष्ट्रातील शिक्षणासंबंधीची माहिती दिली आहे. तसेच महाराष्ट्रातील ग्रंथालये व आयुर्वेद शिक्षणाची संबंधित माहिती दिलेली आहे.


- देशपांडे, राजेंद्र. / वाव्हळ, शिवाजी.

शरीर क्रिया विज्ञान भाग-१, शंतनु प्रकाशन : अहमदनगर, आवृत्ती १ ली २०००.

या पुस्तकामध्ये आयुर्वेदाचा परिचयाविषयी माहिती मिळते.

- देव, विजय. राजकिय विश्लेषण कोश दास्ताने रामचंद्र आणि कंपनी ८३०, सदाशिव पेठ, पुणे १९९७.

  सदर पुस्तकामध्ये लेखकाने सांगितले आहे कि, महाराष्ट्रात महाविद्यालयीन शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठी भाषेला मान्यता मिळाली आहे. त्यामुळे ज्ञानाच्या क्षेत्रातील इंग्रजी भाषेचे महत्व आणि गरज मान्य करूनही मराठी माध्यमातून म्हणजेच मातृभाषेतून होणे हे स्वाभाविकच आहे. प्रश्नावलीच्या साहाय्याने मुलाखत घेवून व्यक्तींची माहिती मिळविणे हे एक विकसीत संशोधन तंत्र आहे. **(देव, १९९७)**

- दास्ताने, संतोष. महाराष्ट्र २०१२ नितिन प्रकाशन, पुणे – ०२.

  या पुस्तकामध्ये महाराष्ट्रातील शिक्षण व महाराष्ट्रातील वैद्यकिय शिक्षणाविषयीची माहिती मिळते.

- दास्ताने, संतोष. भारत एक पाहणी : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे – ४११०३०.

  या पुस्तकामध्ये शिक्षणविषयक माहिती मिळते.

- दायमा, ब्रिजमोहन. विद्याभारती सेट / नेट मार्गदर्शक लातूर.

  या पुस्तकामध्ये लेखकाने संशोधन, संशोधन प्रबंधाविषयी, संशोधन केंद्र, संशोधन मार्गदर्शक व पीएच. डी. प्रबंध या विषयी माहिती मिळते.

- दास्ताने, संतोष. भारत एक पाहणी १९९८.

  या पुस्तकामध्ये भारतातील ग्रंथालयांविषयीची माहिती दिली आहे.

- पवार, एस. पी. / जाधव, सुनंदा. ग्रंथालय व माहितीशास्त्र फडके प्रकाशन, कोल्हापूर.

  या पुस्तकामध्ये संशोधन करीत असताना साहित्य शोध घेणे अतिशय महत्वाचे असते. त्या सबंधित वास्तविक तथ्यांचे संकलन अतिशय महत्वाचे असते. त्या सबंधित माहिती मिळते. माहिती मिळविण्याची उपलब्ध साधनसामुग्री, संशोधकाचे गुण व कौशल्य संशोधनासाठी लागणारा कालावधी, संशोधन कार्याच्या पूर्तीसाठी उपलब्ध असणारा पैसा या बाबींचा विचार करून संशोधन आराखडा करण्याबाबत माहिती दिलेली आहे.

- पहाडे, दिनकर मुकुंद. व्यावहारीक आयुर्वेदाचा इतिहास भाडगाव (वर्धा) व्यावहारीक प्रकाशन १९९३.

  या पुस्तकामध्ये आयुर्वेदाच्या उद्यासबंधीची माहिती मिळते. तसेच आयुर्वेदाची वैदीक वाङ्मयापासूनची इतिहासाविषयीची माहिती दिली आहे. आयुर्वेदाची स्वातंत्र्योत्तर काळातील प्रगती याविषयीची माहिती मिळते.

- कोंडके, बाळ. महाराष्ट्र नायक २०१३.

  सदर लेखकाने महाराष्ट्र नायक मध्ये आयुर्वेदाचे आज दिसत असणारे महत्व प्रस्थापीत होण्याला गेल्या दोन शतकांतील अनेक संस्था तसेच विविध मान्यवर व्यक्ती नियतकालीके कारणीभूत आहेत हे विसरून चालणार नाही हे सांगितलेले आहे.

  महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास १९ व्या शतकाच्या अखेरीस आयुर्वेदीय शिक्षणाची व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाले. आयुर्वेद विद्यालये सुरू करण्यात आली. आयुर्वेदाची ही सर्व शिक्षणव्यवस्था राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीच्या प्रेरणेने आणि विदेशी शिक्षण न होण्याच्या दृष्टीकोनातून निर्माण झाली. **(कोंडके, २०१३)**

- महाजन, शा. ग. पुणे शहराचा ज्ञानकोश : पुणे शहराचा ज्ञानकोश प्रतिष्ठान, आवृत्ती २ री २००४.

  या पुस्तकामध्ये पुणे शहरातील भौगोलिक, सांस्कृतिक इ. विषयीची माहिती मिळते.

- महाजन, शा. ग. मी पीएच. डी. होणारच ! युनिर्व्हसल प्रकाशन, पुणे – ३०.

  या पुस्तकाचे लेकक हे जयकर ग्रंथालय पुणे विद्यापीठ, पुणे येथील माजी ग्रंथपाल आहेत त्यांनी या पुस्तकात पीएच. डी. ला प्रवेश होण्यापासून ते पीएच. डी. उत्तीर्ण होवून प्रबंधाचे प्रकाशन करण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियांविषयी मार्गदर्शन केलेले आहे. तसेच संशोधन व त्याची व्याप्ती याबद्दल माहिती दिलेली आहे. प्रलेखनविषयी सविस्तर माहिती दिली आहे.

- मानकर, सुधाकर. उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढ अतुल पब्लीकेशन्स, कोल्हापूर. – ०८.

या पुस्तकामध्ये लेखकाने महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षणाबाबत माहिती दिलेली आहे. महाराष्ट्र हे उच्च शिक्षणाच्या बाबतीत नेहमी आघाडीवर असलेले राज्य आहे हे सांगितलेले आहे. याबरोबरच भारतातील उच्च शिक्षणाविषयीची माहिती या पुस्तकामधून मिळते.

- मात्यु, मामन. मनोरमा इयरबुक २०१२, मलायला मनोरमा, पी. बी. नं. २६, केरळ
- रानडे, सुभाष. / परांजपे, गो. रा.

  आयुर्वेदाचा इतिहास व परिचय आवृत्ती २ री. १९८५, अनमोल प्रकाशन, पुणे.

  या पुस्तकामध्ये आयुर्वेदाच्या इतिहासाचा मागोवा घेण्यात आला असून आयुर्वेदाचा उगम, अष्ठांग आयुर्वेद, आयुर्वेदाची प्राचीन गुरूकुल शिक्षण पध्दती, आयुर्वेदाची उपयोग व आयुर्वेदाच्या विकासाची माहिती दिलेली आहे.
- रिसवडकर, म. रा.

  संशोधन व्याख्या आणि पध्दती नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक.

  यामध्ये संशोधनासाठी माहिती संकलित कशी करावी, माहिती संकलनाची साधने आणि तंत्रे, प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण ही संकलनाची तंत्रे आणि नमुना निवड यांचे मार्गदर्शन मिळते. तसेच संशोधनातील अनुमान किंवा अंदाज कसा बांधावा व निष्कर्ष कसा काढावा हे नमूद केलेले आहे. आकृत्या, तक्ते, सांख्यिकीय आलेख, छायाचित्रांचा वापर निष्कर्षाची मांडणी, परिशिष्टे, सारांश याविषयीची माहिती मिळते.
- रानडे, सुभाष / परांजपे, गो. रा.

  आयुर्वेदाचा इतिहास, सप्टेंबर २००७, अनमोल प्रकाशन, ६८३, बुधवार पेठ, पुणे – ४११००२.

  या पुस्तकामध्ये भारतातील आयुर्वेदाच्या संघटना विषयी माहिती दिली आहे. तसेच बौध्द साहित्यातील आयुर्वेद माहिती बरोबरच प्राचीन विद्यांपीठांविषयी माहिती दिलेली आहे. तसेच आयुर्वेदासाठी नेमलेल्या समित्या, आयुर्वेद संशोधन शिक्षण, आयुर्वेदीय मासीके व प्रकाशक याविषयीची माहिती मिळते. तसेच जगातील विविध देशांतील आयुर्वेदाविषयीची माहिती मिळते.

- संत, दु. का.

  संशोधन पध्दती, प्रक्रिया व अंतरंग विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे. आवृत्ती २ री १९८८.

  या पुस्तकामध्ये संशोधन प्रक्रियेसाठी उपयुक्त माहिती संग्रह माहिती विश्लेषण व सादरीकरण या बाबत सखोल व महत्वपूर्ण माहिती दिली आहे.

- संपादक.

  'आयुर्वेद' भारतीय संस्कृतीचा कोश भाग १ या पुस्तकामध्ये आयुर्वेद, आयुर्वेद शिक्षणाची वाढ व विकास या विषयी माहिती मिळते.

- सोहोनी, श. कृ.

  शैक्षणिक टिपाकोश १९९३, प्रकाशक सोहोनी सुधा श. गुलमोहोर पेरावे पार्क, पुणे – ३०.

  सदर पुस्तकामध्ये ग्रंथालयाविषयीची माहिती मिळते. ग्रंथालय हे कोणत्याही शिक्षण संस्थेचे लक्ष्य आहे हे सांगितले आहे. ग्रंथालयात पाठ्य पुस्तकाखेरीज शब्दकोश, संदर्भ कोश, तत्सम नियतकालिके, शैक्षणिक अहवाल व विषयवार विविध पुस्तके असतात. अलिकडील काळात ग्रंथसांभार आतोनात वाढल्याने, ग्रंथ जमा करणे, संशोधन साहित्य मिळविणे त्यांचे जतन करणे ते दुसऱ्याला उपलब्ध करून देणारी यंत्रणा निर्माण करणे यामध्ये समस्या आल्या. त्यामुळे शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करून त्याचे शास्त्र बनविण्यात आले याविषयी माहिती मिळते. **(सोहोनी, १९९३)**

## २.९ संशोधन विषयाच्या संदर्भात इंटरनेटवरील उपलब्ध वेबसाईटस्

Websites :-

http://www.puneeducation.net/ayurvedic

1) www.mush.com
2) www.google.com
3) www.itcompany.com
4) www.infolibrarain.com
5) www.ayurved.wagholi.com

6) www.ayurbalance.com
7) www.carcayu.com
8) http://mr.wikipedia.org/wiki
9) www.refernce.com
10) www.nim.nih.gov
11) www.ocic.org
12) http://www.ayurveda.nama.org
13) http://www.ayurvedicacademy.com/history.htm/
14) http:ayurveduniversity.com
15) http://maharash/modules/sitecontent/history.new.php
16) http://marathiword.com/shrushtiranga/science/qyurved.html
17) http://www.indg.in/health/ayush-1
18) http://www.globalmarathi.com
19) http://vidyarajvision.org.in/prakalp.html
20) http://www.ncbi.nlm,nih,gov/pmc/articles
21) http://www.aaos.org.sg/html/aboutus.html
22) http://epaper.esakal.com
23) http://ccimindio.org/introduction_ccim.html
24) www.ccras.nic.in/about_ccras
25) http://indianmedicine.nic.in/central_sch.asp
26) http://whglibdoc.who.int/hq

## २.१० संशोधन पेपर व इतर

- Khandare, Dhanishta S. & Karekar, Vijay. (25 Feb. 2011) from the editors desk. Role of Libraries with reference ICT and NAAC Accreditation. State level conference proceeding Pune ‘Tilak Maharashtra Vidyapeth P. 9.
- S. R. Mendale & Khot N. B. (22nd & 23rd Auguest, 2013) Electronic Resource usage in Ayurved Medical Libraries in Maharashtra National Conference proceeding Aurangbad.

Vinayakrao Patil Mahavidyalaya, Vaijapur, Aurangabad. P. 211 ISBN -978-93-80876-41-2. P. 211.216.

- S. R. Mandale & Khot N. B. (27th & 28th September, 2013) A case study of Eclectronic resource usage in Annasaheb Dange Ayurved Medical College, Ashtha, National Level Conference proceeding : AISSMS College of Enginneing Pune P.-57 ISNB-978-935137-482-4. P-57-60.
- S. R. Mandale & Khot Namita B. (30th & 31st Aug. 2013) study of Library Automation in Ayurved Medical College Libraries in Sangli District. State level seminar proceeding 30th & 31st Auguest 2013 Yashavantrao Chavan Institute of Science Satara. P-22-26.
- Khot, Namita B. (30th & 31st Auguest, 2013) Computerization and modern Library practices. State level seminar. Satara. Yashavantrao Chavan Institute of Science, Satara.
- खराडे, विकास व. (30th & 31st Auguest, 2013) संगणकीकरण : एक काळाची गरज, 'Computerization and modern Library practices' या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र सातारा : यशवंतराव चव्हाण इन्स्टीट्युट ऑफ सायन्स सातारा. झ.-१३-२१.
- Mandale, S. R. & Khot N. B. (October, 2013) Study of Library Automation in Ayurved Medical College Libraries in Pune District : International Journal of Multidisciplinary Research Pune. Vol. – II Issue 7 (VIII) October 2013 ISSN:2277-9302 P- 24-27.
- Mandale, S. R. & Kharade V. V. (25th & 26th February, 2014) use of cloud computing in Library and Information Science field. National level conference proceeding 2014, Kolhapur : Br. Balasaheb Khardekar Library & Dept. of Library and Information Science Shivaji University Kolhapur ISBN-978-81-8486-523-3 P.-359-362.

- Mandale, S. R. Khot N. B. (15th March, 2014) An Anyletical study of the Ayurved Medical College Libraries of Maharashtra in the age of Informational Technology : International Journal of Multidisciplinary research Vadgaon Sheri Pune.
- Naik S. D. & Dahibhate N. B., Karambdkar M. A. (26th & 26th February 2014) Networking of Academic Libraries in Digital Era. National level conference proceeding Kolhapur. Br. Balasaheb Khardekar Library, Shivaji University, Kolhapur. ISBN-978-81-8486-523-3 P.- 86-93.
- पाटील पांडुरंग बी. (8th & 9th April 2011) ग्रंथालयातील माहिती स्त्रोत आणि व्यवस्थापन ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाची भूमिका या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र, कराड-वेणुताई चव्हाण कॉलेज कराड.
- पाटील पांडुरंग बी. (फेब्रुवारी २०११) माहिती संप्रेषण तंत्रज्ञान आणि मुल्यांकना संदर्भात महाविद्यालयीन ग्रंथालयांची भूमिका या विषयावर राज्यस्तरीय परिषद, पुणे टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.


## समारोप

प्रस्तुत संशोधनासाठी सदर संशोधकाने महाराष्ट्रातील विविध ग्रंथालयांना भेटी देऊन या अगोदरच्या संशोधनाचा आणि संशोधन साहित्याचा आढावा घेतला आहे. तो या प्रकरणांमध्ये दिला आहे. ग्रंथालय आणि माहिती शास्त्रातील राष्ट्रीय व राज्यस्तरावर झालेल्या विविध परिषद आणि चर्चासत्रामध्ये सहभागी होऊन त्यामध्ये सदर संशोधनाच्या अनुषंगाने संशोधन पेपर सादर केले आहेत. त्यातील माहितीही दिली आहे. इतर संशोधन तज्ञांच्या संशोधन पेपरमधील सारांशही दिला आहे. या प्रकरणामुळे संशोधन कार्यास सर संशोधकास निश्चित दिशा मिळाली.

# संदर्भ सूची


- **आपटे, वा. गो.** (२००५) अनमोल मराठी शब्द रत्नाकर अनमोल प्रकाशन पुणे. पृ. ४४५.
- **आगलावे,प्रदिप** (२०००) संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन नागपूर.
- **कुंभार, राजेंद्र.** (१९९४) ग्रंथालय व्यवस्थापन वाचनसाहित्य संग्रहाचा विकास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक पृ. ९७.
- **कर्णिक, प्रदिप.** (२०००) संशोधन प्रकल्प : स्वरूप व लेखन पद्धती नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ पृ. ३६.
- **कऱ्हाडे, बी. एम.** (२००७) शास्त्रीय संशोधन पद्धती आ. २ री पिंपळापुरे प्रकाशन नागपूर.
- **कुलकर्णी, विश्वंभर / भिंताडे, विनायक रामचंद्र**. (२००६) भारतीय आधुनिक शिक्षण : समस्या आणि उपाय श्री. विद्या प्रकाशन पुणे.
- **कोलारकर, राजेश शिवाजीराव.** (२००८) आयुर्वेद इतिहास प्रथमावृत्ती ५ सप्टेंबर २००८, जान्हवी प्रकाशन, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर. ४१६११४.
- **के, सागर व पाटील, व्ही. बी.** (१९९८) महाराष्ट्राचा सर्वांगीण इतिहास के. सागर प्रकाशन पुणे.
- **के, सागर.** (१९९८) अरसा हा भारत के. सागर प्रकाशन पुणे. पृ. ३९८.
- **चार्ल्स, बुशा व स्टिफन, हार्टर**. (१९८०) रिसर्च मेथडस इन लायब्ररीयनशीप, एकॅडेमिक प्रेस.
- **जोशी, भिमसेन रंगाचार्य / पोंक्षे दत्तात्रय**. (२००७) सामाजिक शास्त्रांमधील संज्ञा सिद्धांताचा स्पष्टीकरणात्मक कोश (शिक्षणशास्त्र) प्रथमावृत्ती जानेवारी २००७, डायमंड पब्लीकेशन्स, सदाशिव पेठ, पुणे – ७.
- **जोशी, महादेवशास्त्री**. (१९७६) भारतीय संस्कृती कोश खंड - १.
- **जोगळेकर, श्री. वा**. (२००१) वैद्यकिय शब्दकोश, ओरिएंट लॉंगमन लिमिटेड आर. कामानी मार्ग मुंबई.

- **जोशी, तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री**. (१९७६) मराठी विश्वकोश खंड २, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई.
- **जाधव, तुकाराम**. (२०१२) महाराष्ट्र वार्षिकी द युनिक ॲकॅडमी, पुणे.
- **जोशी, तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री**. (१९९४) लेखसंग्रह खंड १, श्री. विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे – ३०.
- **तांबे,बालाजी**. (२०१०) आयुर्वेद उवाच ।। भाग १, बालाजी तांबे फाउंडेशन, कार्ला – ०५.
- **दळवी, दिपक**. (२००७) डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड - १, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे
- **दळवी, दिपक**. (२००७) डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड २, डायमंड पब्लीकेशन्स, २००७, सदाशिव पेठ, पुणे – ३०.
- **दिक्षित, दुर्गा**. (१९९१) डायमंड महाराष्ट्र संस्कृतीकोश, डायमंड पब्लीकेशन्स, सदाशिव पेठ, पुणे – ३०.
- **देशपांडे, लिना**. (२०००) सर्वेक्षण : एक संशोधन पध्दती नाशिक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ पृ. २, ३, १०, ११.
- **देशपांडे, राजेंद्र**. (२०००) शरीर क्रिया विज्ञान भाग १, शंतनु प्रकाशन, अहमदनगर पृ.
- **देव विजय** (१९९७) राजकिय विश्लेषण कोश, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी ८३०, सदाशिव पेठ, पुणे – ३०.
- **दास्ताने, संतोष**. (२०१२) महाराष्ट्र २०१२, नितिन प्रकाशन, पुणे -०२.
- **दास्ताने, संतोष**. भारत एक पाहणी : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे – ४११०३०.
- **दास्ताने, संतोष**. (१९९८) भारत एक पहाणी.
- **नरगुंदे, रेवती**. (२००२) ग्रंथालये आणि सामाजिक विकास युनिव्हर्सल प्रकाशन १३/६, मृत्युंजय कॉलनी, कोथरूड पुणे – २९. पृ. १६, ११६.

- **निकोसे, सत्यप्रकाश**. (२००७) आधुनिक ग्रंथालयाचे व्यवस्थापन प्रज्ञा प्रकाशन, नागपूर – २२ पृ. ३५८.
- **पवार, एस. पी. / जाधव, सुनंदा**. (जाने. २००५) ग्रंथालय व माहितीशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर – १२ पृ. ३३६.
- **पोखरापूरकर, राजा**. (२००७) संशोधनासाठी नमुना निवड यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक पृ. ३.
- **पहाडे, दिनकर मुकुंद**. (१९९३) व्यावहारीक आयुर्वेदाचा इतिहास व्यावहारीक प्रकाशन, माडगाव, वर्धा.
- **परांजपे, माणिक / जोशी, सुनिल**. (२००५) ग्रंथपालन प्रमाणपत्र परिक्षा (वर्गीकरण व तात्वीक प्रश्नोत्तरे) नवचैतन्य प्रकाशन एस. व्ही. रोड, बोरीवली (प.) मुंबई – ४०००९२ पृ -. ७०.
- **बुवा, जी. ए**. (२००७) ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह श्री. साई प्रकाशन, जुनी ग्रामपंचायत कार्यालयानजीक, बांदा ता. सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग – ४१६५११. पृ. १६५
- **बापट, भा. गो**. (२०००) शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शिक्षण विकास व्हीनस प्रकाशन, पुणे - ०२.
- **बाक्रे, अ. वि**. (२०००) आयुर्वेद वास्तव-अवास्तव ग्रंथालय ज्ञानयज्ञ म्युनिसिपल स्कुल टोपीवाला लेन ग्रॅट रोड मुंबई-०७ पृ. ३४, ५३.
- **भटकर, अरूण**. (२००४) आयुर्वेद इतिहास १ ली आवृत्ती २००४. गोदावरी पब्लीशर्स ॲन्ड बुक्स प्रमोटर्स १४८, शास्त्रीनगर, नागपूर पृ. – ९.
- **भट, शरद गो**. (डिसेंबर २००८) इलेक्ट्रॅानिक माहिती साधने, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स २०६, राम मंदीर गल्ली, महाल नागपूर – ३२. पृ. ४५.
- **महाजन, शा. ग**. (२००४) पुणे शहराचा ज्ञानकोश : पुणे शहराचा ज्ञानकोश प्रतिष्टान, आ. २ री २००४.
- **महाजन, शा. ग.** मी पीएच. डी. होणारच ! युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे – ३०.

- **महाजन, शा. ग.** (१९९५) ग्रंथालय व्यवस्थापन, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन सदाशिव पेठ, पुणे – ३०. पृ. २४.
- **मानकर, सुधाकर.** उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढ अतुल पब्लीकेशन्स, कोल्हापूर – ०८.
- **मात्यु,मामन**. (२०१२) मनोरमा इयरबुक २०१२, मलायला मनोरमा, पी. बी. न. २६ कोय्यायम, केरळ – ०१.
- **यादव, दिपक प्रेमचंद**. (२०१०) आयुर्वेद इतिहास १ ली आवृत्ती २०१०, चौखम्मा सुरभारती प्रकाशन, वाराणसी २२१००१. पृ. १३.
- **रानडे, सुभाष / परांजपे,गो. रा.** (१९८५) आयुर्वेदाचा इतिहास व परिचय, अनमोल प्रकाशन, पुणे – ०२.
- **रिसवडकर, म. रा.** संशोधन व्याख्या आणि पद्धती नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **रानडे, सुभाष / परांजपे, गो. रा.** (२००७) आयुर्वेदाचा इतिहास, अनमोल प्रकाशन ६८३, बुधवार पेठ, पुणे – ०२.
- **साखरे, राजेंद्र रमाकांत**. (२००३) ग्रंथालय, संदर्भसेवा : तात्वीक व प्रात्यक्षिक, युनिव्हर्सल प्रकाशन, मृत्युंजय कॉलनी, कोथरूड, पुणे – ४११०२९. पृ. ३८.
- **संत, दु. का**. (१९९८) संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.
- **सोहोनी, शा. कृ**. (१९९३) शैक्षणिक टिपाकोश, गुलमोहोर, पेशवे पार्क, पुणे – ३०.
- **सी, लाल एवम कुमार के**. (२००४) ग्रंथालय अध्ययन माला एवम सुचना विज्ञान ESS ESS पब्लीकेशन्स अनसारी रोड, दर्यागंज, न्यू देल्ही – ०२ P - १२

**English Books**

- **Best and Khan**. (1995) Research in education, prentice Hall, New Delhi. P. 16.

- **Busha, Charles. Harter, Shtephenp**. (1980) Research Methods in Librarianship. Techniques and Interpretation NewYork : Academic Press.
- CCIM Rules (1996) ISM C.H.
- **Deshpande, Neela J. / Patil, S. K.** (2004) University and College Librarianaship in India in the 21st century. Jaykar Library, University of Pune – 07. P 0 72.
- Govt. Of India (2004) The Ayurvedic Pharamacopo EIA of India part I. Vol. IV. 2004.
- **Gaikwad, M. N. / Bilawar, P. B**. (2012) Current Trends in Ayurvedic Medical College, Libraries in Kolhapur District (Maharashtra) India. : A study LAP-LAMBERT Academic Publishing. 2012 P. 39.
- **Gopal, M. H.** (1970) Introductin to research procedure in Social Sciences Bombay : Asia Publishing House.
- **Jamdhade Mohan Laxman** यांनी " A Study of subject Classification in Ayurved faculty according to dewey decimal classification and colon classification 2012.
- **Kumar, Krishan**. (1987) Library Administration and Management. Nikas Publishing Houses Pvt. Ltd. 576, Maslid Road, Jangpura, New Delhi – 14. P – 112.
- **Narayan B**. (1998) Total Quality Management. A.P.H. Publishing Corporation Ansari Road, Darya Ganj New Delhi – 02 P. 29.
- **Shukla, R. K**. (1995) Automation of Library and Information Center Concept publishing Company, Mohan Garden New Delhi – 59. P. – 41.
- **Ranade, Subhash / Abbas, Qutab. / Deshpande, Rajendra**. (1998) History & Philosophy of Ayurvda. International Academy of Ayurveda Eandwane Pune – 38 P. 13.


**मराठी नियतकालिके**

* **कांबळे, तानाजी लक्ष्मण**. (सप्टेंबर, २०१०) ग्रंथविश्व-भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक – डॉ. शियाली रामामृत रंगनाथन पुणे : मासिक जडण घडण – पृ. ३६.
* **खोत, नमिता**. (जुन, जुलै, ऑगस्ट २००७) सिक्स सिग्मा : ग्रंथालयातील गुणवत्ता व्यवस्थापनाची गुरूकिल्ली, ज्ञानगंगोत्री, नाशिक – यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ पृ. १०
* **खोत, नमिता आणि बर्वे, राहूल**. (डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी) २०१०-११ युजर स्टडी आणि युजरस्टडीचे ग्रंथालयीन उपयोजन ज्ञानगंगोत्री, नाशिक : य़शवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ पृ. ११.
* **जोशी, मिनल मुकुंद. / बाहेती, एस. आर.** (२००७) ग्रंथालयात पोर्टल, व्होर्टल आणि गेटवे यांची आवश्यकता ज्ञानगंगोत्री जुन, जुलै, ऑगस्ट, २००७ पृ. २१.
* **देवधर, विजय**. (२००६) ग्रंथालयासाठी गुणवत्ता व्यवस्थापन : ग्रंथालय व्यवस्थापन पद्धतीत गुणवत्तेची भूमिका सप्टेंबर, ऑक्टोंबर, नोव्हेंबर २००६ ज्ञानगंगोत्री नाशिक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक पृ. ४२.
* **बुवा, जी. ए. व खानोलकर श्रीमती, राखी प्रभू.**(२००८) ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापन व संशोधनासाठी उपयुक्त तंत्रे, ज्ञानगंगोत्री जानेवारी - फेब्रुवारी २००८. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अंक – ३ पृ. ३७.

**इंग्रजी नियतकालिके**

* **Flatey, Robert and prock Krista**. (2009) E-resource collection development : A servey of current practice (e-Jourrnal) p 296.
* **Srinivasalu, P. and Reddy, V. Pulla**. (2010) A survey of MedicalCollege Libraries in Andhrapradesh, India. Library Philosophy and practice (Ejournal) 391.
* **Deivanai, T.R. and Selvam J** (January 2010) professional ethics in Librarianship University News, 48 (03) January, 18-24, 2010 P 16.

- **Chauhan, B. P.** (Dec. 27-31, 2004) ICT Enabled library and Information services winter school TIET 2004 P-1.
- **Earl, Maratha F**. (April 1996) Library instruction in the Medical School Curriculum : a survey of Medical College Libraries. Bull med Library Association 84 (2) April 1996 P. 191.
- **Ramana, P. V. and Rao V. C.** (March 2003) Use of Information Technology in central University Libraries of India DESI DOC Bullectin of Information Technology Vol. 23 No. 02 March 2003 P. 25.
- **Krubu, Dorcas Eiemeh**, (2011) The Impact of Information and communication Technology (ICT) in Nigerion University Libraries. Library Philosophy and practice 2011. ISSN – 1522-0222.
- **Vibhati, Natraj B.** (2003) Improving Teaching Effective veness in Library and Information Science Educaiton University News, Vol. 41 No. 02 January 13-19, 2003 P – 15.
- **Bhatt, Atul.** (Jan. 2012) An Analytical study of the Medical College Libraries of Gujrat in the age of Information Technology Library Philosophy and practice (e-journal).
- **Khatri, Ajay B. & Choukhande, Vaishali G.** (Sept. 2012) Indigenous knowledge web Resources in India with special Reference to Ayurvedic Resources : International Journal of Digital Library services. Vol. 2 July-September, 2012 Issue – 3 (ISSN : 2250-1142) P-01.
- **Jamdade, Mohan. Jamdade, Pramila. Pange, Bhausaheb. Mugade, Vishnu**. (Sept. 2012) Library classification and It's Development 'A study Review of Reserarch Vol. 1 Issue 12 Sept. 2012 P. – 12.

- **Jamdade, Mohan L., Jamdade, P. M., and Pange, B. M.** (Auguest, 2011) Classificaiton schemes in Ayurved College Libraries in Maharashtra : A Study Vol. 1 Issue – VII (Augest, 2011) : Liberary Science.
- **Kemdarne, Suryakant B.** (2012) "A study of Library Automation and Networking in Dental College Libraries Affiliated to Rajiv Gandhi University of Health Science, Banglore Ph.D. Thesis Tilak Maharashtra, Vidyapeeth Pune.
- **कचरे, मृणालिनी. आबासाहेब**. (२००१) "महाराष्ट्रातील शासकिय वैद्यकिय महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा विकास एक अभ्यास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक.
- **कदम, अर्चना. गणेश**. (२०१०) "मुंबई शहरातील आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयांचा अभ्यास" यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **कढणे मंगला आ.** (२०१०) "राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय ठाणे ग्रंथसंग्रहाचे मुल्यमापन : एक अभ्यास ठाणे.
- **पाटील, पांडुरंग. बाळकृष्ण**. (२०१२) महाराष्ट्र राज्यातून प्रसिद्ध होणाऱ्या मराठी वृत्तपत्रांच्या माहिती संप्रेषणात वृत्तपत्रीय ग्रंथालयांचे योगदान पीएच. डी. प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ गुलटेकडी पुणे.
- **Sudge, Suresh**. (2012) modernization of Libraries Attached to the Defence traning and education Institutes in India with Reference to services and sources, Ph.D. Thesis Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.
- **बेगम, रूखसाना**. (२००१) "An Evaluation of all Amen Medical College central Library, Bijapur by the students and teaching staff." Shivaji University Kolhapur.

- **चव्हाण, माया. गणेश.** (२००३) "पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांच्या वाचकांना मिळणाऱ्या सेवांचा अभ्यास" यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **चोपडे, संदिप उत्तम**. (२००६) "आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयात माहिती साधन म्हणून होत असलेला नियतकालिकांचा उपयोग" यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **चव्हाण, चंद्रकांत. मारूतीराव.** (२००४) "राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर ग्रंथालय एक अभ्यास" यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **चौगुले, सुवर्णा. मधुकर**. (२००८) "बेळगाव येथील एम. ए. शेख, होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज आणि हॉस्पीटल ग्रंथालय : एक अभ्यास" यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **गवळी, सुभाष. केशवराव**. (२००८) "पुर्णा येथील रामराव पाटील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयातील विद्यार्थी वाचकांच्या माहिती विषयक गरजा : एक अभ्यास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **गवारे, मंदा. शामराव.** (२००८) "कृष्णा वैद्यकिय महाविद्यालय कराड ग्रंथालय संगणकीकरणची सद्य स्थितीचा अभ्यास करणे." यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **जगताप, राजाराम. यशवंत.** (२००४) "कराड येथील कृष्णा वैद्यकिय महाविद्यालय ग्रंथालयांच्या सद्यस्थितीचा आढावा : एक अभ्यास" यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **मुल्ला, एस. ए**. (२००१) "Reading habits of teacher and students in Krishna Institute of Medical sciences, Karad : A study" Shivaji University, Kolhapur.

- **मोरे एस. एस**. (१९९७) "Development plan of Government Medical College Library, Miraj" Shivaji Vidyapeeth Kolhapur.
- **महाजन, एस. डी**. (२००५-२००६) "कृषी महाविद्यालय कोल्हापूर या ग्रंथालयातील नियतकालीकांचा वापर : एक अभ्यास" यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **नांगरे, शिवाजी ज्ञानदेव**. (२००४) "पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांचा अभ्यास." यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **पाटील, संजूताई नामदेव**. (२००५) "कोल्हापूर जिल्ह्यातील वैद्यकिय महाविद्यालयीन ग्रंथालये" यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
- **पाटील पांडुरंग सिताराम** (२००४) "भोगावती महाविद्यालय कुरूकली ग्रंथालय एक अभ्यास" यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **सावंत, दिपाली पांडुरंग**. (२०११) "आयुर्वेदीक मेडीकल कॉलेज पेठवडगाव ग्रंथालय एक अभ्यास" यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **साळुंखे,विलास**. (२००३) "कृष्णा वैद्यकिय महाविद्यालय ग्रंथालय कराड : एक अभ्यास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक.
- **सोने,स्वाती महादेव**. (२००८) "माईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय सावंतवाडी ग्रंथालय एक अभ्यास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
- **Khandare, Dhanishta S. & Karekar Vijay**. (25 Feb. 2011) from the editors desk. Role of Libraries with reference ICT and NAAC Accreditation. State level conference proceeding Pune 'Tilak Maharashtra Vidyapeth P. 9.
- **Khot, Namita B.** ($30^{th}$ & $31^{st}$ Auguest 2013) Computerization and modern Library practices. State level seminar. Satara. Yashavantrao Chavan Institute of Science, Satara.

- **खराडे, विकास व**. (30th & 31st Auguest, 2013) संगणकीकरण : एक काळाची गरज, ‘Computerization and modern Library practices’ या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र सातारा : यशवंतराव चव्हाण इन्स्टीट्युट ऑफ सायन्स सातारा. झ.-१३-२१.
- **Khot, N. B**. (25th & 26th February 2014) Cloud computing and Academic Libraries : An overview National level proceeding Br. Balasaheb Khardekar Library Shivaji University Kolhapur. ISBN-978-81-8486-523-3 P – 238-245.
- **Pange, B. M**. (8 & 9 April 2011) Library Automation and its impact role of Information Techonology in Library. State level seminar Karhad : Venutai Chavan College P. 35.
- **Mandale S. R. & Khot N. B.** (22nd & 23rd Auguest, 2013) Electronic Resource usage in Ayurved Medical Libraries in Maharashtra National Conference proceeding Aurangabad. Vinayakrao Patil Mahavidyalaya, Vaijapur, Aurangabad. P. 211 ISBN -978-93-80876-41-2. P. 211.216.
- **Mandale S. R. & Khot N. B**. (27th & 28th September 2013) A case study of Eclectronic resource usage in Annasaheb Dange Ayurved Medical College, Ashtha, National Level Conference proceeding : AISSMS College of Enginneing Pune P.-57 ISNB-978-935137-482-4. P-57-60.
- **Mandale S. R. & Khot Namita B**. (30th & 31st Aug. 2013) study of Library Automation in Ayurved Medical College Libraries in Sangli District. State level seminar proceeding 30th & 31st Auguest 2013 Yashavantrao Chavan Institute of Science Satara. P-22-26.
- **Mandale S. R. & Khot, N. B**. (October, 2013) Study of Library Automation in Ayurved Medical College Libraries in Pune District

: International Journal of Multidisciplinary Research Pune. Vol. – II Issue 7 (VIII) October 2013 ISSN:2277-9302 P- 24-27.

- **Mandale, S. R. & Kharade V. V**. (25th & 26th February 2014) use of cloud computing in Library and Information Science field. National level conference proceeding 2014, Kolhapur : Br. Balasaheb Khardekar Library & Dept. of Library and Information Science Shivaji University Kolhapur ISBN-978-81-8486-523-3 P.- 359-362.
- **Mandale S. R. Khot N. B.** (15th March 2014) An Anyletical study of the Ayurved Medical College Libraries of Maharashtra in the age of Informational Technology : International Journal of Multidisciplinary research Vadgaon Sheri Pune.
- **पाटील, पांडुरंग बी.** (8th & 9th April 2011) ग्रंथालयातील माहिती स्त्रोत आणि व्यवस्थापन ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाची भूमिका या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र, कराड-वेणुताई चव्हाण कॉलेज कराड.
- **पाटील, पांडुरंग बी**. (फेब्रुवारी २०११) माहिती संप्रेषण तंत्रज्ञान आणि मुल्यांकना संदर्भात महाविद्यालयीन ग्रंथालयांची भूमिका या विषयावर राज्यस्तरीय परिषद, पुणे टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.

# प्रकरण ३ रे
# आयुर्वेदाचा इतिहास व विकास

## ३.१ प्रस्तावना

महाराष्ट्र हे विद्येचे माहेरघर असून येथे अनेक शिक्षण संस्था कार्यरत आहेत आणि येथे उत्तम दर्जाचे शिक्षण दिले जाते. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील मोलाचे कार्य करणारे अनेक समाज सुधारकांचा पाया महाराष्ट्राने घातला आहे. पत्रकारीतेमध्ये आणि संशोधन कार्यात अनेक मानदंड महाराष्ट्राने निर्माण केले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास झाला आहे. माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये महाराष्ट्र अग्रेसर बनत चालला आहे. महाराष्ट्राला ऐतिहासीक आणि शैक्षणिकदृष्ट्या खूप महत्व आहे. (**दास्ताने, १९९८**)

महाराष्ट्र हे विद्येचे माहेरघर असलेने येथे शिक्षणाला अत्यंत महत्व आहे. महाराष्ट्रातील आधुनिक शिक्षणाची सुरूवात मिशनऱ्यांनी आठराव्या शतकात प्रथम केली. विसाव्या शतकात अनेक शैक्षणिक संस्था, शाळा, महाविद्यालये यांनी अध्यापन, संशोधन, ग्रंथप्रकाशन, यांच्याव्दारे शिक्षणप्रसाराचे कार्य वाढवत नेले. संस्कृत, तत्वज्ञान, धर्मशास्त्र, पुरातत्वशास्त्र अशा अनेक विद्या शाखांमध्ये राज्यातील विद्वानांनी वेगळा ठसा उमटविला आहे. महाराष्ट्रात विशषतः १९६० नंतर उच्च शिक्षणाच्या सोयी सामान्य लोकापर्यंत पोहचण्याची प्रक्रिया सुरु झाली. सामाजिक बदल आणि अभिसरण यांना शैक्षणिक क्रांतीने सुरूवात झाली. (**जाधव, २०१२**)

आयुर्वेद या पारंपारिक उपचार पध्दतीचे मुळ दक्षिण आशियात आहे, आयुर्वेद मानवी शरीर, आजारपण, थेरपी आणि सुदृढ जीवनशैली यासाठीची एक रचनात्मक पध्दती आहे. या पध्दतीला प्राचीन असा इतिहास असून तो खिस्तपूर्व ५ व्या शतकातील बुध्दकालीन आहे. दोन हजारापेक्षा अधिक काळ हजारो आशीयाई लेखकांनी या पारंपारीक उपचार पध्दतीवर अत्यंत विस्तृत स्वरूपात साहित्य निर्मिती केली आहे. अद्याप पर्यंत खुप प्रसार झालेल्या संस्कृत पुस्तकावरून हे साहित्य हस्तलिखितांच्या माध्यमातून पुढे पाठविणे ही १९ व्या शतकातील सामान्य बाब होती. भारत, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ आणि जगाच्या इतर भागातील ग्रंथालयात उपलब्ध आहेत. **(Domini, 2003)**

शिक्षण म्हणजे 'मानवाला जी स्वावलंबी व निस्वार्थी बनविते. त्यास शिक्षण म्हणावे अशी ऋग्वेदामध्ये शिक्षणाची व्याख्या करण्यात आली आहे. (**जोशी १९७६**)

समाजामध्ये आरोग्य शिक्षणाला अन्यन्य साधारण महत्व आहे. वैद्यकिय शिक्षण हे आयुर्वेदिक, होमीयोपॅथीक, ॲलोपॅथीक या वेगवेगळ्या उपचार पध्दती आहेत. वैद्यकिय शिक्षणातून उत्कृष्ठ वैद्यक घडविणे हा महत्वाचा उद्देश असतो. प्राचीन काळापासून ऋषी - मुनीनी लिहिलेल्या धर्मग्रंथ, देव, उपनिषदातून आयुर्वेद शिक्षणास फार महत्व असल्याचे दिसून येते. तथापी सध्याचे आयुर्वेदीक शिक्षण फार गतीशील झाल्याचे दिसून येते. समाजाचा आयुर्वेदाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत आहे. आयुर्वेदाची भूमिका भविष्यात निर्णायक ठरणार आहे. विशषतः आयुर्वेदा विषयीचे वाढते आकर्षण लक्षात घेता पारंपारिक औषधांना देखील महत्व प्राप्त होऊ लागले आहे. त्यामुळे पूर्वीच्या मिश्र शिक्षणक्रमाच्या धर्तीवर नवा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याचा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा मानस आहे. **(WHO, 2001)**

'शुभं करोती कल्याणम् आरोग्यम् धनसंपदा' या संध्याश्लोकाला भारतात विशेषतः महाराष्ट्रात वेगळे महत्व आहे. महाराष्ट्रातील वैद्यकिय सेवा ही अगदी पुरातण काळापून आहे. प्राचीन काळापासून महाराष्ट्रात आयुर्वेद वैद्यकप्रणाली अस्तीत्वात आले. आयुर्वेद हे वैद्यकशास्त्र उदयास आल्यापासून शेकडो वर्षे अऩेक ऋषी मुनीनी त्यावर पध्दतशीर संशोधन केले. नंतरच्या काळात अनेक आयुर्वेदतज्ञ व वैद्यक भारतात निर्माण झाले. त्यातील बरेचसे वैद्यक हे महाराष्ट्रातील आहेत. **(जोशी, १९७६)**

भारतातीलच नव्हे तर परदेशातील विद्यार्थी देखील आयुर्वेदाकडे आकृष्ठ झाल्याचे दिसून येते. Ayurveda can be described as the science, which imports knowledge of life. "हिता ऽ हित सुख दुःखामायुस्तस्य हिता ऽ हितम्। सावं व सच्च यवोक्त आयुर्वेदः स उच्चते।" **(www.ayerbalance.com)**

आयुर्वेद हा संस्कृत भाषेतील शब्द असून त्याचा संधी विग्रह आयु + वेद म्हणजेच जीवन + विद्या असा होतो. **(रानडे, १९८५)**

ज्या शास्त्रात आयुष्याबद्दलचे ज्ञान आहे किंवा ज्या शास्त्राच्या उपयोगाने आयुष्य प्राप्त करून घेता येते ते शास्त्र म्हणजे 'आयुर्वेद' भारतात प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या वैद्यकिय ज्ञानाची कल्पना आयुर्वेद आणि त्यासारख्या विद्याशाखांमधून येते. आयुर्वेदाला सुमारे ३००० वर्षापासून चालत आलेली व्यापक आणि उत्तुंग परंपरा आहे. आयुर्वेद हा अथर्ववेदाचा एक घटक समजला जातो. तथापी विशेषतः गौतम बुद्ध यांच्या

आणि त्यानंतरच्या काळात आयुर्वेदामध्ये अनेक महत्वपूर्ण गोष्टींची भर घालण्यात आली. समुद्र मंथनातून निघालेले भगवान धन्वंतरी हे आयुर्वेदातील परंपरेनुसार आद्य मानले जातात.

आयुर्वेदाची आठ अंगे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कायाचिकित्सा. | २) | बालरोग व स्त्रीरोग चिकित्सा. |
| ३) | शल्यचिकित्सा. | ४) | शालाक्यचिकित्सा. |
| ५) | दंषचिकित्सा | ६) | गृहचिकित्सा |
| ७) | जरेची चिकित्सा | ८) | वाजीकरण |

या सर्वांना मिळून आष्ठांग आयुर्वेद असे म्हणतात. **(www.ayerbalance.com)**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना ३ जून, १९९८ मध्ये नाशिक येथे करण्यात आली. या विद्यापीठाचा मुख्य उद्देश आरोग्य विद्यापीठाचा दर्जा, उंचावणे, गुणवत्तायुक्त वैद्यकिय शिक्षण देणे आणि संशोधनासा प्रोत्साहन देणे हा आहे.

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार यांनी आयुर्वेदातील संशोधनासाठी ‘‘सेंट्रल कौन्सील फॉर रिसर्च इन आयुर्वेदा ॲन्ड सिध्दा’’ हा स्वतंत्र विभाग निर्माण केला आहे. या विभागाची देशात वेगवेगळ्या शहरांमध्ये ३३ रिसर्च सेंटर्स आहेत. या विभागाने मोठ्या प्रमाणावर आयुर्वेदातील साहित्य प्रकाशित केलेले आहे. भारतातील सर्व आयुर्वेद महाविद्यालये व संशोधन केंद्र या विभागाशी संलग्न आहेत. भारतात अनेक विद्यापीठांमध्ये व आयुर्वेद महाविद्यालयामध्ये संशोधनाने व ज्ञानदानाचे कामकाज चालते. आयुर्वेदाची परंपरा जतन करणाऱ्या महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक ६३ आयुर्वेद महाविद्यालये आहेत. तर देशात २५४ आयुर्वेद महाविद्यालये आहेत.

आयुर्वेद ही वैद्यकशास्त्रातील एक स्वतंत्र शाखा झाली असून त्याच्याविषयी शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था व कॉलेजेस महाराष्ट्रात विपूल प्रमाणात आहेत. यातून आज नवनवीन आयुर्वेद तज्ञ तयार होत आहेत.

या अनुषंगाने महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास अभिप्रेत आहे. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या विज्ञान युगात वैद्यकिय व अन्य क्षेत्रांत वेळोवेळी होणाऱ्या घडामोंडीची माहिती विविध प्रसार माध्यमांव्दारे तसेच माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गरजू अभ्यासू, संशोधन, विद्यार्थी तसेच वाचकांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ग्रंथालयांची आहे. आजची ग्रंथालये ही केवळ ग्रंथालये राहिली नसून त्यांना

“माहिती व संदर्भ केंद्र” म्हणून कार्य करावे लागत आहे. ग्रंथालये ही आपल्या संस्कृती व इतिहासाची रक्षणकर्तेच आहेत. ग्रंथालयाचा विकास व विस्तार हा अनौपचारिक व अविरत शिक्षणाचा एक भाग आहे. ज्ञान व माहितीच्या प्रसारणात त्यांना असाधारण महत्व प्राप्त झालेले आहे.

संशोधन कार्यासाठी निवडलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून वाचकांना, संशोधकांना सेवा देण्याच्या नवीन, आधुनिक तंत्रज्ञानाचा, साधनांचा अभ्यास करणे, ग्रंथालयातील ग्रंथ संग्रह, वाचकांच्या समस्या समजावून घेवून त्यावर उपाय सुचविणे यासाठी ग्रंथालयांचा अभ्यास करणे अभिप्रेत आहे.

## ३.२ आयुर्वेद अर्थ स्वरूप व व्याप्ती

प्रस्तुत संशोधन कार्य करीत असताना आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांच्या संदर्भात अभ्यास करीत असताना आयुर्वेद म्हणजे काय याचा थोडासा परामर्श घ्यावेसे महत्वाचे वाटते.

**१) आयुर्वेद**

आयु + वेद या ठिकाणी आयुर्वेदाचा साधा आणि सरळ अर्थ सांगितला आहे. आयु म्हणजे जीवन व वेद म्हणजे ज्ञान जीवनाचे सर्वांगीण ज्ञान करून देणारे शास्त्र म्हणजेच आयुर्वेद हे केवळ वैद्यक शास्त्र नसूनते जीवशास्त्र आहे. जीवनविद्या आहे “म्हणजेच ज्याच्यामुळे आयुष्याचे ज्ञान प्राप्त करून घेता येते तो आयुर्वेद” **(जोशी, १९८६)**

२) “आयुर्वेद हे भारताचे वैशिष्ट्यपूर्ण असे वैद्यकशास्त्र असून ते पृथ्वीवरील सर्वात प्राचीनतम असे वैद्यक शास्त्र आहे” तसेच “आयुर्वेद म्हणजे आयुष्याचे ज्ञान देणारे शास्त्र” **(परांजपे १९८५)**

३) आयुर्वेद – ‘आयु’ म्हणजे आयुष्य आणि ‘वेद’ म्हणजे सम्यक ज्ञान, म्हणून आयुर्वेद हे आयुष्य निरामय आणि आनंदी करण्याचे परीपूर्ण आणि सम्यक शास्त्र आहे. **(तांबे, २०१०)**

## ३.३. आयुर्वेद, आयुर्वेदाचा आढावा

### आयुर्वेद

समाजामध्ये आरोग्यशिक्षणाला अनन्यसाधारण महत्व असून वैद्यकिय शास्त्रामध्ये आयुर्वेद, होमिओपॅथीक, ॲलोपॅथीक अशा विविध उपचार पध्दती आहेत. या पैकी आयुर्वेद ही भारतीय उपमहाव्दीपामधील एक पारंपारीक व मूळ चिकित्सा पध्दती असून, ‘‘ती दक्षिण आशियामध्ये विशेषतः बांग्लादेश, भारत, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका या देशात मोठ्या प्रमाणात वापरली जाते. **(WHO, 2001)**

आज जगभर आयुर्वेद या शब्दाला प्रसिध्दी प्राप्त झाली आहे. भारतीय वैद्यकशास्त्र हे आयुर्वेद या नावाने प्रसिध्द झाले आहे. आयु म्हणजे आयुष्य व वेद म्हणजे ज्ञान असा या शब्दाचा अर्थ असल्याने आयुर्वेद म्हणजे आयुष्याचे ज्ञान अशी व्याख्या केली जाते. म्हणजेच हा वेद निरोगी व दिर्घ जीवनाचे रहस्य स्पष्ट करतो.




आयुर्वेद हा संस्कृत भाषेतील शब्द असून त्याचा संधीविग्रह (आयुः) जीवन विद्या (वेद) अशा प्रकारे होतो. ‘‘ज्या शास्त्रात आयुष्याबद्दलचे ज्ञान आहे किंवा ज्या शास्त्राच्या उपयोगाने आयुष्य प्राप्त करून घेता येते ते शास्त्र म्हणजे आयुर्वेद’’ **(WHO 2001)**

आयुर्वेदाचा इतिहास पाहिला तर आयुर्वेद दक्षिण आशिया मध्ये औषधाची एक प्रभावशाली प्रणाली राहिलेली आहे. ‘‘आयुर्वेदाचे आरंभीच्या काळातील साहित्य वैदीक काळापासून भारतात असल्याचे दिसून येते. आयुर्वेदाचार्यानी अनेक औषधानुसार व शल्यचिकीत्सच्या आधारावर / प्रक्रियेनुसार अनेक आजार व रोगांवर उपचार केले आहेत. आयुर्वेदातील उपचार पध्दतीमध्ये वनौषधी, आहार विषयक नियम, व्यायामाचे विविध प्रकार

आणि त्याद्वारे शरीरातील नैसर्गीक प्रतीकारशक्ती वाढविण्यावर भर दिला जातो. (Dept. of Ayurveda Govt. Of India)

**आयुर्वेदाचा आढावा**

वैदीक कालखंडानंतर 'ब्राह्मणे' व 'उपनिषदे' यांचा कालखंड आला. या काळात वैद्यकांवर ब्राह्मणांची हुकुमत होती. वैद्यकिय प्रशिक्षण स्वगृही होण्याची पध्दत या काळात रूढ झाली. या कालखंडातील वैद्यकप्रणालीस 'आयुर्वेद' हे नाव मिळाले. आयुर्वेदाचा अर्थ जीवनाचे शास्त्र असे आहे. आयुर्वेदाचे वैशिष्ट्य हे कि त्यात मानवाचा सर्वांगीण दृष्टीकोऩातून विचार झाला आहे. आयुर्वेदात आदर्श जीवन पध्दतीचे वर्णन आहे. आचार, विचार, आहार, व्यायाम, स्नान, परिसर, हवामान, ऋतूमान व औषधी या सर्वांचा एकत्रितपणे विचार करणारी आयुर्वेद ही प्राचीन काळातील एकमेव प्रणाली आहे.

आयुर्वेद हे पृथ्वी, जल, अग्नि, वायु आणि आकाश या पंच महाभुतावर आधारित आहे. ब्रह्माणंची रचनाही मानवाच्या शरीरामध्ये समाविष्ठ आहे. आयुर्वेद वात, पित्त व कफ या तीन दोषांचे संतुलन करते. आयुर्वेदानुसार हे तीन सिद्धांत दोष आरोग्यासाठी महत्वाचे आहेत. कारण जेव्हा ते संतुलित असतात तेव्हा शरीर निरोगी असते आणि जेव्हा ते असंतुलित असतात तेव्हा शरीर रोगी असते. **(जोशी, १९७६)**

'चरकसंहिता' व 'सुत्रुतसंहिता' हे आयुर्वेदातील प्रमाणग्रंथ मानले जातात. भारतीय संशोधकांच्या मतानुसार या ग्रंथाची निर्मिती इ. स. पूर्व ८०० च्या सुमारास झाली आहे.

भारतात वायव्येकडे तक्षशीला आणि पूर्वेकडील नालंदा व उत्तरेकडील वाराणसी ही विद्यापीठे प्रसिध्द होती. चरकाचा काल इ. स. १०० व सुश्रुताचा  इ. स. ४०० असे पाश्चात्य संशोधक मानतात. इ. स. ६०० मध्ये वाग्भटाने 'अष्ठांगहदयसंहिता' इ. स. १००० मध्ये सारंगधराने 'सारंगधरसंहिता' इ. स. १६०० मध्ये भावमिश्राने 'भावप्रकाश' आणि नंतर माधवाने 'माधवनिदान' हे ग्रंथ लिहिले.

या आयुर्वेदाचे वाग्भट, चरक आणि सुश्रुत हे तीन प्रसिध्द आयुर्वेदाचार्य होत. ते ब्रहतप्रयी यानावाने प्रसिध्द होते. यातील चरक हा शरीरशास्त्रात निपूण असून त्याने त्यावर आधारित चरकसंहिता हा ग्रंथ रचला. प्रत्यक्ष देवांचा वैद्य असलेल्या धन्वंतरीनेच याला शल्यतंत्र म्हणजे ऑपरेशनचे शास्त्र शिकविले असे म्हंटले जाते. सुश्रुताला त्वचारोपणतंत्र सुध्दा अवगत होते असे म्हणतात. तसेच त्याने डोळ्यांच्या शस्त्रक्रियेमध्ये देखील प्राविण्य

मिळविले होते. त्यानंतर इ. स. ७ व्या शतकाच्या पूर्वार्धात वाग्भट हा विद्वान होऊन गेला त्याने आयर्वेदावर आधारित अष्टांगहदय ग्रंथ लिहून विश्वाची रचना करण्यापूर्वीच ब्रम्हदेवांनी आयुर्वेदशास्त्र हजार अध्याय एक लक्ष्य श्लोकांच्या रूपात रचून ठेवले होते. नंतर मात्र मानवाचे अल्पायुष्य व अल्पबुध्दी यांचे विचार करून आयुर्वेदाची आठ अंगे तयार करावी लागली व आयुर्वेद अष्ठांग आयुर्वेद नावाने साकार झाली. ''कायाचिकित्सा म्हणजे साधारण रोगचिकित्सा, बालरोग व स्त्रीरोग यांची चिकित्सा, शल्यचिकित्सा, शालावयचिकित्सा, दंषचिकित्सा, ग्रहचिकित्सा, जरेची चिकित्सा वाजीकरण अशी आयुर्वेदाची आठ अंगे आहेत. या सर्वांना मिळून अष्ठांग आयुर्वेद असे म्हणतात. **(जोशी, १९७६)**




रामायण व महाभारतातही आयुर्वेदाचे उल्लेख सापडतात. हनुमंतानी सुषेण वैद्यांच्या सांगण्यावरून द्रोणगीरीहून मृतसंजीवनी आणणे, दशरथाच्या मृत्युनंतर भरत आयोध्येत येईपर्यंत त्यांचे शव तेलाच्या द्रोणीत ठेवणे वगैरे गोष्टींमुळे त्यावेळी आयुर्वेदशास्त्र प्रचलित असल्याचे लक्षात येते.

महाभारतात नारदमुनी युधिष्ठिराला 'तुझे वैद्य चिकित्सेच्या (ही अष्टांग आयुर्वेदाचीच आठ अंगे होत) निपुण आहेत काय ? असा प्रश्न विचारतात, त्यावरूनही या काळात राजा, महारथ्यावर आयुर्वेदतज्ञ उपचार करत असल्याचे लक्षात येते. **(जोशी, १९७६)**

## ३.४ आयुर्वेदाचा इतिहास, उदय व वाढ

“आयुर्वेदाची उत्पत्ती ही हिंदूधर्माशी सबंधित मुख्य चार वेदांपैकी एक अयर्ववेद या इसवी सनपूर्व सुमारे १२०० मध्ये रचल्या गेलेल्या वेदामधून झाली आहे. आयुर्वेद हा अथर्ववेदाचा एक घटक समजला जातो. आपल्या उपखंडातील जास्त प्रामाणिक संकलन आणि काम म्हणून सुश्रुत संहिता हा ग्रंथ उपलब्ध आहे. यामध्ये १८४ अध्याय आणि ११२० आजारावर, ७०० औषधी वनस्पती, ६४ खनिज स्त्रोतांची तयारी, ५७ प्राण्यांच्या माहिती वर आधारित आहे. **(रानडे, १९८१)**

**आयुर्वेदाचा इतिहास**

आयुर्वेदाव्दारे आपण ताप, खोकला, धाप लागणे, फोड, मिरगी, गाठ, त्वचारोग, कुष्ठरोग, मधूमेह, उच्च रक्तदाब अशा अनेक भयंकर रोगावर उपचार केला जातो. तसेच शल्य चिकीत्साव्दारे मोतीबिंदू ऑपरेशन, सिजरींग, जखमावर उपचार करण्याची पध्दतीसाठी प्रामुख्याने आयुर्वेद वनस्पतींचा वापर केला जात असे. आयुर्वेद उपचार पद्धतीमध्ये चरक संहितेचा समावेश प्रामुख्याने होत असतो.

अतिप्राचीन काळातील अस्तीत्वात असणाऱ्या साहित्यामध्ये सुश्रुता संहिता असून ते इ. स. ४०० मध्ये पांडू लिपीमध्ये लिहिण्यात आले आहे.

भारतीय उपचार पध्दती आणि त्याची मध्य आशियातील संकल्पना इतिहासकारांसाठी सुश्रुतांनी पांडू लिपीमध्ये सादर केली आहे.

इसवी सनाच्या सातव्या शतकात वाग्भट यांनी सुरूवातीच्या आयुर्वेदीक साहित्याचे एकत्रीकरण केले त्याला अष्ठांग संहिता असे म्हणतात.

चरक, सुश्रुत व वाग्भट यांचे काम आयुर्वेदाचा मूळ आधार समजले जाते.

**(शर्मा, १९९६)**

**ऋग्वेद : Ayurveda in Vedas**

ऋग्वेदातील आयुर्वेद ऋग्वेदात अश्विनी कुमारांचा विशेष उल्लेख आला आहे. इंद्र, अग्नी, सोम यांच्यानंतर ऋग्वेदातील महत्वाची देवता म्हणजे अश्विनौ हीच होय. या देवतेविषयी ५० सुक्ते आहेत. याशिवाय ऋग्वेदामध्ये इंद्राला सुध्दा वैद्यशास्त्र देवता म्हंटलेले आहे. **(कोलारकर, २००८)**

आयुर्वेदाच्या इतिहासाकडे लक्ष देताना आयुर्वेदाची देवता धन्वंतरी आणि आयुर्वेदात सर्वात पूजनीय असणाऱ्या वैद्य अश्विनीकुमार (देवांचे फॅमिली डॉक्टर) यांचा प्रथम विचार

अभिप्रेत आहे. आयुर्वेदाची देवता म्हणजे आरोग्याची देवता. अर्थातच अशी शक्ती की जिच्या उपासनेमुळे व कृपेमुळे संपूर्ण जीवनाचे सार्थक होऊ शकते. (**तांबे,२०१०**)

'धन्वन' शब्द हा धनुष्यवाचक असून, 'तरी' म्हणजे पार नेणारी नौका आणि या पार करणाऱ्या देवतेस धन्वंतरी म्हंटले जाते. योग आणि आयुर्वेद शास्त्राप्रमाणे शरीराचा मेरूदंड हे धनुष्याचे प्रतीक आहे. मेरूदंडाच्या तळाशी असणारी सुप्त शक्ती उत्क्रांत करून धनुष्याच्या म्हणजेच मेरूदंडाच्या वरच्या टोकाला जीव-शिवाचे, सीता-रामाचे मीलन करून जीवन आनंदमय करणे हाच आयुर्वेदशास्त्राचा उद्देश आहे म्हणून आयुर्वेदाची देवता धन्वंतरी आहे.

धन्वंतरीची उत्पत्ती समुद्रमंथनाच्या वेळी जलतत्वातून झालेली आहे. आश्विन कृष्ण त्रयोदशी म्हणजेच धनत्रयोदशीच्या दिवशी श्री धन्वंतरीची प्रार्थना व पूजा केली जाते.

एकंदरीत पाहता साप्रंत काळात ज्ञात असलेला आयुर्वेदाचा इतिहास पाहता अभ्यासण्यापूर्वी या प्राचीन, पारंपारीक, आयुर्वेदीय देवतांचे स्मरण व प्रार्थना करून आयुर्वेदाच्या अभ्यासाची सुरूवात करणे इष्ठ होईल. (**तांबे, २०१०**)

आयुर्वेद हे नुसते वैद्यकिय वा औषधाचे शास्त्र नाही, तर ते जीवन जगण्याचे, जीवन कसे जगावे यासंबंधी अथापासून इतिपर्यंत मार्गदर्शन करणारे जीवनशास्त्र आहे. अनादी म्हणजे ज्यांची सुरूवात नाही. अनंत म्हणजे ज्याला अंत नाही, जे नित्य म्हणजे सदैव व शाश्वत अस्तित्व असणारे आहेत आणि ज्यात अपार ज्ञानसंचय आहे. अशा चतुर्वेदातील अयर्ववेदाचा उपवेद म्हणजे 'आयुर्वेद' होय जीवसृष्टी निर्माण होण्यापूर्वीपासूनच आयुर्वेद शास्त्राचे अस्तित्व आहे असे मानले जाते.

अनुत्पाधैव प्रजा आयुर्वेदमेवाग्रेऽसृजत। ......सुश्रुतसंहिता म्हणजे प्रजोत्पत्तीच्या उत्पतीअगोदरच आयुर्वेद अस्तित्वात आला सुश्रुतसंहितेतले सुत्र सांगते.

आयुर्वेद हे शास्त्र म्हणून कसे उदयास आले या संदर्भातील माहिती आपणास दोन विभागात कळेल. आयुर्वेदाची परंपरा सांगताना त्याची सुरूवात ब्रम्हदेवापासून होते.

१) दैवी परंपरा – २) लौकिक परंपरा –

**१) दैवी परंपरा**

या सृष्टीची निर्मिती ब्रम्हदेवाने केली असे मानले जाते. "सृष्टी निर्माण केल्यानंतर त्यामध्ये जी प्राणीसृष्टी उत्पन्न होणार आहे त्याचे जीवन सुखी व्हावे त्यांना कोणतीही व्याधी

होऊ नयेत म्हणून ब्रम्हदेवाने आयुष्याचे ज्ञान असणाऱ्या आयुर्वेद शास्त्राची प्रथमतः रचना केली." असे मानले जाते. आयुर्वेदाची परंपरा सांगताना त्याची सुरूवात ब्रम्हदेवापासून होते. चतुर्वेद जसे अनादी, अनंत व शाश्वत आहेत. तसाच पंचमवेद असलेला आयुर्वेद प्रथम ब्रम्हदेवाने स्मरण केला. ब्रम्हदेवाकडून प्रजापतीनी तो ग्रहण केला व त्यानंतर अश्विनीकुमारांना दिला. पुढे आश्विनीकुमारांनी आयुर्वेदाचे ज्ञान इंद्राला दिले. त्यानंतर पृथ्वीतलावरील प्राणीमात्रांच्या आरोग्यरक्षणासाठी पुनर्वसु आत्रेय ऋषी जेव्हा इंद्राकडे गेले तेव्हा इंद्राने आयुर्वेदाचे ज्ञान त्यांना दिले अशा प्रकारे आयुर्वेदशास्त्र पृथ्वीतलावर आले.

**२) लौकिक परंपरा**

सत्य युगानंतर लोकांचे स्वारस्य नष्ट होऊ लागले त्यांना अनेक प्रकारचे आजार होवू लागले. त्यासाठी त्यावर उपाय शोधण्यासाठी तत्कालीन ऋषी, शास्त्रज्ञांनी हिमालयाच्या पायथ्याशी एक शास्त्रीय परिसंवाद आयोजित केला यास अनेक शास्त्रज्ञ व भारद्वाज हजर होते. आरोग्य रक्षणाचे शास्त्र इंद्रासच माहिती होते. तेव्हा इंद्राने भारव्दाजास आयुर्वेदाचे ज्ञान दिले. अशा प्रकारे आयुर्वेदाची निर्मिती झाली. सरासर सृष्टीच्या अगोदर आयुर्वेदाचा जन्म झाला आणि त्यानंतर सजीव सृष्टीचा जन्म झाला असे तत्कालीन साहित्यावरून दिसून येते.

वेद काळामध्ये आयुर्वेदाचा प्राचीन इतिहासाच्या दृष्टीने वैद्यक काळ अत्यंत महत्वाचा आहे. वैदीक साहित्य चार विभागात विभागले उपनिषद अरण्यक, सुत्काळ, शरीर, गर्भविद्या आणि निदानसह जाते. छंदकाळ, थंगकाळ, ब्राह्मणकाळ, चिकित्सा या तीन शास्त्राचा वेदकाळमध्ये प्रारंभ झाला होता. 'शपथ ब्राह्मण' आणि अथर्व वेद याद मानवी शरीराची हाडे व अवयव व्यवस्थीत रीतीने मोजून सांगितली आहेत.

वेदकाळामध्ये युध्दे होत होती त्यांच्या जखमाही होत होत्या त्यामुळे कायाचिकित्साबरोबर माल्यचिकित्सा ही केली जात होती. वेद काळामध्ये जेव्हा ग्रंथ निर्माण होवू लागले तेव्हापासून आयुर्वेदाची प्रगती होवू लागली.

"वेदामध्ये २६०, सुश्रुत संहितेने ३८५, चरकामध्ये ५००, धन्वंतरी निघण्डु मध्ये ३२४, द्रवयुगामध्ये ६६६, आयुर्वेदीक वनस्पतींचा उल्लेख केल्याचे आढळते, दिसून येते.

पौराणिक काळामध्ये सुद्धा वैद्यकशास्त्र प्रगत होते. "रामायणामध्ये लक्ष्मण ज्यावेळी रावणाकडून जखमी होतो. त्यावेळी संजीवनी चिकित्सेचा उल्लेख आढळतो. रामायणामध्ये

मृत व्यक्तीला टिकविण्यासाठी तैल-द्रोणी मध याचा उपयोग करीत. रामायण काळात प्रसुतिशास्त्र देखील अस्तित्वात होते. रामायणात असलेली वनस्पतींची नावे सध्या प्राप्त झालेल्या निघन्टू ग्रंथात आढळतात. महाभारत काळामध्ये काय, बाल, गृह, उहर्वीग, भाल्य, द्रष्ठा, जय वृषाचिकित्सा ही आयुर्वेदाची आठली अंगे प्रगत होती. या कामी भैषज औषध चिकित्सेला अधिक महत्व होते."

कफ, पित्त व वायु हे शरीरात उत्पन्न होणारे धर्म असून हे सम प्रमाणात असणे हे स्वरस्याचे चिन्ह समजले जाते. अग्नीपुराणात धातूंचा व भस्मांचा उल्लेख आढळतो. गरूड पुराणात १४६ ते २०० पर्यंतच्या अध्यायामध्ये आयुर्वेदाचा उल्लेख आढळतो. पौराणिक काळात प्रारंभ रामायणापासून सुरू होतो व याज्ञवल्य काळी संपतो. **(वडोदकर, १९८०)**

बौध्द काळामध्ये अहिसेंचा उदय झाल्याने त्याचा परिणाम शल्य तंत्रावर झाल्याचे दिसते. बौध्दकालीन आयुर्वेदाचे ज्ञान 'विनयपिटिका' होते जातक ग्रंथावरून तक्षशिला विद्यापीठातील विद्यार्थी शीर आणि उदर यावर शस्त्रक्रिया करत असल्याचे दिसून येते. वाग्भटाचे अष्ठांग संग्रह व अष्ठांगहदय हे दोन्ही ग्रंथ याच काळात समाविष्ट होतात.

बौध्द साहित्यातील "नावनीतकम" हा ग्रंथ संपूर्णतः आयुर्वेदाचा आहे. 'विनयपिटीका' नावाच्या ग्रंथातील आयुर्वेदीक चिकित्सेची माहिती बघितली तर लक्षात येते की, हा काळ आयुर्वेदाच्या दृष्टीने अतिशय भरभराटीचा होता. जगभरातील विद्यार्थी या काळात आयुर्वेद व इतर भारतीय शास्त्राध्ययनासाठी भारतात येत असत. हा काळ आयुर्वेदशास्त्र-चिकित्सा शास्त्राच्या दृष्टीने सर्वसंपन्न समजला जातो.

यानंतरच्या काळ म्हणजे मौर्यकाळ कौटिल्य अर्थशास्त्राचे प्रणेता चाणक्य हे या काळात तक्षशिलेमध्ये अध्यापन करीत असत. कौटल्यलिखित अर्थशास्त्रामध्ये गर्भवतीच्या गर्भाचे रक्षण प्रजनन शास्त्रातील निपुण वैद्याची करावे. गर्भवतीच्या इच्छा पूर्ण कराव्यात या संबंधीचे उल्लेख सापडतात. राजाजवळ आयुर्वेदोक्त अगद म्हणजे विषनाषक औषधे असावीत याचे वर्णन आढळते.

मौर्यवंशातील दुसरा प्रतापी राजा म्हणजे अशोक, ज्याचे अशोकचक्र आजही भारताच्या ध्वजावर आहे. अशोक राजाच्या काळच्या शीलालेखवरून त्यावेळी ठिकठिकाणी चिकित्सा केंद्र, दवाखाने उभारणे, विविध औषधी वनस्पतीची लागवड करणे, मांस भोजनाऐवजी शाकाहाराला प्राधान्य देणे वगैरे माहिती मिळते.

यानंतर म्हणजे इ. स. पूर्व २१० ते इ. स. १७६ पर्यंतचा काळ कुषाण काळ समजला जातो. सध्या अस्तित्वात असलेली व आयुर्वेदशास्त्राची प्राचीन संहिता म्हणून ओळखली जाणारी चरकसंहिता या काळात लिहिली गेली. ही संहिता बौध्द साहित्यातले अनेक शब्द वापरले आहेत. उदा. मैत्री, करूणा, मुदिता व अपेक्षा हे बौध्दांचे चार ब्रह्मविचार वैद्याच्या ठायी असावेत असे चटकसंहितेत सांगितले आहे.

यानंतर भारिशववंश अस्तित्वात आला हे रजि शिवशंकराचे उपासक होते. आज उपलब्ध असलेली सुश्रुतसंहिता या काळात लिहिली गेली असावी.

''चरक संहितेप्रमाणे सुश्रुत संहितेसाठी आयुर्वेदात अनन्यसाधारण महत्व आहे. महाभारतामध्ये शुश्रुतचा पिता विश्वामित्र होय असा उल्लेख आढळतो. शस्त्रक्रियेचे प्राचीन काळामध्ये प्रगल्भ तंत्र सांगणारा ग्रंथ म्हणून सुश्रुत संहितेचा उल्लेख करावा लागेल. अष्ठांगसंग्रह व अष्ठांगह्रदय हे दोन मुख्य ग्रंथ होत हे ग्रंथ वाग्भटाचार्यानी लिहिलेले आहेत.

इसवी सनाच्या आठव्या शतकामध्ये आयुर्वेदाची रसशास्त्र किंवा रसतंत्र शाखा उदयास आली असे मानतात. रस म्हणजे पारा, रोग निवारण करण्यासाठी आयुर्वेदात सोने, रूपे, शिसे, लोखंड, तांबे, जस्त इ. धातूंचा उपयोग केला जात होता. त्याचबरोबर खनिज प्राणी व वनस्पतीजन्य पदार्थाचा रोग निवारण व शक्तीवर्धक म्हणून उपयोग केला जातो होता असा उल्लेख सापडतो. रसरत्नाकर, रसरत्नसमुच्चय, रसप्रकाश सुधाकर, रसेन्द्र युजमणी, रसरत्नप्रदीप कौरे बरेचसे ग्रंथ इ. स. १२ ते १७ व्या शतकापर्यंत लिहिल्याचे आढळते. मात्र या व यानंतरच्या काळात भारतावर अनेक परकिय आक्रमणे झाली. वैद्यकशास्त्राला राजकिय सहाय्यता न मिळाल्याने आयुर्वेदाची अवनती होऊ लागली. परकिय आक्रमणांमध्ये जीवीतहानी मोठ्या प्रमाणावर झालीच पण ग्रंथसंपदा मोठ्या प्रमाणावर नष्ट झाली. यातून वाचलेले ग्रंथ व पारंपारिक ज्ञान यातून आयुर्वेदाची जी जोपासना झाली तेवढीच आज आपल्यासमोर आहे.

धन्वंतरी निघण्टू हा आयुर्वेदाचा सर्वांत जुना वैद्यकिय ग्रंथकोश किंवा त्यावेळचे नाव निघण्टू मानला जातो. आयुर्वेदामध्ये निर्माण झालेले 'आश्वआयुर्वेद' व 'गजाआयुर्वेद' हे दोनच ग्रंथ सध्या उपलब्ध आहेत. शरीररचना शरीर क्रिया यांचाही विचार आयुर्वेदात केलेला आहे.

**आयुर्वेद शिक्षण वाढ व विकास**

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये लोकमान्य टिळकांचा स्वदेशी चळवळीचा परिणाम म्हणून भारतात देशी शास्त्र चिकित्सा पध्दतीला चालना मिळाली. १९२० मध्ये नागपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय काँग्रंसने भारतीय देशी चिकित्सा पध्दतीला प्रोत्साहन देण्याकरीता, देण्याविषयीचा ठराव मंजूर केला. स्वांतत्र्यपूर्व काळामध्ये आयुर्वेदाच्या विकासासाठी विविध समित्या स्थापन झाल्याचे दिसून येते. त्यामध्ये १९२१ मध्ये मद्रास, बंगाल येथे १९२५ मध्ये, उत्तरप्रदेश १९२८ मध्ये, १९३८ मध्ये पंजाब, १९४७ मध्ये मुंबई, १९४७ मध्ये आसाम येथे विविध प्रांतीय समित्या स्थापन झाल्याचे निदर्शनास येते.

त्यामध्ये प्रामुख्याने खालील शिफारशी केल्याचे दिसून येते. देशी चिकित्सा पध्दतीला राजमान्यता देण्यात यावी देशी चिकित्सा पध्दतीतील पदवीधरांची रजिस्ट्रेशन करण्याची सोय करावी. यासाठी निबंधकाची नियुक्ती करावी. आयुर्वेद व अन्य देशी चिकित्सा पध्दतीची विद्यालये सुरू करावीत.

आयुर्वेद व देशी चिकित्सा पध्दतीची रूग्णालये उघडावीत या शिफारशीनुसार १९३८ मध्ये आयुर्वेद वैद्याच्या रजिस्ट्रेशनची सोय करण्यात आली. याकरीता भारतीय चिकित्सा बोर्ड व स्टेट कॉन्सिलची भारतीय चिकित्सा बोर्ड व स्टेट कॉन्सिलची स्थापना करण्यात आली. देशी चिकित्सा पध्दतीची महाविद्यालये व रूग्णालये सुरू करण्यात आली.

## ३.५ आयुर्वेदाची सद्यस्थिती

### ३.५.१ भारताच्या संदर्भातील सद्यस्थिती

"भारतीय संसदेने आयुर्वेदासाठी शैक्षणिक पात्रता प्रमाणित करणे आणि अभ्यास व संशोधनासाठी मान्यताप्राप्त संस्था उपलब्ध करून देणे या उद्देशाने भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद (Central Council of Indian Medicine) ही वैधानिक संस्था भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद अधिनियम १९७० पास करून १९७१ मध्ये स्थापन केली असून केंद्रिय परिषदेने आयुर्वेदामधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अनेक नियम व अभ्यासक्रम तयार केले आहेत. **(ccim.india)**

"भारतात २४० महाविद्यालये आयुर्वेद पध्दतीने शिक्षण देत असून या महाविद्यालयांची प्रतीवर्षी ११२२५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची क्षमता आहे. **(Nttp-2007)**

यांपैकी ५८ महाविद्यालये वेगवेगळ्या विषयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शिक्षण देत आहेत. ही महाविद्यालये भारतातील वेगवेगळ्या विद्यापीठांशी संलग्न आहेत. या महाविद्यालयांना भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषदेने मान्यता दिलेली आहे. भारत सरकारने आयुर्वेदामधील शिक्षण आणि संशोधनाकरीता अनेक चॅनेलच्या माध्यमातून राज्य व राष्ट्रीय स्तरावर मदत केली आहे. आणि (संशोधनाकरीता अनेक चॅनेलच्या माध्यमातून) पारंपारिक उपचार पध्दतीचे शिक्षण खेड्यात व शहरामध्ये देण्यासाठी संस्थाना सहाय्य केले आहे. **(ccim India-2009)**

'आयुष विभाग, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांनी भारतात पारंपारिक चिकित्सा पध्दती वाढविण्यासाठी – Central Council for Research in Ayurveda and Siddha. (CCRAS) की स्वायत्त संस्था दिनांक ३० मार्च १९७८ रोजी स्थापन केली. असून त्यांना १०० टक्के अनुदान देण्यात येते. या विभागाची देशात वेगवेगळ्या शहरामध्ये ३५ रिसर्च सेंटर असून दिल्ली येथे मुख्य कार्यालय आहे. या ठिकाणी आयुर्वेदातील बेसिक रिसर्च, क्लिनिकल रिसर्च, ड्रग रिसर्च लिटरेचर रिसर्च, न्यु ड्रग डेव्हल्पमेंट, कोलब्रेटिव्ह रिसर्च स्टडीज, इंपॉर्टट एम. ओ. यु. इत्यादी कामकाज चालते. या विभागाने मोठ्या प्रमाणावर आयुर्वेदातील साहित्य प्रकाशीत केले आहे. **(Indian Medicine 2009)**

"राज्य शासनाकडून २१९६, स्थानिक संस्थाच्याकडून १४, इतर संस्थाच्याकडून १६३ व सेंट्रल कॉन्सील फॉर रिसर्चकडून २४ अशी एकुण २३९८ आयुर्वेदीक हॉस्पीटल्स भारतात कार्यरत आहेत. तर राज्य शासनाच्या वतीने १२६६५, स्थानिक संस्थाच्याकडून १००६, इतर संस्थाच्याकडून १२ व सेंट्रल कौन्सील फॉर रिसर्च कडून ६ अशी एकूण १३९१४ आयुर्वेदाच्या डिस्पेन्सरी चालवल्या जात आहेत. पारंपारिक व वैकल्पीक उपचार पध्दतीने भारतात चालविण्यात येणाऱ्या एकूण हॉस्पीटल पैकी आयुर्वेद हॉस्पीटलचे ७४.८६ % तर डिस्पेन्सरी ६५.१६ % आहेत. **(NHP 2007)**

भारतात काही हजार कंपन्या आयुर्वेदीक औषधे पुरवितात यामध्ये ३० कंपन्या अशा आहेत कि, ज्यांचा प्रत्येक वर्षी एक लाख डॉलर्स पेक्षा जास्त धंदा आहे. डाबर, वैदनाथ, झेंडू, हिमालया व्हिको लॅबोरेटरीज, या कंपन्या आयुर्वेद औषधांच्या मुख्य सप्लायर्स असून भारतातील आयुर्वेदाचे मार्केट ८५ टक्क्यापेक्षा जास्त प्राप्त केले आहे.

“जागतिक आरोग्य संघटनेने २००३ मध्ये प्रकाशित केलेल्या अहवालानुसार भारताच्या खेड्यातील एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के लोक प्राथमिक आरोग्यासाठी आयुर्वेद औषधांचा वापर करीत आहेत. **(WHO 2001)**

“शैक्षणिक पात्रता प्राप्त केलेले आयुर्वेदीक डॉक्टर्स ४०५३६६१ संपूर्ण भारतात असून शहरी व ग्रामीण भागामध्ये क्लिनिक्सव्दारे आयुर्वेदीक उपचार पध्दतीचा प्रसार करीत आहेत. या डॉक्टरांच्याकडून मोठ्या प्रमाणात समाजात आयुर्वेदीक औषधांचा वापर केला जातो. “सध्या ८० टक्यांपेक्षा जास्त आयुर्वेद औषधांची प्रिस्क्रेप्शन डॉक्टर्स देत आहेत. **(डहाणूकर, थत्ते २०००)**

भारतामध्ये काही हजार कंपन्यांमार्फत आयुर्वेदीक औषधे पुरविली जातात यामध्ये काही कंपन्या अशा आहेत कि, ज्यांचा प्रत्येक वर्षाला एक लाख डॉलरपेक्षा जास्त धंदा आहे. व्हिको लॅबोरेटरीज, झेंडू, वैद्यनाथ, डाबर या कंपन्या आयुर्वेद औषधांच्या मुख्य सप्लायर्स असून भारतातील आयुर्वेदाचे मार्केट ८५ टक्यापेक्षा जास्त प्राप्त केले आहे.

**(www.schwitzbiotech.tradeindia.com )**

### ३.५.२. परदेशातील आयुर्वेदाच्या प्रसाराची सद्यस्थिती

“शेवटच्या काही दशकांमध्ये परंपरागत आणि नैसर्गिकपणे निरोगी करण्याच्या पध्दतीचा भाग म्हणून आयुर्वेदाचे पुनरूत्थान होवून जागतीक स्तरावर गेले आहे. वेगवेगळ्या भाषेतील आयुर्वेदाचे साहित्य, कोर्सेस आणि क्लिनिक्स संपूर्ण जगामध्ये सादर केली आहेत. World Health Organisation ने आयुर्वेदाला जगातील एक पारंपारीक अतिमहत्वाची उपचार पध्दती म्हणून मान्यता दिलेली असून, जागतीक आरोग्यासाठी आवश्यक आहे. **(रानडे सुभाष १९८५ )**

“आयुर्वेदाला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचविण्यामध्ये परंपरागत भारतीय वैद्यकिय पध्दतीशी सबंधित शैक्षणिक संस्थाचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. जपान, ऑस्टेलिया, नेदरलँड, इटली, अर्जेटिना आणि जर्मनी या देशामध्ये कार्य करणाऱ्या आयुर्वेदीक संस्थाशी शैक्षणिक सहकार्यातून आयुर्वेदाचे जागतिकीकरण करण्याचे कार्य करण्यासाठी गुजरात आयुर्वेद विद्यापीठाने समजोता करार केले आहेत. तसेच मेडीकल इन्सीट्युट ऑफ रशिया यांनी भारत सरकार बरोबर समझोता करार केला आहे.

**(www.ayurveduniversity.com)**

भारताच्या बाहेर मॉरिशिअर, पाकिस्तान, बांग्लादेश, मॅनमार, नेपाळ, श्रीलंका, थाईलंड, मलेशिया या देशांनी आयुर्वेद उपचार पध्दती स्वीकारली आहे. तर अमेरिका, टांझानिया, मँगोलिया, सिंगापूर इ. देशांनी आयुर्वेद उपचार पध्दती ही वैकल्पीक उपचार पध्दती म्हणून स्वीकार केला आहे. **(परांजपे, २००७)**

## मॉरिशअस

‘‘पारंपारीक उपचार पध्दतीची व्यवस्था पाहण्यासाठी मॉरिशिअसमध्ये आयुर्वेदीक व इतर पारंपारिक उपचारपध्दती ॲक्ट १९८९ (४२) अस्तित्वात आला.

होमिओपॅथीक आयुर्वेदीक व चायनीज पध्दतीनुसार वापरावयाच्या उपचार पध्दती म्हणून या पारंपारीक उपचार पध्दतीची रचना या ॲक्टमध्ये करण्यात आली. या कायद्यानुसार वैधानिक संस्था, पारंपारिक उपचार पध्दती बोर्ड, पारंपारीक उपचार पध्दतीनुसार डीप्लोमा प्राप्त केलेल्या डॉक्टरांची नोंदणी सिस्टीम यांची निर्मिती करण्यात आली आहे. तेथील स्थानिक डॉक्टरांना पारंपारिक उपचार पध्दतीने उपचार करण्याची परवानगी देण्यात आली आहे. **(WHO, 2001)**

## पाकिस्तान

‘‘पाकिस्तानमध्ये राष्ट्रीय आरोग्य उपचार पध्दती म्हणून युनानी, तिब्ब, आयुर्वेद आणि होमिओपॅथी या उपचार पध्दती स्वीकारल्या आहेत.

युनानी, आयुर्वेदीक आणि होमिओपॅथीमधील कायदेशीर पदवी, डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन या करीता १९६५ चा कायदा (१६६) असून युनानी आणि आयुर्वेदीक पध्दती करीता बोर्ड स्थापन केले आहे. या बोर्डाकडून शैक्षणिक पात्रता प्राप्त डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन, मान्यता प्राप्त संस्थांची हवी असणारी स्टॅंडर्ड राखणे, संशोधन करणे इत्यादी कार्य केले जाते.

तिबा कॉलेज पाकिस्तान, युनानी टिचींग इन्सीट्यूट या दोन सरकारी संस्था सह खाजगी क्षेत्रातील २६ पब्लीक सेक्टरमधील १ महाविद्यालय युनानी व आयुर्वेद उपचार पध्दतीचे शिक्षण देत आहेत. या सर्वच्यावर डायरेक्ट कंट्रोल नॅशनल कौन्सील फॉर तिब्बा, मिनिस्ट्री ऑफ हेल्थ यांचा, असून ते अभ्यासक्रम तयार करून परीक्षा घेतात. **(परांजपे, २००७)**

**बांग्लादेश**

बांगला देशामध्ये आयुर्वेद उपचार पध्दती मोठ्या प्रमाणावर वापरली जात आहे. १९७२ च्या कायद्यानुसार बोर्ड ऑफ युनानी ॲड आयुर्वेदीक सिस्टीम ऑफ मेडीसीन ची स्थापना करण्यात आलेली असून शिक्षणाचा दर्जा राखणे, अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन करणे युनानी व आयुर्वेद उपचार पध्दतीचा दर्जा वाढविली ही कार्ये केला जात आहेत.

बांगला देशात आयुर्वेदाचे चार वर्षाचे अभ्यासक्रम चार महाविद्यालयातून राबविण्यात येत असून या वर बोर्ड ऑफ युनानी ॲड आयुर्वेदीक चा संपूर्ण कंट्रोल आहे. (**रानडे, २००७**)

**मॅनमार**

'पारंपारीक मॅनमार उपचार पध्दती ही आयुर्वेदावर आधारीत उपचार पध्दती असून या उपचार पध्दतीवर ४००० ग्रंथ लिहिण्यात आलेले आहेत. Indigenous Medicine ची स्थापना १९८९ मध्ये करण्यात आलेली आहे. १९९६ मध्ये पारंपारीक उपचार पध्दती कायदा आल्यानंतर ३९६२ औषधांची नोंदणी करण्यात आली असून ६३२ औषध निर्मात्यांना परवानगी देण्यात आलेली आहे. (**परांजपे, २००७**)

**नेपाळ**

''आयुर्वेद ही नेपाळमधील राष्ट्रीय उपचार पध्दती आहे.

नेपाळमधील ७५ टक्के लोक पारंपारीक उपचार पध्दतीला महत्व देवून तिचा वापर करतात. नेपाळ मध्ये १४१ आयुर्वेदीक डिस्पेन्सरीज, १४ विभागीय डिस्पेन्सरीज, १५ जिल्हा स्तरीय आयुर्वेदीक हेल्थ सेंटर्स व दोन हॉस्पीटल्स आहेत. ६२३ इस्टीट्यूशनली क्वालीफाईड डॉक्टर्स तर ४००० आयुर्वेदाचे प्रशिक्षित डॉक्टर्स आहेत. १९८८ मध्ये आयुर्वेदीक मेडीकल कौन्सीलची स्थापना करण्यात आलेली असून आयुर्वेदीक उपचार पध्दती अधिक चांगल्या प्रकारे चालविणे, प्रशिक्षित डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन करणे इ. कार्ये या संस्थेमार्फत केली जातात. काठमांडू येथे त्रिकुवन विद्यापीठामार्फत आयुर्वेदाचे शिक्षण दिले जाते. (**रानडे, २००७**)

**श्रीलंका**

''श्रीलंकेमध्ये आयुर्वेद उपचार पध्दतीचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येतो.

१९६१ कायद्यानुसार आयुर्वेदीक मेडीकल कौन्सीलची स्थापना करण्यात आली असून आयुर्वेदीक डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन, औषध निर्माते व नर्सेस तसेच आयुर्वेदीक कॉलेज आणि हॉस्पीटल्स, आयुर्वेदीक रिसर्च कमिटी यांचे नियम तयार केले आहेत.

डिपार्टमेंट ऑफ आयुर्वेदाने आयुर्वेदातील पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविले आहेत. World Health Organization ने श्रीलंकेतील पारंपारीक उपचार पध्दतीमधील मानव संशोधन विकासासाठी एक प्रोग्रॅम दिला होता. या देशात पौर्वात्य वैद्यकासाठी स्वतंत्र मंत्रालय असून स्वतंत्र आयुर्वेद विभाग आहे. सद्यसिथीत या देशात आयुर्वेदाचे पदवी शिक्षण देण्यासाठी दोन संस्था आहेत. १) Inst. Of Indigenous medicines. IM राजगिरीजा. २) गंफा विक्रमाचारी आयुर्वेद इन्सिटट्यूट (केलोनिया विद्यापीठ) **(रानडे, २००७)**

**थाईलंड**

‘‘भारतीय व चायनीज पारंपारीक औषधी पध्दतीवर आधारित थाई पारंपारीक औषधी पध्दत तयार करण्यात आली आहे.

थाईलंड सरकार सध्या हर्बल मेडिसीनच्या वापराबाबतच्या विकासासाठी काम करीत आहे. १९५७ मध्ये पहिले थाई पारंपारीक उपचार पध्दतीचे स्कूल Wat Do येथे स्थापन करण्यात आले. खाजगी संस्थेकडून १९८२ मध्ये आयुर्वेद कॉलेज सुरू करण्यात आले असून तीन वर्षाचे अभ्यासक्रम चालविण्यात येतात. या महाविद्यालयाला थाईलंड सरकार मदत करीत आहे. **(रानडे, २००७)**

**मलेशिया**

‘‘मलेशियामध्ये ज्या काळी पारंपारिक उपचार पध्दती वापरण्यात येतात त्यापैकी आयुर्वेद ही एक आहे. औषधी गोळ्या, मलम तेल, धातू, खनिजे, वनस्पती चुर्ण इ. आयुर्वेद औषधे भारतातून आयात केली जातात. **(परांजपे, २००७)**

**युनाईटेड स्टेट ऑफ अमेरिका**

American Academy of Ayurvedic Medicain (AAAM) या संस्थेची स्थापना भारतातील आणि अमेरिकेतील आयुर्वेदीक डॉक्टर्स अभ्यासक संशोधक, आणि व्यवस्तापक यांच्यासाठी ऑक्टोंबर १९९९ मध्ये केली आहे.

अमेरिकेमध्ये डॉक्टरांना आयुर्वेदीक उपचार करणेसाठी औषधे तयार करण्यासाठी या संस्थेकडून लायसन्स घ्यावे लागते. या संस्थेने भारत सरकार व यु. एस. नॅशनल इन्सीट्यूट

ऑफ हेल्थ यांचे सहकार्य स्विकारले आहे. National Ayurvedic Medical Associatin (NAMA) **(रानडे, २००७)**

**ऑस्ट्रीया**

या देशात आयुर्वेदाला कायदेशीर मान्यता आहे. बर्गलर स्कूल ऑफ मसाज ही संस्था १० प्रकारचे आयुर्वेद अभ्यासक्रम राबवित आहे. ही संस्था इंटरनॅशनल ॲकॅडमी ऑफ आयुर्वेद, पुणे यांच्याशी संलग्न आहे. तसेच झेक रिपब्लीक व आयुर्वेदीक इन्सीट्युट ऑफ धन्वंतरी या संस्थाही आयुर्वेदाचे शिक्षण देत आहेत. **(रानडे, २००७)**

**फ्रान्स**

फ्रान्समध्ये श्री. किरण व्यास यांनी स्थापन केलेली 'तपोवन' ही संस्था २० वर्षापासून आयुर्वेद व योगाच्या प्रसारासाठी कार्यरत आहे. दरवर्षी ही संस्था आयुर्वेदाची आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करते. (www.tapovan.com) तसेच युरोपीयन इन्स्टीट्युट ऑफ वेदीक स्टडीज ही जी आत्रेय स्मिथ यांची BP 18, 30610 ही संस्था Sauve येथे असून ती फ्रान्स व स्वीस देशात विविध शैक्षणिक अभ्यासक्रम राबविते. (www.atreya.com) **(परांजपे, २००७)**

**ग्रीस**

या देशामध्ये १) होलिस्टीक हेल्थ फौंडेशन ही संस्था तसेच २) अल्टीमेंट हेल्थ सेंटर ही संस्था आयुर्वेदाचे विविध अभ्यासक्रम राबवित आहे. ही संस्था IAA, पुणेशी संलग्न आहे. (३१) (www.ultimectehealth.com) (www.spirituality practice.com) **(रानडे,२००७)**

**जर्मनी**

जर्मनीमध्ये गेल्या अनेक वर्षापासून १) सेवा अकादमी, म्युनिक २) महिंद्रा इन्स्टीट्युट ३) युरोवेद इन्स्टीट्युट ह्या संस्था आयुर्वेदाचे विविध अभ्यासक्रम राबवित आहेत. (www.mahandra_institut.de) **(परांजपे, २००७)**

**हंगेरी**

हंगेरी हा एकमेव युरोपीय देश आहे कि जेत्रे आयुर्वेदाला वैद्यकिय शास्त्र म्हणून मान्यता आहे. भारत सरकार व हंगेरी देशात करार झालेला असून त्यामार्फत आयुर्वेद प्रसाराचे कार्य होते. (www.guruda.hu) हंगेरिअन आयुर्वेद मेडीकल फौंडेशन ही संस्था येथे कार्यरत आहे. **(रानडे, २००७)**

**इस्त्राईल**

या देशात १) इंटरनॅशनल सेंटर फॉर आयुर्वेद स्टडीज ही संस्था आयुर्वेदाचे विविध अभ्यासक्रम राबविते ही संस्था पुणे येथील IAA शी संलग्न आहे. २) रीडमन कॉलेज ऑफ कॉम्लिमेंटरी मेडिसीन : ही संस्था तेलअबीव येथे आयुर्वेदाचा पदवी अभ्यासक्रम सुरू करीत आहे. (www.reidman.co.in) **(रानडे, २००७)**

**इटली**

इटलीमध्ये १) ऐसकेअे आयुर्वेद ही मिलानमधील संस्था आहे. या संस्थेतील अभ्यासक्रम IAA पुणे व श्रीलंकेतील Open International University of यांच्याकडून मान्यताप्राप्त आहे. **(रानडे, २००७)**

**नेदरलॅंडस**

या देशामध्ये १) युरोपियन इन्स्टीट्युट फॉर सायंटीफीक मेडीसीन ही संस्था आयुर्वेदीक शिक्षण देणारी सर्वांत जुनी संस्था असून आयुर्वेदीक अभ्यासक्रमासाठी गुजरात आयुर्वेद विद्यापीठीला संलग्न आहे. २) युरोप आयुर्वेद महाविद्यालय हे ॲमस्टरडॅम येते स्थित असून आयुर्वेद अभ्यासक्रम राबविते. (www.ayu.nl) **(रानडे, २००७)**

**पोलंड**

या देशात फौंडेशन फॉर हेल्थ ही संस्था कार्यरत आहे. ही IAA पुणे शी संलग्न आहे. १९९९ पासून IAA ने आयुर्वेदीक वैद्यांना शिकविण्यासाठी ३३ पेक्षा जणांना पाठविले आहे. **(परांजपे, २००७)**

**पोर्तुगाल**

योग फेडरेशन पोर्तुगाल – लिल्बन येथील योग फेडरेशन व ब्राझील येथील डॉ. जोस रूगे यांच्या संयुक्त विद्यमाने ३ वर्षाचा आयुर्वेदीक अभ्यासक्रम चालू आहे. **(परांजपे, २००७)**

**स्वीस**

१) सेवा अकादमी व महिन्द्रा इन्सीट्यूल यांच्या अनेक शाखा स्वीसमध्ये आयुर्वेदाचे विविध अभ्यासक्रम चालवित असल्याचे दिसून येते. २) सुझेन गॉडली यांनी झुरिच येथे आयुर्वेद सेंटर स्थापन केलेले आहे. हे सेंटर IAA शी संलग्न आहे. **(रानडे, २००७)**

**स्पेन**

स्पेनमध्ये १) स्कूल ऑफ आयुर्वेदीक कल्चर बर्सिलोना २) चेंट्रो आयुर्वेदा सालूड ३) हॉटेल एडन रॉक – कॅप्रॉग ४) सालामाका विद्यापीठ या चार ठिकाणी आयुर्वेदीक शिक्षण दिले जाते.

**स्वीडन**

१) वेदलील इन्स्टीट्यूट - स्टॉकहोम येथे आयुर्वेदाचे कार्य चालते. **(परांजपे गो. रा. २००७)**

**यु. के.**

१) जे. पी. अे. या संस्थेमार्फत अर्धवेळ आयुर्वेद पदवीका अभ्यासक्रम सुरू केला आहे. Medical Control Agency (MCA) या संस्थेने आयुर्वेद चिकित्सा पध्दती नियमितीकरणाचा प्रस्ताव दिला आहे. **(रानडे, २००७)**

**यु. एस. ए.**

यु. एस. ए. मध्ये अनेक अनेक आयुर्वेदीक संस्थानी आयुर्वेदाचा पदवीका अभ्यासक्रम सुरू केला आहे. प्रा. सुभाष रानडे व डॉ. सुनंदा रानडे गेली १० वर्षे या महाविद्यालयातून आयुर्वेद शिकवित आहेत. कॅलिफॉर्नियासह अमेरिकेतील ५ राज्यांमध्ये आयुर्वेदाला मान्यता आहे. **(रानडे, २००७)**

**कॅनडा**

१) जीवन इन्स्टीट्यूट : ही संस्था टोरेंटो येथे १५ महिन्यांचा आयुर्वेदीक अभ्यासक्रम राबवितो. निकोल सिबोने हे या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. (www.aacanda.ca) ही वेबसाईट आहे. **(परांजपे, २००७)**

**साऊथ आफ्रिका**

येथे माजी राष्ट्राध्यक्ष श्री. मंडेला यांच्या प्रयत्नांमुळे या देशात आयुर्वेदाला मान्यता मिळाली आहे. स्कूल ऑफ नेल्सन मंडेला जोहान्सबर्ग येथे आयुर्वेद विभाग चालू करण्यात आला आहे. **(रानडे, २००७)**

**दक्षिण अमेरिका अर्जेटीना**

या देशात १) Foundation desalud Ayurveda prema. डॉ. जार्ज लुई संस्थापक अध्यक्ष आहेत. २) Univeridad Abierta Interamericana – ohacabulo.

३) फौंडेशन फॉर आयुर्वेद ४) इंटरनॅशनल योग फांउडेश या चार ठिकाणी आयुर्वेद अभ्यासक्रम राबविले जातात. **(रानडे, २००७)**

**ब्राझील**

ब्राझीलमध्ये १) शुध्द धर्म मंडळ ऑफ वाजेरा फौंडेशन Uberlandia २) त्रिगुण अकादमी Belo Horixonte या दोन संस्थामधून आयुर्वेदाचे अभ्यासक्रम सुरू आहे. त्या संस्था IAA पुणेशी संलग्न आहेत. डॉ. भारती लेले, प्रा. सुभाष रानडे आयुर्वेद प्रसारासाठी ब्राझीलमधील विविध केंद्रांना भेटी देतात.

**चिली**

चिली विद्यापीठ अर्जेटीना विद्यापीठाच्या सहकार्याने आयुर्वेद अभ्यासक्रम सुरू करीत आहे. सँटीआगो येथील केंद्र IAA शी संलग्न असून लॉरेटो मुनोझ या संस्थापक अध्यक्ष आहेत.

**आस्टेलिया**

या देशात आयुर्वेदाला राजमान्यता आहे व आयुर्वेद पदवीधर स्वतःला वैद्यकिय व्यावसायीक म्हणून आस्ट्रेलिया सरकारकडे नोंदणी करू शकतो. या देशात दोन ठिकाणी आयुर्वेद अभ्यासक्रम चालविले जातात.

**न्यूझीलंड**

या देशात आयुर्वेदाला राजमान्यता आहे. १) वेल पार्क कॉलेज ऑफ नॅचरल थेरपीज - आकलंड २) आस्टेलियन असोसिएशन ऑफ आयुर्वेदीक स्टडीज. ३) ट्रॅडिशनल आयुर्वेद सेंटर येथून आयुर्वेद अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते. **(रानडे, २००७)**

**जपान**

या देशात १) सोसायटी ऑफ आयुर्वेद – १९६९ २) इन्स्टीट्युट ऑफ ट्रॅडिशनल ओरिएंटल मेडिसीन १९९४, टोकियो. ३) इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ आयुर्वेदीक डिक्युजन – किरोशिमा. या संस्थामधून आयुर्वेद अभ्यासक्रम राबविले जातात. **(परांजपे, २००७)**

**रशिया**

भारत व रशिया या दोन देशांत आयुर्वेद शिक्षणासंदर्भात सामंजस्य करार झाला आहे. आयुर्वेद शिक्षणासाठी जामनगर विद्यापीठ व बनारस हिंदू विद्यापीठ यांनी एकत्रित

काम करण्याची तयारी केली आहे. डाबर कंपनीचा या प्रकल्पाला पाठींबा आहे. प्रवदा या प्रसिध्द वर्तमानपत्रातून आयुर्वेद सदरे प्रकाशित केली जातात

**महर्षी आयुर्वेद**

महर्षी महेश योगी यांनी स्थापन केलेली ही जगातील सर्वांत मोठी संस्था आहे कि जी आयुर्वेद प्रसारासाठी स्थापन केलेली आहेत. वैदीक संस्कृतीतील आयुर्वेद, योग, ज्योतीषवास्तु इ. शास्त्रांचा प्रसार हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. www.mapi.com ही त्यांची वेबसाईट आहे. अशाप्रकारे जगातील अनेक देशामधून आयुर्वेद शिक्षण व आयुर्वेदाचे प्रसार कार्य चालू असल्याचे दिसून येते. (**रानडे, २००७**)

### ३.५.३ महाराष्ट्रातील आयुर्वेदाच्या शिक्षणाच्या प्रसाराची सद्यस्थिती

'शुभंकरोती कल्याणम आरोग्यम धनसंपदा' या संध्याश्लोकाला भारतात विशेषतः महाराष्ट्रात वेगळे महत्व आहे. महाराष्ट्रातील वैद्यकिय सेवा ही अगदी पुरातन काळापासून आहे. प्राचीन काळापासून महाराष्ट्रात आयुर्वेद होमीओपॅथी युनानी, निसर्गोपचार व योगसंहिता या वैद्यकप्रणाली अस्तित्वात आहेत. मध्यंतरीच्या काळात 'ॲलोपॅथी' ही उपचार पध्दती पाश्चात्य राष्ट्रात विकसीत झाली. काळानुरूप ही पध्दती भारतात आणि नंतर महाराष्ट्रातही वापरली जाऊ लागली आणि अल्पावधीत लोकप्रियही झाली.

आयुर्वेद हे वैद्यकशास्त्र उदयास आल्यापासून शेकडो वर्षे अनेक ऋषीमुनींनी त्यावर पध्दतशीर संशोधन केले. नंतरच्या काळात अनेक वैद्यक व आयुर्वेदतज्ञ भारतात निर्माण झाले. त्यातील बरेचसे वैद्यक हे महाराष्ट्रातील आहेत. आयुर्वेदाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आणि रोग मुक्तीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. काळानुसार आयुर्वेदाचे महत्व वाढत चालले आहे आणि आज महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येक शहरांत स्वतंत्र आयुर्वेदीक उपचार केंद्रे आहेत. आयुर्वेद औषधे तयार करणाऱ्या मोठमोठ्या कंपन्यांचे कारखाने महाराष्ट्रात अस्तित्वात आहेत. बरीचशी आयुर्वेदीक औषधे महाराष्ट्रात तयार होवून परदेशी पाठविली जातात. आयुर्वेद ही वैद्यकशास्त्रातील एक स्वतंत्र शाळा झाली असून त्याविषयी शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था व कॉलेजेस महाराष्ट्रात विपुल प्रमाणात आहेत. यातून आज नवनवीन आयुर्वेदतज्ञ तयार होत आहेत.

आज महाराष्ट्रात शैक्षणिक गरजेनुसार वैद्यकिय महाविद्यालये निर्माण होत आहेत. ही महाविद्यालये शासकिय, निमशासकिय खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविली जात आहेत.

राज्यात ५२ शासकिय (विद्यापीठ व्यवस्थापना खालील व महानगरपालीकांनी चालविलेली महाविद्यालये धरून) २८ शासन अनुदानित व १६८ विनाअनुदानीत तत्वावरील खाजगी वैद्यकिय महाविद्यालये अशी एकूण २४८ महाविद्यालये वैद्यकिय शिक्षण देण्याचे कार्य करीत असून त्यांची एकूण विद्यार्थीक्षमता १३,८६३ इतकी आहे. उपरोक्त महाविद्यालयांत ॲलोपॅथीक पदवी ३१ व पदव्युत्तर २८, आयुर्वेदीक पदवी ५८ व पदव्युत्तर २४, होमिओपॅथीक पदवी ४५ व पदव्युत्तर १२, युनानी पदवी ८, व पदव्युत्तर २, दंतचिकित्सा पदवी २६ व पदव्युत्तर १६ याप्रमाणे विविध प्रकारचे वैद्यकिय शिक्षण देणाऱ्या पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयांचा समावेश आहे.

राज्य शासनाने सन १९९८ मध्ये नाशिक येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना केली असून या विद्यापीठामार्फत राज्यातील वैद्यकिय शिक्षण व आनुषंगिक कार्ये पार पाडली जातात. सध्या महारारा‍ष्ट्रात आयुर्वेद वैद्यकिय शिक्षण देणारी ६३ कॉलेजेस आहेत. ती २७ जिल्ह्यांत कार्यरत आहेत. त्यापैकी ५५ आयुर्वेद महाविद्यालयातून ६ चे शिक्षण म्हणजे पदवीपर्यंत शिक्षण दिले जाते तर २१ आयुर्वेद महाविद्यालयातून पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. अलिबाग, नंदुरबार, सातारा, मुंबई महानगर येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व ५०० रूग्ण खाटांचे संलग्नीत रूग्णालय सुरू करण्यास केंद्र शासनाची मान्यता मिळाली आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकिय संशोधन परिषदेची स्थापना झाली आहे. या परिषदेतर्फे महत्वपूर्ण प्रकल्प राबविण्यात येत आहेत. ४० लाख रूपयांचे अनुदान वितरीत होत आहे. राष्ट्रीय स्तरावर वैद्यकिय पदवी अभ्यासक्रमासाठी सामयीक प्रवेश परिक्षेत सामील होण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जे. जे. रुग्णालय परिसरास अतिविशेषोपचार रूग्णालय उभारण्यात येणार आहे. (**दास्ताने, २०१२**)

गेल्या तीन वर्षात वैद्यकिय शिक्षण या विभागाने अनेक महत्वाचे निर्णय घेवून सर्व सामान्यांना दिलासा दिला आहे. या विभागाचे निर्णय प्रभावीपणे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यमंत्री डी. पी. सावंत यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. (**लोकराज्य, २०१२**)

### ३.५.४ महाराष्ट्र राज्य

पृथ्वीतलावर आशिया खंडातील भारत एक खंडप्राय देश आहे. या देशात २८ घटकराज्ये व केंद्रशासीत प्रदेश आहेत. या घटक राज्यांमधील महाराष्ट्र एक राज्य आहे. समर्थ उद्योग प्रकाशनाने प्रकाशीत केलेल्या ‘पर्यटन मार्गदर्शिका महाराष्ट्र’ मध्ये

महाराष्ट्राबाबत पुढील माहिती दिलेली आहे. जगाच्या नकाशात महाराष्ट्र राज्याचे अक्षांश हे १५ ग उत्तर ते २२.१ उत्तर दिले आहे. रेखांश हे ७२.६ पूर्वते ८०.९ पूर्व असे दिले आहे. मराठी भाषेच्या आधारे १ मे १९८० या दिवशी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आहे. मराठी ही या राज्यातील बहसंख्य लोकांची मातृभाषा आहे. (**आपटे, २००५**)

## ३.६. शिक्षण अर्थ व स्वरूप

१) 'मानवला जी स्वावलंबी व निःस्वार्थी बनविते तीच विद्या होय' अशी ऋग्वेदामध्ये शिक्षणाची व्याख्या करण्यात आली आहे. (**जोशी १९७६**)

२) परिपक्व व्यक्तीने अपरिपक्व व्यक्तीच्या वैयक्तीक तसेच सामाजिक गरजा लक्षात घेवून सुचना व शिस्तीच्या व्दारे व्यक्तीतील शारीरिक, मानसिक, बौध्दीक, सौंदर्यात्मक, सामाजिक तसेच अध्यात्मीक शक्तींचा सुसंवादात्मक विकास साधून मोक्ष प्राप्ती करण्यासाठी नियोजीत केलेली पध्दतशीर योजना म्हणजे शिक्षण होय. रेडन (**दास्ताने, २००३**)

## शिक्षणाचे स्वरूप

### शिक्षणाचे दारे सर्वांना खुली

ब्रिटीश राजवटीच्या काळात शिक्षणात झालेला सर्वात महत्वाचा बदल असा कि, इंग्रज राजकर्यांनी भारतीय समाजातील सर्व जातीधर्माच्या लोकांना शिक्षणाची व्दारे खुली केली. ब्रिटीशपूर्व काळात शिक्षणाचा अधिकार फक्त वरिष्ठ जातीच्या लोकांपुरताच मर्यादीत होता. परंतु इंग्रज सरकारने भारतीय समाजातील सर्व घटकांना शिक्षणाचा अधिकार दिला.

सरकारच्या या धोरणामुळे येथील कनिष्ठ जातीच्या लोकांना प्रथमच शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. ही एका अर्थाने शिक्षणक्षेत्रात घडून आलेली अभूतपूर्व क्रांती म्हणावी लागेल.

महाराष्टासह भारताच्या अनेक भागांत शिक्षणाचा प्रसार करण्यात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी धार्मीक उद्देशाने शिक्षणप्रसाराचे कार्य हाती घेतले होते हे खरे असले तरी त्यांच्या या कार्याचा भारतीय समाजातील विविध घटकांना मोठा फायदा मिळाला आहे, हे नाकबूल करता येणार नाही.

आधुनिक शिक्षणाची व्यवस्थीत घडी बसविण्याचे कार्य प्रथम मिशनऱ्यांनीच केले. त्यांनी मुंबईत मराठी भाषिक मुलांसाठी मराठी माध्यमाच्या काही शाळा सुरू केल्या.

अमेरिकन मराठी मिशनचा प्रमुख गॉर्डन हॉल याने एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात मुंबईत मराठी माध्यमाची एक शाळा सुरू केली. त्याने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातही शिक्षणाचा प्रसार करण्याकडे लक्ष पुरविले. मुंबई बाहेरही पुणे, अहमदनगर इत्यादी ठिकाणी आपल्या शाळा सुरू केल्या. (**दास्ताने,२००३**)

**शिक्षण संकल्पना, अर्थ व स्वरूप**

**शिक्षण –** शिक्षण या शब्दाचा अर्थ खूपच व्यापक आहे. शिक्षण म्हणजेच मानवाचा विकास हि एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. मानवाच्या क्षमता व वर्तन विकसीत करणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण. "जीवनाच्या सर्व व्यवहाराकरीता महत्वाचे असणारे ज्ञान, कौशल्य व जाणीव संक्रमीत करणारे संघटीत व सातत्याचे अध्यापन म्हणजे शिक्षण." युनेस्को (**जोशी, २००७**)

शिक्षण या निकषावर जगातील पाचवी महासत्ता म्हणून भारताचा उल्लेख केला जातो. शिक्षणामुळे सर्वांगीण विकास होतो. समाज परिवर्तनाचे काम शिक्षण करीत असते. 'सा विद्या या विमुक्तये' असे म्हंटले जाते. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. मानव हा समाजशील प्राणी म्हणून ओळखला जातो. सामाजिक जीवन जगणाऱ्या व्यक्तींच्या पध्दतशीर आणि सुसंगत अभ्यास समाजशास्त्रामध्ये केला जातो. शिक्षणाच्या विचारामध्ये् सामुहिक जीवनाच्या सबंधातील चालीरीती, परंपरा, संस्था व विचारपध्दती, जीवन पध्दतीचा अभ्यास महत्वाचा ठरतो. समाजनियंत्रण, आणि समाज परिवर्तन, सर्जनशील विधायक कार्य आणि नवसामाजिक पध्दतीचा अभ्यास करण्यासाठी शिक्षण हे अत्यंत महत्वाचे आहे. म्हणून शिक्षण ही संकल्पना फक्त शाळेत जाणे, ज्ञान प्राप्त करणे, विद्यापीठ किंवा शाळेच्या परिक्षा देणे आणि प्रमाणपत्र किंवा पदवी प्राप्त करणे इथपर्यंतच मर्यादित नाही.

शिक्षण हा शब्द संस्कृतीत्पन्न आहे. पाणीनी सुत्रानुसार शिक्ष + अन असे रूप शिक्षणाचे आहे. पुढे 'न' चा 'ण' झाला. शिक्ष किंवा शिक्षण म्हणजे उपदेश करणे, परिवर्तन घडवून आणणे. इंग्रजीतील Education या शब्दाचे लॅटीन भाषेतील अर्थ Educare - to rear, to nourish, to bringup म्हणजेच पालनपोषण करणे, संवर्धन करणे, संगोपन करणे असा होतो.

"जिवंत व्यक्तीकडे जीवनाचे संक्रमण म्हणजे शिक्षण होय." (**सोहोनी, २००७**)

“विद्यार्थ्यांच्या मनातील सुप्त शक्ती जागृत करणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण बालकाचे वर्तन बदलणारी व नियंत्रित करणारी एक प्रक्रिया म्हणजे शिक्षण.” ड्रीवर.

“शिक्षण म्हणजे प्रत्येकाच्या व्यक्ती विकासाला उत्तम संधी प्राप्त करून देणे.” सर, पर्सी नन.

The process of educating teaching, or traning or part of or a stage in this traning, the teaching learning or development which results from this process of teaching or traning. The process of imparting or acquiring for a particular trade or profession; a kind of schooling, instruction and discipline in genral; erudition; the academic discipline deoling with teaching and learning methods in the schools. **(New websters Dictionary, 1979)**

“मानवला ज्यामुळे स्वावलंबन मिळते व ज्यामुळे निस्वार्थी मनोवृत्ती निर्माण होते ती विद्या म्हणजे शिक्षण होय. ऋग्वेद

“शिक्षण म्हणजे आत्म साक्षात्कास्व होय.” शंकराचार्य

“विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतिविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.” - महात्मा, जोतीबा फुले.

**शिक्षणाच्या विविध व्याख्यावरून शिक्षणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे**

१) शिक्षण हे व्यक्तीमध्ये संस्कार आणि व्यक्तीमत्वाची जडण-घडण घडून आणण्याचे साधन आहे.

२) शिक्षणामुळे व्यक्तीचे अज्ञान दूर घेवून ज्ञानाचा प्रकाश पडतो म्हणूनच शिक्षण म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे नेणारे साधन आहे.

३) शिक्षणामुळे राष्ट्रीय एकात्मता अखंडीत ठेवण्याचे कार्य केले जाते.

४) शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल विकास घडून आणला जातो. केवळ त्यांच्या डोक्यामध्ये नवीन माहिती न घालता बंधुत्व, शिलसंपन्नता आणि नवीन कलागुणांना चालना मिळते.

५) शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये सत्य, न्याय, कर्तव्ये आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचे कार्य शिक्षक करतो त्यामुळे विद्यार्थ्यांचे अनुभव जन्य जीवन हे परीपक्व होते.

६) शिक्षण हे चारित्र्य संवर्धनाचे आणि संसकृती संक्रमणाचे साधन आहे.

७) शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरीक, बौध्दीक आणि मानसीक क्षमतांचा व गुणांचा विकास होवून विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास घडवून आणला जातो. (**जोशी,** २००७)

**शिक्षणाची पार्श्वभूमी**

शिक्षण ही विविधांगी सतत चालणारी प्रक्रिया आहे. २५०० वर्षाच्या शिक्षणाच्या पार्श्वभूमीचा आणि विकासाचा आढावा घेताना प्राचीन काळातील शिक्षण, मध्ययुगीन काळातील शिक्षण, स्वातंत्र्योत्तरकालीन भारतीय शिक्षण यांचा समावेश होतो.

शिक्षणाच्या संदर्भात इंग्रजी राजवटीतील दुसरा महत्वाचा बदल म्हणजे शिक्षणप्रसाराच्या कार्यात सरकारनेही रस घेतला. ब्रिटीशपूर्व काळात येथील राजकर्त्यांनी शिक्षणाच्या कार्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले होते. लोकांना शिक्षण देणे किंवा समाजात शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार करणे ही आपली जबाबदारी आहे असे राजकर्त्यांना कधी वाटले नव्हते. जातीसंस्थेने घातलेले निर्बंध आणि राजकर्त्यांची उदासीनता या कारणांमुळे भारतीय समाजातील बहुसंख्य लोक शिक्षणापासून वंचित राहिले होते, परंतु ईस्ट इंडीया कंपनीने महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार करण्याचे धोरण आखून, मुंबई इलाटव्यात एल्फीन्सटन कँडी, मोल्सवर्थ, कॅप्टन, जर्व्हीस यांसारख्या विद्याप्रेमी सरकारी अधिकाऱ्यांनी स्थानिक जनतेला शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्याच्या कामी पुढाकार घेतलेला दिसून येतो.

शिक्षणाच्या संदर्भात खिस्ती-मिशनऱ्यांनी केलेली आणखी एक महत्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी या देशात स्त्री-शिक्षणाची सुरूवात केली. भारतीय समाजाने स्त्रियांना शिक्षणाचा हक्क नाकारला होता. त्यामुळे या ठिकाणी मुलींच्या शिक्षणाची कसलीही व्यवस्था नव्हती. अमेरिकन मिशनने हिंदू मुलींच्याकरीता पहिली शाळा इ. स. १८१९ मध्ये कलकत्ता येथे सुरू केली. त्यानंतर अमेरिकन मिशन व स्कॉटिश मिशन या मिशनरी संस्थानी महाराष्ट्रात मुंबई व पुणे येथे मुलींसाठी शाळा उघडल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्याच्या कामी माउंट स्टुअर्ट एल्फीन्सटन याने मोलाचे योगदान दिलेले आहे. मुंबई इलाख्यात आधुनिक शिक्षणाचा पाया घालण्याचे कार्य एलफिन्स्टनेन केले आहे असे म्हंटले तरी चुकीचे ठरणार नाही. **(दास्ताने, २०१२)**

**भारताच्या संदर्भात शिक्षण**

**वैदीक शिक्षणाच्या काळात वेगवेगळी शिक्षणकेंद्र आणि विद्यापीठे सुप्रसिध्द होती.**

वैदिक कालखंडानंतरचा बौध्द कालखंड हा इ. स. पूर्व ६०० ते १०० असा समजला जोतो. गौतमबध्दाचे बौध्द तत्वज्ञान संस्थापक म्हणून बौध्दकालीन शिक्षणामध्ये अत्यंत महत्वाचे योगदान आहे. बौध्दकालीन शिक्षणामध्ये धम्मप्रसार, ज्ञानप्रसार, आध्यात्मीक प्रगती, चारित्र्य व नैतिकतेचा विकास, चिंतन आणि मनन इ. वर भर देण्यात आला. नालंदा विद्यापीठ, वल्लभी विद्यापीठ विक्रमशालीविद्यापीठ, नडीया विद्यापीठ महत्वाचे होय.

जैन धर्माचे चोविसावे धर्मगुरू वर्धमान महावीर यांनी जैन शिक्षणाची निर्मिती केली. मुक्ती वदाची प्राप्ती हे ध्येय होते. यामध्ये प्रामुख्याने चारित्र्यसंवर्धन, गुरुशिष्य सबंध इ. शिक्षण होय. महावीरांचे शैक्षणिक विचार महत्वाचे आहेत.

१) शिक्षण हे ज्ञानप्राप्तीचे व आत्मोव्दाराचे साधन आहे.

२) शिक्षणाव्दारे समाजात धर्मभावना जागृत करून विद्यार्थ्यांना जबाबदार नागरीक बनविते.

३) शिक्षणाव्दारे विद्यार्थी आणि शिक्षकाचे चारित्र-संवर्धन करणे.

४) शिक्षणाव्दारे जगातील सर्व घटकांचे सम्यक ज्ञान देणे.

५) शिक्षणाव्दारे पूर्वदूषित ग्रहांना स्थान न देणे. **(रानडे, १९८५)**

## ३.७ भारतातील शिक्षण पध्दती

भारताच्या संदर्भात शिक्षणासबंधी विचार करताना प्राचीन युगापासून करावी लागेल. या युगामध्ये शिक्षणावरती ऋषीमुनीचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. तत्कालीन समाजव्यवस्था ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशा चार विभागात सामावली होती.

शिक्षण घेणे आणि देणे हे फक्त ठराविक लोकांच्या पुरते मर्यादीत होते. साधारणतः मुल ८-१० वर्षांचे झाले कि त्याला शिक्षणासाठी गुरूग्रही पाठविले जात असे. गुरूचे आश्रम शहरापासून लांब, निर्जन, निसर्गरम्य परिसरामध्ये असत त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना स्वतःची कामे स्वतः करावी लागत. त्यामुळे आपोआपच त्यांना स्वावलंबन कष्ट करण्याची सवय

लागत असे. प्राचीन काळातील शिक्षणामध्ये वैदीक काळ, बौध्दकाळ, जैनकालीन शिक्षण यांचा समावेश होतो.

जगाच्या इतिहासातील वैदीक कालखंड प्राचीन कालखंड समजला जातो. "वैदिक म्हणजे वेदाचे पठण करणारे किंवा वेद जाणणारे होम वेदक्ती अनेन इति वेळाः" याचा अर्थ ज्या ग्रंथाचे ज्ञान प्राप्त होते तो वेद होय. वैदिक काळामध्ये समाजाची रचना भ्रुती, स्मृती युक्त पुणारांच्या आधारे झाली. वैदीक काळात चातुर्वण्य पध्दत होती. वैदीक काळाचे वैशिष्ट्य म्हणजे आश्रमव्यवस्था होय. अनादीकाळापासून खिस्तपूर्व १००० वर्ष या पहिला कालखंड, दुसरा कालखंड खिस्तपूर्व १००० ते खिस्तपूर्व २०० पर्यंतचा होय. इसवी सन पूर्व २०० ते इसवी सन ५०० हा तिसरा कालखंड होय.

वैदिक काळातील शिक्षण पध्दतीमध्ये मुल्य, आचार-विचार, भारतीय परंपरा, संस्कृतीचे संवर्धन, वैदिक वाङःमय, तत्वज्ञान इ. बाबींना महत्व दिले आहे. शिक्षण व्यवस्थेमध्ये गुरूकुल पध्दत आणि आश्रम व्यवस्था महत्वाची मानली जाते. (दास्ताने,२०१२)

**वैशिष्ट्ये**

प्राचीन काळी शिक्षण हे गुरूच्या घरी म्हणजेच आश्रमात राहूनच घ्यावे लागत असे म्हणून या पध्दतीला गुरूकुल शिक्षण पध्दती मानले गेले आहे.

शिक्षण घेणेचे ठिकाण म्हणजे आश्रम हे शहरापासून दूर असल्याने त्यांचा परिणाम विद्यार्थ्यांवर होत नव्हता. विद्यार्थ्यांना शांत एकाग्रतेने अभ्यास करता येत नव्हता. गुरू आणि शिष्याचे सबंध २४ तास असल्याने चांगल्या आणि चारित्र्यसंपन्न गुरूंच्या प्रभाव विद्यार्थ्यांवर पडत होता. आश्रमातील दिनचर्या पहाटे सुरू होत असे व रात्रीपर्यंत चालत असे. तत्कालीन गुरू म्हणजे ज्ञानाचे सागरच होते. तयार छापील मजकूर किंवा पुस्तके त्याकाळी उपलब्ध नव्हती पाठांतराला सर्वात जास्त महत्व दिले जात होते.

श्रवण, मनन व चिंतन ही अभ्यास पध्दती होती. सर्वागानी विचार करता तत्कालीन शिक्षण पध्दतीचा अभ्यास केल्यानंतर त्यातील प्रत्येक गोष्ट विचार करावयास लागणारी आहे. प्राचीन शिक्षण पध्दतीचा जर पुनश्च अंगीकार केला तर संपुर्ण जगाला शांतीचा सुखाचा खऱ्या ज्ञानाचा मार्ग दाखविण्याचे श्रेय आपल्या भारत देशात लाभेल यात शंका नाही. **(जोशी, २००७)**

### ३.७.१ मध्ययुगीन भारतीय शिक्षण

प्राचीन काळामध्ये अत्युच्च शिखरावर असणारी शिक्षण पद्धती मध्ययुगीन काळात मुसलमानांच्या आणि परकिय आक्रमणांमुळे खंडीत झाल्याचे दिसून येते. मोगलांनी भारतावर अनेक खाऱ्या केल्या. अनेक महत्वाची ठिकाणे काबीज करून त्या ठिकाणी आपल्या धर्माचे शिक्षण देण्यास सुरूवात केली. इ. स. १२९० मध्ये महमंद घोरी ने 'मदरसा' सुरू केल्या. अकबराने आग्रा, शिक्री, गुजरात या ठिकाणी शिक्षणाची केंद्रे सुरू केली. अकबरकालीन शिक्षण पध्दती लवचिक होती यात विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार शिक्षण घेण्याची मुभा होती. पण औरंगजेबाच्या काळामध्ये त्यावर निर्बंध आले.

राजकिय अस्थिरतेमुळे शिक्षणाची पाहिजे तशी प्रगती होऊ शकली नाही. गरीब आणि सर्वसामान्य जनता शिक्षणापासून वंचित राहिल्याचे दिसून येते. या काळातील शिक्षण पध्दतीचा उद्देश मुस्लीम संस्कृतीचा प्रसार करणे, ग्रंथव्दारे ज्ञानप्रसार, धर्मप्रसारासाठी शिक्षण इ. सांगता येईल. शिक्षणाचा इतिहास अभ्यासताना महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायातील ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांचा समावेश होते. इ. स. १६०० ते १९४७ हा कालखंड स्वातंत्र्यपूर्व कालखंड समजला जातो. यालाच ब्रिटीशांचा कालखंड समजला जातो. भारतीय शिक्षणात लॉर्ड मेकॉलेच्या जाहीरनाम्याचे योगदान इंग्रजी भाषेच्या प्रसारासाठी होते. त्यानंतर बेंटिक यांनी शिक्षण विषयक अहवाल जाहीर केला. १८३५ ते १८५३ या काळात भारतात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. भारताचे शैक्षणिक धोरण ठरविण्याच्या दृष्टीने चार्लस वूड यांच्याकडे काम सोपविले गेले. वुडचा खलिता हा भारतातील महत्वाचा खलिता होय.

भारताच्या शिक्षणाच्या संदर्भातील हंटर आयोग हा पहिला महत्वपूर्ण शैक्षणिक आयोग समजला जातो.

### ३.७.२. ब्रिटीशकालीन भारतीय शिक्षण

ब्रिटीशांनी भारतावर जवळ-जवळ दीडशे वर्षे राज्य केले. त्याचा परिणाम जसा इतर क्षेत्रावरती झाला तसाच शिक्षणावरती झाला. ब्रिटीशांनी भारतावर राज्य करण्यासाठी त्यांना, फक्त कारकुनांची आवश्यकता होती. त्यामुळे त्यांनी भारतीयांना फक्त सुशिक्षित ठेवण्याचे धोरण ठेवले.

१८५४ मध्ये चार्लस वुड यांनी आपले शैक्षणिक धोरण स्पष्ट केले. प्राथमिक शिक्षणावर भर दिला. इंग्रजी व विज्ञानाच्या अभ्यासासाठी विद्यापीठांची स्थापना केली. १८५९ मध्ये लॉर्ड स्टेजलेची 'भारत मंत्री' म्हणून नियुक्ती झाली. या शैक्षणिक परिस्थीची पाहणी करणेसाठी एक समिती नियुक्त करण्यात आली.

भारताच्या शैक्षणिक विकासात सर चार्लस वुड यांच्या शिक्षणविषयक खलित्याला विशेष महत्व लागले आहे. भारतातील शिक्षणव्यवस्थेचा आढावा घेवून त्यासबंधी एक अहवाल सादर करणेसाठी ब्रिटिश पार्लमेंटने कंपनीच्या नियामक मंडळाच्या अध्यक्ष सर चार्लस वुड यांची नियुक्ती केली होती. त्याने १९ जुलै १८५४ रोजी आपला अहवाल सरकारला सादर केला होता.

भारतात इंग्रजी शिक्षणाला चालना देण्याचे कार्य लॉर्ड विल्यम बेंटिकच्या १८३५ च्या निर्णयाने केले असले तरी भारतीय शिक्षण पध्दतीला सुव्यवस्थीत पाया प्राप्त करून देण्याचे कार्य सर चार्लस वुड यांच्या शिक्षणविषयक खलित्यांने (Woods Despatch) केले.

वूडच्या खलित्यात शिक्षणासबंधी काही महत्वाच्या सूचना पुढीलप्रमाणे होत्या. –

१) शिक्षणपध्दतीत कनिष्ठ पातळीपासून ते उच्च शिक्षणापर्यंत सुसंवाद निर्माण करण्यात यावा.

२) देशात प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये यांसारख्या शैक्षणिक संस्था पुरेसा प्रमाणात स्थापन करण्यात याव्यात.

३) प्रत्येक प्रांतात स्वतंत्र शिक्षण खाते सुरू करावे आणि त्या खात्यामार्फत शाळांची तपासणी करण्यासबंधीची व्यवस्था करावी.

४) उच्च शिक्षणाचे नियंत्रण करण्यासाठी विद्यापीठांची स्थापना करण्यात यावी.

५) स्त्री शिक्षणाला उत्तेजन देण्याकडे विशेष लक्ष पुरविण्यात यावे.

६) शिक्षण समाजातील सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविणेसाठी खास प्रयत्न करण्यात यावेत.

७) शिक्षण हे पूर्णतः निधर्मी स्वरूपाचे असावे इ.

याच काळात माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षणाबाबत दिलेल्या शिफारशी महत्वाच्या आहेत. १९०२ मध्ये विद्यापीठ शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. विद्यापीठाच्या कायद्यातील विद्यापीठाच्या आणि महाविद्यालयाच्या अनुदानात वाढ झाली. विद्यापीठ आणि महाविद्यालयांतील ग्रंथालये समृध्द होण्यास मदत झाली. भारतातील शिक्षणाचे सार्वत्रिकरण,

मोफत व सक्तीचे शिक्षण कसे आवश्यक आहे, ही भूमिका महात्मा जोतीबा फुले यांनी मांडली. त्यानंतर ना. गोखले यांनी कायदेमंडळात सक्तीच्या शिक्षणाचा ठराव मांडला. राष्ट्रीय शिक्षणामध्ये अनेक मान्यवर नेत्यांनी महत्वाचे योगदान दिले. यामध्ये प्रामुख्याने बाळ गंगाधर टिळक, महात्मा फुले, लाला लजपतराय, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. चा समावेश होतो.

१) हंटर कमिशन

३ जानेवारी १८८२ रोजी तत्कालीन शिक्षण पध्दतीची पाहणी करण्यासाठी व्हाईस रॉय, लॉर्ड स्टीफन यांने विल्यम हंटरच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली तिलाच हंटर किंवा भारतीय शिक्षण आयोग म्हणतात. यामध्ये २२ सदस्यापैकी ७ भारतीय होते पण ते ब्रिटीशधार्जीण होते. भारतीयांचे खरे प्रतिनिधित्व करणारा एक ही नव्हता. त्यामुळे हा नावाचाच भारतीय आयोग होता.

२) भारतीय विश्वविद्यालय आयोग (२७ जाने. १९०२)

विद्यापीठाचा विकास कसा करता येईल तसेच विद्यापीठाचे संघटन व कार्यपध्दतीचा विचार करून सूचना व शिफारशी करणे हे या आयोगाचे काम होते.

३) कलकत्ता विद्यापीठ आयोग (१४ सप्टेंबर, १९१७)

४) सार्जंट आयोग (१९४४)

### ३.७.३ स्वातंत्र्योत्तर भारतीय शिक्षण

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाल्यानंतर सर्वच क्षेत्रामध्ये विकासास चालना मिळाली. शिक्षण क्षेत्रही त्यापासून अलिप्त राहू शकले नाही. भारतीय शिक्षणक्षेत्रामध्ये क्रांती घडवून आणण्याच्या दृष्टीने भारत सरकारने वेळोवेळी विविध आयोगाची स्थापना करून शैक्षणिक विकासाचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

१९४७ ला भारत स्वतंत्र झाला. शिक्षणाच्या पध्दतशीर विकासाकडे लक्ष देण्याचे ठरले. १९५० ला भारताची घटना तयार झाली. देशाच्या विकासासाठी पंचवार्षीक, सामाजिक व आर्थिक नियोजन सुरू झाले.

**१) विद्यापीठ शिक्षण आयोग**

स्वातंत्र्योत्तर काळात सन १९४८ मध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठीय शिक्षणाची उद्दिष्टे, अध्यापनाचा दर्जा, अभ्यासक्रम, पदव्युत्तर

शिक्षण, स्त्री-शिक्षण, कृषी विद्यापीठातील शिक्षण आदी व्यापक कला असलेला आयोग नेमला गेला.

**२) माध्यमिक शिक्षण आयोग**

सन १९५२-५३ मध्ये माध्यमिक शिक्षणासंदर्भात शिफारशी करण्यासाठी डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलीयार यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा आयोग नेमूण माध्यमिक शिक्षणातील उणीवा दूर करण्यासाठी प्रयत्न केला.

**३) भारतीय शिक्षण आयोग**

सन १९६४-६६ मध्ये डॉ. डी. एच. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली 'भारतीय शिक्षण आयोग' नेमण्यात आला. या आयोगाने एकूणच शैक्षणिक क्षेत्राचा व्यापक दृष्टीकोनातून व व्यापक कक्षेत विचार केला त्या दृष्टीने स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शैक्षणिक भारताच्या इतिहासात या आयोगाला शिफारशींस महत्वाचे स्थान द्यावे लागते.

१०+२+३ हा आकृतीसबंधही कोठारी आयोगानेच सुचविला. पूर्व प्राथमिक शाळांचा विकास करावा. शास्त्रीय शिक्षण आणि संशोधन याकडे अधिक लक्ष द्यावे, व्यावसायीक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध कराव्यात, शिक्षणाच्या माध्यमातून नीतीमूल्यांच्या जोवासनेवर भर द्यावा, उपेक्षितांच्या विशेषतः अनुसुचित जाती-जमातींच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष द्यावे. या बाबींकडेही या आयोगाने शासनाचे लक्ष वेधले.

या आयोगाच्या शिफरशींमुळे पुढे सन १९६८ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अनुसरण्यात आले.

**४) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण**

सन १९८६ मध्ये नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहिर केले जाते. सन १९९२ मध्ये त्यात काही सुधारणा करण्यात आल्या. १० (५+३+२) २+३ असा नवा आकृतीबंध आखण्यात आला. **(दास्ताने, २००३)**

### ३.७.३ भारताची शैक्षणिक संदर्भातील सद्यस्थिती

स्वातंत्र्यानंतर आजपर्यंतच्या कालखंडाचा आढावा घेता देशात शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झाल्याचे दिसून येते.

सन १९५०-५१ मध्ये देशातील प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या २,२३,५९६ इतकी होती. आता ही संख्या चौपटीहून अधिक वाढली असून १०.४२ लाखावर

पोहचली आहे. सन १९५०-५१ मध्ये देशांतील विद्यापीठांची संख्या २५ इतकी होती. आज देशातील विद्यापीठांची संख्या ५०४ वर पोहोचली आहे. त्यामध्ये २४३ राज्य विद्यापीठे ४० केंद्रिय विद्यापीठे १३० १३० अभिमत विद्यापीठे ५३ खाजगी विद्यापीठे यांचा समावेश आहे. तसेच राज्याच्या वैधानिक अधिनियमांतर्गत स्थापन झालेल्या विद्यापीठीच दर्जाच्या ५ संख्या देशात कार्यरत असून केंद्राच्या वैधानिक अधिनियमांतर्गत स्थापन झालेल्या विद्यापीठीय दर्जाच्या राष्ट्रीय महत्वाच्या १३ संख्याही उच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. व्यावसायीक शिक्षणावर भर देण्यात आला आहे. आजच्या काळात शास्त्र व तंत्रज्ञानाने जीवनाची सर्व क्षेत्रे व्यापली असल्याने शास्त्र व तंत्रज्ञानाची शिक्षणक्षेत्रातील निकड लक्षात घेवून सातव्या योजनेपासून शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्याबरोबर व्यावसायीक शिक्षणाबरोबर वर अधिक भर दिला जात आहे. सन १९८६-९७ मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देशात ७२.६ लाख होती. ती आता १ केटी १३ लाखांवर पोहोचली आहे. (**जाधव, २०१२**)

## ३.८ वैद्यकिय शिक्षण

ग्रंथालयापेक्षा आरोग्यशास्त्र ग्रंथालये ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. कारण ती वैशिष्ट्यपूर्ण वापरणाऱ्यांच्या ठराविक गरजा व सेवा पुरवितात. आरोग्याशास्त्र ग्रंथालय ह्या संज्ञेमुळे वेगवेगळ्या प्रकारची ग्रंथालये समाविष्ट होतात. ज्याप्रमाणे वैद्यकिय महाविद्यालये ग्रंथालये, संशोधन संस्था देत महाविद्यालये रूग्णालये, परिचारिका संस्था, औषधनिर्माण कंपन्या, सरकारी आरोग्य विभाग इ. वैद्यकिय महाविद्यालयीन ग्रंथालयाचे कार्य उबड आहे कि, बौध्दीक प्रयत्नांचे केंद्र आहे. जे आधुनिक शिक्षण व संशोधनाचे कार्यशील शैक्षणिक साधन आहे.

वैद्यकिय ग्रंथालये म्हणजे असे म्हणता येईल कि, वैद्यकिय विद्यार्थी व वैद्यकिय व्यवसायामध्ये विशिष्ठ रित्या मोठ्या प्रमाणात ते वैद्यकिय विषय क्षेत्रात साहित्य व माहिती सेवा करतात.

आज भारतामध्ये २४९ आयुर्वेद महाविद्यालयातून वैद्यकिय शिक्षण दिले जात आहे. भारतातील २४ राज्यांमधून आयुर्वेदाचे शिक्षण घेण्याची सोय आहे. तसेच महाराष्ट्रात ६३ आयुर्वेद महाविद्यालयातून हे शिक्षण देण्यात येते. महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यांमध्ये आयुर्वेद वैद्यकिय शिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. वैद्यकिय शिक्षण दिले जाते. यामध्ये ५ शासकीय आयुर्वेद महाविद्यालये आहेत तर १४ Private Aided व ४३ Private आहेत व १ Govt. Aided आहे. (**दास्ताने, २०१२**)

महाराष्ट्र वैद्यकिय संशोधन परिषद स्थापन झाली आहे. या परिषदेतर्फे महत्वपूर्ण प्रकल्प राबविण्यात येत आहेत. राष्ट्रीय स्तरावर वैद्यकिय पदवी अभ्यासक्रमासाठी सामायीक प्रवेश परिक्षेत सामील होण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. **(लोकराज्य, २०१२)**

### ३.८.१ भारतातील वैद्यकिय शिक्षण

मध्ययुगामध्ये इसवी सन १२००-१८०० मध्ये आयुर्वेदाचे शिक्षण व सराव हा संचित अवस्थेत होता. आयुर्वेद औषध शिक्षणाला सरळ आजच दिला गेला नाही आणि शिक्षण देणाऱ्या संस्था ह्या अत्यंत वाईट अवस्थेत होत्या व त्या दृष्टीने कोणतीही दृश्य प्रगती त्या काळात आयुर्वेदीक औषधामध्ये प्रस्थापीत केली नाही.

युनानी पध्दतीचा औषध अभ्यासक्रम मुस्लीम विजेत्यांनी भारतामध्ये आणला. पोर्तुगीज लोकांनी १६ व्या शतकांमध्ये इ. स. १५१० मध्ये रॉयल हॉस्पिटल हे गोव्यामध्ये स्थापन करून भारतामध्ये पाश्चिमात्य औषध पध्दतीची सुरूवात केली. ईस्ट इंडिया कंपनीने सन १७४० मध्ये वैद्यकिय विभागाला सुरूवात केली कि ज्यामध्ये वैद्यकिय सेवेची स्थापना झाली. या कंपनीने १९७९ हा मद्रास जनरल रूग्णालय स्थापन केले.

सध्या भारतामध्ये २४ राज्यांतील २४९ आयुर्वेद महाविद्यालयातून आयुर्वेदाचे शिक्षण दिले जात आहे. त्यापैकी आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक, केरळा, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, राजस्थान इ. राज्यांमध्ये आयुर्वेद वैद्यकिय महाविद्यालयांची संस्था जास्त आहे. **(दास्ताने, २०१२)**

## ३.९ महाराष्ट्रातील वैद्यकिय शिक्षण

स्वातंत्र्यापूर्वी महाराष्ट्रामध्ये फक्त चारच वैद्यकिय महाविद्यालये होती. मुदलीयार समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र सरकारने १९६० मध्ये पाच नवीन महाविद्यालये स्थापन केली. सन १९८५ पर्यंत या महाविद्यालयांनी संख्या १३ पर्यंत पोहचली. महाराष्ट्र सरकारचा धोरणांचा बदल होवून खाजगी वैद्यकिय महाविद्यालये सुरू झाली.

राज्यात ५२ शासकिय (विद्यापीठ व्यवस्थापना खालील व महानगरपालीकांनी चालविलेली महाविद्यालये धरून) २८ शासन अनुदानित व १६८ विनाअनुदानीत तत्वावरील खाजगी वैद्यकिय महाविद्यालये अशी एकूण २४८ महाविद्यालये वैद्यकिय शिक्षण देण्याचे कार्य करीत असून त्यांची एकूण विद्यार्थीक्षमता १३,८६३ इतकी आहे. उपरोक्त महाविद्यालयांत

ॲलोपॅथीक पदवी ३१ व पदव्युत्तर २८, आयुर्वेदीक पदवी ५८ व पदव्युत्तर २४, होमिओपॅथीक पदवी ४५ व पदव्युत्तर १२, युनानी पदवी ८, व पदव्युत्तर २, दंतचिकित्सा पदवी २६ व पदव्युत्तर १६ याप्रमाणे विविध प्रकारचे वैद्यकिय शिक्षण देणाऱ्या पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयांचा समावेश आहे. **(दास्ताने, २०१२)**

राज्य शासनाने सन १९९८ मध्ये नाशिक येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना केली असून या विद्यापीठामार्फत राज्यातील वैद्यकिय शिक्षण व आनुषंगिक कार्ये पार पाडली जातात. सध्या महाराराष्ट्रात आयुर्वेद वैद्यकिय शिक्षण देणारी ६३ कॉलेजेस आहेत. ती २७ जिल्ह्यांत कार्यरत आहेत. त्यापैकी ५५ आयुर्वेद महाविद्यालयातून ६ चे शिक्षण म्हणजे पदवीपर्यंत शिक्षण दिले जाते तर २१ आयुर्वेद महाविद्यालयातून पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. अलिबाग, नंदुरबार, सातारा, मुंबई महानगर येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व ५०० रूग्ण खाटांचे संलग्नीत रूग्णालय सुरू करण्यास केंद्र शासनाची मान्यता मिळाली आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकिय संशोधन परिषदेची स्थापना झाली आहे. या परिषदेतर्फे महत्वपूर्ण प्रकल्प राबविण्यात येत आहेत. ४० लाख रूपयांचे अनुदान वितरीत होत आहे. राष्ट्रीय स्तरावर वैद्यकिय पदवी अभ्यासक्रमासाठी सामयीक प्रवेश परिक्षेत सामील होण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जे. जे. रुग्णालय परिसरास अतिविशेषोपचार रूग्णालय उभारण्यात येणार आहे. **(दास्ताने, २०१२)**

गेल्या तीन वर्षात वैद्यकिय शिक्षण या विभागाने अऩेक महत्वाचे निर्णय घेवून सर्व सामान्यांना दिलासा दिला आहे. या विभागाचे निर्णय प्रभावीपणे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यमंत्री डी. पी. सावंत यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. **(लोकराज्य, २०१२)**

## वैद्यकिय शिक्षण

### प्राचीन काळातील आयुर्वेद शिक्षण पध्दती

भारत देशात प्राचीन काळापासून ते पारतंत्र्य काळापर्यंत अनेक स्थित्यंतरे झाली. सामाजिक, आर्थिक, राजकीय, वांशीक युध्दे, परकिय आक्रमणे इ. मुळे ही स्थित्यंतरे घडून आली. या प्रत्येक स्थित्यंतराला कलाटणी देवून भारतीय शास्त्रे विशेषतः आयुर्वेद टिकून राहिला. प्राचीन काळापासून पारतंत्र्य काळापर्यंत भारतात निर्माण झालेल्या शिक्षण पध्दती पुढीलप्रमाणे आहेत.

१) सांधीक शिक्षण पध्दती.

२) आश्रमशाळा पध्दती.

३) विद्यापीठ शिक्षण पध्दती.

४) गुरूकुल शिक्षण पध्दती.

## १) आयुर्वेदाची सांधिक शिक्षण पध्दती :-

प्राचीन काळात आयुर्वेदाची शिक्षण पध्दती ही सांधिक स्वरूपाची शिक्षण पध्दती होती. प्रत्येक ऋषींनी अभ्यासात घेणारे सर्व शास्त्र अभ्यासावे. सोबत आयुर्वेद शास्त्र अभ्यासावे व स्वतःची चिकीत्सा स्वतःच करावी अशी पध्दत होती. या शास्त्राचा उपयोग सामान्य लोकांनाही करून द्यावा असा उद्देश असावा. **(दास्ताने, २०१२)**

## २) आयुर्वेदाची आश्रमशाळा शिक्षण पध्दती :-

प्राचीन काळात ऋषींनी आयुर्वेदशास्त्र शिकून घेतल्यानंतर त्यांनी आपले आश्रम निर्माण केले. हे आयुर्वेदाचे शिक्षण इंद्राकडून काशीराज देवीदास धन्वंतरीनी आयुर्वेद शास्त्र शिकून घेतले व काशी येथे गंगा नदीच्या तीरावर आश्रम निर्माण केले. या काशीराज देवीदास धन्वंतरींनी आश्रमातील आठ शिष्यांना आयुर्वेद शास्त्र शिकविले. याप्रमाणे आयुर्वेदाचे शिक्षण देण्याचे काम आश्रम शाळेमध्ये होऊ लागले हे आश्रम गावापासून दूर वनात असायचे या आश्रमातच गरू व शिल्प रहात असत. **(दास्ताने, २०१२)**

## ३) आयुर्वेदाची विद्यापीठ शिक्षण पध्दती

### तक्षशिला विद्यापीठ

महाभारत युध्दानंतर जस-जशी परिस्थीती शांत होत गेली. तस-तशी अनेक ठिकाणी विस्कळीत असलेले विव्दान एकत्र आले त्यांनी एकत्रित कार्य करण्याची योजना केली व त्यातूनच तक्षशिला विद्यापीठाची स्थापना झाली. तक्ष राजाचा या विद्यापीठाची स्थापना करण्यात महत्वाचा सहभाग होता. या विद्यापीठाची स्थापना इ. स. पूर्व ६ ते इ. स. पू. ७ असावी. या विद्यापीठात १८ शाखा आणि इतर विद्यांचे शिक्षण देणारे हे विद्यापीठ त्याकाळी अग्रेसर होते. या विद्यापीठामध्ये राजगृह, मिथिला, वाराणसी, उज्जेन, कुरू, कोटाल या भारतातील प्रमुख देशातून विद्यार्थी येत असत. भारताच्या आजूबाजूला असणाऱ्या बेबिलो निया, मिश्र (इजिप्त) सिरीया, अरेबिया चीन व ग्रीस या देशातून विद्यार्थी शिक्षणासाठी आणि येत असत.

या विद्यापीठातून त्या काळी ज्योतीष, आयुर्वेद, खगोलशास्त्र, गणित, कृषी, जादू, धनुर्विद्या व इतर युध्द शास्त्रे यांचे शिक्षण दिले जात असे. व्याहीदेव, आत्रेय चाणक्य, पापिनी, ब्रम्हदत्त, जावक अवघोष, कुमारबंब्ध यासारखे अनेक नामवंत विद्वान या विद्यापीठात शिक्षण देण्याचे काम करीत होते. (**रानडे, १९७६**)

**नालंदा**

इ. स. ४ थ्या शतकात गुप्त काळातील चंद्रगुप्त दुसरा यांचा मुलगा कुमार गुप्त याने नालंदा विद्यापीठाची स्थापना केली. बिहारमधील पटणा व राजगृह यांच्या दरम्यान पागलपूर जिल्ह्यांतील पसटवट्टा या ठिकाणी के विद्यापीठ होते. सध्या ही या विद्यापीठाचे अवशेष पहावयास मिळतात.

चिनी प्रवाशी ह्यू-एम-त्संग हा इ.स. ३२९ ते ६४५ या ६९ वर्षांच्या काळात नालंदा विद्यापीठ विद्यार्थी होता. त्यांनी असे लिहून ठेवले आहे कि, नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय अतिशय समृध्द व प्रचंड आहे. १ मैल लांब व अर्धा मैल रूंद जागेत विद्यापीठाच्या इमारती पसरलेल्या आहेत. या सर्वाच्या भोवती उंच भिंत संरक्षणासाठी होती. साधारणपणे या विद्यापीठामध्ये ३०० खोल्या व्याख्याने देण्यासाठी होत्या आणि प्रशस्त असे ८ मोठे हॉल होते.

ग्रंथालयासाठी ३ प्रचंड इमारती होत्या आणि प्रत्येक इमारती ९ मजली होती. ग्रंथालय विभागाला 'धर्मराज' असे संबोधिले जात असे. प्रमुख इमारत ६ मजली होती व १०००० विद्यार्थी आणि १५०० शिक्षक होते. या विद्यापीठाला बंगाल, गुप्त, जावा, सुमात्रा येथील राजे लोकांकडून प्रचंड देणग्या मिळत असत म्हणूनच हे सर्व शक्य होते.

आयुर्वेद, असंग, बसुबंध, दिन्नग, स्थित्मती, धर्मपाल यासारखे प्रसिध्द शास्त्रज्ञ या विद्यापीठामध्ये शिक्षण देण्याचे काम करीत होते. हे विद्यापीठ ४१० ते १२०० या कालावधीत अत्यंत भरभराटीला आले होते. (**रानडे, १९७६**)

**विक्रमशिला**

बंगालमध्ये हे विद्यापीठ ८ व्या शतकात उदयास आले. परकीय आक्रमणामध्ये नालंदा प्रमाणे हे विद्यापीठ ही पूर्णपणे नष्ठ झाले. (**रानडे,१९७६**)

**काशी**

वाराणसी येथे गंगा नदीच्या काठावर हे विद्यापीठ होते. वेदांत या विषयाच्या अध्ययनासाठी हे विद्यापीठ सर्वत्र प्रसिध्द होते. (**परांजपे, १९७६**)

**मिथिला विद्यापीठ**

येथे स्थापन झालेले विद्यापीठ नवन्यास किंवा लॉजीक अथवा तर्कशास्त्र या विषयासाठी प्रसिध्द होते. (**परांजपे, १९७६**)

**वल्लभी विद्यापीठ**

सध्याच्या सौराष्ट्र जवळील बाल या गावाजवळ हे विद्यापीठ होते. पूर्वी या गावाला वल्लभीपूरा असेही नाव होते.

परकिय शत्रुच्या आक्रमणामध्ये विद्यापीठीय शिक्षण पध्दतीला उतरती कळा लागली. इ. स. १२ व्या शतकामध्ये नाश झाला. पुढील काळात आयुर्वेद शिक्षणाचे एकही विद्यापीठ शिल्लक राहिले नाही. परकीयांच्या आक्रमणातून जे काही आयुर्वेद विज्ञान शिल्लक राहिले त्यांनी हिंदू राज्याचा आश्रय घेतला तर काहींनी घरगुती स्वरूपात आयुर्वेद चिकित्सा पध्दती सुरू ठेवली या शास्त्राचा मारा होऊ नये म्हणून अनेकांनी आयुर्वेद शाळा आपल्या मुलांना शिकविण्यास प्रारंभ केला. (**रानडे, १९७६**)

**आयुर्वेदाची गुरूकुल शिक्षण पध्दती**

इ.स. १२ व्या शतकानंतर गुरूकुल शिक्षण पध्दती प्रारंभ झाली. आयुर्वेदाच्या अनेक विव्दांनानी आपला शिष्यवर्ग निर्माण केला. आयुर्वेद शिकणारे ७ ते ८ शिष्य जमवायचे व स्वतःच्या घरी बोलावून चटकसंहिता, अष्ठांग संग्रह, अष्ठीह्रदय, सुहुतसही, उन्य चिकीत्सा, ग्रंथ शिकवित असत. अशा प्रकारे ही गुरूकुल शिक्षण पध्दती १८ वे शतकापर्यंत सुरूच होती. त्यामुळे या काळात विशषतः बंगालमध्ये अनेक आयुर्वेद शास्त्र निर्माण झाले. (**दास्ताने, २०१२**)

**४) आयुर्वेदाची अर्वाचीन शिक्षण परंपरा**

**१) आयुर्वेदाची मिश्र शिक्षण पध्दती**

इ. स. १८०० मध्ये इंग्लंडच्या ईस्ट इंडीया कंपनीने व्यापारी दृष्ट्या हिंदुस्थानात पदार्पण केले. आणि नंतर राज्य प्रस्थापीत केले या काळात काही हिंदू व पुसळमान राजे इंग्रजी सत्तेचे चालक म्हणून छोटी-छोटी राज्ये चालवू लागली अशाच हिंदू राज्याच्या आश्रयाने आयुर्वेद वैद्य असायचे व हिंदू कुटुंबातील लोक यांच्याकडून चिकित्सा करून घेत याच काळात भारतात युरोपीय चिकित्सा शास्त्राचा प्रचार व प्रसार होण्यास सुरूवात झाली. इ. स. १९३५ मध्ये लॉर्ड बेटिंगने भारतातील वैद्यकीय शिक्षणाचे स्वरूप ठरविण्याकरीता एक समिती नेमली त्या समीतीने केलेल्या शिफारशी प्रमाणे भारतात हिंदी (देशी-आयुर्वेद)

वैद्यकाबरोबर ॲलोपॅथीक (पाश्चात्य) वैद्यकशास्त्र शिकवावे असे ठरवले. परंतु सुरूवातीच्या काळामध्ये भारतात संस्कृत महाविद्यालयाची स्थापना करावी. नंतर मेडीकल्सची स्थापना करावी असे ठरले. याच मेडीकल शाळेमध्ये भारतीय विद्यार्थ्यांकरिता भारतीय वैद्यक शिक्षणाचा वर्ग निर्माण झाला. या ठरावानुसार १८२४ मध्ये कलकत्ता व १९३३ मध्ये संस्कृत शाळा स्थापन साली नंतर १८५५ मध्ये मद्रास व कलकत्ता येथील संस्कृत शाळेमध्ये मेडीकलची स्थापना करण्यात आली पुढे याच मेडीकल शाळेमध्ये इंग्रजी मुलांकरीता पाश्चात्य वैद्यकाचा अभ्यासक्रम सुरू केला तर भारतीय मुलांकरीता मिश्र अभ्यासक्रम सुरू झाला. अशाप्रकारे इंग्रजांनी भारतामध्ये मिश्र वैद्यक शिक्षणाची मुहूर्तमेठ केली व आयुर्वेदाला राजाश्रय मिळाला.

## २) वैद्यकिय शिक्षणाचा प्रारंभ

इ.स. १९५२ मध्ये मेडीकल शाळांचे रूपांतर मेडीकल कॉलेजमध्ये करण्यात आले. इंग्लंडमधील रॉयल कॉलेज फिजीशियनकडून सन १८५६-५७ मध्ये या मेडीकल कॉलेजना मान्यता देण्यात आली. अशा प्रकारे भारतात १९ व्या शतकात मिश्र वैद्यकशास्त्राचे शिक्षण देणाऱ्या १४ संख्या निर्माण झाल्या व त्या कार्यरत राहिल्या.

इंग्रनांनी इ. स. १९०५-१९१० या दरम्यान वैद्यकीय शिक्षण व चिकित्सा विषयक पाहणी केली. त्यात त्यांना मिश्र शिक्षण पदवीधारक प्राच ॲलोपॅथीकचीच प्रॅक्टीस करत होते. तसेच लोकांवर ॲलोपॅथीचा प्रवाह दिसून आला. त्यामुळे इंग्रज सरकारतर्फे भारतात पाश्चात्य वैद्यकाला कायदेशीर रीत्या राजमान्यता देण्यात आली. व सर्वमित्र वैद्यकांचे अभ्यासक्रम बंद करण्यात आले. सर्व मेडीकल कॉलेजमध्ये शुध्द पाश्यात्य वैद्यकाचा अभ्यासक्रम लागू करण्यात आला. १८१८ मध्ये कलकत्ता येथे पहिल्या शुध्द मेडीकल कॉलेजची स्थापना झाली व कलकत्ता येथील मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल भारतातील सर्वात मोठे बनले नंतर अनेक ठिकाणी मेडीकल कॉलेजची स्थापना झाली.

## ३) स्वदेशी चळवळ आणि आयुर्वेद शिक्षणसंस्था

लोकमन्यांनी २० व्या शतकाच्या सुरूवातीला स्वदेशी चळवळ सुरू केली. लोकमान्यांच्या स्वदेशी प्रेरणेने भारतात देशी शास्त्र व आयुर्वेद चिकित्सा विद्यालय अनेक ठिकाणी हे शिक्षणक्रम सुरू झाले. १९६२ मध्ये भारतात गुरूकुल कांगडी संस्कृत महाविद्यालय याची स्थापना झाली. १९१० मध्ये या महाविद्यालयात आयुर्वेदाचा वर्ग सुरू करण्यात आला. १९२८ मध्ये बनारसला हिंदू विश्वविद्यालयाची स्थापना झाली. १९१५ मध्ये

पाश्चात्य वैद्यकाला राजमान्यता मिळाल्यामुळे चिकित्सा करताना आयुर्वेदाबरोबर पाश्चात्य वैद्यक शिकविणे सुरू झाले. त्यामुळे पुढील काळात आयुर्वेद महाविद्यालयात मिश्र शिक्षण पध्दती सुरू राहिली. परंतु याही काळात आयुर्वेदाचे वर्ग व गुरूकुल आयुर्वेद शिक्षण पध्दतीने शिक्षण देणे सुरू करण्यात आले. पुण्यात व पश्चिम बंगाल मध्ये असे गुरूकुल पध्दतीने शिक्षण देणारे घराणे कार्यरत होते.

१९२० साली महाराष्ट्र स्वदेशी चळवळीने अधिक भर पडली. आयुर्वेद हे स्वदेशी चिकित्सा शास्त्र असल्यामुळे भारतात विशेषतः महाराष्ट्रात शुध्द आयुर्वेदाचा शिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण झाल्या. पुणे येथे राष्ट्रीय शिक्षण मंडळाने टिळक आयुर्वेद महाविद्यालय तर पंडीत गुणेशास्त्री यांनी गुणे आयुर्वेद महाविद्यालयाची अहमदनगर येथे स्थापना केली. तर अमरावती येथे हनुमान व्यायाम शाळेत प्रसारक मंडळाने आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विशेष प्रयत्नांने नागपूर येथे पं. गोवर्धन शर्मा यांनी श्री. आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना केली. **(रानडे, १९७६)**

### ४) वसाहती स्वराज्य कायदा व आयुर्वेद शिक्षण

भारतात १९३८ मध्ये वसाहतीच्या स्वराज्याचा कायदा लावण्यात आला. १९३८ मध्ये डॉ. मिल्डर स्वास्थ्यमंत्री असताना त्यांनी आयुर्वेद वैद्यांच्या रजिस्ट्रेशनचा कायदा केला. या कायद्यान्वये आयुर्वेद शिक्षणप्रणाली, पाश्चात्य शिक्षण प्रणाली चालू केली. आयुर्वेद व ॲलोपॅथी असा मिश्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. मुंबई प्रांतात मेट्रीक धारकांची शुध्द आयुर्वेदाची D.A.S.F. ही पदविका घेण्यास सुरूवात केली.

विदर्भात नागपूरला विदर्भ आयुर्वेद बोर्डाची स्थापना करण्यात आली व काही महाविद्यालयात आयुर्वेदाचा शुध्द अभ्यासक्रम सुरू होता. परंतु नागपूर व पुणे येथील विद्यापीठांच्या अंतर्गत B.A.M.S. बॅचलर ऑफ आयुर्वेद मेडीसीन ॲन्ड सर्जरी हा ४ वर्षाचा मिश्र अभ्यासक्रम सुरू होता तो सुरूच ठेवण्यात आला.

## ३.१० वैद्यकिय शिक्षण

ग्रंथालयापेक्षा आरोग्यशास्त्र ग्रंथालये ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. कारण ती वैशिष्ट्यपूर्ण वापरणाऱ्यांच्या ठराविक गरजा व सेवा पुरवितात. आरोग्याशास्त्र ग्रंथालय ह्या संज्ञेमुळे वेगवेगळ्या प्रकारची ग्रंथालये समाविष्ट होतात. ज्याप्रमाणे वैद्यकिय महाविद्यालये ग्रंथालये, संशोधन संस्था देत महाविद्यालये रूग्णालये, परिचारिका संस्था, औषधनिर्माण कंपन्या,

सरकारी आरोग्य विभाग इ. वैद्यकिय महाविद्यालयीन ग्रंथालयाचे कार्य उबड आहे कि, बौध्दीक प्रयत्नांचे केंद्र आहे. जे आधुनिक शिक्षण व संशोधनाचे कार्यशील शैक्षणिक साधन आहे.

वैद्यकिय ग्रंथालये म्हणजे असे म्हणता येईल कि, वैद्यकिय विद्यार्थी व वैद्यकिय व्यवसायामध्ये विशिष्ठ रित्या मोठ्या प्रमाणात ते वैद्यकिय विषय क्षेत्रात साहित्य व माहिती सेवा करतात.

आज भारतामध्ये २४९ आयुर्वेद महाविद्यालयातून वैद्यकिय शिक्षण दिले जात आहे. भारतातील २४ राज्यांमधून आयुर्वेदाचे शिक्षण घेण्याची सोय आहे. तसेच महाराष्ट्रात ६३ आयुर्वेद महाविद्यालयातून हे शिक्षण देण्यात येते. महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यांमध्ये आयुर्वेद वैद्यकिय शिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. वैद्यकिय शिक्षण दिले जाते. यामध्ये ४ शासकीय आयुर्वेद महाविद्यालये आहेत तर १६ Private Aided व ४३ Private आहेत **(दास्ताने २०१२)**

महाराष्ट्र वैद्यकिय संशोधन परिषद स्थापन झाली आहे. या परिषदेतर्फे महत्वपूर्ण प्रकल्प राबविण्यात येत आहेत. राष्ट्रीय स्तरावर वैद्यकिय पदवी अभ्यासक्रमासाठी सामायीक प्रवेश परिक्षेत सामील होण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. **(लोकराज्य, २०१२)**

मध्ययुगामध्ये इसवी सन १२००-१८०० मध्ये आयुर्वेदाचे शिक्षण व सराव हा संचित अवस्थेत होता. आयुर्वेद औषध शिक्षणाला सरळ आजच दिला गेला नाही आणि शिक्षण देणाऱ्या संस्था ह्या अत्यंत वाईट अवस्थेत होत्या व त्या दृष्टीने कोणतीही दृश्य प्रगती त्या काळात आयुर्वेदीक औषधामध्ये प्रस्थापीत केली नाही.

युनानी पध्दतीचा औषध अभ्यासक्रम मुस्लीम विजेत्यांनी भारतामध्ये आणला. पोर्तुगीज लोकांनी १६ व्या शतकांमध्ये इ. स. १५१० मध्ये रॉयल हॉस्पिटल हे गोव्यामध्ये स्थापन करून भारतामध्ये पाश्चिमात्य औषध पध्दतीची सुरूवात केली. ईस्ट इंडिया कंपनीने सन १७४० मध्ये वैद्यकिय विभागाला सुरूवात केली कि ज्यामध्ये वैद्यकिय सेवेची स्थापना झाली. या कंपनीने १९७९ हा मद्रास जनरल रूग्णालय स्थापन केले.

सध्या भारतामध्ये २४ राज्यांतील २४९ आयुर्वेद महाविद्यालयातून आयुर्वेदाचे शिक्षण दिले जात आहे. त्यापैकी आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक, केरळा, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, राजस्थान इ. राज्यांमध्ये आयुर्वेद वैद्यकिय महाविद्यालयांची संस्था जास्त आहे. **(दास्ताने, २०१२)**

राज्य शासनाने सन १९९८ मध्ये नाशिक येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना केली असून या विद्यापीठामार्फत राज्यातील वैद्यकिय शिक्षण व आनुषंगिक कार्ये पार पाडली जातात. सध्या महाराराष्ट्रात आयुर्वेद वैद्यकिय शिक्षण देणारी ६३ कॉलेजेस आहेत. ती २७ जिल्ह्यांत कार्यरत आहेत. त्यापैकी ५५ आयुर्वेद महाविद्यालयातून ६ चे शिक्षण म्हणजे पदवीपर्यंत शिक्षण दिले जाते तर २१ आयुर्वेद महाविद्यालयातून पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. अलिबाग, नंदुरबार, सातारा, मुंबई महानगर येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व ५०० रूग्ण खाटांचे संलग्नीत रूग्णालय सुरू करण्यास केंद्र शासनाची मान्यता मिळाली आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकिय संशोधन परिषदेची स्थापना झाली आहे. या परिषदेतर्फे महत्वपूर्ण प्रकल्प राबविण्यात येत आहेत. ४० लाख रूपयांचे अनुदान वितरीत होत आहे. राष्ट्रीय स्तरावर वैद्यकिय पदवी अभ्यासक्रमासाठी सामयीक प्रवेश परिक्षेत सामील होण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जे. जे. रुग्णालय परिसरास अतिविशेषोपचार रूग्णालय उभारण्यात येणार आहे. (**दास्ताने, २०१२**)

गेल्या तीन वर्षात वैद्यकिय शिक्षण या विभागाने अनेक महत्वाचे निर्णय घेवून सर्व सामान्यांना दिलासा दिला आहे. या विभागाचे निर्णय प्रभावीपणे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यमंत्री डी. पी. सावंत यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. (**लोकराज्य, २०१२**)

## ३.११ वैद्यकिय शिक्षणाचे प्रकार

भारतामध्ये मान्यता प्राप्त विविध वैद्यकिय शाखांचा अभ्यास केला जातो. त्या शाखा किंवा वैद्यकिय शिक्षणाचे प्रकार पुढीलप्रमाणे सांगितले आहेत.

१) आधुनिक वैद्यकशास्त्र (M.B.B.S.)

२) दंत वैद्यकशास्त्र (B.D.S.)

३) आयुर्वेद वैद्यकशास्त्र (B.A.M.S.)

४) होमिओपॅथी वैद्यकशास्त्र (B.H.M.S.)

५) निसर्गोपचार आणि योगा (D.Y.M.S.)

६) फिजिओ थेरपी (B.D.T.H.)

७) सुश्रुषा नर्सींग (Nursing)

८) औषधशास्त्र (Pharmacy)

वैद्यकिय शिक्षणाच्या वरील प्रकारपैकी आयुर्वेद वैकशास्त्राचे शिक्षण आयुर्वेदीक मेडीकल कॉलेजमध्ये दिले जाते. आयुर्वेदीक वैद्यकिय महाविद्यालयाचा अभ्यास करताना आयुर्वेदाचा इतिहास जाणून घेणे आवश्यक आहे.

## १) **प्राक्वैदीक काल**

सृष्टीची निर्मिती कशा प्रकारे झाली मानवा सारखा प्रगत प्राणी निर्माण कसा झाला. हे अद्याप कुणालाही न उकळलेले गुढच आहे. याविषयी वेगवेगळ्या शास्त्रज्ञांनी वेगवेगळे सिद्धांत मांडले असले तरी त्यातील सिध्दांत हे गुढ पूर्णपणे उकलू शकले नाहीत. सजीवाची उत्पत्ती, स्थिती व मृत्यू हा निसर्ग असला तरी प्रत्येक सजीवाला जिवीत टिकविण्याची निरोगी राहण्याची व आजार, आघात व पिडा झाल्यास त्यावर उपाय शोधण्याची अंतप्रेरणा ही सुध्दा अगदी नैसर्गिक अशीच आहे. प्रजा निर्माण होण्यापूर्वीच आयुर्वेदाची आयुष्य टिकविण्याचा नैसर्गिक प्रेरणेची उत्पत्ती झाली. यातच आयुर्वेदांचे स्वभाव सिध्दत्व, अनादित्य, भाव स्वभाव नित्यत्व आहे. सृष्टीतील सर्व प्राण्यांची उत्पत्ती केली वेदवाडमपात म्हंटले आहे. ब्रम्हा ही देवता म्हणजे अतःप्रेरणएची निसर्गशक्ती आहे असे म्हंटले आहे. त्यानंतर प्रगत मानव वैद्यक वैदीक काल, आयुर्वेदावतरण, दैवी परंपरा, लौकीक परंपरा असा विकास होत गेलेला दिसून येतो. **(रानडे, १९८५)**

## **आयुर्वेदावतरण**

लौकीक अर्थाने आपण चास्व वेद मानतो पण प्रजापतीने आयुर्वेद हा पाचवा वेद निर्माण करून तो भास्कर याला दिला. त्याने त्यावरून स्वतः भास्कर संहिता तयार करून आपल्या शिक्षणात हे ज्ञान दिले. या शिक्षणाला देखील नंतर स्वतंत्र संहिता रचल्या त्या पुढीलप्रमाणे –

१) धन्वंतरी – चिकित्सा तत्वज्ञान
२) दिवादास – चिकित्सा दर्शन
३) काशिराज – चिकित्सा
४) अश्विनकुमार – चिकित्सा सारतंत्र
५) नकुल - वैष्ठक सर्वस्व
६) यम – ज्ञानार्णव
७) स्यवन – जीवदान
८) जनक - वैण्लअंदेहमंजन
९) सहदेव – यधीसिंधू विवर्धन
१०) बुध - सर्वसार
११) जाणाल – तंत्रसार
१२) पैल – निदान
१३) जानली - वेदांगसार
१४) करथ – कुरर्थ सर्वधर
१५) अगस्त्य – दैध निर्णय तंत्र

**आयर्वेदावतरणाची दैवी व लौकीक परंपरा आणि संप्रदाय**

**ब्रम्हदेव**

**प्रजापती (दक्ष)**

अश्विनकुमार

↓

इंद्र

↓

(आत्रेय संप्रदाय)

(मात्रेय, पुनर्वसु)
भारव्दाज, अश्मीवेस
भेल / भडे
जतुकर्ण, पाराशर
यम
हरीत, क्षारपानी
जानाल
चरक संहितेप्रमाणे

(धन्वंतरी संप्रदाय)

धन्वंतरी
कारीवती दिवोदास
सुश्रुत, औषधेतव
वैतरण, औरभ्र, पौष्कलावत
कत्रिवीर्य, गोपूररक्षित, भोज

(आत्रेय संप्रदाय)

कास्यप
वसिष्ठ
भूग, अत्री

(भास्कर संप्रदाय)
धन्वंतरी
दिवोदास काशीराज
अश्विनीकुमार

नकुल
च्यवस, जनुक, बुध, जाजील
पेल, कश्प, ब्रम्हवैवर्ल
पुरावाप्रमाणे २

सहदेव

## ३.१२ आयुर्वेद शिक्षण वाढ व विकास

“स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये लोकमान्य टिळकांच्या स्वदेशी चळवळीचा परिणाम म्हणून भारतात देशी शास्त्र चिकित्सा पध्दतीला चालना मिळाली. १९२० मध्ये नागपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय कॉग्रेसने भारतीय देशी चिकित्सा पध्दतीला प्रोत्साहन देण्याविषयीचा ठराव मंजूर केला. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये आयुर्वेदाच्या विकासासाठी विविध समित्या स्थापन

झाल्याचे दिसून येते. त्यामध्ये बंगाल येथे १९२५ मध्ये उत्तरप्रदेश १९२८ मध्ये, १९२१ मध्ये मद्रास, १९३८ मध्ये पंजाब, मुंबई १९४०, १९४७ मध्ये आसाम मध्ये विविध प्रांतीय समित्या स्थापन झालेचे निदर्शनास येते. या समित्यांनी प्रामुख्याने पुढीलप्रमाणे शिफारशी केल्याचे दिसून येते.

१) देशी चिकित्सा पध्दतीला राजमान्यता देण्यात यावी.

२) आयुर्वेद व अन्य देशी चिकित्सा पध्दतीची रूग्णालये व विद्यालये स्थापन करावी.

३) देशी चिकित्सा पध्दतीतील पदवीधरांची रजिस्ट्रेशन करण्याची सोय करावी या करीता निबंधकाची नियुक्ती करावी.

या प्रांतीय समित्यांनी केलेल्या शिफारशीनुसार १९३८ साली डॉ. गिल्डर महोदयांच्या पुढाकाराने आयुर्वेदिक वैद्यांच्या रजिस्ट्रेशनची सोय करण्यात आली. या करीता भारतीय चिकित्सा बोर्ड व स्टेट कौन्सीलची स्थापना करण्यात आली. देशी चिकीत्सा पध्दतीची महाविद्यालये व रूग्णानले सुरू करण्यात आली. (**पहाडे, १९९३**)

## ३.१३ आयुर्वेद शिक्षणासबंधी प्रमुख संस्था

### १) सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडीयन मेडिसीन

१९७१ मध्ये या केंद्रिय परिषदेची स्थापना करण्यात आली ही परिषद खालील कार्ये करते.

अ) देशी चिकित्सा पद्धतीवर नियंत्रण ठेवणे.

ब) देशी चिकित्सा पध्दतीने अभ्यासक्रम निश्चित करणे व त्याची अंमलबजावणी करणे.

क) पदवी निश्चित करण्याबाबत निर्णय घेणे.

ड) देशी चिकित्सा पध्दतीची नवीन महाविद्यालये व औषधी कंपन्या सुरू करण्यास परवानगी देणे.

इ) कार्ये या परिषदेस करावी लागतात. त्यांच्या नियमाप्रमाणे महाविद्यालयामध्ये सोयी सुविधा आहेत किंवा नाहीत त्यांच्यावरची योग्य ती कारवाई केली जाते.

### २) आयुष

ही संघटना केंद्र शासन मान्य असून भारतातील सर्व आयुर्वेद महाविद्यालयांवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करते. (Ayush) नोव्हे. २००३ रोजी साली मिनिस्ट्री ऑफ हेल्थ ॲन्ड फॅमिली वेल्फेअर यांनी स्थापन केले.

### ३) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना ३ जून १९९८ मध्ये नाशिक येथे करण्यात आली. या विद्यापीठाचा मुख्य उद्देश आरोग्य विद्यापीठाचा दर्जा उंचावणे, गुणवत्तायुक्त वैद्यकिय शिक्षण देणे आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे हे आहेत. सध्या या विद्यापीठांतर्गत वैद्यकिय, दंत वैद्यकिय, आयुर्वेद युनानी, होमिओपॅथी, फार्मसी, ॲक्युप्रेशर, थेरेपी, फिजिओथेरेपी, ऑडीओलॉजी इ. अभ्यासक्रम शिकविण्याची सोय आहे. वरील शिक्षण अभ्यासक्रमावरील संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रवेश परिक्षा घेवून विविध अभ्यासक्रमासाठी विविध वैद्यकिय महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्याचे काम हे विद्यापीठ करत असते. प्रवेश देणे, परिक्षा घेणे नियंत्रण ठेवणे ही देखील कामे करतात.

"या विद्यापीठांतर्गत एकुण महाविद्यालयाची संख्या १८८ असून या संपूर्ण महाविद्यालयाची संख्या १८८ असून या संपूर्ण महाविद्यालयातील एकुण ११८६३ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. ही सर्व महाविद्यालये महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यात कार्यरत आहेत.

या विद्यापीठाला महाराष्ट्र शासनाने ५१ एकर जागा दिली आहे. तसेच प्रशासकिय इमारत बांधण्यासाठी ३० करोड रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. या विद्यापीठांमध्ये सध्या ११७ कर्मचारी कार्यरत आहेत.

या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डी. जी. डोणगावकर होते तर सध्या या विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. अर्जुन जामकर हे आहेत.

### ४) भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली

ही संघटना भारतीय शासनाद्वारा भारतातील व परदेशातील आयुर्वेद व इतर शिक्षणावर नियंत्रण व मार्गदर्शन करण्याचे काम करते. (**रानडे, १९८५**)

### ५) इंटरनॅशनल ॲकॅडमी ऑफ आयुर्वेद

पुण्यातील ही संस्था डॉ. सौ. सुनंदा रानडे, डॉ. सौ. भारती लेले, डॉ. अविनाश लेले व त्यांचे सहकारी चालवितात. या संस्थेतर्फे परदेशातील विद्यार्थ्यांसाठी पुण्यात आयुर्वेदाचे अभ्यासक्रम चालविले जातात.

विविध देशातील आयुर्वेदाचा प्रसार करण्याचा व्यक्ती संस्था आणि त्यांचे कार्य लक्षात घेतल्यास आयुर्वेदाला पुन्हा एकदा सुवर्णयुग प्राप्त होणार यात शंका नाही. (**रानडे, १९८५**)

### ६) नॅशनल इंटीग्रेटेड मेडीकल असोसिएशन निमा दिल्ली

ही संघटना भारतातील सर्व आयुर्वेद प्रॅक्टीशनवरती एकत्र येवून स्थापन केली आहे व व्यवसायात येणाऱ्या अडीअडचणीवर मात करण्यासाठी कार्य करीत असते. **(रानडे, १९७६)**

### ७) ऑल इंडिया आयुर्वेदीक स्पेशालिस्ट पोस्ट ग्रेज्युएट असोसिएशन

ही संघटना पोस्ट ग्रॅज्युएट झालेल्या वैद्यकिय आयुर्वेद वैद्यांच्यासाठी काम करते. **(रानडे, १९७६)**

### ८) इंडीयन असोसिएशन फॉर द स्टडी ऑफ ट्रॅडीशनल असोसिएशन मेडीसीन.

### आयुर्वेदाचा परदेशात प्रसार

आयुर्वेद, जोतिष, नृत्य, संगीत या वेदातील महत्वपूर्ण शास्त्राबद्दल फार मोठ्या प्रमाणात कुतुहल व जिज्ञासा परदेशात उत्पन्न झाली आहे. योगाचा परदेशातील प्रसार गेली दोन दशके फार वेगाने चालू आहे.

आयुर्वेद शास्त्राची तसेच वैद्यकिय ज्ञानाची काही क्षेत्रांत प्रचंड प्रगती होवून ही काही साध्या व गंभीर आनाराची कारणे व चिकित्सा अद्यापही गुढ राहिल्याने परदेशातील अनेक शास्त्रज्ञ व वैद्यकिय व्यावसायिक आयुर्वेदाकडे आकृष्ठ झाले आहेत. त्यामुळे युरोप, जपान, अमेरिका, आस्ट्रेलिया या देशात गेल्या दशकांत अनेक संख्या होवू शकल्या, या सर्व संस्था आयुर्वेदाचा जोमाने प्रचार करीत आहेत. **(रानडे, १९७६)**

## ३.१४ आयुर्वेद शिक्षणासबंधी प्रमुख समित्या

आयुर्वेद हे भारतीय वैद्यकशास्त्र असलेने अति प्राचीन काळापासून सर्व भारतीय लोकांना प्रिय आहे. आयुर्वेदाला काळपरत्वे कमी अधिक प्रमाणात राजाश्रय मिळाला असला तरी शास्त्राची लोकमान्यता मात्र कायम आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वेळोवेळी सरकारने आयुर्वेद शास्त्राचा अनेक समित्या नेमल्या देशी चिकित्सा पध्दतीचा विकास घडवून आणण्यासाठी केंद्र सरकारने या समित्यांच्या मार्फत प्रयत्न केला व त्यांनी त्या-त्यावेळी सुचनाही केल्या आहेत त्यापुढीलप्रमाणे –

१) भोर समिती – १९४५     २) चोपडा समिती – १९४६

३) पंडीत समिती – १९५२     ४) वेदसमिती

५) उडूप समिती ६) मुदलियार समिती

७) व्यास समिती **(रानडे, १९८५)**

## १) भोर समिती

भारत सरकारने डॉ. भोर यांच्या अध्यक्षतेखाली १९४५ मध्ये पहिली समिती नेमली तीच ही 'भोर समिती' होय.

संपूर्ण भारतामध्ये या समितीला सर्व्हे करता आला नाही म्हणून या समितीने देशी चिकित्सा पध्दतीचे सर्व निर्णय प्रांतीय समितीने घ्यावेत अशी शिफारस केली. आयुर्वेद शास्त्राकडे या कमिटीने दुर्लक्षच केले. त्यामुळे अनेकानी याबाबत सरकारकडे तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली होती. परिणामतः मद्रासच्या स्वास्थमंत्री श्रीमती लक्ष्मीपती यांच्या अध्यक्षतेखाली पुढील निर्णय घेण्यात आले होते.

१) केंद्र व राज्यांत आयुर्वेद व युनानी शास्त्राचे संशोधन, शिक्षण यांची व्यवस्था राष्ट्रीय योजना समितिच्या शिफारशीनुसार केली जावी.

२) आयुर्वेद व युनानी चिकित्सकांना सरकारी नोकऱ्यांत समाविष्ठ करावे याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने १९४६ मध्ये पुढील कमिटी नेमली. **(रानडे, १९८५)**

## २) चोपडा समिती

कर्नल सर रामनाथ चोपडा यांच्या अध्यक्षतेखाली १९४६ मध्ये या समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने संपूर्ण भारतभर पाहणी केली व १९४८ मध्ये आपला अहवाल केंद्र सरकारला सादर केला.

**शिफारशी**

१) संपूर्ण भारतामध्ये मिश्र वैद्यक पध्दतीचा एकच पाठ्यक्रम करावा.

२) प्रांतीक भाषावार पाठ्यपुस्तके निर्माण करण्याकरीता राज्य शासनाने एक समिति स्थापन करावी व समितीने मिश्र अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके तयार करावीत.

३) एकाच प्राध्यापकाने प्राचीन व अर्वाचीन विषय शिकवावेत.

४) केंद्र सरकारने भारतीय स्तरावर रजिस्ट्रेशनचा कायदा करावा. एक रजिस्टर तयार करावे राज्य सरकारने एक समिती नेमून समिती मार्फत वैद्याच्या रजिस्ट्रेशची व्यवस्था करावी.

५) आयुर्वेदाचा संशोधन विभाग असावा.

६) आयुर्वेद व पाश्चात्य वैद्याकांशी समन्वय साधावा व समन्वित पाठ्यक्रम तयार करावा.

७) मेडीकल कॉलेजात आयुर्वेदाचा इतिहास शिकवावा - आयुर्वेद आणि युनानी या शास्त्रांचे संशोधन अवश्य करावे या सूचनेचा पाठपुरावा करण्यासाठी सरकाने १९४९ मध्ये पुढील कमिटी नेमली.

**३) पंडीत कमिटी**

डॉ. सी. जी. पंडीत या कमिटीचे अध्यक्ष होते. त्यांनी ज्या सूचना सरकारला केल्या त्यानुसार जामनगर येते १९५२ मध्ये आयुर्वेदाचे केंद्रिय संशोधन केंद्र स्थापन केले. पुढे १९५६ मध्ये केंद्रिय सरकारने याच संस्थेत भारतातील प्रथम पदव्युत्तर शिक्षणकेंद्र सुरू केले.

१) आयुर्वेद कॉलेजमधील प्रवेश पात्रता इंटर सायन्स असावी व पाठ्यक्रम पाच वर्षाचा असावा.

२) सर्व भारतभर आयुर्वेदाचा समान अभ्यासक्रम असावा आणि सर्वांना एकच पदवी असावी अशा शिफारशी केल्या. **(रानडे १९८५)**

**४) वेद समिती : १९५४**

पंडीत समितीने १९५२ मध्ये केलेल्या सूचना व कार्य लक्षात घेवून १९५४ मध्ये त्रिवेंद्रम येथे एक केंद्रिय स्वास्थ परिषद घेण्यात आली. या परिषदेमध्ये पंडीत समितीने दिलेल्या अहवालावर विस्तृत विचार करून दवे यांच्या अध्यक्षतेखाली फोर्स हेल्थ ॲन्ड डेव्हलपमेंट कमिटीची स्थापना केली.

या समितीने प्रत्येक राज्यात वैद्यकिय शिक्षणाचे एक बोर्ड व फॅक्टरी नेमण्यात यावी. बोर्डाने सर्व वैद्यकिय व्यावसायीकांने रजिस्ट्रेशन करावे व फॅकल्टीने शिक्षणविषयक कार्य करावे. इंडीयन मेडीकल कौन्सिलप्रमाणे, सेंट्रल कौन्सिलप्रमाणे सेंट्रल कौन्सिल नेमून आयुर्वेद शिक्षणाचे नियोजन करावे आयुर्वेद पदवी स्नातक स्वरूपाची असावी. स्नातकोत्तर प्रशिक्षण व संशोधनाची सोय करावी इ. शिफारशी केल्या. या समितीने मिश्र अभ्यासक्रमाचा एक पाठ्यक्रमही तयार करून दिला. **(रानडे, १९८५)**

**५) उडूप समिती**

केंद्र शासनाने डॉ. के. एन. उडूप यांच्या अध्यक्षतेखाली १९५८ मध्ये ही समिती नेमली. आयुर्वेदीय शिक्षणसंस्था व संशोधन केंद्रे यांची सध्याची स्थिती कशी आहे, त्यांना

मिळणारे आर्थिक सहाय्य आणि त्यांनी आजपर्यंत काय प्रगती केली आहे याबद्दलचा अहवाल तयार करणे व केंद्र सरकारला शिफारशी करणेसाठी ही समिती नेमली होती.

या समितीच्या मुख्य अभिप्राय वैद्यक तसेच शुध्द आयुर्वेद वैद्यक निर्माण करण्याकडे होता. या समितिचा अहवाल काही प्रमाणात मान्य केल्याने आयुर्वेद शिक्षण प्रणालीस चालना मिळाली. या कमिटीने केलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे होत्या.

१) आयुर्वेदाची उन्नती करण्यासाठी मिश्र शिक्षणक्रमयुक्त अभ्यासक्रम असावा त्याबरोबर शुध्द आयुर्वेदाचा अभ्यासक्रमही चालू ठेवण्यास हरकत नाही.

२) सर्व आयुर्वेदीय विद्यालये विद्यापीठांशी संलग्न असावीत.

३) आयुर्वेदीय अध्यापकांचे वेतन मेडीकल कॉलेजमधील अध्यापकांच्या एवढे असेल पाहिजे.

४) प्रत्येक प्रांतातील शासनाने संशोधनासाठी बोर्ड नेमून त्यात आयुर्वेदीय व आधुनिक दोनही पदवीधरांना नियुक्त करावे. **(रानडे, १९८५)**

### ६) व्यास कमिटी

१९६२ शुध्द आयुर्वेदाचा पाठ्यक्रम तयार करणेसाठी श्री. मोहनलाल व्यास, आरोग्यमंत्री, गुजरात राज्य यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली, त्याप्रमाणे या कमिटीने एक पाठ्यक्रमही तयार केला.

केंद्र सरकारच्या सुचनेप्रमाणे १९७१ जुलैपासून सर्वत्र बी. ए. एम. एस. हा शुध्द आयुर्वेदाचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. सध्या याचा अभ्यासक्रमानुसार विद्यापीठीय स्तरावर संपूर्ण भारतात आयुर्वेदाचे पदवी शिक्षण सुरू केले. **(परांजपे, १९७६)**

### ७) मुदलियार समिती

१९५९ मध्ये श्री. मुढलियार यांच्या अध्यक्षतेखाली हेल्थ सर्वे ॲन्ड कमिटी स्थापन करण्यात आली या समितीने १९६१ मध्ये केलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

१) आयुर्वेदाकरीता सेंट्रल कौन्सील निर्माण करावा.

२) संपूर्ण भारतात आयुर्वेदाचा एकसारखाच अभ्यासक्रम सुरू करावा.

३) प्रत्येक राज्यात आयुर्वेदाचा स्नातकोत्तर अभ्यासक्रम सुरू करावा. **(रानडे, १९८५)**

### प्रादेशिक समिती

**डॉ. झकेरिया समिती -** आरोग्यमंत्री डॉ. झकेरिया यांनी मांडलेला मुख्य मुद्दा पुढीलप्रमाणे "मिश्र मेडीकल स्नातकांना M.B.B.S प्रमाणे मान्यता व वेतनश्रेणी दिली तर त्यावर इंडीयन

मेडीकल कौन्सीलकडून आक्षेप घेतला जाईल. त्याकरीता मिश्र मेडीकल स्नातकांनी M.B.B.S. पदवीशी समक्षक आहे हे सिध्द करायला पाहिजे. याकरिता महाराष्ट्र शासन मिश्र स्नातकांना काही अटीवर M.B.B.S ला प्रवेश देईल असे अश्वासन डॉ. झकेरिया यांनी दिले.

**कुलगुरू पवार समिती –** कुलगुरू श्री. पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमण्यात आली. त्यांनी M.B.B.S हा शुध्द आयुर्वेदाचा अभ्यासक्रम संपूर्ण भारतामध्ये लागू करव्यात आला आहे असे जाहीर केले. या अभ्यासक्रमात सुसुत्रता आणण्याकरीता व त्याची योग्य अंमलबजावणी करण्याकरिता सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन (C.C.I.M.) ची स्थापना करण्यात आली. त्यानुसार ही संस्था आयुर्वेद शिक्षणशास्त्राचे सर्व धोरण ठरविते तर राज्य सरकार आयुर्वेदीय स्नातकांचे रजिस्ट्रेशन करते. १९७० साली केंद्र शासनाने एक अध्यादेश (IMCC act 1970) काढून B.A.M.S हा आयुर्वेदाचा अभ्यासक्रम संपूर्ण भारतामध्ये लागू करण्यात आला आहे असे जाहीर केले. या अभ्यासक्रमात सुसुत्रता आणण्याकरीता व त्याची योग्य अंमलबजावणई करण्याकरीता सेन्ट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन C.C.I.M. ची स्थापना करण्यात आली. त्यानुसार ही संस्था आयुर्वेद शिक्षण विषयीचे सर्व धोरण ठरविते तर राज्य सरकार आयुर्वेद स्नातकांचे रजिस्ट्रेशन करते. **(रानडे, १९७६)**

## ३.१५ संशोधकाने निवडलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाची थोडक्यात माहिती

### १) भारती विद्यापीठाचे आयुर्वेद महाविद्यालय धनकवडी, पुणे

भारती विद्यापीठाची स्थापना १० मे १९६४ साली झाली आणि त्यानंतर मा. डॉ. पतंगराव कदमसाहेब यांनी आयुर्वेदाचे महत्व ओळखून सन १९९० मध्ये या महाविद्यालयाची स्थापना धनकवडी, पुणे येथे स्थापना केली. या महाविद्यालयास सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन (CCIM) नवी दिल्ली यांचेकडून मान्यता आहे. या महाविद्यालयास NAAC बेंगलोर या संस्थेकडून (अ) मानांकन मिळाले आहे.

या महाविद्यालयाची स्वतंत्र अशी प्रशस्त इमारत आहे. ग्रंथालय सुसज्ज असून आधुनिक सेवा-सुविधा पुरविल्या जातात. या महाविद्यालयातून Diploma UG ते PG तसेच Ph.D. पर्यंतचे (B.A.M.S. / M.D. / M.S.) शिक्षण दिले जाते.

यासाठी हे महाविद्यालय आधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण आहे.

## २) टिळक आयुर्वेद महाविद्यालय रास्ता पेठ, पुणे

पुण्यामध्ये सर्वात जुने स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये स्थापन झालेले हे आयुर्वेद महाविद्यालय आहे. राष्ट्रीय शिक्षण मंडळाची स्थापना १९३३ मध्ये झाली आणि त्यावर्षी हे आयुर्वेद महाविद्यालय त्या संस्थेने सुरू केले. हे महाविद्यालय अनुदानित महाविद्यालय आहे. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न असून, सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन (CCIM) नवी दिल्ली यांचेकडून मान्यता प्राप्त आहे. आतापर्यंत या महाविद्यालयातून ७००० विद्यार्थी पदवीधर व ११०० विद्यार्थी यांनी यशस्वीरित्या शिक्षण प्राप्त केले आहे.

## ३) अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय सदाशिव पेठ, पुणे

या महाविद्यालयाची स्थापना सन १९३६ मध्ये सदाशिव पेठ, पुणे येथे झाली आहे. आयुर्वेद शिक्षण मंडळाचे हे आयुर्वेद महाविद्यालय वैद्य हरिभाऊ परांजपे यांनी स्थापन केले आहे. परांजपे यांनी १९२७ मध्ये आयुर्वेदाचे शिक्षण पूर्ण केल्यापासून समाजातील गरीब लोकांना औधधोपचार करण्यास सुरूवात केली. आयुर्वेदाचे महत्व ओळखून त्यांनी आयुर्वेद महाविद्यालय सुरू केले. हे महाविद्यालय पुणे विद्यापीठाशी संलग्न असून अनुदानित आहे. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी जोडले आहे.

या महाविद्यालयाचे ग्रंथालय सुसज्ज आहे.

या महाविद्यालयातून UG व PG (B.A.M.S. / M.D.) पर्यंतचे शिक्षण मिळते.

## ४) आयुर्वेद महाविद्यालय गणेशवाडी, पंचवटी, नाशिक

या आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना सन १९५४ मध्ये नाशिक येथे करण्यात आली आहे. हे महाविद्यालय पुणे विद्यापीठाशी संलग्न आहे, त्याचप्रमाणे ते महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी ही संलग्न आहे. तसेच सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन (CCIM) नवी दिल्ली यांचेकडून मान्यताप्राप्त आहे. या कॉलेजला राज्य शासन आणि केंद्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात फंडस मिळाले आहेत. या महाविद्यालयातून UG व PG (B.A.M.S. / M.D. / M.S.) पर्यंतचे शिक्षण मिळते. हे महाविद्यालय अनुदानित आहेत.

## ५) श्री. गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर

या महाविद्यालयाची स्थापना सन १९१७ मध्ये अहमदनगर येथे झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे.

तसेच सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन (CCIM) नवी दिल्ली यांचेकडून मान्यताप्राप्त महाविद्यालय आहे. हे विनाअनुदानित तत्वावर चालते. या महाविद्यालयातून UG व PG (B.A.M.S. / M.D.) पदवी पर्यंतचे शिक्षण दिले जाते.

**६) कर्मवीर व्यंकटराव तानाजी रणधीर आयुर्वेद कॉलेज, शिरपूर, धुळे**

या महाविद्यालयाची स्थापना धुळे येथे सन १९७२ मध्ये झालेली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. हे महाविद्यालय ४० वर्षापूर्वीचे धुळे जिल्ह्यातील पहिले महाविद्यालय आहे. या महाविद्यालयातून UG (B.A.M.S.) पदवीपर्यंतचे शिक्षण मिळते. हे महाविद्यालय अनुदानित आहे.

**७) वसंतदादा पाटील आयुर्वेद कॉलेज दक्षिण शिवाजीनगर, सांगली**

या महाविद्यालयाची स्थापना सांगली येथे सन १९८१ मध्ये झाली आहे. हे अनुदानित महाविद्यालय नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयातून UG (B.A.M.S.) पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जात आहे.

**८) आयुर्वेद महाविद्यालय श्री. शिवाजीनगर राहुरी फॅक्टरी अहमदनगर**

या महाविद्यालयाची स्थापना सन १९९१ मध्ये अहमदनगर येथे झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. हे विनाअनुदानित तत्वावर सुरू आहे. या महाविद्यालयातून UG व PG (B.A.M.S. / M.D. / M.S.) या पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. हे महाविद्यालय आधुनिक सेवा सुविधांनी परीपूर्ण आहे. या महाविद्यालयाचे ग्रंथालय सुसज्ज असून ग्रंथ व जर्नल्स विपूल प्रमाणात आहेत.

**९) महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सुमितभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय हडपसर, पुणे**

या महाविद्यालयाची स्थापन सन १९९० मध्ये हडपसर, पुणे येथे झालेली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. हे महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर चालविले जाते. या महाविद्यालयातून UG व PG (B.A.M.S. / M.D.) पदवीपर्यंतचे शिक्षण मिळते.

**१०) कॉलेज ऑफ आयुर्वेद अॅन्ड रिसर्च सेंटर आकुर्डी, पुणे**

या महाविद्यालयाची स्थापना सन १९९० मध्ये आकुर्डी, पुणे येथे झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे यांच्या स्थापनेनंतर मामासाहेब मोहोळ यांच्या प्रेरणेने या

महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. हे महाविद्यालय सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन (CCIM) नवी दिल्ली यांचेकडून मान्यताप्राप्त आहे. या महाविद्यालयातून UG व PG (B.A.M.S. / M.D.) पर्यंतचे शिक्षण दिले जाते. हे कॉलेज आधुनिक सेवा सुविधांनी युक्त असे आहे. येथील ग्रंथालय सुसज्ज असून ग्रंथ व जर्नल विपूल प्रमाणात आहेत.

### ११) संगम सेवाभावी ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, संगमनेर, अहमदनगर

या महाविद्यालयाची स्थापना सन १९९२ मध्ये संगमनेर, अहमदनगर येथे झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. तसेच सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन (CCIM) नवी दिल्ली यांचेकडून मान्यताप्राप्त आहे. या महाविद्यालयातून UG व PG (B.A.M.S. / M.D. / M.S.) पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते.

### १२) वसंत कुसुम रूटल योगा आणि आयुर्वेद संस्थानचे सिध्दकला आयुर्वेद महाविद्यालय संगमनेर, अहमदनगर

या महाविद्यालयाची स्थापना सन १९९२ मध्ये संगमनेर, अहमदनगर येथे झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. हे महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर सुरू आहे. या महाविद्यालयातून UG व PG (B.A.M.S. / M.D.) पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. या कॉलेजमधील प्रथम वर्षांची (B.A.M.S.) प्रवेश क्षमता ६० इतकी आहे.

### १३) भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय वाघोली, पुणे

भारतीय संस्कृती दर्शन ट्रस्टने सन १९९८ मध्ये ह्या आयुर्वेद महाविद्यालयाची वाघोली, पुणे येथे स्थापना केली आहे. या महाविद्यालयाची प्रशस्त अशी इमारत आहे. या महाविद्यालयाची प्रथम वर्षाची प्रवेशक्षमता ६० इतकी आहे. येथे देशी-विदेशी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. तसेच सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन (CCIM) नवी दिल्ली यांचेकडून मान्यताप्राप्त आहे. या महाविद्यालयाचे ग्रंथालय सुसज्ज असून ग्रंथालयामधून वाचकांना योग्य सेवा-सुविधा पुरविल्या जातात.

### १४) छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे आयुर्वेद महाविद्यालय औरंगाबाद

या महाविद्यालयाची स्थापना सन १९८९ मध्ये औरंगाबाद येथे झाली आहे. हे महाविद्यालय विनाअनुदानित आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयातून UG व PG (B.A.M.S. / M.D.) पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते.

### १५) शासकिय आयुर्वेद कॉलेज, मधुबन, उस्मानाबाद

या महाविद्यालयाची स्थापना सन १९८६ मध्ये उस्मानाबाद येथे झाली आहे. हे कॉलेज महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. This College has maintained superb Academic Record Since the foundation of MUHS and well equipped with all modern facility. This College has well maintained Library with wide range of books collection and journals.

या महाविद्यालयाची BAMS या प्रथम वर्षाची प्रवेशक्षमता ५० विद्यार्थी इतकी आहे.

### १६) सेठ सी. एम. आर्यंगल वैद्यक महाविद्यालय, सातारा

या महाविद्यालयाची स्थापना सन १९१३ मध्ये सातारा येथे झाली आहे. हे सर्वात जुने आयुर्वेद महाविद्यालय आहे. हे महाविद्यालय अनुदानित असून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयाची B.A.M.S. प्रथमवर्ष विद्यार्थी प्रवेश क्षमता ५० इतकी आहे.

### १७) सेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालय सोलापूर

या महाविद्यालयाची स्थापना सन १९६७ मध्ये सोलापूर येथे झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. हे शासकीय अनुदानित महाविद्यालय आहे. हे महाविद्यालय सर्व आधुनिक सेवा सुविधांनी युक्त आहे. ग्रंथालय सुसज्ज आहे व ग्रंथालय पुस्तके व जर्नल्स मुबलक प्रमाणात आहेत. या महाविद्यालयातून B.A.M.S. / M.D. पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते.

### १८) यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोल्हापूर

श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाने या आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना सन १९८९ मध्ये कोडोली, कोल्हापूर येथे केलेली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. तसेच सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन (CCIM) नवी दिल्ली यांचेकडून मान्यताप्राप्त आहे. महाविद्यालयातून B.A.M.S.

/ M.D. पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. महाविद्यालयाचे ग्रंथालय सुसज्ज असून ग्रंथ व जर्नल्स मुबलक प्रमाणात आहेत.

### १९) आयुर्वेद मेडीकल कॉलेज पेठवडगाव, कोल्हापूर

हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ सावर्डे या संस्थेमार्फत या आयुर्वेद मेडीकल कॉलेजची स्थापना २७ नोव्हेंबर १९८९ ला झाली आहे. हे आयुर्वेद महाविद्यालय पूर्वी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या विद्यापीठाशी संलग्नीत होते पण शासनाच्या नवीन धोरणानुसार १९९८ साली महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक येथे स्थापन झाल्यानंतर हे महाविद्यालय यांच्याशी संलग्न झाले. सदर विद्यापीठ हे फक्त आरोग्य विज्ञानाशी संबधित विषयाच्या शिक्षणावर लक्ष केंद्रीत करते.

सदर वैद्यकिय महाविद्यालयात करणेची सोय आहे. हे महाविद्यालय B.A.M.S. विनाअनुदानित तत्वावर चालविले जाते. महाराष्ट्र शासन भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद यांची मान्यता असून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठे नाशिक यांच्याशी संलग्नीत आहे. सदर वैद्यकिय महाविद्यालयातून बी. ए. एम. एस. या अभ्यासक्रमाचे २०० विद्यार्थी शिक्षण होत आहेत. तर २० प्राध्यापक आणि ६० प्रशासकीय व रूग्णालय कर्मचारी आहेत.

### २०) गंगा एज्युकेशन सोसायटीचे आयुर्वेद कॉलेज कोल्हापूर

गंगा एज्युकेशन सोसायटीने सन १९८९ मध्ये ह्या आयुर्वेद महाविद्यालयाची रंकाळावेस, कोल्हापूर येथे स्थापना केली. या महाविद्यालयाची प्रशस्त अशी इमारत आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्रातील अतिशय चांगल्या दर्जाच्या असलेले एकमेव असे आहे. हे महाविद्यालय आधुनिक सोयी सविधांनी युक्त असे आहे. या महाविद्यालयातून बी. ए. एम. एस. या अभ्यासक्रमाची सोय आहे. विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता ६० इतकी आहे.

### २१) श्रीमती के. सी. अजमेरा आयुर्वेद महाविद्यालय, धुळे

धुळे चॅरीटेबल सोसायटीने सन १९८९ मध्ये या महाविद्यालयाची विनाअनुदानित तत्वावर स्थापना केली. या महाविद्यालयामध्ये प्रत्येक कोर्ससाठी आधुनिक सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

### २२) दादासाहेब सुरूपसिंग नाईक आयुर्वेद महाविद्यालय धुळे

दादासाहेब सुरूपसिंग नाईक या आयुर्वेद महाविद्यालयची स्थापना सन १९८९ मध्ये धुळे या जिल्ह्यात झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

या विद्यापीठांशी संलग्न आहे. या महाविद्यालयातून पदवीपर्यंतचे (B.A.M.S.) शिक्षण दिले जाते.

### २३) चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय, भुसावळ, जळगाव

जळगावमध्ये स्वातंत्र्यानंतर स्थापन झालेले हे आयुर्वेद महाविद्यालय आहे. सन १९८९ मध्ये या महाविद्यालयाची स्थापना भुसावळ (जळगाव) येथे करण्यात आली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामध्ये नोंद असून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयातून B.A.M.S. या अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते. या अभ्यासक्रमासाठी १०+२ बारावी सायन्स पात्रता ठेवली आहे.

### २४) आर. ए. पोदार आयुर्वेद मेडीकल कॉलेज, मुंबई

या महाविद्यालयाची स्थापना सन १९४१ मध्ये वरळी, मुंबई येथे झाली आहे. हे आयुर्वेद महाविद्यालय शहराच्या मध्यभागी असून आयुर्वेदाची देवता धन्वंतरी हिचे अत्यंत सुंदर मंदिर ही आहे. ग्रंथालयासाठी स्वतंत्र अशी प्रशस्त इमारत आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठांशी संलग्न आहे. हे शासकीय आयुर्वेद महाविद्यालय आहे.

### २५) श्रीमती के. जी. मित्तल पुनर्वसू आयुर्वेद महाविद्यालय, मुंबई

श्रीमती के. जी. मित्तल पुनर्वसु आयुर्वेद महाविद्यालय हे मुंबई येथे सन १९५४ मध्ये स्थापन झाले आहे. हे महाविद्यालय अनुदानीत तत्वावर चालविले जाते आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयातून पदवीपर्यंतचे (B.A.M.S.) शिक्षण दिले जाते. त्याचबरोबर पदव्युत्तर M.D. या अभ्यासक्रमाचीही सोय आहे.

### २६) येरळा मेडीकल ट्रस्ट आणि आयुर्वेद कॉलेज मुंबई

या महाविद्यालयाची स्थापना मुंबई येथे सन १९९१ मध्ये झाली आहे. हे आयुर्वेद महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयातून B.A.M.S. / M.D. पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. आणि हे महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर चालते.

### २७) आर. जे. व्ही. एस. भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी

या आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना सन १९८४ मध्ये सुतीकागृह कॅम्पस खासकीलवाडा, सावंतवाडी येथे सिंधुदुर्ग या जिल्ह्यात झालेली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. हे आयुर्वेद

महाविद्यालय अनुदानीत तत्वावर चालविले जाते. हे महाविद्यालय आधुनिक सोयी सुविधांनी परीपूर्ण असे आहे. The Institute has well maintained library with wide range of books collection and journals. या आयुर्वेद महाविद्यालयातून B.A.M.S. पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते.

**२८) नालासोपारा आयुर्वेद कॉलेज, ठाणे**

या आयर्वेद महाविद्यालयाची स्थापना सन १९९२ मध्ये वसई, तालुक्यामध्ये, ठाणे जिल्ह्यात झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. हे महाविद्यालय विनाअनुदानीत खाजगी तत्वावर चालविले जाते आहे. या महाविद्यालयातून B.A.M.S. या पदवीपर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे.

**२९) शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर**

या शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना सन १९६५ मध्ये नागपूर येथे करण्यात आली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयातून UG व PG, B.A.M.S. / M.D. या अभ्यासक्रमाची सोय आहे. १०+२ बारावी सायन्स ग्रुप प्रवेश पात्रता ठेवली आहे. तसेच हे महाविद्यालय आधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण असून सुसज्ज असे ग्रंथालय आहे.

**३०) श्री. आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर**

या आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना धन्वंतरी मार्ग, हनुमान नगर नागपूर येथे सन १९५६ मध्ये झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान, विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. तसेच हे महाविद्यालय अनुदानित तत्वावर चालू आहे. या महाविद्यालयातून UG व PG या दोन्ही अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते. यासाठी १०+२ सायन्स ग्रुप पात्रता ठेवली आहे. तसेच आधुनिक सोयी सुविधांनी परीपूर्ण असे हे आयुर्वेद महाविद्यालय असून सुसज्ज असे ग्रंथालय आहे.

**३१) श्री. राधाकृष्ण तोष्णीवाल आयुर्वेद महाविद्यालय अकोला**

या महाविद्यालयीच स्थापना अकोला येथे सन १९५५ मध्ये करण्यात आलेली आहे. स्वातंत्र्यानंतर स्थापन झालेले हे आयुर्वेद महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाकडून UG व PG तसेच डिप्लोमा Ph. D. आणि पर्यंतचे शिक्षण दिले जाते हे अनुदानित महाविद्यालय आहे. तसेच सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसन (CCIM) नवी दिल्ली यांच्याकडून

मान्यताप्राप्त असून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. हे महाविद्यालय आधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण असून सुसज्ज असे ग्रंथालय आहे.

### ३२) विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती

या आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना सन १९३१ मध्ये अमरावती येथे झाली आहे. हे महाविद्यालय अनुदानित तत्वावर चालविले जाते. तसेच हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयातून UG व PG या दोन्ही अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते. यासाठी १०+२ सायन्स ग्रुप पात्रता आहे. या महाविद्यालयाचे ग्रंथालय सुसज्ज असून आधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण आहे. हे आयुर्वेद महाविद्यालय स्वातंत्र्यापूर्वी स्थापन झालेले आहे.

### ३३) श्री. गुरूदेव आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती

या आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना अमरावती येथे सन १९५९ मध्ये झालेली आहे. हे महाविद्यालय अनुदानित महाविद्यालय असून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे.

### ३४) दयाभाई मावजी माजीविया (DMM) आयुर्वेद महाविद्यालय यवतमाळ

या आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना सन १९६१ मध्ये झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठांशी संलग्न आहे. तसेच हे आयुर्वेद महाविद्यालय अनुदानित तत्वावर चालविले जात असून सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन नवी दिल्ली यांचेकडून मान्यताप्राप्त आहे. या महाविद्यालयातून UG व PG या दोन्ही अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते.

### ३५) ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय, पतुर अकोला

या महाविद्यालयाची स्थापना अकोला येथे सन १९८९ मध्ये झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. तसेच हे विनाअनुदानित तत्वावर चालविले जाणारे महाविद्यालय आहे. या महाविद्यालयातून UG (B.A.M.S.) पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते.

### ३६) लेफ्ट. सुनिल रामसिंगजी चुनावाले आयुर्वेद महाविद्यालय, चिखली, बुलढाणा

या आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापना सन २००० मध्ये बुलढाणा येथे करण्यात आली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न

आहे. हे महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर चालविले जाते. या महाविद्यालयातून UG (B.A.M.S.) पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते.

### ३७) श्री. सप्तश्रृंगी आयुर्वेद कॉलेज नाशिक

या महाविद्यालयाची स्थापना नाशिक येथे सन १९९९ मध्ये झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. तसेच हे महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर चालू आहे. या महाविद्यालयातून UG (B.A.M.S.) पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते.

### ३८) कॅप्टन केदारी रेडेकर आयुर्वेद कॉलेज गडहिंग्लज, कोल्हापूर

या महाविद्यालयाची स्थापना सन १९९९ मध्ये झालेली आहे. हे महाविद्यालय टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठाशी संलग्न असून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठामध्ये नोंदणीकृत आहे. हे महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर चालविले जाते. हे महाविद्यालय आधुनिक सोयी सुविधांनी युक्त असे आहे. या महाविद्यालयातून UG (B.A.M.S.) या पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते.

### ३९) पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन आयुर्वेद कॉलेज अहमदनगर

या महाविद्यालयाची स्थापना सन १९९९ मध्ये अहमदनगर येथे झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. तसेच सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन (CCIM) या नवी दिल्ली या संस्थेकडून मान्यताप्राप्त आहे. या महाविद्यालयातून UG (B.A.M.S.) पर्यंतचे शिक्षण दिले जाते हे महाविद्यालय विना अनुदानित तत्वावर चालविले जाते.

### ४०) पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आयुर्वेद ॲन्ड रिसर्च सेंटर पिंपरी, पुणे

या महाविद्यालयाची स्थापना सन १९९९ मध्ये पिंपरी, पुणे येथे झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयातून UG व PG या दोन्ही अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते. (B.A.M.S. / M.D.) हे तसेच हे महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर चालविले जाते.

### ४१) शासकिय आयुर्वेद कॉलेज वझीराबाद, नांदेड

या महाविद्यालयाची स्थापना वझीराबाद, नांदेड येथे सन १९५६ मध्ये झाली आहे. हे महाविद्यालय शासकीय आहे. तसेच हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,

नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. हे नांदेड शहराच्या मध्यभागी आहे. या महाविद्यालयातून UG व PG (B.A.M.S. / M.D.) या दोन्ही अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते. तसेच हे महाविद्यालय आधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण असून सुसज्ज असे ग्रंथालय आहे.

**४२) ज्युपीटर आयुर्वेद कॉलेज आणि तारीणी आयुर्वेद हॉस्पीटल सावरकर नगर, नागपूर**

या महाविद्यालयाची स्थापना सन २००१ मध्ये नागपूर येथे झालेली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व विद्यापीठाशी संलग्न आहे. हे महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर चालविले जाते. या महाविद्यालयातून B.A.M.S. या पदवीपर्यंत शिक्षण दिले जाते. यासाठी 10+02 बारावी सायन्स ग्रुप पात्रता आहे. तसेच हे महाविद्यालय आधुनिक सोयी सुविधांनी युक्त असे आहे. सुसज्ज असे ग्रंथालय आहे.

**४३) आण्णासाहेब डांगे आयुर्वेद मेडीकल कॉलेज आष्टा, सांगली**

या महाविद्यालयाची स्थापना सन १९९९ मध्ये आष्टा सांगली येथे झालेली आहे. हे महाविद्यालय विनाअनुदानित तत्ववर चालविले जात असून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयातून UG व PG या दोन्ही अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते. (B.A.M.S. / M.D.) तसेच हे संशोधन केंद्रही आहे. येथे UG व PG च्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कक्षाची सोय आहे. ग्रंथालय आधुनिक सोयी सुविधांनी युक्त असे आहे.

**४४) मांजरा आयुर्वेद कॉलेज आणि रूग्णालय लातूर**

या महाविद्यालयाची स्थापना सन २००० मध्ये गांधी मैदान, लातूर येथे झाली आहे. या महाविद्यालयाची प्रशस्त अशी इमारत आहे. ही इमारत सेट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन नवी दिल्ली यांच्या नियमानुसार आहे. मांजरा चॅरीटेबल ट्रस्टमार्फत हे महाविद्यालय चालविले जाते. या ट्रस्टचे संस्थापक माजी मुख्यमंत्री मा. विलासरावजी देशमुख हे आहेत. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयाचे ग्रंथालय आधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण असून ६२३५ पुस्तके आहेत. या ग्रंथालयातून १७ नॅशनल जर्नल्स आणि संशोधन पत्रिका विद्यार्थ्यांना पुरविल्या जातात. विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचन कक्षाची सोय आहे.

## ४५) धन्वंतरी आयुर्वेद कॉलेज उदगीर, लातूर

या महाविद्यालयाची स्थापना सन २०००-०१ मध्ये लातूर येथे झालेली आहे. हे महाविद्यालय सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन () नवी दिल्ली यांचेकडून मान्यताप्राप्त आहे. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाशी संलग्न असे आहे. विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचन कक्षाची सोय आहे. तसेच १८,४६७ इतक्या पुस्तकांनी युक्त असे आहे. ग्रंथालयात संशोधनात्मक नियतकालीके घेतली जातात.

## ४६) अश्विन ग्रामीण आयुर्वेद कॉलेज, संगमनेर अहमदनगर

या महाविद्यालयाची स्थापना आरवी बु।।, ता. संगमनेर, अहमदनगर येथे सन २००० मध्ये झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे तसेच हे महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर चालविले जात असून आधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण आहे. या महाविद्यालयाचे सुसज्ज असे ग्रंथालय असून ग्रंथसंग्रह व जर्नल्स आवश्यक उपलब्ध आहेत.

## ४७) लोकनेते राजारामबापू पाटील आयुर्वेदीक मेडीकल कॉलेज आणि रूग्णालय, इस्लामपूर, सांगली

या महाविद्यालयाची स्थापना सन २००१ मध्ये सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथे तालुक्यांच्या ठिकाणी झाली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. हे महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर चालविले जात असून आधुनिक सोयी सुविधांनी युक्त आहे. या महाविद्यालयांचे ग्रंथालय सुसज्ज आहे. हे महाविद्यालय सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन नवी दिल्ली या संस्थेकडून मान्यताप्राप्त आहे. ग्रंथालयात ७००० हजार पुस्तके असून विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनकक्षाची सोय आहे. विद्यार्थ्यांसाठी बुक-बँक योजना चालू आहे.

## ४८) रामराव पाटील आयुर्वेद महाविद्यालय आणि रूग्णालय पुरणा, परभणी

या महाविद्यालयाची स्थापना सन २००० मध्ये पुरणा तालुक्यात, परभणी जिल्ह्यात केली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर चालविले जाते. या महाविद्यालयातून UG (B.A.M.S.) पदवीपर्यंतचे शिक्षण मिळते. तसेच या महाविद्यालयाचे ग्रंथालय सुसज्ज आहे.

### ४९) रूरल इन्स्टीट्युट ऑफ आयुर्वेद ॲन्ड रिसर्च सेंटर, मायणी सातारा

या महाविद्यालयाची स्थापना सन २००४-०५ मध्ये मायणी येथे सातारा जिल्ह्यात झाली आहे. या महाविद्यालयाची स्थापना श्री. छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटीने केली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आयुर्वेद शिक्षणाची सोय झाली आहे. येथे UG (B.A.M.S.) पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते.

### ५०) डॉ. जे. जे. मगदूम आयुर्वेद मेडीकल कॉलेज जयसिंगपूर, कोल्हापूर

डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्टने या आयुर्वेद महाविद्यालयाची स्थापन सन २००१-०२ मध्ये केली आहे. हे महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. हे महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर सुरू आहे. या महाविद्यालयातून UG (B.A.M.S.) पदवीपर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक सोयी सुविधा सर्वांगीण विकासासाठी पुरविल्या जातात.

### ५१) महिला उत्कर्ष प्रतिष्ठानचे आयुर्वेद कॉलेज ॲन्ड हॉस्पीटल, ॲन्ड रिसर्च सेंटर, देगाव वासीम

या महाविद्यालयाची स्थापना महिला उत्कर्ष प्रतिष्ठानने सन २००७-०८ मध्ये देगाव, वासीम येथे झाली आहे. हे महाविद्यालय ग्रामीण भागात आहे. हे महाविद्यालय सेंट्रल कौन्सील ऑफ इंडीयन मेडीसीन नवी दिल्ली यांचेकडून मान्यताप्राप्त असून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाशी संलग्न आहे. या महाविद्यालयातून UG (B.A.M.S.) पदवीपर्यंतचे शिक्षण मिळते.

# संदर्भसूची


१) **अहिर, हिरा**. उदयोनमुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक नागपूर – प्रकाशन १९९५ पृ.९.

२) **बापट, भा. गो**. शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शिक्षण विकास, व्हीनस प्रकाशन पुणे – ४११००२.

३) **कोलारकर, राजेश शिवाजीराव**. आयुर्वेद इतिहास, प्रथमावृत्ती, ५ सप्टेंबर २००८, जान्हवी प्रकाशन, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर – ४१६११४.

४) **जाधव, तुकाराम**. महाराष्ट्र वार्षिकी २०१२ द युनिक ॲकॅडमी, पुणे.

५) **जोशी, लक्ष्मणशास्त्री**. मराठी विश्वकोश खंड २, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई १९७६ पा.नं. १४८.

६) **जोशी, भिमसेन रंगाचार्य**. सामाजिक शास्त्रामधील संज्ञासिध्दातांचा स्पष्टीकरणात्मक कोश 'शिक्षणशास्त्र' प्रथमावृत्ती जानेवारी २००७, डायमंड पब्लीकेशन्स, सदाशिव पेठ, पुणे-३०.

७) **जोशी, तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री**. मराठी विश्वकोश खंड २ महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई १९७६ पा. १५०.

८) **दास्ताने, संतोष**. भारत एक पाहणी १९९८ दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे -३०.

९) **देशपांडे, राजेंद्र**. शरीरक्रिया विज्ञान भाग-१ पुणे. आनंद प्रकाशन १९९२ पृ. ९.

१०) **पहाडे, दिनकर मुकुंद**. व्यावहारीक आयुर्वेदाचा इतिहास, मांडगाव (वर्धा) व्यावहारीक प्रकाशन १९९३ पृ. २६३.

११) **मानकर, सुधाकर**. उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढ, अतुल पब्लीकेशन्स, कोल्हापूर – ०८.

१२) **रानडे, सुभाष. परांजपे, गो. रा**. आयुर्वेदाचा इतिहास, सप्टेंबर २००७ अनमोल प्रकाशन, ६८३, बुधवार पेठ, पुणे – ४११००२.

१३) **रानडे, सुभाष**. आयुर्वेदाचा इतिहास व परीचय पुणे - अनमोल प्रकाशन १९८१ पृ.७.

१४) **रानडे, सुभाष / परांजपे, गो. रा**. आयुर्वेदाचा इतिहास अनमोल प्रकाशन पुणे १९८५ पृ. क्रं.१.

१५) संपादक. 'आयुर्वेद' भारतीय संस्कृतीचा कोश भाग १ पृ. ४६१.

१६) संपादक, महाराष्ट्र २००३.

१७) संपादक, लोकराज्य नोव्हेबंर २०१२.

१८) वार्षीक अहवाल अष्ठांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणे.

१९) वार्षीक अहवाल टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे.

२०) **वडोदकर, सी. वी**. आयुर्वेदाचा इतिहास पुणे – कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे १९८० पृ. २२५.

२१) **शर्मा, प्रियवत**. आयुर्वेद का वैज्ञानिक इतिहास चोखम्या ओरीयन्टालिया, वाराणसी १९९६.

२२) C.C.I.M. Rules 1996 ISM H.

२३) **Dahunukar, Thatte Urmila, turreda**, popular prakashan, Bombay Rer. Sdi 2000 p 33-34.

२४) Department of Ayurveda, Yoga & Naturopathy, Unani, Siddha & Homeepthy, Ministry of Health family welfare (Govt. of India)

२५) http://ccimindia.om/introduction.ccim.html

२६) http://www.ccimindia.org/collegs.status.ayurveda.2009-10

२७) http://indianmedicine.nic.in lcentral_sch.asp

२८) http://www.ayurbalance.com/explore_ayurveda.html

२९) http://www.holisticonline.com/ayurveda/ayu_introduction.html

३०) Indian system of Medicine and Homeopattiy in India 2001.

३१) National Health profile (NHP) of India, Govt. of India, Central Bureau of Health Intellignce, 2007. http://cbhidghs.nic.infindes2. aspslid=987 sublinkid=698.

३२) World Health Organization, "Legal status of traditional medicine and complementary alternative medicines – A Worldwide Review" 2001.

३३) www.scbwitxbiotech.tradeindia.com

## प्रकरण ४ थे

# ग्रंथालय संकल्पना प्रकार व कार्ये

## ४.१ प्रस्तावना

आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालये हा शैक्षणिक ग्रंथालयाचा एक प्रकार आहे. महाविद्यालयातील इतर विभागाप्रमाणेच ग्रंथालय विभागही महत्वाचा असतो. या विभागाला त्या महाविद्यालयाचा 'आत्मा' असे संबोधले जाते. ग्रंथालयाविना महाविद्यालय अशी संकल्पनाच केली जावू शकत नाही. यासाठी प्रत्येक आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालय असते. त्यामध्ये विविध विषयांवरील पुस्तकांबरोबरच विविध प्रकारचे कोश, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, नियतकालीकांचे जुने अंक, खंड वृत्तपत्रामधील आयुर्वेद विषयासबंधीची कात्रणे तसेच विविध लेख इ. चा ग्रंथालयात संग्रह करून ठेवलेला असतो. या प्रकरणातून आयुर्वेद ग्रंथालये व त्यांची कार्ये तसेच त्यांची गरज याविषयीची माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे. जे ग्रंथालय कोणत्या ना कोणत्या शैक्षणिक संस्थेशी संबधित असते त्याला शैक्षणिक ग्रंथालय म्हणतात. **(सुतार, २०११)**

## ४.२ ग्रंथालय संकल्पना

ग्रंथालयाला इंग्रजीत LIBRARY असे म्हणतात. मराठीत ग्रंथालय शब्दाची फोड ग्रंथ + आलय अशी होते. त्याचाच अर्थ ग्रंथाचे घर असा होतो. ज्या ठिकाणी वाचकांसाठी ग्रंथ व इतर वाचन साहित्य एकत्रित करून ठेवले जाते. वाचकांना कमीत कमी वेळेत ग्रंथालयीन सेवा देण्यासाठी येथील स्वतंत्र यंत्रणा कार्यरत असते अशा ठिकाणास ग्रंथालय असे म्हणतात.

वाचकांना, उपभोक्त्यांना हवी असणारी माहिती, ग्रंथ अथवा ग्रंथेत्तर साहित्य कमीत कमी वेळात उपलब्ध करून देणाऱ्या यंत्रणेला व ठिकाणाला ग्रंथालय असे म्हणतात. ग्रंथालयात वाचक, वाचन साहित्य व ग्रंथालय सेवक हे तीन घटक अतिशय महत्वाचे आहेत.

"ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था आहे. ग्रंथालय ही सामाजिक संस्कृतीचा वारसा जपणारी केंद्रे आहेत." **(कोण्णूर, २००८)**

पूर्वी ग्रंथालयात ग्रंथ जतन करून ठेवले जात त्याही अगोदर ते साखदंडाने टेबलापाशी अथवा कपाटात जखडलेले असते. कारण ग्रंथनिर्मितीला ग्रंथाच्या प्रती तयार करण्यास वेळ लागत होता. प्राचीन ग्रंथालयात तर इष्टीका ग्रंथ, चर्मग्रंथ पपायरसाच्या गुंडाळ्या असत. कालांतराने त्यात बदल झाले. हस्तलिखित व मुद्रीत साहित्याची त्यात भर पडली.

आधुनिक ग्रंथालयात तर ग्रंथाबरोबरच नियकालिक, वृत्तपत्रे, दृकश्राव्य साधने, ध्वनीफिती, सुक्ष्मपट, सुक्ष्मपत्र, छायाचित्रे, वृत्तपत्र कात्रणे अशा मुद्रीत व अमुद्रीत साहित्याचा संग्रह केलेला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात संगणक, सी. डी. रोम अशा किती तांत्रीक गोष्टीही आलेल्या आहे. (**कोण्णूर, २००८**)

पूर्वी ग्रंथपालाची भूमिका संरक्षकाची होती कारण ज्ञान हे लोकांसाठी असते. अशा भावना त्या काळात नव्हती. त्यावेळी ग्रंथालये, राजे, राजवाडे, देवालये, मठ या ठिकाणीच होती. आधुनिक काळात ग्रंथालयासाठी इमारत, ग्रंथसंग्रह, ग्रंथालयीन प्रशासन, सेवक, ग्रंथालयीन साधन सामग्री, आंतर ग्रंथालयीन साधन सामग्री सहकार्य या गोष्टी ही ग्रंथालयांच्या सबंधात विचारात घेणे महत्वाचे ठरले आहे.

‘‘समाजामध्ये ज्ञानाचा प्रसार होणे, संशोधकांच्या, वाचकांच्या गरजा तत्परतेने पूर्ण करणे, त्यांना मार्गदर्शन करणे, त्याचे मनोरंजन करणे व सुबुध्द नागरीक घडविणे या सर्व गोष्टीसाठी ग्रंथालयांचा जास्तीत जास्त उपयोग होण्याकडे कल ठेवून त्याप्रमाणे उपक्रम भरवणे अशा तऱ्हेने ग्रंथालयाच्या कार्याची व्याप्ती वाढली आहे. (**कोण्णूर, २००८**)

ग्रंथालयामार्फत शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, सांस्कृतिक या गोष्टी पार पाडणे आवश्यक ठरते म्हणून ग्रंथालय व समाजाचा सर्वांगीण विकास या गोष्टी परस्परावलंबी आहेत.

## ४.३ ग्रंथालयाचे प्रकार




आकृती क्रमांक ४.१ ग्रंथालयाचे प्रकार

सार्वजनिक ग्रंथालये, शैक्षणिक ग्रंथालये, राष्ट्रीय ग्रंथालये आणि विशेष ग्रंथालये असे ग्रंथालयाचे प्रमुख प्रकार आहेत. वाचकांच्या प्रकारावरून हे प्रकार पडले आहेत. गावातील, शहरातील सर्वांसाठी सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत असतात. ही ग्रंथालये गावची, शहराची ज्ञान मंदिरे आहेत. ती सांस्कृतिक केंद्रे म्हणूनही भूमिका पार पाडताना दिसतात. (**सुतार, २०११**)

### ४.३.१ सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रकार




आकृती क्र. ४.२ सार्वजनिक ग्रंथालयांचे प्रकार

सार्वजनिक ग्रंथालयांना लोकशिक्षणाची लोकविद्यापीठही म्हंटले आहे. महाराष्ट्र ग्रंथालय संचालनालयाने सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रामुख्याने अ, ब, क, ड वर्ग सार्वजनिक ग्रंथालये असे वर्गीकरण केलेले आहे. तसेच शासनामार्फत चालवली जाणारी काही विभागीय सार्वजनिक ग्रंथालये आहेत. युनेस्कोच्या मदतीने सार्वजनिक ग्रंथालयांचा आदर्श नमुना म्हणून दिल्ली येथील सार्वजनिक ग्रंथालय कार्यरत आहे.

कोलकाता येथील राजाराम मोहनरॉय ग्रंथालय फाऊंडेश (RRRLF) सार्वजनिक ग्रंथालयासाठी मदत करते.

युनेस्कोने सार्वजनिक ग्रंथालयाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

१) सार्वजनिक ग्रंथालयावरील मोठा हिस्सा सार्वजनिक निधितून जमा होत असतो.

२) सार्वजनिक ग्रंथालय मुक्तद्वार असते सर्व जाती धर्माच्या वाचकांना कोणताही भेदभाव न करता मोफत ग्रंथालयीन सेवा दिली जाते.

३) ग्रंथालयाचे स्वरूप एखाद्या स्वयंसेवी शैक्षणिक संस्थेसारखे असते. तेथे निरंतर शिक्षण देण्याची कामगिरी सातत्याने होत असते.

४) वाचकांना विविध विषयावरील जास्तीत जास्त माहिती कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय निरपेक्षपणे उपलब्ध करून दिली जाते. त्यासाठी शैक्षणिक व माहिती प्रदान करणारी साधने एकत्रित केलेली असतात. विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम येथे हाती घेतले जातात. (**सुतार, २०११**)

### ४.३.२ शैक्षणिक ग्रंथालये

जे ग्रंथालय कोणत्या ना कोणत्या शैक्षणिक संस्थेशी संबंधित असते त्याला शैक्षणिक ग्रंथालय म्हणतात. शैक्षणिक ग्रंथालयात शालेय, महाविद्यालयीन, विद्यापीठीय ग्रंथालयांचा समावेश होतो.

**शैक्षणिक ग्रंथालये**

- शालेय ग्रंथालये, प्राथमिक, उच्च माध्यमिक, शाळांची ग्रंथालये
- महाविद्यालयीन ग्रंथालये, तंत्रनिकेतन, पदवी महाविद्यालय पदव्युत्तर केंद्रे, व्यावसायिक संस्थातील ग्रंथालये
- विद्यापीठ ग्रंथालये पारंपारिक विद्यापीठे, विज्ञान तंत्रशिक्षण संस्था, भारतीय तंत्र विज्ञान संस्था, कृषी विद्यापीठ, व्यवस्थापन शाळा संस्था, निरंतर व दूरशिक्षण संस्थाची ग्रंथालये

आकृती क्रं. ४.३ शैक्षणिक ग्रंथालयाचे प्रकार

शैक्षणिक ग्रंथालये ही अध्ययन, अध्यापन, संशोधन आणि त्या-त्या शैक्षणिक संस्थाच्या ध्येय धोरणानुसार चालविलेल्या तत्सम इतर कार्याना सहाय्य करीत असतात. ही ग्रंथालये शिक्षण व्यवस्थेत विविध स्तरांवर महत्वाची भूमिका पार पाडीत असतात.

भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी महाविद्यालयीन विद्यापीठ ग्रंथालयाविषयी मार्गदर्शन केले आहे. जे ग्रंथालय कोणत्या ना कोणत्या शैक्षणिक संस्थेशी संबंधित असते त्याला शैक्षणिक ग्रंथालय म्हणतात. शैक्षणिक ग्रंथालयात शालेय, महाविद्यालयीन, विद्यापीठीय ग्रंथालयांचा समावेश होतो. (**सुतार २०११**)

**शालेय ग्रंथालये**

पहिली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यासाठी आणि त्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी ही ग्रंथालये कार्यरत असतात. विशेषतः ५ वी ते १२ वी पर्यंतच्या शाळांमध्ये ही ग्रंथालये प्रामुख्याने आढळतात. महाराष्ट्रात ५०० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असणाऱ्या शाळामध्ये अशा ग्रंथालयासाठी अर्धवेळ ग्रंथपाल, १००० पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पूर्णवेळ ग्रंथपाल शालेय ग्रंथालयासाठी कार्यरत असतो.

या ग्रंथालयात प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक अशी विभागणी असते. शालेय ग्रंथालयात विशेषतः प्राथमिक शाळेतील बालवाचक हे ५ ते १० वयोगटातील असतात. या

बालवाचकांच्या बालमनावर पुस्तकांच्या व इत सदृश्य माध्यमांतून चांगले शैक्षणिक सुसंस्कार केले जातात. लहान वयातच वाचनाविषयीची आवड व कुतुहल निर्माण करण्यासाठी शालेय ग्रंथालयात, किशोर गोष्टी, चांदोबा, रामायण, महाभारत, स्वातंत्र्यवीर थोर नेते, त्यांची महान चरीत्रे, चित्रपट, कॅसेटस, तक्ते, नकाशे, छायाचित्रे अशी विविध शैक्षणिक साधने ग्रंथालयात उपलब्ध असतात.

माध्यमिक शालेय ग्रंथालयात ९ व १० आणि ११ ते १२ या वयोगटातील विद्यार्थी असतात. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा कालखंड अतिशय 'सेनटेरिट' असतो. नेमक्या याच वेळी त्यांची योग्य जडण घडण ग्रंथालयाच्या माध्यमातून केली जाते. त्यासाठी शिक्षण मंडळाने शिफारस केलेली क्रमिक व संदर्भ पुस्तके, विद्यार्थ्यांसाठी माध्यमीक ग्रंथालयात असतो अत्यंत गरजेचे असते.

माध्यमिक शाळेच्या ग्रंथालयाचा ग्रंथपाल हा योग्य गुणवत्तेचा असावा लागतो त्याला आधुनिक साधनांची म्हणजे संगणक, प्रोजेक्टर, स्लाईडस इ. विषयी माहिती असते.

**महाविद्यालयीन ग्रंथालये**

हा शैक्षणिक ग्रंथालयाचा एक प्रकार आहे. या प्रकारच्या ग्रंथालयातील वाचक हा तरूण वर्ग असतो. त्यांच्यासाठी संदर्भग्रंथ, नियतकालिके, क्रमिक पुस्तके, संगणक, दृकश्राव्य साधणे, इ. गोष्टीचा संग्रह असतो. महाविद्यालयात प्रवेश घेणारे विद्यार्थी हे तरूण गटातील असतात. त्यांची बौध्दीक कुवत वाढलेली असते. त्यामुळे त्यांच्यावर वैयक्तीक लक्ष देणे हे प्रत्येक प्राध्यापकाचे व ग्रंथपालाचे काम असते.

उच्च शिक्षणासाठी तयार केलेल्या शैक्षणिक आकृतीबंधामध्ये विविध शैक्षणिक आयोग समित्यांनी ही ग्रंथालये अत्यावश्यक मानली आहेत. ज्ञान व माहिती या क्षेत्रांत विद्यार्थ्यांना स्वावलंबी होण्यास मदत करणे, विद्यार्थी व अध्यापक यांची शैक्षणिक प्रगती करण्यास प्रोत्साहन देणे, पाठ्यपुस्ताबरोबरच अमर्यादीत माहिती विश्वाची जाणीव करून देणे, अध्ययन, अध्यापन प्रक्रियेमध्ये निरंतर सेवा पुरविणे इ. उद्दिष्टे विचारात घेऊन महाविद्यालयीन ग्रंथालये कार्य करीत असतात.

या उद्दिष्टांच्या पूर्तीकरता विविध स्वरूपातील वाचन साहित्याचा संग्रह विकसीत करणे, उपयुक्त सेवा पुरविणे, विस्तार सेवांव्दारे वाचनाची आवड वृध्दींगत करणे, ग्रंथालय सहकार, वाचन साहित्याचा सामुहिक उपयोग, बुक बँक व इतर कार्ये या ग्रंथालयांना पार पाडावी लागतात.

महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधकांना, तसेच सेवकांना ही ग्रंथालये सेवा देतात. ह्या ग्रंथालयांचे ग्रंथपाल हे उच्चशिक्षित असतात. महाविद्यालयीन ग्रंथालये ही एक आधारशिला व शक्तीकेंद्रच असतात.

**विद्यापीठांची ग्रंथालये**

विद्यीपीठीय ग्रंथालय हे महाविद्यालयांच्या ग्रंथालयापेक्षा भिन्न स्वरूपाचे असते. विद्यापीठाचा क्षेत्रात 'व्यासंग' या शब्दाला अतिशय महत्व आहे. कारण या न्यासंगातूनच उत्तम दर्जाची गुणवत्ता, ज्ञान व सुसंस्कार निर्माण होत असतात. विद्यापीठामध्ये असणाऱ्या विविध विद्याशाखांमधील विद्यार्थी, शिक्षक व संशोधक यांच्या शिक्षणाविषयक गरजांची पुर्तता करू शकणाऱ्या ग्रंथसंग्रहाची निर्मिती करणे, तसेच संशोधन विकास कार्यासाठी विविध ग्रंथालयीन व माहिती विषयक गरजा पुरविणे हे विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रमुख कार्य आहे.

विद्यापीठ ग्रंथालयात ग्रंथसंग्रह हा अद्ययावत, प्रचलीत माहिती पुरविण्यास समृध्द असावा. या अनुषंगाने संदर्भ साधने, जर्नल्स, मॅगेझिन्स, संशोधन अहवाल, शोध प्रबंध, परीषदांचे कार्यवृत्तांत, अहवालाची शासकीय प्रकाराने इत्यादी वाचनसाहित्याबरोबरच दृकश्राव्य माध्यमे, ध्वनी चित्रफिती, व्हिडीओ, सी. डीज, इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन सेवाव्दारे वाचकांना विद्यापीठ ग्रंथालयांनी माहिती सेवा व उत्पादनांची उपलब्धता करून देवून उच्च शिक्षणाचा विकास साधला आहे.

ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण देण्यासाठीही विद्यापीठ ग्रंथालय महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. विद्यापीठ ग्रंथालय उच्च दर्जाची शैक्षणिक भूमिका पार पाडीत असते.

विद्यापीठाचा ग्रंथपाल हा विद्यापीठाच्या कुलगुरूंना जबाबदार असतो. हा उच्च शिक्षा विभूषित व इतर कर्मचारी सुध्दा योग्य गुणवत्ता धारक असतात. अलीकडे UGC चा देशातील सर्व विद्यापीठांची ग्रंथालये एकत्र जोडून माहितीचे जाळे म्हणजे इन्फर्मेशन ॲन्ड लायब्ररी नेटवर्क निर्माण करण्याचा प्रयत्न चालू आहे. **(सुतार, २०११)**

**राष्ट्रीय ग्रंथालये**

हेरॉलडस लायब्रेरियन्स ग्लासही अँड रेकरन्स बुकच्या सहाव्या आवृत्तीत (१९८७) राष्ट्रीय ग्रंथालयाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे.

१) शासकीय अर्थ सहाय्यावर चालविले जाणारे ग्रंथालय.

२) साधारण त्याची सेवा साऱ्या देशाला उपलब्ध असते असे ग्रंथालय.

३) बहुदा या ग्रंथालयातील पुस्तकांचा उपयोग फक्त संदर्भासाठीच केला जातो.

४) राष्ट्रीय ग्रंथालये ही कॉपीराईट ग्रंथालये असतात.

५) या ग्रंथालयाचे प्रधान कार्य म्हणजे देशांतर्गत प्रकाशित होणारी पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे व इतर प्रकाशने यांचा संग्रह करणे व भावी काळासाठी भावी पिढ्यांच्या माहितीसाठी ज्ञानाचा ठेवा या स्वरूपात त्यांचे जतन करणे.

६) राष्ट्रीय ग्रंथालये परदेशात प्रकाशित झालेली पुस्तकेही खरेदी करू शकतात व त्याव्दारे आपला ग्रंथसंग्रह करू शकतात.

युनेस्कोने ही वरीलप्रमाणेच आशय असणारी अशी व्याख्या राष्ट्रीय ग्रंथालयाबाबत केली आहे. भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय कोलकत्ता येथे आहे. एखाद्या देशात वेगवेगळ्या प्रकारची एकाहून अधिक राष्ट्रीय ग्रंथालये असू शकतात.

राष्ट्रीय ग्रंथालय हे त्या देशाचे मानाचे स्थान मानले जाते. राष्ट्रीय ग्रंथालयांकडे त्या-त्या देशांनी विशेष लक्ष दिल्यामुळे प्रत्येक देशाची राष्ट्रीय ग्रंथालये सुसज्ज व समृध्द झालेली आहेत.

**सारणी क्र. ४.१.**
**राष्ट्रीय ग्रंथालयांचे प्रकार**

| अ.नं. | प्रकार | कार्य | उदाहरणे |
|---|---|---|---|
| १ | सर्व समावशेक | विविध स्वरूपाची विविधांगी कार्ये | भारतीय राष्ट्रीय ग्रंथालय कोलकत्ता, कॅनडाचे राष्ट्रीय ग्रंथालय. |
| २ | विषयानुसार | कृषी, वैद्यक, विज्ञान, वैज्ञानिक / तंत्रवैज्ञानिक | राष्ट्रीय कृषी ग्रं. अमेरिका राष्ट्रीय ग्रं. भारत दिल्ली. रा. विज्ञान ग्रं. दिल्ली. भारत रा. वैज्ञा. व तंत्र वैज्ञा. ग्रं. रशिया. |
| ३ | विशिष्ट गटाची मिळणाऱ्या लाभानुसार | आमदार, खासदार संघासाठी (लोकप्रतिनिधी) | अंधासाठी राष्ट्रीय ग्रंथालय अमेरिका, राष्ट्रीय डाएट ग्रंथालय, जपान. |
| ४ | औद्योगिक क्षेत्र | -- | स्कॉटलंडने राखीव ग्रंथालये |
| ५ | कार्य | देवघेव | ब्रिटिश डॉक्युमेंट सप्लाय सेंटर |

**विशेष ग्रंथालये**

एकोणिसाव्या शतकातील शेवटच्या काही वर्षात औद्योगीकीकरण मोठ्या प्रमाणात सुरू झाले तेव्हा विशेष ग्रंथालये अस्तित्वात येऊ लागली. ही औद्योगिक क्रांतीची परिस्थीती होती. त्यावेळच्या औद्यौगिक व व्यावसायीक संस्थांची ग्रंथालये ही आजच्या विशेष ग्रंथालयाची सुरूवात होती.

पार्लमेंट, सरकारी विभाग, वैज्ञानिक व संशोधन विभाग, शैक्षणिक संस्था, व्यावसायिक व औद्योगिक संघ, संग्रहालये अशा संस्था - संघटनांची ग्रंथालये ही विशेष ग्रंथालये असतात. ती त्या-त्या-त्या संस्थाच्या गरजांशी निगडीत अशी माहितीसेवा देतात.

विशेष ग्रंथालयांची जास्तीत-जास्त गरज भासण्यास कारणीभूत असणारे काही बदल खालीलप्रमाणे आहेत. गेल्या काही वर्षात शास्त्रीय व इतर संशोधनाच्या वेगाने विकास होऊ लागला आणि माहिती 'संप्रेषणाच्या' (Communication) साधनांमध्ये बदल झाले. दररोज होत असलेले संशोधन व नवीन शोध, यामुळे लिखित ज्ञानात व माहितीत भर पडली.

अशी मोठ्या प्रमाणातील माहिती जमवून एकत्रित करणे व तिचा परीणामकारक उपयोग घडवून आणणे, यासाठी स्वतंत्र योजनांची आवश्यकता भासू लागली. प्रत्येक विषय व त्यांचे सुक्ष्मविषय यावरील माहितीची व्यवस्था करण्यासाठी स्वतंत्र व विशेष केंद्राची गरज निर्माण झाली.

माहितीचा संग्रह करून, ती योग्यवेळी प्रतीप्राप्त करून देण्यासाठी त्या केंद्राना, मोठ्या ग्रंथालयावर अवलंबून रहावे लागून लागले. म्हणून विसाव्या शतकाच्या आरंभी विशेष ग्रंथालये अस्तीत्वात आली आहेत ती शास्त्रीय व तंत्रज्ञान विषयक संशोधन आणि औद्योगिक विकास यांच्याशी प्रत्यक्ष सबंधित असतात. त्यांची वैशिष्ट्ये व कार्ये स्पष्ट करण्याऱ्या अनेक व्याख्या काही तज्ञांनी व संघटकांनी केलेल्या आहेत.

सामान्यपणे विशेष ग्रंथालयाबाबत पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले जाते. विशिष्ठ अशा एकूण विषयाशी किंवा विषयांच्या गटाशी सबंधित, एवढ्याच व्याप्तीची ग्रंथालये, म्हणजे विशेष ग्रंथालये असतात. या ग्रंथालयांमधील माहितीच्या संग्रहात, विशिष्ठ क्षेत्रावरील माहितीचाच समावेश असतो. तिची व्यवस्था करणारे कर्मचारी हे 'विशेष प्रशिक्षीत' असतात. तिचा उपयोगही मर्यादीत व विशिष्ठ गरजूंकडून होतो.

'बार्बरा कॉयल यांच्यामते, इतर ग्रंथालये व विशेष ग्रंथालये यांच्यात वाचनसाहित्याच्या स्वरूपातील फरक असतो. इतर ग्रंथालयात ग्रंथ, पुस्तीका व नकाशे असे वाचन साहित्य असते. विशेष ग्रंथालयात माहितीचे विशेष घटक महत्वाचे असतात. **(Kyle, १९७६)**

कामत यांनी म्हंटले आहे कि, 'हे उपयोजकांसाठी विशेष संग्रह करणारे व त्यांच्या गरजा भागविणारे ग्रंथालय असते. येथील उपयोजक मुख्यतः मातृसंस्थेशी सबंधित असतात व त्यांना माहिती, प्रलेखन व इतर ग्रंथालयीन सेवा या तज्ज्ञ व प्रशिक्षित सेवकांकडून दिल्या जातात. **(कामत, १९८५)**

श्री. डब्ल्यु ॲरावर्थ W. Ashworth यांच्या मतानुसार आर्थिक सहाय्य करणाऱ्या मातृसंस्थेच्या खाजगी फायद्यांसाठी विशिष्ठ स्वरूपातील माहिती मिळवून तिचे जतन व योग्य उपयोग करून देणारे ग्रंथालय हे विशेष ग्रंथालय असते. माहिती सेवांच्या बदलत्या प्रवाहानुसार नव्या-नव्या संकल्पनांची भर घालून त्याच्या तयार होतात. प्रथम विशिष्ठ विषयावर लिहिलेल्या साहित्यांशी संबंधित ग्रंथालय म्हणजे विशेष ग्रंथालय असे म्हंटले जाई. त्यानंतर मर्यादीत उपयोजकांच्या उपयोगासाठी विशिष्ठ ज्ञानशाखेवरील माहिती जमवून तिचे व्यवस्थापन तज्ज्ञ कर्मचाऱ्यांकडून ज्या ग्रंथालयात केले जाते ते विशेष ग्रंथालय होय. **(Ashworth, 1979)**

विशेष ग्रंथालयाबाबत युनेस्कोने (UNESCO) ने पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे. संसद वैज्ञानिक संशोधन संस्था, शासकीय विभाग, शैक्षणिक संस्था, व्यावसायीक व औद्योगिक संघटना आणि संग्रहालये, तेथील माहितीच्या उपभोक्त्यांना म्हणजे शास्त्रज्ञ व संशोधक तसेच तज्ज्ञांना सेवा देणारे हे ग्रंथालय असते. ते इतर कोणत्याही प्रकारात बसत नाही असे हे विशेष ग्रंथालय असते. हे मातृसंस्थेच्या सभासदांचे खाजगी ग्रंथालय असते. **(UNESCO, 1974)**

प्रा. आयझॅक यांनी अनेक वैशिष्ट्यांचा समावेश असणारी एक व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. विशिष्ठ गटाचे घटक असणाऱ्या गरजूंना त्यांच्या समान अभ्यास विषयासाठी स्थलासाठी किंवा मानसिक व शारिरीक विकृतींच्या उपायांसाठी, विशेष माहिती सेवा ज्या ग्रंथालयातून दिली जाते ते विशेष ग्रंथालय होय.

अशा या अनेक व्याख्यावरून विशेष ग्रंथालयाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

- विशेष ग्रंथालयामध्ये विशेष स्वरूपातील वाचनसाहित्याचा संग्रह केला जातो.

- वाचन साहित्याचा विशेष संग्रह हा केंद्रबिंदू मानून संगटन केले जाते.
- विशेष अभ्यासकानाच सेवा दिली जाते.
- विशिष्ठ स्वरूपाचीच सेवा दिली जाते.
- विशेष ग्रंथालयातील व्यवस्थापन हे अपारंपारिक (NON Traditional) स्वरूपाचे असते.
- मातृसंस्थेचा उपविभाग असे याचे स्थान असते.

म्हणजे प्रशिक्षण संस्था, औद्यौगिक संस्था, संशोधन व विकास संस्था, रूग्णालये, वृत्तपत्रे, शैक्षणिक व व्यावसायीक मंडळ, अंध व अपंग यांच्या संस्था तुरूंग आणि शासकीय विभाग यांची ग्रंथालये ही विशेष ग्रंथालये असतात.

## ४.४ आयुर्वेद ग्रंथालय संकल्पना

आयुर्वेद ग्रंथालये हा शैक्षणीक ग्रंथालयांचा एक प्रकार आहे. प्रत्येक आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये ही ग्रंथालये वाचकांना माहिती देण्याचे कार्य करतात. ग्रंथालयांचा जास्तीत जास्त वापर हा विद्यार्थी वाचक, अध्यापक व संशोधकाकडून होतो. विद्यार्थ्यांना वाचकांना हवी असणारी माहिती त्यांच्या अभ्यासक्रमाला आधारभूत ठरणारी माहिती या ग्रंथालयातून हवी असते. या सेवा सुविधा देण्यासाठी मुद्रीत व अमुद्रीत वाचनसाहित्य, संदर्भग्रंथही येथे संग्रहीत केले जातात. तसेच अभ्यासक्रमावर आधारीत कात्रणसेवा, विविध विषयावरचे लेख, छायाचित्रे व इतर आवश्यक माहिती कमीत-कमी वेळेत उपलब्ध करून द्यावे लागते. शीघ्र किंवा दुत संदर्भसेवा ही मुख्य व महत्वाची सेवा अशा ग्रंथालयामधून सेवकामार्फत व संगणकामार्फत पुरविण्याचे कार्य केले जाते.

अशा वाचकांना आवश्यक सेवा देण्यासाठी संदर्भग्रंथ आवश्यक ठरतात, पण ग्रंथपाल फक्त त्यांच्यावरच अवलंबून राहत नाही. कारण ग्रंथालयातील वाचकांना त्यांना हवी असणारी नेमकी माहिती द्यावी लागते आणि त्यासाठी तज्ञ प्राध्यापक, विभागप्रमुख, संशोधक व वाचकांचा, विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार विविध प्रकारच्या वाचनसाहित्याचा तसेच माहिती साधनांचा संग्रह करावा लागतो. याशिवाय प्रचलीत माहितीसाठी आयुर्वेद विषयाशी सबंधित नियतकालिके, लेख, वृत्तपत्रातील कात्रणे, इ. चे जतन करावे लागते.

तसेच ग्रंथालयात नियतकालीकांचे जुने अंक बायडींग करून ठेवणे अत्यंत फायदेशीर ठरते. त्यातील महत्वाच्या लेखांचे सारलेखन व निर्देशन करून ठेवल्यास त्यांचा वाचकांना निश्चितपणे उपयोग होतो.

## ४.५ आयुर्वेद ग्रंथालयांची गरज

ग्रंथालय ही सेवाभावी संस्था आहे. या संस्थेव्दारे वाचकांना उत्तम दर्जेदार सेवा पुरविणे व सुविधा उपलब्ध करून देणे हे ग्रंथालयाचे एकमेव ध्येय असते. आधुनिक काळात संशोधनाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे वाचकांची माहितीविषयक गरज व मागणी वाढत आहे. ही गरज व मागणी पूर्ण करण्यासाठी अद्ययावत माहिती वाचकांपर्यंत पोहोचविण्याची ग्रंथालयांची गरज आहे.

वैद्यकिय महाविद्यालय हे समाजाला सोवा देणारी महत्वाची संस्था आहे. मानवाचे दैनंदिन जीवन यांत्रीक  धक्काधकीचे झालेले आहे. त्यासाठी वैद्यकांना अद्ययावत ज्ञान असणे जरूरीचे आहे. ही कामे वैद्यकिय क्षेत्रातील माहिती देणारी ग्रंथ, संदर्भग्रंथ, नियतकालीके करीत असतात. या सर्व ज्ञान साहित्याचा संग्रह करणे, त्याचे जतन करणे व योग्य वेळी उपलब्ध करून देणे आवश्यक असते. ह्या सर्व महत्वाच्या कामाची भूमिका बजावणेसाठी आयुर्वेद वैद्यकिय ग्रंथालयांची अत्यंत गरज आहे.

महाविद्यालयीन ग्रंथालये ही उच्च शिक्षण प्रक्रियेमध्ये अध्ययन, अध्यापन व माहिती संप्रेषण केंद्रे आहेत. त्यांचे कामकाज प्रभावी व तत्पर होण्यामागे प्रामुख्याने ग्रंथालयांचा व त्यातील विविध विभागांचा मोलाचा वाटा आहे. त्यादृष्टीने या ग्रंथालयातील विविध विभाग व त्यांची विविध प्रकारची कामे यांचे शास्त्रीय नियोजन होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील आयुर्वेद वैद्यकिय महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील विविध विभाग अधिक कार्यक्षण व कार्यतत्पर होण्याच्या अनुषंगाने व्यावसायीक दृष्टीकोनातून आवश्यक ते मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. आयुर्वेद महाविद्यालयांची ग्रंथालये संदर्भ सेवेची महत्वाची भूमिका बजावत असतात. ग्रंथालयाच्या उपभोक्त्यांना हवी ती माहिती अचूक व कमी वेळेत पुरविण्यासाठीच या ग्रंथालयांच्या निर्मितीचे प्रमुख कार्य आहे.

## ४.६ आयुर्वेद ग्रंथालयांची कार्ये

3) http://www.lianza.org.nz/library/files/stores_olo/minimum_stds_n z helth_libraries Retrieved on 02/02/2011.

4) http://www.reference_education.info_asurvey_college_libraries. Retrived on 25/12/2011.

5) Ibid P. 181.

6) **Indian Medical Council**. (1984) minimum standards requirement for a Medical College for 100 admissions annually New Delhi : P. 24.

7) **Kent, Alien. Lancour Harold. and Daily Joy**. (1976) Encyclopedia of Library and Information Science V. 17. Newyork : Marcel Dikker inc P. 344-45.

8) **Kumar, P. S. G**. (2001) Indian Excyclopedia of Library and Information Science, Vol. I. New Delhi : S. Chand and Company P. 140.

9) **Leake, C. D**. (12th Sept. 1995) Journal of Medical Educatin 30 (04) P. 489.

10) **Lamiranade, Arthur G.** (1970) Websters unified Dictionary and Encyclopedia. New York : websters unified pub. P. 1588.

11) **Mathews, D**. (1979) The Medical Librarian and his world. In medical Librarianship Ed. By D. A. Mathews and fiana M. Pickan London : Clive Bingley P. 9.

12) Op. Cit. Indian Medical Council 24.

13) Op. Cit. Government of India P. 8.

14) **Pande, Ravindra** (2006) U.G.C. NET / SLET Libray and Informain Science New Delhi : Ramesh Publishing House P. 61.

## प्रकरण ६ वे

# माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण

## ६.१ प्रस्तावना

'महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास' या संशोधन कार्यासाठी माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावलीचा उपयोग / वापर करण्यात आला आहे. यासाठी वेगवेगळ्या तीन प्रकारच्या प्रश्नावली तयार करण्यात आल्या. सदर महाविद्यालयांच्या ग्रंथालयांतील ग्रंथपालांना प्रश्नावली देवून ग्रंथालयाबद्दलची सर्व माहिती संकलीत केली आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थी व प्राध्यापकांनाही प्रश्नावली देवून ग्रंथालयाबद्दलचे मत तसेच सोयी सुविधा याबद्दलची माहिती संकलित केली आहे.

माहिती संकलनासाठी महाराष्ट्रातील ६३ आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयापैकी ५१ आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथपाल, प्राध्यापक, विद्यार्थी यांचेकडून माहिती मिळाली आहे. या ग्रंथालयातून पोस्टाने प्रश्नावलीव्दारे प्रत्यक्ष भेटी देवून तसेच दूरध्वनीव्दारे मुलाखत घेवून माहिती संकलीत केली आहे. यासर्वांकडून व्यवस्थीत माहिती प्रश्नावलीच्या माध्यमातून भरून मिळाली. काही ग्रंथपालांनी प्रश्नावली भरून पोस्टाने पाठवून दिली. संशोधन विषयाचे महत्व, आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयाचे महत्व, ग्रंथपालांची ग्रंथालयाविषयीची भूमिका, त्यांचे स्थान, ग्रंथालयांमध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर व त्यामुळे ग्रंथालयीन सेवावरती होणारे परिणाम याविषयी चर्चा होवून आपली मते मांडली.

माहितीचे विश्लेषण केल्याशिवाय वस्तूस्थितीचा बोध होत नाही. संकलित केलेली माहिती ही विस्कळीत स्वरूपात असते. त्यासाठी माहितीचे विश्लेषण केले जाते. माहितीचे विश्लेषण संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही प्रकारे केले आहे. प्रस्तुत संशोधनात प्रश्नावलीव्दारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे. तसेच संख्यात्मक व गुणात्मक दोन्ही पध्दतींचा वापर केला आहे. ग्रंथालयीन सेवा संदर्भात गुणात्मक विश्लेषण पद्धतीचा वापर केला आहे. तर ग्रंथाच्या वाढीच्या संदर्भात संख्यात्मक विश्लेषण पध्दतीचा वापर केला आहे.

माहितीचे विश्लेषण केल्यानंतर ती माहिती आकर्षक रीतीन सादर करावी लागते. माहितीचे सादरीकरण केल्याने ती माहिती चटकन समजते व लक्षात राहते. त्यामुळे

सादरीकरण जेवढे चांगल्या प्रकारे केले जाते तेवढी ती माहिती वाचकांच्या लक्षात येते व निष्कर्ष काढता येतात.

प्रस्तुत संशोधनात माहितीचे सादरीकरण हे टेबल पायचार्ट, बारचार्ट याव्दारे केले आहे. व त्यानुसार निष्कर्ष व शिफारशी काढल्या आहेत.

१) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

२) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयातील समस्यांचा शोध घेणे.

३) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो का याचा शोध घेणे.

४) ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह, वाचक आणि सेवा यांचा अभ्यास करणे.

प्रस्तुत उद्दिष्टे अभ्यासण्यासाठी, संशोधकाने प्रश्नावली, मुलाखत तसेच इंटरनेटचा वापर केला आहे.

संशोधकाने संकलित केलेल्या माहितीचे सादरीकरण करण्यासाठी व वस्तुस्थिती सुस्पष्ठ करण्यासाठी संख्याशास्त्रीय पध्दतीचा व तंत्राचा आधार घेवून तक्ते, आकृत्या व आलेख इत्यादींचा अवलंब करून संख्यात्मक व गुणात्मक दर्जा राखण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत शोध प्रबंधातील माहितीचे सादरीकरण व विश्लेषण पुढीलप्रमाणे करीत आहे.

## ६.२ माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण

कोणत्याही संशोधनामध्ये माहिती संकलनानंतर तथ्य विश्लेषण ही महत्वाची प्रक्रिया आहे. Analysis या शब्दाचा मराठी अर्थ 'विश्लेषण' हा आहे. या प्रक्रियेमध्ये संकलित तथ्यांचे वर्गीकरण, माहितीच्या गुणवैशिष्ट्यानुसार केले जाते. संशोधनामध्ये तथ्यांचे परिक्षण करून त्याची क्रमबध्द, शास्त्रोक्त मांडणी केली जाते. त्यामुळे विश्लेषणानंतर निष्कर्ष काढणे सोपे जाते.

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रश्नावली, मुलाखती व निरिक्षण या माहिती संकलन साधनाव्दारे व तंत्राव्दारे माहिती संकलीत केली आहे. संशोधनासाठी संकलीत केलेली माहिती अपरीपक्व किंवा कच्च्या स्वरूपात असते. त्या माहितीला विश्लेषणक्षम बनविण्याची प्रक्रिया म्हणजेच तथ्यांचे प्रक्रियन होय. माहितीचे योग्य विश्लेषण आणि सादरीकरण करावे

लागते. संशोधनाच्या एकुण प्रक्रियेमध्ये तथ्यांचे विश्लेषण व सादरीकरण या दोन कार्यांना अतिशय महत्वाचे स्थान आहे.

माहितीचे विश्लेषण संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही प्रकारे केले जाते. माहिती संकलन करण्याच्या अनेक साधनाव्दारे विविध स्वरूपातील विविध प्रकारची माहिती संकलीत होते. या माहिती संकलनाने संशोधन विषयाचे स्वरूप स्पष्ट होत नाही तर त्यासाठी संकलीत केलेल्या माहितीवर लक्ष केंद्रीत करून, त्या माहीतीमध्ये एक प्रकारची सुव्यवस्था आणून त्यातील संघटन, परस्पर संबंध व व्यवस्थीकरण केल्याशिवाय संकलीत केलेल्या माहितीचा अर्थबोध होत नाही. म्हणून माहितीची उपलब्धता म्हणजे शास्त्रीय संशोधनाचा शेवट नसतो. म्हणून संकलीत केलेल्या माहितीचे शिस्तबध्द व्यवस्थापन केले पाहिजे. या प्रक्रियेलाच माहितीचे / तथ्यांचे विश्लेषण असे म्हणतात.

### ६.२.१ तथ्य विश्लेषण व निर्वचनाचा अर्थ

संशोधनात ''आशय विश्लेषण आणि निर्वचन'' या दोन प्रक्रिया आवश्यक आणि महत्वाच्या व अटळ आहेत. वुल्फ (Wolfe) यांच्या मते, ''निसर्गातील घटनांमध्ये जरी गुंतागुंत असली व सकृत दर्शनी त्यांची स्थिती गोंधळून टाकणारी असली तरी, त्यामध्ये व्यवस्थीतपणा अगर अनुक्रम आणणे हे केवळ विश्लेषणाच्या व संयोगाच्या प्रक्रियेने शक्य होते. सर्व वैज्ञानिक पध्दतीचा हाच पाया आहे.

विविध तंत्राचा वापर करून मिळविलेल्या माहितीला शास्त्रीय रूप देण्यासाठी विश्लेषण हाती घ्यावे लागते. पण तथ्यांचे विश्लेषण करताना ते काल्पनिक, व्यक्ती सापेक्ष किंवा मर्यादीच स्वरूपाचे असू नये, तर ते व्यक्ती निरपेक्ष, तार्कीक व काही मुलभूत तत्वावर, गुणावर अवलंबून असावयास हवे. थोडक्यात तथ्याच्या संमिश्र घटनेचे स्पष्टीकरण करताना अत्यंत तार्कीक पध्दतीने त्यामध्ये समाविष्ट असलेले निरनिराळे घटक वेगळे करून सांगणे म्हणजे 'तथ्यांचे विश्लेषण' करणे होय.

## ६.३ आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयाबाबत माहिती संकलन

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठांकडे महाराष्ट्रातील ६३ आयुर्वेद महाविद्यालयांची नोंद आहे. त्यापैकी ५१ आयुर्वेद महाविद्यालयांनी प्रतिसाद दिला. त्यांची प्रश्नावलीव्दारे मुलाखतीव्दारे व दुरध्वनी मोबाईल इ. साधनांच्याव्दारे माहिती संकलीत

केली आहे. यापैकी प्रत्येक आयुर्वेद महाविद्यालयाचे स्वतःचे ग्रंथालय आहे. याची माहिती पुढील सारणीत दिली आहे.

### ६.३.१ ग्रंथपाल प्रश्नावली माहिती संकलन आणि विश्लेषण

**प्रास्ताविक**

संशोधन विषयासंबंधित माहितीचे संकलन करण्यासाठी संशोधन कार्यासाठी निवडलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथपालांना प्रश्नावली देण्यात आली होती. त्यांनी प्रश्नावली योग्य वेळेत भरून देवून सहकार्य केले. त्यानुसार दिलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे. ६३ आयुर्वेद महाविद्यालयापैकी ५१ आयुर्वेद महाविद्यालयांनी प्रश्नावलीला प्रतिसाद दिलेला आहे. तर उर्वरीत १२ आयुर्वेद महाविद्यालयांनी प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे हे माहिती संकलन आणि विश्लेषण प्रतिसाद दिलेल्या ५१ आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचे आहे. या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची माहिती पुढील सारणीत दिली आहे.

**सारणी क्र. ६.१**

**ग्रंथालयांचा प्रतिसाद**

| अ.क्र. | ग्रंथपाल प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५१ | ८०.९५ % |
| २ | नाही | १२ | १९.०४ % |

**विश्लेषण**

महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास या संशोधन विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथपालाकडून ८०.९५ % इतका प्रतिसाद मिळाला आहे.

**आलेख क्र. ६.१**

**ग्रंथालयांचा प्रतिसाद**




**अर्थनिर्वचन :-**

वरील सारणी व आलेख यावरून असे दिसून येते की, आयुर्वेद महाविद्यालयाच्या ६३ ग्रंथालयांपैकी ५१ (८०.९५ %) ग्रंथालयांनी प्रतिसाद दिलेला आहे.

**६.३.२ ग्रंथपालांविषयी सर्वसाधारण माहिती**

**विश्लेषण**

ग्रंथपाल हा ग्रंथालयांचा मुळ आधारस्तंभ असल्यामुळे ग्रंथपालांचे ग्रंथालय शास्त्रातील प्रशिक्षण ही महत्वाची बाब आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील आयुर्वेद ग्रंथालयांतील प्रशिक्षित ग्रंथपालांची संख्या त्यांची शैक्षणिक पात्रता समजावून घेण्यासाठी संकलीत केलेल्या माहितीचे सादरीकरण सारणी क्र. ६.२ मध्ये करण्यात आलेले आहे. प्रस्तुत माहिती आलेख क्र. २ मध्ये आलेखस्वरूपात देण्यात आली आहे.

## सारणी क्र. ६.२

## आयुर्वेद ग्रंथालयांमधील प्रशिक्षित ग्रंथपालांची संख्या

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | ग्रंथपालाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रमाणपात्र प्राप्त ग्रंथपाल | १ | १.९६ |
| २ | पदवी प्राप्त ग्रंथपाल | ८ | १५.६८ |
| ३ | पदव्यत्तर पदवी प्राप्त | ३७ | ७२.५४ |
| ४ | एम. फिल. पदवी प्राप्त | ३ | ५.८८ |
| ५ | पीएच. डी. पदवी प्राप्त | १ | १.९६ |
| ६ | नेट / सेट प्राप्त | १ | १.९६ |
| | **एकूण** | **५१** | **१००** |

**अर्थनिर्वचन**

सारणी क्र. ६.२ मध्ये दर्शविलेल्या संख्यात्मक माहितीवरून असे स्पष्ट होते की, एकूण ५१ आयुर्वेद ग्रंथालयांपैकी ५१ ग्रंथालयामध्ये ग्रंथपाल सद्यस्थितीत काम करीत आहेत. यापैकी १ (१.९६) प्रमाणपत्र प्राप्त ग्रंथपाल,८ (१५.६८) पदवी प्राप्त ग्रंथपाल,३७ (७२.५४) पदव्यत्तर पदवी प्राप्त ग्रंथपाल तसेच ३ (५.८८) आहेत. एम. फिल पदवी प्राप्त ग्रंथपाल व १ (१.९६) पीएच. डी. पदवी प्राप्त ग्रंथपाल आहेत. तसेच सेट - नेट पात्र ग्रंथपाल १ (१.९६) काम करीत आहेत. यावरून असे दिसून येते कि पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेल्या ग्रंथपालांची संख्या सर्वात जास्त आहे.

## आलेख क्र. ६.२

## प्रशिक्षित ग्रंथपाल



### ६.३.३) ग्रंथपालांचे कार्य समाधान

**विश्लेषण**

आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथपालांचे / कर्मचाऱ्याचे कार्य समाधान जाणून घेणे महत्वाचे आहे. त्याची माहिती सारणी क्र. ६.३ मध्ये दिलेली आहे. याबाबत सेवातंर्गत प्रशिक्षणाची संधी मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या ४३ (८४.३१ %) कर्मचाऱ्यांना योग्य वेतन मिळते. त्याचप्रमाणे ५० (९०.०३ %) कर्मचारी वर्ग कार्यसमाधानी आहे. प्रस्तुत माहिती आलेख स्वरूपात आलेख क्र. ३ मध्ये देण्यात आली आहे.

**सारणी क्र. ६.३**

**ग्रंथपालांचे कार्यसमाधान**

| अ.क्र. | कार्यसमाधान घटक | होय मते | नाही मते | होय कार्यसमाधानाचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | सेवांतर्गत प्रशिक्षणाची संधी मिळते का ? | ४३ | ०८ | ८४.३१ |
| २ | योग्य वेतन मिळते काय ? | ४९ | ०२ | ९६.०७ |
| ३ | कर्मचारी वर्ग समाधानी आहे का ? | ५० | ०१ | ९८.०३ |

**आलेख क्र. ६.३**

**ग्रंथपालांचे कार्यसमाधान**



**अर्थनिर्वचन :-**

ग्रंथालयातील ८४.३१ % कर्मचाऱ्यांना सेवातंर्गत प्रशिक्षणाची संधी मिळते. तर १५.६८% ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना सेवातंर्गत प्रशिक्षणाची संधी मिळत नाही. ९६.०७ % ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना योग्य वेतन मिळते. त्यामुळे ९८.०३ % कर्मचारी वर्ग आपल्या कार्याबाबत समाधानी आहे. ५.६८ ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना सेवातंर्गत प्रशिक्षणाची सधी तेथील व्यवस्थापनाकडून दिली जात नाही. ३.९२ % ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना योग्य ते वेतन दिले जात नाही. त्यामुळे त्यांना कार्यसमाधान मिळत नाही.

## ६.४ आयुर्वेद महाविद्यालयांची स्थापना वर्षे

संशोधकास आपल्या संशोधन कार्यासाठी महाविद्यालयांची नावे व स्थापना, कारकिर्द किती वर्षाची आहे हे पाहण्यासाठी याबाबतची संख्यात्मक माहिती सारणी क्र. ६.४ मध्ये दिलेली आहे.

**सारणी क्र. ६.४**

**ग्रंथालयांची स्थापना वर्षे**

| अ.क्र. | स्थापना वर्षे | ग्रंथालय संख्या | प्रतीशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १९१०-१९२५ | ०२ | ३.९२ |
| २ | १९२५-१९४० | ०३ | ५.८८ |
| ३ | १९४१-१९५५ | ०६ | ११.७६ |
| ४ | १९५६-१९७० | ०४ | ७.८४ |
| ५ | १९७१-१९८५ | १५ | २९.४१ |
| ६ | १९८६-२००० | १६ | ३१.३७ |
| ७ | २००१-२०१५ | ०५ | ९.८८ |

**आलेख क्रमांक ६.४**

**ग्रंथालयांची स्थापना वर्षे**




**विश्लेषण :-**

वरील सारणी व आलेख यावरून असे दिसून येते कि संशोधन कार्यासाठी अभ्यासण्यात आलेल्या ग्रंथालयांमध्ये १९१० ते १९२५ या वर्षामध्ये (३.९२ %) ग्रंथालये, १९२५ ते १९४० या वर्षामध्ये (५.८८ %), १९४१ ते १९५५ वर्षामध्ये (११.७६ %) ग्रंथालये, तसेच १९५६ ते १९७० या वर्षामध्ये (७.८४ %) ग्रंथालये, १९७१ ते १९८५ मध्ये (२९.४१ %) ग्रंथालयांची स्थापना झालेली आहे. १९८६ ते २००० या वर्षामध्ये (३१.३७ %) ग्रंथालयाची तर २००१ ते २०१५ या वर्षामध्ये (९.८८) ग्रंथालयाची स्थापना झालेली आहे.

**अर्थनिर्वचन :-**

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की, १९८६ ते २००० या वर्षामध्ये सर्वात जास्त ग्रंथालयांची (३१.३७ %) स्थापना झालेली आहे. त्या खालोखाल १९७१ ते १९८५ (२९.४१ %) या वर्षामध्ये झालेली आहे. तसेच सर्वात कमी ग्रंथालयांची स्थापना ही १९१० ते १९२५ या वर्षामध्ये झालेली दिसून येते.

## ६.५ आयुर्वेद महाविद्यालयांची ग्रंथालये

**विश्लेषण**

महाराष्ट्रात शासकिय महाविद्यालये, शासन अनुदानित महाविद्यालये व विनाअनुदानित महाविद्यालये अशा तीन प्रकारच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांच्याशी संलग्नीत असणारी ५८ आयुर्वेद महाविद्यालये, अभिमत विश्वविद्यालयाच्या

५ घटक शाखा अशी एकूण ६३ महाविद्यालये अस्तित्वात आहेत. या महाविद्यालयांच्या ग्रंथालयाच्या माध्यमातून आयुर्वेद शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यात येत आहे. त्यामुळे या महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा अभ्यास करणे आवश्यक  आहे. या संदर्भातील माहिती. सांख्यिकिय माहितीचे वर्गीकरण सारणी क्र. ६.५ मध्ये केले आहे. प्रस्तुत माहिती आलेख स्वरूपात आलेख क्र. ३ मध्ये देण्यात आलेली आहे.

**सारणी क्र. ६.५**

**आयुर्वेद महाविद्यालयांची ग्रंथालये**

| **अ.क्र.** | **तपशील** | **शहरी विभाग** | **ग्रामीण विभाग** | **एकूण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| १ | शासकिय महाविद्यालयांची ग्रंथालये | ४ | ० | ४ | ७.८४ |
| २ | शासन अनुदानित महाविद्यालयांची ग्रंथालये | १४ | २ | १६ | ३१.३७ |
| ३ | विनाअनुदानित महाविद्यालयांची ग्रंथालये | २२ | ९ | ३१ | ६०.७८ |
| | **एकूण** | **४०** | **११** | **५१** | **१००** |

प्रस्तुत माहिती महाराष्ट्रातील ६३ पैकी ५१ महाविद्यालयांच्या ग्रंथालयाकडून प्राप्त झाली आहे.

**अर्थनिर्वचन :-**

सारणी क्र. ६.५ मध्ये दर्शविलेल्या संख्यात्मक माहितीवरून असे स्पष्ट होते कि महाराष्ट्रातील ५१ आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांपैकी सर्वात जास्त ४० (७८.४३ %) ग्रंथालये ही शहरी भागातील आहेत तर सर्वात कमी ११ (२१.५६ %)  ग्रंथालये ग्रामीण भागातील आहेत.

### आलेख क्र. ६.५

### महाराष्ट्रातील ग्रंथालयाचे प्रमाण




वरील विश्लेषणावरून असे स्पष्ट होते कि, आयुर्वेद व पारंपारीक उपचार पध्दतीचा प्रसार, प्रचार आणि भविष्यासाठी जतन या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने स्वतःची ४ (७.८४ %) आयुर्वेद महाविद्यालये शहरी विभागात स्थापन करून तसेच शहरी भागातील १४ व ग्रामीण भागातील २ अशा १६ (३१.३७ %) महाविद्यालयांना अनुदान देऊन आयुर्वेद या उपचार पध्दतीला चालना दिलेली आहे.

शहरी विभागातील २२ व ग्रामीण विभागातील ०९ अशा एकूण ३१ (६०.७८ %) विना अनुदानित महाविद्यालयांनी शासनाकडून किंवा अन्य संस्थाकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत न घेता या पारंपारिक उपचार पध्दतीचे ज्ञान जतन करून आयुर्वेदाच्या विकासात मोलाचा वाटा उचलला आहे.

या ग्रंथालयातून खिस्तपूर्व ५ व्या शतकातील बुध्दकालीन आयुर्वेद या पारंपारीक उपचार पध्दतीच्या साहित्याचे जतन प्रचार आणि प्रसार करण्याचा महत्वपूर्ण कार्य करण्यात येत आहे.

**आलेख क्रमांक ६.६**

**आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची संख्या.**




**अर्थनिर्वचन**

शहरी भागातील ४० महाविद्यालयांच्या ग्रंथालयांपैकी ०४ (१० %) शासकिय महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत. १४ (३५ %) शासन अनुदानित महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत. तसेच २२ (५५ %) विनाअनुदानित महाविद्यलयांची ग्रंथालये आहेत. शहरी विभागातील आयुर्वेद ग्रंथालयांमध्ये सर्वात जास्त प्रमाणात विनाअनुदानित महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत. तर सर्वात कमी प्रमाणात शासकिय महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत.

**आलेख क्रं. ६.७**

**शहरी भागातील ग्रंथालयांचे प्रमाण**



**विश्लेषण**

ग्रामीण विभागातील ११ महाविद्यालयांच्या ग्रंथालयांपैकी शासन अनुदानित महाविद्यालयांची ग्रंथालये २ (१८.१८ %) व विनाअनुदानित महाविद्यालयांची ग्रंथालये ९ (८१.८१%) आहेत. ग्रामीण विभागात शासकिय महाविद्यालये अस्तित्वात नसून सर्वात जास्त प्रमाणात विना अनुदानित महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत.

**आलेख क्र. ६.८**

**ग्रामीण भागातील ग्रंथालयाचे प्रमाण**




**अर्थनिर्वचन**

ग्रामीण व शहरी विभागातील असे एकूण ५१ महाविद्यालयांची ग्रंथालये असून यापैकी शासकिय आयुर्वेद महाविद्यालये ४ (७.८४ %) शासन अनुदानित महाविद्यालये १६ (३१.३७ %) विनाअनुदानीत महाविद्यालयांची ग्रंथालये ३१ (६०.७८ %) आहेत. ग्रामीण व शहरी विभागात मिळून सर्वात कमी प्रमाणात शासकीय महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत. तर सर्वात जास्त प्रमाणात विना अनुदानीत महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत.

## ६.६ आयुर्वेद महाविद्यालयामध्ये चालविण्यात येणारे अभ्यासक्रम

### विश्लेषण

महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये आयुर्वेद विषयातील अनेक अभ्यासक्रम चालविण्यात येतात असे अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाविद्यालयांची शहरी विभागातील व ग्रामीण विभागातील संख्या व त्याचे प्रमाण याची माहिती समजावून घेण्यासाठी संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण सारणी क्र. ६.६ मध्ये दिले आहे. प्रस्तुत माहिती आलेख स्वरूपात आलेख क्र. ७ मध्ये देण्यात आली आहे.

**सारणी क्र. ६.६**

**आयुर्वेद महाविद्यालयामध्ये चालविण्यात येणारे अभ्यासक्रम**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | महाविद्यालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सर्टिफिकेट | ३ | ५.८८ |
| २ | डिप्लोमा | २ | ३.९२ |
| ३ | पदवी | ५१ | १०० |
| ४ | पदव्युत्तर | ३१ | ६०.७८ |
| ५ | एम. फिल. | ३ | ५.८८ |
| ६ | पीएच. डी. | ९ | १७.६४ |

**आलेख क्र. ६.९**

**आयुर्वेदातील विविध अभ्यासक्रमांची महाविद्यालये**



**अर्थनिर्वचन**

सारणी क्र. ६.६ मध्ये दर्शविलेल्या संख्यात्मक माहितीवरून असे स्पष्ट होते कि, ५१ (१००%) महाविद्यालयामध्ये, पदविका अभ्यासक्रम, ३१ महाविद्यालयामध्ये, पदव्युत्तर अभ्यासक्रम शहरी विभागातील ४० व ग्रामीण विभागातील ११ अशा ५१ महाविद्यालयामध्ये, एम.फिल. ३ महाविद्यालयामध्ये, पीएच. डी. ९ महाविद्यालयामध्ये राबविण्यात येत आहेत.

## ६.७ आयुर्वेद महाविद्यालयास आयुर्वेद कौन्सीलची मान्यता आहे काय ?

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.७ मध्ये आयुर्वेद महाविद्यालयांना आयुर्वेद कौन्सीलची मान्यता आहे की नाही याची माहिती दिलेली आहे. आलेख क्र. ८ मध्ये ही माहिती आलेख स्वरूपात दाखविली आहे.

**सारणी क्र. ६.७**

**आयुर्वेद कौन्सील मान्यता**

| अ.क्र. | आयुर्वेद कौन्सील मान्यता | ग्रंथालय संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ४३ | ८४.३१ |
| २ | नाही | ८ | १५.६८ |

ग्रंथपालांना प्रश्नावलीमध्ये आपल्या आयुर्वेद महाविद्यालयास आयुर्वेद कौन्सीलची मान्यता आहे का ? असा प्रश्न विचारला होता. त्यावरून मिळालेल्या माहितीनुसा ४३ (८१.३१ %) आयुर्वेद महाविद्यालयांना आयुर्वेद कौन्सीलची मान्यता मिळाली असल्याचे समनतेतर उर्वरीत आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथपालांनी मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविल्याचे सांगितले आहे.

**आलेख क्र. ६.१०**
**आयुर्वेद कौन्सीलची मान्यताप्राप्त ग्रंथालये**




**अर्थनिर्वचनः-**

सारणी क्र. ६.७ मध्ये आयुर्वेद महाविद्यालयांना आयुर्वेद कौन्सीलची मान्यता प्राप्त असलेल्या ग्रंथालयांची माहिती दिली आहे. यानुसार अभ्यासण्यात आलेल्या ५१ आयुर्वेद महाविद्यालयांपैकी ४३ आयुर्वेद महाविद्यालयांना (८४.३१ %) आयुर्वेद कौन्सीलची मान्यता आहे तर आठ आयुर्वेद महाविद्यालयांना (१५.६८ %) आयुर्वेद कौन्सीलची मान्यता घेतली नसल्याचे निदर्शनास येते. तरी उर्वरीत महाविद्यालयांनी आयुर्वेद महाविद्यालयांनी आयुर्वेद कौन्सीलची मान्यतेबाबत प्रस्ताव पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले. यावरून असे दिसून येते कि (८४.३१ %) आयुर्वेद महाविद्यालयांनी आयुर्वेद कौन्सीलची मान्यता घेतली आहे.

## ६.८ आयुर्वेद वैद्यकिय महाविद्यालयांचे प्रमाणीकरण / मुल्यांकन

### विश्लेषण

सारणी क्र. ६.८ मध्ये आयुर्वेद वैद्यकिय महाविद्यालयांचे प्रमाणीकरण / मुल्यांकना विषयीची माहिती देण्यात आली आहे. यामध्ये ३३ आयुर्वेद महाविद्यालयांचे प्रमाणीकरण / मुल्यांकन झाल्याचे दिसून येते. तर १८ आयुर्वेद महाविद्यालयांचे मुल्यांकन झालेले नाही. तरी उर्वरीत आयुर्वेद महाविद्यालयांनी मुल्यांकन करून घेण्याविषयी शिफारशीमध्ये नमूद करण्यात आले आहे. प्रस्तुत माहिती आलेख क्र. ९ मध्ये आलेख स्वरूपात देण्यात आली आहे.

**सारणी क्र. ६.८**

**प्रमाणीकरण झालेली महाविद्यालये**

| अ.क्र. | आयुर्वेद महाविद्यालय | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रमाणीकरण / मुल्यांकन झालेली | ३३ | ६४.७० |
| २ | प्रमाणीकरण / मुल्यांकन न झालेली | १८ | ३५.२९ |

**आलेख क्र. ६.११**

**आयुर्वेद वैद्यकिय महाविद्यालयांचे प्रमाणीकरण**




**अर्थनिर्वचन :-**

सारणी क्र. ६.८ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते कि, सदर संशोधन अभ्यासक्रमासाठी अभ्यासण्यात आलेल्या ५१ आयुर्वेद महाविद्यालयापैकी ३३ (६४.७० %) आयुर्वेद महाविद्यालयांचे प्रमाणीकरण / मुल्यांकन झाले आहे तर उर्वरीत १८ (८५.२९) आयुर्वेद महाविद्यालयांचे प्रमाणीकरण होण्याचे बाकी आहे. तरी त्या आयुर्वेद महाविद्यालयांनी प्रमाणीकरण / मुल्यांकन करून घ्यावे असे संशोधकाचे प्रामाणीक मत आहे.

## ६.९ आयुर्वेद महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी संख्या

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.९ मध्ये आयुर्वेद महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी संख्येविषयी माहिती दिली आहे. प्रस्तुत माहिती आलेख क्र. १० मध्ये आलेख स्वरूपात दिली आहे.

**सारणी क्र. ६.९**

**आयुर्वेद महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या.**

| अ.क्र. | विद्यार्थी संख्या (UG BAMS) | आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालये | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १-५० | १ | १.९६ |
| २ | ५१-१०० | १ | १.९६ |
| ३ | १०१-१५० | ३ | ५.८८ |
| ४ | १५१-२०० | ४ | ७.८४ |
| ५ | २०१-२५० | ९ | १७.६४ |
| ६ | २५१-३०० | ११ | २१.५६ |
| ७ | ३०१-३५० | १३ | २५.४९ |
| ८ | ३५१-४०० | ९ | १७.६४ |

**आलेख क्र. ६.१२**

**आयुर्वेद महाविद्यालयातील UG विद्यार्थी संख्या**



**अर्थनिर्वचन:-**

सारणी क्र. ६.९ मध्ये अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांतील UG विद्यार्थी संख्येविषयीची माहिती मिळते. या माहितीवरून असे निदर्शनास येते कि १.५० च्या पटीत UG विद्यार्थी संख्या असलेले केवळ ०१ (०१.९६ %) आयुर्वेद महाविद्यालय आहे तर ५१ ते १०० च्या पटीत असलेले एक महाविद्यालय आहे. तसेच अनुक्रमे १०१ ते १५० (५.८८ %) १५१ ते २०० च्या पटीत (७.८४ %) असलेले दिसून येते. ३०१ ते ३५० (२५.४९ %) च्या पटीत १३ आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या दिसून येते. सर्वात जास्त म्हणजे ३५१ ते ४०० या पटीत ०९ (१७.६४) आयुर्वेद महाविद्यालांमध्ये आहे. तरी उर्वरीत आयुर्वेद महाविद्यालयांनी विद्यार्थी संख्या वाढविणेसाठी अग्रक्रम दिला पाहिजे.

**सारणी क्र. ६.९.१**

**आयुर्वेद महाविद्यालयातील PG विद्यार्थी संख्या**

| **अ.क्र.** | **विद्यार्थी संख्या (PG)** | **आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालये** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | १-२० | ०९ | १७.६४ |
| २ | २१-४० | ११ | २१.५६ |
| ३ | ४१-६० | ०९ | १७.६४ |
| ४ | ६१-८० | ०७ | १३.७२ |
| ५ | ८१-१०० | ०६ | ११.७६ |
| ६ | १०१-१२० | ०५ | ९.८० |
| ७ | १२१-१४० | ०४ | ७.८४ |
| | **एकूण** | **५१** | **१००** |

**विश्लेषण :-**

सारणी क्र. ६.९.१ मध्ये आयुर्वेद महाविद्यालयातील PG विद्यार्थी संख्येविषयीची माहिती देण्यात आली आहे. आलेख क्र. १०.१ मध्ये प्रस्तुत माहिती आलेख स्वरूपात दिलेली आहे.

## आलेख क्र. ६.१३

## आयुर्वेद महाविद्यालयातील PG विद्यार्थी संख्या




**अर्थनिर्वचन**

सारणी क्र. ६.९.१ मध्ये सदर संशोधनासाठी अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयातील विद्यार्थी संख्येविषयी माहिती दिली आहे. यावरून असे दिसून येते कि ०१ ते २० या प्रमाणात विद्यार्थी संख्या असलेली ०९ आयुर्वेद महाविद्यालये (१७.६४ %) आहेत. तर २१ ते ४० च्या पटीत ११ आयुर्वेद महाविद्यालये (२१.५६ %) आहेत. १०१ ते १२० च्या प्रमाणात ०५ (९.८० %) आयुर्वेद महाविद्यालये आहेत. तसेच १२१-१४० च्या पटीत ०४ (७.८४ %) आयुर्वेद महाविद्यालये असल्याचे निदर्शनास येते. तरी सर्व आयुर्वेद महाविद्यालयांनी जास्तीत जास्त विद्यार्थी संख्या वाढविणेसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## ६.१० आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयातील एकूण सेवकांची संख्या

**सारणी क्र. ६.१०**

**ग्रंथालयातील सेवकांची संख्या**

| अ.क्र. | सेवक पद | ग्रंथालये | प्रतीशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल | ५१ | १०० |
| २ | सहा. ग्रंथपाल | १७ | ३३.३३ |
| ३ | ग्रंथालय सहाय्यक | ०९ | १७.६४ |
| ४ | कॉम्प्युटर ऑपरेटर | ०७ | १३.७२ |
| ५ | ग्रंथालय लिपीक | ११ | २१.५६ |
| ६ | ग्रंथालय परिचर | ४३ | ८४.३१ |
| ७ | शिपाई | ५१ | १०० |
| ८ | झेरॉक्स ऑपरेटर | ०७ | १३.७२ |

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.१० मध्ये आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील सेवकांची माहिती दिली आहे. ही माहिती प्रत्यक्षभेटी तसेच प्रश्नावलीव्दारे व दुरध्वनी मोबाईल, ग्रंथपालाच्या मुलाखतीव्दारे ५१ आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून प्राप्त झाली आहे. आलेख क्र. ११ मध्ये ही माहिती आलेख स्वरूपात दिलेली आहे.

**आलेख क्र. ६.१४**

**ग्रंथालयातील सेवकांची संख्या**



**अर्थनिर्वचन :-**

सारणी क्र. ६.१० मध्ये आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील सेवकांची माहिती दिलेली आहे. या सारणी नुसार असे दिसून येते की, ५१ आयुर्वेद ग्रंथालयामध्ये १०० % ग्रंथपाल काम करीत आहेत. तसेच ३३.३३ % सहाय्यक ग्रंथपाल काम करीत आहेत. १७.६४ % ग्रंथालय सहाय्यक आपली सेवा बजावित आहेत. तर १३.७२ % कॉम्प्युटर ऑपरेटर ग्रंथालय संगणीकरणात मदत करीत आहेत. तसेच ग्रंथालयात १०० % शिपाई सेवा करीत आहेत. १३.७२ % झेरॉक्स ऑपरेटर काम करीत आहेत. तसेच ८४.३१ % ग्रंथालय परिचर सेवा देत आहेत.

## ६.११ आयुर्वेद ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाची भाषा

**विश्लेषण**

आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात आयुर्वेद विषयांशी संबंधित विषयावरील अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. तसेच ग्रंथालयांच्या वाचकाकडून अनेकविध भाषेतील ग्रंथसाहित्याची मागणी होत असते. त्यामुळे अनेक भाषेतील आयुर्वेद विषयांशी संबंधित ग्रंथ हे वाचकांना उपलब्ध करून देत असतात. महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या किती ग्रंथालयानी भाषानिहाय ग्रंथसंग्रह संकलीत केलेल्या माहिती सारणी क्र. ६.११ मध्ये दिली आहे.

**सारणी क्र. ६.११**

**भाषानिहाय ग्रंथसंग्रह करणारी आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालये**

| अ.क्र. | भाषा | आयुर्वेद ग्रंथालय संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मराठी | ५१ | १०० |
| २ | हिंदी | ५१ | १०० |
| ३ | इंग्रजी | ५१ | १०० |

**आलेख क्र. ६.१५**

**भाषानिहाय ग्रंथसंग्रह करणारी आयुर्वेद ग्रंथालये.**




**अर्थनिर्वचन**

सारणी क्र. ६.११ मध्ये सदर संशोधनासाठी अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयांनी भाषानिहाय ग्रंथसंग्रह संकलीत केलेली माहिती दिलेली आहे यावरून असे दिसून येते कि या सर्व महाविद्यालयाच्या ग्रंथालयांनी ५१ (१०० %) भाषानिहाय ग्रंथसंग्रह संकलीत करून ठेवला आहे. ग्रंथालयांच्या वाचकाकडून अनेकविध भाषेतील ग्रंथसाहित्याची मागणी होत असते. त्यासाठी वाचकांना अनेकविध भाषेतील ग्रंथ उपलब्ध करून देण्याच्या सोयीसाठी हा भाषानिहाय ग्रंथसंग्रह खूप महत्वाचा व आवश्यक आहे.

## ६.१२ आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.१२ मध्ये आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाची माहिती दिलेली आहे. आलेख क्र. १३ मध्ये प्रस्तुत माहिती आलेख स्वरूपात दिली आहे.

## सारणी क्र. ६.१२
## आयुर्वेद ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह

| अ.क्र. | ग्रंथसंग्रह | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण % |
|---|---|---|---|
| १ | १०००१-१२००० | ३० | ५८.८२ % |
| २ | १२००१-१४००० | १० | १९.६० % |
| ३ | १४००१-१६००० | ०४ | ७.८४ % |
| ४ | १६००१-१८००० | ०२ | ३.९२ % |
| ५ | १८००१-२०००० | ०२ | ३.९२ % |
| ६ | २०००१-२२००० | ०१ | १.९६ % |
| ७ | २२००१-२४००० | ०२ | ३.९२ % |

## आलेख क्र. ६.१६
## आयुर्वेद ग्रंथालयातील एकूण ग्रंथसंग्रह




**अर्थनिर्वचन :-**

सारणी क्र. ६.१२ मध्ये सदर संशोधनासाठी अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद वैद्यकिय महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाविषयी माहिती दिली आहे. आलेख क्र. ६.४ मध्ये ही माहिती आलेख स्वरूपात दाखविणेत आली आहे. यानुसार (५८.८२ %) आयुर्वेद

महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये १०००१ ते १२००० हजारच्या पटीत इतका भाषानिहाय ग्रंथसंग्रह आहे. तर आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये १२००१ ते १४००० हजार या प्रमाणात ग्रंथसंग्रह असल्याचे दिसून येते. १४००१ ते १६००० हजार या पटीत (७.८४ %) इतका ग्रंथसंग्रह आहे. तर (३.९२ %) आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये १६००१ ते १८००० हजारच्या पटीत आहे. तसेच १८००१ ते २०००० च्या पटील  (३.९२ %) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये, (१.९३ %) आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयांमध्ये २०००१ ते २२००० हजार या प्रमाणात व २२००१ ते २४००० हजार या पटीत (३.९२%) इतका ग्रंथसंग्रह आहे.

## ६.१३ आयुर्वेद ग्रंथालयातील ई-स्त्रोत साहित्य संग्रह

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.१३ मध्ये ग्रंथालयातील ई-स्त्रोत साहित्य संग्रहाची माहिती दिलेली आहे. ८४.३१ % ग्रंथालयात CD चा संग्रह आहे. तसेच ५२.९४ % ग्रंथालयात चा वापर केला जातो. ईजर्नलचा वापर ६.७८ % ग्रंथालयातून केला जातो व १३.७२ % ग्रंथालयामध्ये ई-बुक्सचा वापर केला जातो. तसेच ५ % ग्रंथालयामध्ये E-Thesis & Dissertation ची सोय आहे.

**सारणी क्र. ६.१३**

**आयुर्वेद ग्रंथालयातील ई-स्त्रोत साहित्य संग्रह**

| अ.क्र. | ग्रंथालयांतील ई-स्त्रोत साहित्य | संख्या | ग्रंथालये | शे. प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | C. D. | १-५०० | ४३ | ८४.३१ % |
| २ | D. V. D. | १-१०० | २७ | ५२.९४ % |
| ३ | ई-डेटाबेस | १-५० | ३ | ५.८० % |
| ४ | ई-जर्नल | १-१०० | ३१ | ६०.७८ % |
| ५ | ई-बुक | १-१०० | ७ | १३.७२ % |
| ६ | E-Thesis & Dissertations | १-५० | ३ | ५.८८ % |

**आलेख क्र. ६.१७**

**आयुर्वेद ग्रंथालयातील ई-स्त्रोत साहित्य संग्रह.**




**अर्थनिर्वचन :-**

आलेख क्र. १४ नुसार दिलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ई-स्त्रोत साहित्य संग्रहाची माहिती मिळते. या ग्रंथालयातून वेगवेगळ्या स्वरूपात म्हणजे सी.डी., डी.व्ही.डी., ई-डेटाबेस, ई-थेसिसच्या स्वरूपात साहित्य संग्रह उपलब्ध असल्याचे दिसून येते.

**सारणी क्र. ६.१४**

**ग्रंथालयातील वाचकांची संख्या**

| अ.क्र. | वर्षे | ग्रंथालय संख्या | वाचकांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २००१-२००२ | ४९ | १७५९ |
| २ | २००२-२००३ | ४९ | १३१९ |
| ३ | २००३-२००४ | ४९ | १९५३ |
| ४ | २००४-२००५ | ५० | २१०६ |
| ५ | २००५-२००६ | ५० | २०१६ |
| ६ | २००६-२००७ | ५० | १९६५ |
| ७ | २००७-२००८ | ५१ | १९३१ |
| ८ | २००८-२००९ | ५१ | २२१९ |
| ९ | २००९-२०१० | ५१ | १९७८ |
| १० | २०१०-२०११ | ५१ | २३१७ |

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.१४ मध्ये आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील मागील १० वर्षातील म्हणजे २००१ ते २०११ या वर्षातील वाचकांची माहिती दिली आहे. यावरून असे दिसून येते कि सन २००२-२००३ मध्ये ग्रंथालातील वाचकांची संख्या (१३१९) कमी आहे. तर २०१०-२०११ या वर्षातील ग्रंथालयतील वाचकांची संख्या २३१७ इतकी आहे म्हणजे सन २००३-२००४ या वर्षापासून ही संख्या वाढत गेली आहे. याची माहित आलेख क्र. ६.१८ मध्ये आलेख स्वरूपात दिली आहे. सन २००५-२००६ मध्ये ग्रंथालयातील वाचकांची संख्या २०१६ आहे. तर सन २००६-२००७ मध्ये ही संख्या १९६५ इतकी ाहे. सन २००८-२००९ मध्ये २२१९ तसेच २००९-२०१० मध्ये ही वाचकांची संख्या १९७८ इतकी आहे. यावरून असे दिसून येते की सन २००९ पासून २०११ पर्यंत ग्रंथालयातील वाचकांच्या संख्येत चढ उतार होत आहेत.

**आलेख क्र. ६.१८**

**ग्रंथालयातील वाचकांची संख्या.**




**अर्थनिर्वचन**

आलेख क्र. १८ नुसार आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील मागील दहा वर्षातील म्हणणे सन २००१ ते सन २०११ या वर्षातील वाचकांची माहिती मिळते. यावरून असे दिसून येते कि सन २०१०-११ मध्ये ५१ आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात २३१७ एवढे वाचक आहेत. तर सर्वात कमी वाचक १३१९ हे २००२-२००३ या वर्षी आहेत.

## ६.१५ ग्रंथालयातील सध्याची वाचकसंख्या

### विश्लेषण

सारणी क्र. ६.१५ मध्ये ग्रंथालयातील सध्याच्या वाचकांची माहिती दिली आहे. यावरून असे दिसून येते कि ७६.४७ % ग्रंथालयांमध्ये सरासरी वाचकांचे प्रमाण हे १०० ते २०० आहे. तसेच २३.५२ % ग्रंथालयांमध्ये वाचकांचे प्रमाण हे २०० ते ३०० आहे. परंतु हे प्रमाण सुध्दा कमी आहे असे वाटते. ग्रंथालयात वेगवेगळे उपक्रम राबवून वाचकांना आकर्षीत केले गेले पाहिजे. असे केले तरच ग्रंथालयातील वाचकांच्या संख्येत वाढ होईल. त्यासाठी ग्रंथपालांनी वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे. आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयातील वाचक हा सुज्ञ वाचक असतो.

**सारणी क्र. ६.१५**

**ग्रंथालयातील सध्याची वाचकसंख्या**

| अ.क्र. | वर्षे | वाचकांचे प्रमाण | ग्रंथालये | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २०१२-२०१३ | १००-२०० | ३९ | ७६.४७ % |
| | २०१२-२०१३ | २००-३०० | १२ | २३.५२ % |
| २ | २०१३-२०१४ | १००-२०० | २९ | ५६.८६ % |
| | २०१३-२०१४ | २००-३०० | २२ | ४३.१३ % |

**आलेख क्र. ६.१९**

**ग्रंथालयातील सध्याची वाचकांची संख्या**



**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेखावरून दिसून येते कि, आयुर्वेद ग्रंथालयातील सन २०१२-१३ या वर्षातील सरासरी ३९ आयुर्वेद ग्रंथालयामध्ये १०० ते २०० च्या प्रमाणात आहे तर १२ ग्रंथालयामध्ये ही सरासरी २०० ते ३०० वाचक या प्रमाणात आहे. तर २०१३-२०१४ मध्ये ही सरासरी प्रमाण वाढलेले दिसून येते याचे महत्वाचे कारण म्हणजे ग्रंथालयावरती आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव ग्रंथालयात आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर व सेवा यामुळे हे प्रमाण वाढल्याचे ग्रंथपालांचे म्हणणे आहे.

## ६.१६ आयुर्वेद ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.१६ मध्ये आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांच्या इमारती विषयी माहिती दिली
आहे. ग्रंथालयाला जर स्वतंत्र इमारत असेल तर ग्रंथालयातील विविध विभागाचा विकास करणे शक्य आहे. अपुऱ्या जागेमुळे ग्रंथालयाचा विकासास अडथळा होतो. नवनवीन वाचनसाहित्याची भर ग्रंथालयात होत असते. ४५.०९ % ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत आहे. तर ५४.९० % ग्रंथालयांसाठी स्वतंत्र इमारत नसल्याचे दिसून येते. प्रस्तुत माहिती आलेख क्र. २० मध्ये आलेख स्वरूपात दिली आहे.

**सारणी क्र. ६.१६**

**आयुर्वेद ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत**

| अ.क्र. | ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २३ | ४५.०९ |
| २ | नाही | २८ | ५४.९० |
| | **एकूण** | **५१** | **१००** |

**आलेख क्र. ६.२०**

**आयुर्वेद ग्रंथालय स्वतंत्र इमारत**




**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यावरून स्पष्ट दिसते कि, २३ (४५.०९ %) आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र सोय केलेली आहे तर २८ (५४.९० %) आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये ग्रंथालयांसाठी स्वतंत्र इमारत न देता स्वतंत्र विभागाची सोय केलेली आहे. कमी जागे अभावी ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत देता येत नसल्याचे ग्रंथपालांचे म्हणणे आहे.

## ६.१७ आयुर्वेद ग्रंथालयातील वाचनकक्षाची सोय

**विश्लेषण**

ग्रंथपालांच्या प्रश्नावलीमध्ये ग्रंथालयात स्वतंत्र वाचनकक्षाची सोय आहे काय ? असा प्रश्न विचारला होता. प्रश्नावलीतून संकलीत झालेली माहिती सारणी क्र. ६.१७ मध्ये देण्यात आली आहे. सर्व आयुर्वेद ग्रंथालयांमध्ये स्वतंत्र वाचनकक्षाची सोय आहे. हे दिसून येते. प्रत्येक ग्रंथालयातील वाचन कक्षांत बसून शकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वेगवेगळी आहे. ८४.३१ % ग्रंथालयांमध्ये वाचकांसाठी स्वतंत्र वाचनकक्षाची सोय आहे. तर १५.६८ % ग्रंथालयांमध्ये स्वतंत्र वाचन कक्षाची सोय नाही. परंतु स्वतंत्र वाचनकक्षाची सोय करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

### सारणी क्र. ६.१७

### आयुर्वेद ग्रंथालयात वाचनकक्षाची सोय

| अ. क्र. | वाचनकक्षाची सोय | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४३ | ८४.३१ |
| २ | नाही | ८ | १५.६८ |
| | **एकूण** | **५१** | **१००** |

### आलेख क्र. ६.२१

### आयुर्वेद ग्रंथालयात स्वतंत्र वाचन कक्षाची सोय.




**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यामधील माहितीवरून असे स्पष्ट दिसते कि, ४३ (८४.३१) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये वाचकांसाठी स्वतंत्र वाचनकक्षाची सोय आहे. तर ८ (१५.६८) ग्रंथालयामध्ये अपुऱ्या जागेमुळे वेगळी व्यवस्था करता येत नसल्याचे ग्रंथपालांचे म्हणणे आहे. तरी जागेचा योग्य वापर करून स्वंतत्र वाचन कक्षासाठी प्रयत्न चालू आहेत असे सांगितले.

## ६.१८ आयुर्वेद ग्रंथालयातील साधन सामुग्री

### विश्लेषण

ग्रंथालयात उपयुक्त साधनसामुग्री उपलब्ध आहे काय ? असा प्रश्न ग्रंथापालांच्या प्रश्नावलीमध्ये विचारला होता. त्याची माहिती सारणी क्र. ६.१८ मध्ये देण्यात आली आहे. ७६.४७ % ग्रंथालयांमध्ये उपयुक्त साधनसामुग्री उपलब्ध आहे. तर २३.५२ ग्रंथालयांमध्ये उपयुक्त साधनसामुग्री असल्याचे दिसून येत नाही. तरी त्यांनी ग्रंथालयातून उपयुक्त साधन उपलब्ध करावी.

**सारणी क्र. ६.१८**

**आयुर्वेद ग्रंथालयातील उपयुक्त साधनसामुग्री**

| अ. क्र. | उपयुक्त साधनसामुग्री | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३९ | ७६.४७ |
| २ | नाही | १२ | २३.५२ |
| | **एकूण** | **५१** | **१००** |

प्रस्तुत माहिती आलेख क्र. १९ मध्ये आलेख स्वरूपात दिली आहे.

**आलेख क्र. ६.२२**

**आयुर्वेद ग्रंथालयातील साधने**



**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यावरून ग्रंथालयातील उपयुक्त साधनसामुग्री विषयी माहिती मिळते. ग्रंथालयासाठी उपयुक्त अशी साधनसामुग्री जिच्याव्दारे ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांना माहिती सेवा योग्य प्रकारे देता येईल अशी साधनसामुग्री ३९ (७६.४७ %) ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेचे दिसून येते तर १२ (२३.५२ %) ग्रंथालयात ही साधनसामुग्री पुरेशा प्रमाणात म्हणजे अपुरी आहे. त्या ग्रंथालयातून ती लवकरच उपलब्ध होईल असे ग्रंथपालांनी नमूद केले आहे.

## ६.१९ आयुर्वेद ग्रंथालयातील वाचनसाहित्य

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.१९ मध्ये सदर संशोधनासाठी अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील वाचनसाहित्याची माहिती दिली आहे.

**सारणी क्र. ६.१९**

**ग्रंथालयातील एकूण वाचनसाहित्य**

| अ.क्र. | एकूण वाचनसाहित्य | ग्रंथालय संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ०१ ते १०००० | ०२ | ३.९२ |
| २ | १०००१ ते १५००० | ३९ | ७६.४७ |
| ३ | १५००१ ते २०००० | ०६ | ११.७६ |
| ४ | २०००१ ते २५००० | ०३ | ५.८८ |
| ५ | २५००१ ते ३०००० | ०१ | १.९६ |

**आलेख क्रमांक ६.२३**

**ग्रंथालयातील एकूण वाचनसाहित्य**




### विश्लेषण

वरील सारणी क्र. १९ व आलेखानुसार ग्रंथालयातील वाचनसाहित्याची माहिती मिळते. यावरून असे दिसून येते की, १०००१ ते १५००० या प्रमाणात (७६.४७ %) ग्रंथालयात वाचनसाहित्य आहे. तर १५००१ ते २०००० या प्रमाणात (११.७६ %) वाचनसाहित्य आहे. तसेच (५.८८ %) ग्रंथालयामधील वाचनसाहित्य हे २०००१ ते २५००० या प्रमाणात आहे. २०००१ ते ३०००० या प्रमाणात (१.९६ %) वाचनसाहित्य ग्रंथालयात आहे.

### अर्थनिर्वचन

वरील सारणी व आलेखावरून असे दिसून येते की, १०००१ ते १५००० या प्रमाणात (७६.४७%) वाचनसाहित्य ग्रंथालयात आहे. तर २५००१ ते ३०००० या प्रमाणात (१.९६%) ग्रंथालयात आहे. यावरून असे दिसून येते की सर्वात जास्त वाचनसाहित्य असलेले ०१ ग्रंथालय आहे. तर सर्वात कमी वाचनसाहित्य असलेली ०२ ग्रंथालये आहेत.

**सारणी क्र. ६.२०**

**ग्रंथालयातील मुद्रीत स्वरूपातील साहित्यसंग्रह**

| अ.क्र. | मुद्रीत साहित्य संग्रह | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ०१ ते ५००० | ०० | ०० |
| २ | ५००१ ते १०००० | ०३ | ५.८८ |
| ३ | १०००१ ते १५००० | ३६ | ८०.३९ |
| ४ | १५००१ ते २०००० | ०७ | ११.७६ |
| ५ | २०००१ ते २५००० | ०५ | ९.८० |

**आलेख क्रमांक ६.२४**

**ग्रंथालयातील मुद्रीत स्वरूपातील साहित्य संग्रह**




**विश्लेषण**

सारणी क्र. ६.२० मध्ये सदर संशोधनासाठी अभ्यासण्यात आलेल्या ५१ आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील मुद्रित स्वरूपातील साहित्य संग्रहाची माहिती दिलेली आहे.

**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यानुसार अभ्यासण्यात आलेल्या ग्रंथालयांमध्ये सर्वाधिक मुद्रीत स्वरूपातील साहित्यसंग्रह २०००१ ते २५००० या प्रमाणात (९.८० %) ग्रंथालयांमध्ये आहे. तर सर्वात कमी ग्रंथसंग्रह असलेली ५००१ ते १०००० या प्रमाणात (५.८८ %) आहेत.

## ६.२१ ग्रंथालयातील अमुद्रीत स्वरूपातील साहित्यसंग्रह

**विश्लेषण**

ग्रंथालयातील अमुद्रीत स्वरूपातील साहित्य संग्रहाची माहिती सारणी क्र. ६.२१ मध्ये देण्यात आली आहे.

**सारणी क्रमांक ६.२१**

**ग्रंथालयातील अमुद्रीत स्वरूपातील साहित्यसंग्रह**

| अ.क्र. | अमुद्रीत साहित्य संग्रह | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ०१ ते १०० | १० | १९.६० |
| २ | १०१ ते २०० | २९ | ५६.८६ |
| ३ | २०१ ते ३०० | ०९ | १७.६४ |
| ४ | ३०१ ते ४०० | ०३ | ५.८८ |

**आलेख क्रमांक ६.२५**

**ग्रंथालयातील अमुद्रीत स्वरूपातील साहित्यसंग्रह**




**विश्लेषण**

वरील सारणी व आलेख यावरून असे दिसून येते की, अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये अमुद्रीत स्वरूपातील साहित्यसंग्रह ८२८५ इतका आहे. यामध्ये CD / DVD, हार्डडिस्क, फ्लॉपी, Course material , ई-डेटा यांचा

समावेश आहे. ०१ ते १०० या प्रमाणात (१९.६० %) १०१ ते १५० (२७.४५ %) १०१ ते २०० या प्रमाणात (५६.८६ %) २०१ ते २५० या प्रमाणात (११.७६ %) तसेच २०१ ते ३०० (१७.६४ %) व ३०१ ते ३५० या प्रमाणात (५.८८ %) अमुद्रीत ग्रंथसंग्रह आहे.

**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यानुसार असे दिसून येते की, अभ्यासण्यात आलेल्या ग्रंथालयांमध्ये सर्वाधिक अमुद्रीत साहित्य संग्रह हा शासकीय ग्रंथालय नांदेड ची आयुर्वेद ग्रंथालय तसेच टिळक आयुर्वेद ग्रंथालय व भारती विद्यापीठ आयुर्वेद ग्रंथालयात आहेत. तसेच सर्वात कमी वसंतदादा पाटील आयुर्वेद ग्रंथालय व अष्टांग आयुर्वेद ग्रंथालयाकडे आहे.

## ६.२२ ग्रंथालयातील मागील १० वर्षापासूनची ग्रंथसंग्रह संख्या

**सारणी क्र. ६.२२**

**ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह संख्या**

| अ.क्र. | वर्षे | ग्रंथसंख्या |
|---|---|---|
| १ | २००१-२००३ | ३,८३,७९४ |
| २ | २००३-२००५ | ४,३०,२६७ |
| ३ | २००५-२००७ | ४,७९,४७० |
| ४ | २००७-२००९ | ५,३६,३७७ |
| ५ | २००९-२०११ | ५,९६,२०१ |

**आलेख क्रमांक ६.२६**

**ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह संख्या**



**विश्लेषण**

वरील सारणी व आलेख यावरून ग्रंथालयातील मागील दहा वर्षातील ग्रंथसंख्येची माहिती मिळते. यावरून असे दिसून येते की, ग्रंथालयातील ग्रंथसंख्या ही वाढत गेली आहे. वर्षानुवर्षे ग्रंथसंख्येत भर पडला असल्याचे दिसते. सन २००१ ते २००३ या वर्षामध्ये ग्रंथसंग्रह हा ३,८३,७९४ इतका होता. तर तो २००५ ते २००७ मध्ये तो ४,७९,४७० एवढा असल्याचे दिसते. २००९-२०११ मध्ये ह्या ग्रंथसंख्येत भर पडून तो ५,९६,२०१ इतका वाढल्याचे दिसून येते.

**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यावरून असे दिसून येते की, २००१ ते २०११ या वर्षांमध्ये ग्रंथालयातील ग्रंथसंख्या हा वाढत गेली आहे. सन २००१ ते २००३ मध्ये ३,८३,७९४ इतकी तर २०१०-२०११ मध्ये होय ग्रंथसंख्या ५,९६,२०१ एवढी आहे.

## ६.२३ ग्रंथालयातील ग्रंथखरेदी

**विश्लेषण**

ग्रंथालयातील ग्रंथखरेदी कोणामार्फत केली जाते याची माहिती सारणी क्र. ६.२३ मध्ये देण्यात आली आहे. यावरून असे दिसून येते कि ७०.५८ % ग्रंथालयातील ग्रंथखरेदी ही स्थानिक ग्रंथ विक्रेत्यामार्फत केली जाते. तर १७.६४ % ग्रंथखरेदी ही प्रकाशकामार्फत केली जाते. व ३.९२ % ग्रंथालयामध्ये ग्रंथखरेदी ही पसंतीसाठी ग्रंथ मागवून केली जाते. तसचे ३.९२ % ग्रंथालयातील ग्रंथखरेदी ही निवीदा पध्दतीने केली जाते. व १.९६ % ग्रंथालयातील ग्रंथखरेदी ही इतर पध्दतीने केली जात असल्याचे दिसून येते. प्रस्तुत माहिती आलेख क्र. ६.२७ मध्ये आलेख स्वरूपात दिली आहे.

**सारणी क्र. ६.२३**

**ग्रंथालयातील ग्रंथखरेदी**

| अ.क्र. | ग्रंथखरेदी | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण % |
|---|---|---|---|
| १ | प्रकाशकामार्फत | ०९ | १७.६४ |
| २ | दरपत्रक पध्दती | ०१ | १.९६ |
| ३ | स्थानिक ग्रंथ विक्रेत्यामार्फत | ३६ | ७०.५८ |
| ४ | निविदा पध्दतीने | ०२ | ३.९२ |
| ५ | पसंतीसाठी ग्रंथ मागविणे | ०२ | ३.९२ |
| ६ | इतर पध्दती | ०१ | १.९६ |
| | **एकूण** | **५१** | **१००** |

**आलेख क्र. ६.२७**

**ग्रंथालयातील ग्रंथ खरेदी**




**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेखावरून ग्रंथालयातील ग्रंथखरेदी विषयीची माहिती मिळते. यावरून असे स्पष्ट होते की, ३६ (७०.५६ %) ग्रंथालयातून ग्रंथखरेदी ही स्थानिक ग्रंथ विक्रेत्या मार्फत, ०९ (१७.६४) ग्रंथालयातून प्रकाशकामार्फत ०२ (३.९२ %) ग्रंथालयातून निविदा पध्दतीने तर ०२ (३.९२%) ग्रंथालयातून पसंतीसाठी ग्रंथ मागविणे या प्रक्रियेतून ग्रंथखरेदी केली जाते व ०१ (१.९६%) ग्रंथालयातून अनुक्रमे दरपत्रक पध्दती आणि इतर पध्दतीने ग्रंथखरेदी केली जाते. या माहितीवरून असे निदर्शनास येते कि सर्वात जास्त

ग्रंथखरेदी ही स्थानिक ग्रंथविक्रेत्याकडून केली जाते. तर सर्वात कमी ग्रंथखरेदी ही इतर पध्दतीने केली जाते.

## ६.२४ ग्रंथालयातील एकूण नियतकालीकांची संख्या

**विश्लेषण**

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयातील नियतकालीकांची एकूण संख्येबाबाबत विचारणा केली असता मिळालेल्या माहितीचे विश्लेषण सारणी क्र. ६.२४ मध्ये दाखविण्यात आलेले आहे. यावरून असे दिसून येते कि राष्ट्रीय नियतकालिके ०१ ते ५० या पटीत ४२ (८२.३५ %) ग्रंथालयात घेतली जातात तर ०९ (१७.६४ %) ग्रंथालयात ०१ ते १०० या प्रमाणात आहेत. या प्रमाणात ४७ (९२.१५ %) ग्रंथालयात आहेत.

**सारणी क्र. ६.२४**

**ग्रंथालयातील नियतकालीकांची एकूण संख्या**

| अ.क्र. | नियतकालीके | ग्रंथालयांची संख्या | शेकडा प्रमाण % |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय | | |
| | ०१ ते ५० | ४२ | ८२.३५ |
| | ०१ ते १०० | ०९ | १७.६४ |
| २ | आंतरराष्ट्रीय | | |
| | ०१ ते २० | ४७ | ९२.१५ |
| | ०१ ते ४० | ०४ | ०७.८४ |

**अर्थनिर्वचन**

सारणी क्र. ६.२४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या संख्यात्मक माहितीवरून असे स्पष्ट होते कि, या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयापैकी राष्ट्रीय नियतकालीकांचा संग्रह करणारी ग्रंथालये ५१ (१०० %) ग्रंथालये आहेत. तर आंतरराष्ट्रीय नियतकालीकांचा संग्रह असलेली ग्रंथालये ही (५१ %) आहेत. ०१ ते २० या प्रमाणात आंतरराष्ट्रीय नियतकालीके असणारी ग्रंथालये ९७ (९२.१५ %) आहेत तर ०१ ते ४० हे प्रमाण असणारी ०४ (७.८४ %) ग्रंथालये आहेत. यावरून असे दिसून येते कि नियतकालिके मागणी बाबतचा ग्रंथालयांचा कल चांगला आहे.

## ६.२५ नियतकालीकांची भाषावर विभागणी

**विश्लेषण**

महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात आयुर्वेदांशी संबंधीत विषयावरील अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरूपाची नियतकालिके येत असतात. वाचकांना उपलब्ध करून दिली जातात. महाराष्ट्रातील किती ग्रंथालयांनी नियतकालीकांची भाषावर विभागणी केली आहे. हे समजावून घेण्यासाठी संकलित केलेल्या माहिती सारणी क्र. ६.२५ मध्ये देण्यात आली आहेत. यावरून असे दिसून येते कि ५१ (१०० %) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये मराठी नियतकालिके उपलब्ध आहेत. तर २३ (४५.०९ %) ग्रंथालयामध्ये हिंदी भाषेतील नियतकालीके उपलब्ध आहेत. तसेच इंग्रजी भाषेतील नियतकालीके ३७ (७२.५४ %) ग्रंथालयात उपलब्ध आहेत. आणि ३ (५.८८ %) ग्रंथालयात संस्कृत भाषेतील नियतकालिके आहेत.

**सारणी क्र. ६.२५**

**भाषानिहाय नियतकालीके विभागणी असणारी आयुर्वेद ग्रंथालये**

| अ.क्र. | ग्रंथखरेदी | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण % |
|---|---|---|---|
| १ | मराठी | ५१ | १०० |
| २ | हिंदी | २३ | ४५.०९ |
| ३ | इंग्रजी | ३७ | ७२.५४ |
| ४ | संस्कृत | ०३ | ५.८८ |

### आलेख क्र. ६.२८

### भाषानिहाय नियतकालीके विभागणी असलेली आयुर्वेद ग्रंथालये




**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यावरून असे स्पष्ट होते कि, आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात आयुर्वेदाशी संबंधित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिके वेगवेगळ्या भाषेतून येत असतात. यामध्ये मराठी भाषेतून ५१ (१०० %) ग्रंथालयात, हिंदी भाषेतील २३ (४५.०९ %) तर इंग्रजी भाषेतील ०७ (७२.५४ %) ग्रंथालयात ०३ (५.८८ %) ग्रंथालयात संस्कृत भाषेत आहेत. यावरून असे दिसून येते कि सर्वात जास्त ५१ (१०० %) ग्रंथालयात मराठी भाषेतील नियतकालीके आहेत व त्यांची भाषावार विभागणी केली आहे.

## ६.२६ मागील १० वर्षातील वर्गणी भरलेली नियतकालीके

**सारणी क्र. ६.२६**

**मागील १० वर्षातील वर्गणी भरलेली नियतकालिके**

| अ.क्र. | वर्ष | स्थानिक | राष्ट्रीय | आंतरराष्ट्रीय | ग्रंथालय संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००१-२००३ | २३४ | ६६६ | १२७ | ४७ | ९२.१५ |
| २ | २००३-२००५ | १८६ | ८८० | ८५ | ४५ | ८८.२३ |
| ३ | २००५-२००७ | २०१ | ३४० | ७३ | ३९ | ७६.४७ |
| ४ | २००७-२००९ | १४३ | ५२८ | ८५ | ४१ | ८०.३९ |
| ५ | २००९-२०११ | १३७ | ३७५ | ८० | ४६ | ९०.१९ |

**विश्लेषण**

वरील सारणीवरून ग्रंथालयातील वर्गणी भरलेल्या नियतकालिकांची माहिती मिळते. सन २००१ ते २००३ या वर्षामध्ये (९२.१५ %) ग्रंथालयांनी नियतकालीक वर्गणी भरलेली आहे. तसेच २००५ ते २००७ या वर्षामध्ये (७६.४७ %) ग्रंथालयांनी वर्गणी भरलेली आहे. सन २००७ ते २००९ या वर्षामधील नियतकालीक वर्गणी भरलेली (८०.३९ %) ग्रंथालये आहेत. तसेच सन २००९ ते २०११ या वर्षामध्ये (९०.१९ %) ग्रंथालयांनी नियतकालिकांसाठी वर्गणी भरलेली आहे.

**अर्थनिर्वचन**

वरील सारणी क्र. ६.२६ मध्ये दिलेल्या माहितीवरून कसे स्पष्ट होते कि, सन २००१ ते सन २०११ या कालावधीमध्ये ग्रंथालयातून नियतकालीकांसाठी वर्गणी भरली जात आहे. यामध्ये स्थानिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालीकांचा समावेश होतो. वाचकांच्याा मागणीनुसार नियतकालीके ग्रंथालयात घेतली जातात त्यांची वर्गणी भरली जाते. सन २००१ ते २००३ या वर्षामध्ये (९२.१५ %) ग्रंथालयांनी वर्गणी भरलेली आहे. तर २००५-२००७ मध्ये (७६.४७ %) ग्रंथालयांनी नियतकालिकांसाठी वर्गणी भरलेची दिसते.

## ६.२७ आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयातील नियतकालीकावर होणारा वार्षिक खर्च

**विश्लेषण**

आयुर्वेद ग्रंथालयात आयुर्वेदाची संबंधित विषयावरील अनेक नियतकालीकांची वार्षीक वर्गणी भरली जाते. त्यावर होणारा वार्षिक खर्च किती आहे. हे समजावून घेण्यासाठी संकलीत केलेल्या माहिती सारणी क्र. ६.२७ मध्ये दर्शविण्यात आलेले आहे. आलेख क्र. ६.२३ मध्ये प्रस्तुत माहिती आलेख स्वरूपात देण्यात आलेली आहे.

**सारणी क्रमांक ६.२७**

**नियतकालीकावर होणारा वार्षिक खर्च**

| अ.क्र. | वार्षिक खर्च | ग्रं. संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ०१ ते ५००० | ०३ | ५.८८ |
| २ | ५००१ ते १०००० | १० | १९.६० |
| ३ | १०००१ ते १५००० | २७ | ५२.९४ |
| ४ | १५००१ ते २०००० | ०५ | ९.८० |
| ५ | २०००१ ते २५००० च्या पुढे | ०६ | ११.७६ |

**आलेख क्र. ६.२९**

**आयुर्वेद ग्रंथालयात नियतकालीकांवर होणारा वार्षिक खर्च**



**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यावरून ग्रंथालयातील नियतकालीकांचा वार्षीक वर्गणीचा माहिती स्पष्ट होते. ग्रंथालये आपआपल्या आर्थिक बजेटनुसार नियतकालीकांची वर्गणी भरत असतात. ६००१ ते १०००१ ते १५००० या प्रमाणात (५२.९४ %) ग्रंथालयातून वार्षिक वर्गणी भरली जाते. तसेच २०००१ ते २५००० च्या पुढे या प्रमाणात (११.७६ %) ग्रंथालये नियतकालीकांची वर्गणी भरत आहेत. तसेच ०१ ते ५००० या प्रमाणात (५.८८ %) ग्रंथालये नियतकालीकांसाठी वर्गणी भरत आहेत.

## ६.२८ नियतकालिकांच्या जुन्या अंकाच्या संदर्भाबाबत

**विश्लेषण**

आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयात घेतल्या जाणाऱ्या वाचन साहित्यामध्ये नियतकालिक हे महत्वाचे वाचनसाहित्य आहे. संशोधकास हे नवसंजीवनी आहे. त्या दृष्टीने जुन्या महत्वाच्या अंकाना ग्रंथालयात संदर्भासाठी ठेवले जाते का हे सारणी क्र. ६.२८ मध्ये दर्शविण्यात आलेले आहे. प्रस्तुत माहिती आलेक क्र. ६.२४ मध्ये आलेख स्वरूपात दिली आहे.

**सारणी क्र. ६.२८**

**नियतकालीकांचे जुने अंक**

| अ.क्र. | नियतकालीक संदर्भ | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४९ | ९६.०७ |
| २ | नाही | ०२ | ३.९२ |
| | **एकूण** | **५१** | **१००** |

**आलेख क्र. ६.३०**

**नियतकालीकांचे जुने अंक**



**अर्थनिर्वचन**

सारणी क्र. ६.२८ मध्ये दिलेल्या सांख्यिकी माहितीवरून असे स्पष्ट होते कि ९६.०७% आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयात नियतकालीकांचे जुने अंक संदर्भासाठी ठेवले जातात. तर ३.९२ % ग्रंथालयात ठेवले जात नाहीत. एकूणच नियतकालीकांचे जुने अंक संदर्भासाठी ग्रंथालयात राखून ठेवण्याचे प्रमाण जास्त आहे. या नियतकालिकांची संशोधकांना प्राध्यापक व विद्यार्थ्यांना खूप मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते.

## ६.२९ नियतकालीकांची Online सेवा

|

**विश्लेषण**

आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयात येणारी नियतकालिके ही मुद्रीत व अमुद्रीत स्वरूपात येत असतात. अलीकडे E-Journal ही Online सुविधा उपलब्ध झालेने आयुर्वेद विषयाशी संबंधित असंख्य नियतकालिके संगणकाच्या सहाय्याने Online पाहता येऊ लागली आहेत. Online सेवेमुळे वाचकास हवी ती माहिती त्वरीत मिळू लागली आहे. या संबंधिची माहिती सारणी क्र. ६.२९ मध्ये दिलेली आहे.

**सारणी क्र. ६.२९**

**नियतकालीकांची Online सेवा**

| अ.क्र. | Online सेवा | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४३ | ८४.३१ |
| २ | नाही | ०८ | १५.६८ |

**अर्थनिर्वचन**

सारणी क्र. ६.२९ मध्ये दिलेल्या सांख्यिकी माहितीवरून असे स्पष्ट होते कि, महाराष्ट्रातील ८४.३१ % आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये Online सेवा दिली जाते. तर १५.६८ % आयुर्वेद ग्रंथालयामध्ये ती दिली जात नाही. तरी या महाविद्यालयानी Online सेवा सुरू करावी. ज्यामुळे वाचकांना माहिती मिळविणे सोईचे होईल. इंटरनेटच्या माध्यमातून Free Journals पाहता येतील.

आलेख क्र. ६.३१

नियतकालीकांची Online सेवा




## ६.३० ग्रंथालयांची ई-जर्नल सुविधा

### विश्लेषण

आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात येणारी नियतकालीके ही मुद्रीत व अमुद्रीत स्वरूपात येत असतात. परंतु अलीकडे संगणकाच्या वापरामुळे इंटरनेटमुळे ई-जर्नल ही सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे संशोधकास संशोधनासंबंधित तसेच इतर विषयांवरील लेख ई-जर्नलच्या माध्यमातून पाहता येऊ लागले आहेत. या ई-जर्नलच्या Online सेवेमुळे वाचकास हवी ती माहिती त्वरीत मिळू लागली आहे. या संबंधित माहिती सारणी क्र. ६.३० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ६.३०

नियतकालीकांनी ई-जर्नल सुविधा

| अ.क्र. | ई-जर्नल सेवा | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४३ | ८४.३१ |
| २ | नाही | ०८ | १५.६८ |

**अर्थनिर्वचन**

सारणी क्र. ६.३० मध्ये दिलेल्या सांख्यिकी माहितीवरून असे स्पष्ट होते कि, महाराष्ट्रातील ८४.३१ % आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामधून ई-जर्नल सुविधा दिली जाते तर १५.६८ % आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामधून ती दिली जात नाही. तरी या महाविद्यालयांनी ई-जर्नल सुविधा वाचकांना सुविधा उपलब्ध करून द्यावी.

**आलेख ६.३२**

**नियतकालिकांची ई-जर्नल सुविधा**




## ६.३१ ग्रंथालयातील येणारी वर्तमानपत्रे (दैनिके)

**सारणी क्र. ६.३१**

**आयुर्वेद ग्रंथालयात येणारी दैनिके**

| अ.क्र. | तपशिल | ग्रंथालय संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मराठी | ५१ | १०० |
| २ | हिंदी | ३१ | ६०.७८ |
| ३ | इंग्रजी | ५१ | १०० |

**आलेख क्रमांक ६.३३**

**आयुर्वेद ग्रंथालयात येणारी दैनिके**




**विश्लेषण**

आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात येणाऱ्या दैनिकांची बाबत ग्रंथपालांना प्रश्न विचारला होता. त्यानुसार संकलित झालेली माहिती सारणी क्र. ६.३१ मध्ये दिली आहे. त्यानुसार आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयात मराठी, इंग्रजी, हिंदी दैनिक येतात. यावरून असे दिसून येते की अनुक्रमे (१००) ग्रंथालयामध्ये मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रे येत आहेत. तसेच (६०.७८ %) ग्रंथालयामध्ये हिंदी वर्तमानपत्रे येत आहेत.

**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेखावरून ग्रंथालयातील वर्तमान पत्रांची माहिती मिळते. मराठी व इंग्रजी भाषेतील दैनिके सर्वच ग्रंथालयामध्ये (१०० %) येत आहेत. तसेच हिंदी वर्तमान पत्रे ही येत आहेत.

## ६.३२ ग्रंथालयांचा वर्तमानपत्रावर होणारा वार्षिक खर्च

**सारणी क्र. ६.३२**

**वर्तमानपत्रातील वार्षिक खर्च**

| अ.क्र. | वार्षिक खर्च | ग्रं. संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ०१ ते २००० | ०१ | १.९६ |
| २ | २००१ ते ४००० | ०८ | १५.६८ |
| ३ | ४००१ ते ६००० | १२ | २३.५२ |
| ४ | ६००१ ते ८००० | २५ | ४९.०१ |
| ५ | ८००१ ते १०००० च्या पुढे | ०५ | ९.८८ |

### विश्लेषण

आयुर्वेद ग्रंथालयात येणाऱ्या वर्तमानपत्रावर वार्षिक खर्च किती होतो. याबाबत विचारणा केली होती. त्यानुसार संकलित झालेली माहिती सारणी क्र. ६.३२ मध्ये दिली आहे. यावरून आलेख क्र. ६.२७ तयार केला आहे. यावरून ग्रंथालयातील वर्तमानपत्रावरील होणारा वार्षिक खर्चाची माहिती मिळते. (४९.०१ %) ग्रंथालयामध्ये ६००१ ते ८००० या प्रमाणात वार्षिक खर्च होत आहे. तर ८००१ ते १०००० या प्रमाणात (०९.८८ %) ग्रंथालयामध्ये वर्तमानपत्रावरती वार्षिक खर्च् होत आहे. तसेच सर्वात कमी प्रमाणात खर्च हा (०१.९६ %) ग्रंथालयामध्ये होत आहे. ४००१ ते ६००० या प्रमाणात (२३.५२ %) ग्रंथालयांमधून दैनिकांचा वार्षीक खर्च होत असल्याचे दिसून येते.

### अर्थनिर्वचन

वरील सारणी व आलेख यावरून असे दिसून येते की, वर्तमानपत्रावरील ४००१ ते ६००० या प्रमाणातील वार्षीक खर्च हा सर्वात जास्त ग्रंथालयातून (४९.०१ %) होत आहे. तर सर्वात कमी ०१ ते २००० या प्रमाणात सर्वात कमी (१.९६ %) ग्रंथालयातून होत आहे.

**आलेख क्र. ६.३४**
**वर्तमानपत्रावरील वार्षिक खर्च**




## ६.३३ ग्रंथालय समिती

### विश्लेषण

ग्रंथपालांना सदर महाविद्यालयात ग्रंथालय समिती आहे काय असा प्रश्न विचारला होता. त्याची प्रश्नावलीमार्फत मिळालेली माहिती सारणी क्र. ६.३३ मध्ये देण्यात आली आहे. प्रत्येक ग्रंथालयात ग्रंथालय समिती आहे. ग्रंथालय समितीमध्ये एकूण ५ ते ६ सदस्य संख्या आहे. सदर समितीच्या काही ग्रंथालयातून दोन वेळा तर काही ग्रंथालयातून ४ वेळा सभा घेतल्या जातात. या सभेमध्ये ग्रंथालय व्यवस्थापन व नियोजन, ग्रंथालय बजेट, ग्रंथखरेदी व इतर ग्रंथालयांच्या अडचणीवर चर्चा होवून निर्णय घेतले जातात.

ग्रंथालयातील धोरणात्कम निर्णय घेण्यासाठी व ग्रंथालय सेवकांना प्रशासकीय व वाचकांना नियमित मार्गदर्शन करणेसाठी व्यवस्थापनाकडून ग्रंथालय समिती नियमानुसार व कायद्यानुसार प्रत्येक ग्रंथालयात असते. अशी ही ग्रंथालय समिती महाराष्ट्रातील किती ग्रंथालयानी स्थापन केलेली आहे ही माहिती येथे दिलेली आहे.

### अर्थनिर्वचन

वरील सारणीवरून असे स्पष्ट दिसते कि प्रत्येक आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयात, ग्रंथालय समिती आहे. अभ्यासण्यात आलेल्या ५१ (१०० %) ग्रंथालयामध्ये ग्रंथालय समिती असून या समितीव्दारे ग्रंथालयातील धोरणात्मक निर्णय घेतले जातात व ग्रंथालय सेवकांना नियमितपणे मार्गदर्शन करीत असते.

**सारणी क्र. ६.३३**

**आयुर्वेद ग्रंथालय समिती**

| **अ.क्र.** | **ग्रंथालय समिती** | **ग्रंथालय संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १ | होय | ५१ | १०० |
| २ | नाही | ०० | ०० |

## ६.३४ ग्रंथालय समिती सभासद कोणकोण आहेत

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने प्रश्नावलीमध्ये ग्रंथालय समितीचे सभासद कोण-कोण आहेत. असा विचारला होता त्यावरून मिळाळेली माहिती वरून असे दिसून येते कि १०० % ग्रंथालयामध्ये ग्रंथालय समिती स्थापन केली असून त्या ग्रंथालय समितीमध्ये प्राचार्य हे त्या समितीचे अध्यक्ष असून व्याख्याने, ग्रंथपाल, विभागप्रमुख हे सभासद आहेत. याची माहिती सारणी क्र. ६.३४ मध्ये दिली आहे.

**सारणी क्र. ६.३४**

**ग्रंथालय समिती सभासद**

| **अ.क्र.** | **सभासद** | **प्राचार्य** | **विभागप्रमुख** | **व्याख्याने** | **ग्रंथपाल** | **विद्यार्थी प्रतिनिधी** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | होय | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ✓ |
| २ | नाही | ०० | ०० | ०० | ०० | ०० |

**अर्थनिर्वचन**

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते कि ग्रंथालयातील ग्रंथालय समितीमध्ये प्राचार्य, विभागप्रमुख व्याख्याने विद्यार्थी प्रतिनिधी आणि ग्रंथपाल हे सभासद आहेत. संशोधनासाठी अभ्यासण्यात आलेल्या प्रत्येक ग्रंथालयामध्ये ग्रंथालय समिती स्थापन केली असून वरीलप्रमाणे सभासद आहेत.

## ६.३५ ग्रंथालय समिती मिटींग

### विश्लेषण

सारणी क्र. ६.३५ मध्ये ग्रंथालय समितीची मिटींग किती वेळा होते. याची माहिती दिली आहे. सदर माहिती ही प्रश्नावलीमार्फत मिळाली आहे. यावरून असे दिसून येते कि ७०.५८% ग्रंथालयामध्ये वर्षातून तीन वेळा ग्रंथालय समितीच्या मिटींग्स होतात. तर १९.६०% ग्रंथालयामध्ये तीनपेक्षा अधिक म्हणजे अनेकवेळी मिटींग घेतल्या जातात. ५.८८% ग्रंथालयातून वर्षातून दोन वेळी मिटींग होत असल्याचे निदर्शनास येते. या ग्रंथालय समितीच्या मिटींगच्या माध्यमातून ग्रंथालयीन कामकाज सुरळीत चालण्यासाठी ग्रंथालय प्रशासन व संघटन याविषयी धोरणात्मक निर्णय घेतले जातात. यासाठी ग्रंथालय समिती असणे आवश्यक आहे. यावरून ६.२८ हा ग्रंथालय समिती मिटींगचा आलेख तयार केला आहे.

**सारणी क्र. ६.३५**
**ग्रंथालय समिती मिटींग**

| अ.क्र. | ग्रंथालय समिती मिटींग (वर्षातून किती वेळा) | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एक | ०२ | ३.९२ |
| २ | दोन | ०३ | ५.८८ |
| ३ | तीन | ३६ | ७०.५८ |
| ४ | अनेक वेळा | १० | १९.६० |
| | **एकूण** | **५१** | **१००** |

**आलेख क्र. ६.३५**
**ग्रंथालय समिती मिटींग**



**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यावरून ग्रंथालयामध्ये ग्रंथालय सभासदांची मिटींग वर्षातून किती वेळा होते याबाबतची माहिती मिळते वरील माहितीवरून असे स्पष्ट दिसते कि, ३६ (७०.५८) ग्रंथालयामध्ये ग्रंथालय समितीची मिटींग ही वर्षातून तीन वेळा होत असते. १० (१९.६०) ग्रंथालयातून ही अनेकवेळा होत असते. ०३ (५.८८) ग्रंथालयांमध्ये दोन वेळा होत आहे. तरी ग्रंथालय ग्रंथालय समितीची मिटींग योग्य कालावधीत होणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे या ग्रंथालय समितीच्या माध्यमातून ग्रंथालयीन कामकाज सुरळीतपणे चालविणेसाठी मार्गदर्शन मिळते.

## ६.३६ ग्रंथालय समितीची कार्ये

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने ग्रंथपालाच्या प्रश्नावलीमध्ये ग्रंथालयांच्या ग्रंथालय समितीमार्फत कोण-कोणती कार्ये पार पाडली जातात असा प्रश्न विचारला होता. त्याअनुषंगाने संकलीत झालेली माहिती सारणी क्र. ६.३६ मध्ये दिलेली आहे. १०० % ग्रंथालयामध्ये प्रशासन आणि संगठनाचे कार्य ग्रंथालय समिती करीत असल्याचे दिसून येते. तर ६४.७० % ग्रंथालयातून ही समिती अंदाजपत्रक तयार करण्यात मदत करते. ६०.७८ % ग्रंथालयातून ग्रंथालयांचा वार्षिक अहवाल तयार करण्याचे काम ही समिती पार पाडीत असते. तसेच ग्रंथालयाबाबत धोरणात्मक निर्षणय घेण्यासाठी ७२.५४ % ग्रंथालयातून ग्रंथालय समिती पुढाकार घेत असल्याचे दिसून येते. प्रस्तुत माहिती आलेख क्र. ६.२९ मध्ये आलेख स्वरूपात दिली आहे.

**सारणी क्र. ६.३६**

**ग्रंथालय समिती कार्ये**

| अ.क्र. | ग्रंथालय समिती कार्ये | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्रशासन आणि संगठन | ५१ | १०० |
| २ | वाचनसाहित्य निवड | ४३ | ८४.३१ |
| ३ | धोरणात्मक निर्णय | ३७ | ७२.५४ |
| ४ | अंदाजपत्रक तयार करणे | ३३ | ६४.७० |
| ५ | वार्षिक अहवाल तयार करणे | ३१ | ६०.७८ |
| ६ | इतर कार्ये | ०९ | १७.६४ |

**आलेख क्र. ६.३६**

**ग्रंथालय समिती कार्ये**




**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यावरून ग्रंथालय समितीच्या कार्याविषयीची माहिती मिळते. ग्रंथालय समिती विविध स्वरूपाची कार्ये पार पाडीत असते. ४३ (८४.३१ %) ग्रंथालयांमध्ये वाचनसाहित्य निवड ५१ (१०० %) ग्रंथालयामध्ये प्रशासन आणि संगठन ३७ (७२.५४ %) ग्रंथालयांमध्ये धोरणात्मक निर्णय तर ३३ (६४.७० %) ग्रंथालयात अंदाजपत्रक तयार करणे कार्य पार पाडीत असतात.

## ६.३७ ग्रंथालयातील संगणकाचा वापर

**विश्लेषण**

ग्रंथालयात संगणकाचा वापर होतो कि नाही असा प्रश्न प्रश्नावलीमध्ये ग्रंथपालांना विचारला होता. याची माहिती सारणी क्र. ६.३७ मध्ये दिली आहे. यावरून असे दिसून येते कि ९६.०७ % ग्रंथालयांमध्ये संगणकाचा वापर ग्रंथालयीन कामकाजासाठी होत असल्याचे दिसून येते. तर ३.९२% ग्रंथालयामध्ये संगणकाचा वापर काही तांत्रीक अडचणीमुळे होत नसल्याचे दिसून येते.

## सारणी क्र. ६.३७

## ग्रंथालयात संगणकाचा वापर

| अ.क्र. | ग्रंथालयात संगणकाचा वापर | ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४९ | ९६.०७ |
| २ | नाही | ०२ | ३.९२ |

## आलेख क्र. ६.३७

## ग्रंथालयात संगणकाचा वापर




### अर्थनिर्वचन

वरील सारणीचा आलेख यावरून असे स्पष्ट दिसते कि, ग्रंथालयामध्ये ग्रंथालयीन कामकाजासाठी ४९ (९६.६७ %) ग्रंथालयातून संगणकाचा वापर होत आहे तर काही तांत्रिक अडचणी अभावी ०२ (३.९२ %) ग्रंथालयामध्ये संगणकाचा वापर होत असल्याचे समजते. या ग्रंथालयातील ग्रंथपालांनी लवकरच संगणकाचा वापर ग्रंथालयीन कामकाजासाठी करणार असल्याचे नमूद केले आहे.

## ६.३८ ग्रंथालय संगणकीकरण

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.३८ मध्ये ग्रंथालय संगणकीकरणाची माहिती दिली आहे. ही माहिती प्रश्नावलीमार्फत मिळाली आहे. या माहितीवरून असे निदर्शनास येते की ८४.३१ % ग्रंथालयाचे संगणकीकरण पूर्णत्वाच्या मार्गावर असल्याचे दिसते तर १५.६८% ग्रंथालयामध्ये अजूनही संगणकीकरण झालेले नाही असे दिसते. तरी आयुर्वेद ग्रंथालयांचे संगणकीकरण होणे गरजेचे आहे.

**अर्थनिर्वचन**

या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये ग्रंथालय संगणकीकरणासाठी वेगवेगळी सॉफ्टवेअर्स वापरलेली दिसून येतात. यामध्ये Autolib, Slim ई-ग्रंथालय, सोल, लिवसीस, लोकल आणि इतर Free सॉफ्टवेअरच्या माध्यमातून ग्रंथालयांनी संगणकीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**सारणी क्र. ६.३८**
**ग्रंथालय संगणकीकरण**

| अ.क्र. | ग्रंथालय संगणकीकरण | एकुण ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४३ | ८४.३१ |
| २ | नाही | ०८ | १५.६८ |

**आलेख क्र. ६.३८**
**ग्रंथालय संगणकीकरण**



## ६.३९ ग्रंथालयातील इंटरनेट सुविधा

### विश्लेषण

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने ग्रंथपालांच्या प्रश्नावलीमध्ये ग्रंथालयातील इंटरनेट सुविधा बाबत प्रश्न विचारला होता संकलीत झालेली माहिती सारणी क्र. ६.३९ मध्ये देण्यात आली आहे. या सारणीमध्ये होय व नाही मतांचे प्रमाण टक्केवारीमध्ये दिले आहे. यामध्ये असे दिसून येते की ८४.३१ % ग्रंथालयांमध्ये इंटरनेट सुविधा दिली जाते. तर १५.६८ % ग्रंथालयांमध्ये इंटरनेट सुविधा दिली जात नाही. ग्रंथपालांच्या म्हणण्यानुसार याही ग्रंथालयामध्ये इंटरनेट सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आलेख क्र. ६.३२ मध्ये प्रस्तुत माहिती आलेख स्वरूपात दिलेली आहे.

**सारणी क्र. ६.३९**

**ग्रंथालयातील इंटरनेट सुविधा**

| अ.क्र. | इंटरनेट सुविधा | एकूण ग्रंथालय संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४३ | ८४.३१ |
| २ | नाही | ०८ | १५.६८ |

**आलेख क्र. ६.३९**

**ग्रंथालयातील इंटरनेट सुविधा**



**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यावरून स्पष्ट दिसते कि, ग्रंथालयातील इंटरनेट सुविधा ही ४३ (८४.३१ %) ग्रंथालयातून दिली जाते तर ०८ (१५.६८ %) ग्रंथालयातून दिली जात नाही. तरी इंटरनेट सुविधा ही उर्वरीत ग्रंथालयातून लवकरच उपलब्ध करून देणार आहे. असे त्या ग्रंथालयातील ग्रंथपालांनी सांगितले आहे.

## ६.४० ग्रंथालयावर माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव

**सारणी क्र. ६.४०**

**ग्रंथालयावर माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव**

| अ.क्र. | घटक | होय (५१ पैकी) | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव ग्रंथालयावर पडला आहे ? | ५१ | १०० |
| २ | सेवक वर्गावर परिणाम | | |
| | १) सेवक वर्ग कमी झाला | ०१ | १.९६ |
| | २) आहे तेवढाच राहिला | ४८ | ९४.११ |
| | ३) वाढला आहे. | ०२ | ३.९२ |
| ३ | वाचक वर्गावर परिणाम | | |
| | १) वाचक वर्ग वाढला | ३७ | ७२.५४ |
| | २) आहे तेवढाच राहिला | १४ | २७.४५ |
| | ३) कमी झाला | -- | -- |
| ४ | ग्रंथसंग्रहावरील परिणाम | | |
| | १) ग्रंथसंग्रह वाढला | ३८ | ७४.५० |
| | २) कमी झाला | -- | -- |
| | ३) आहे तेवढाच राहिला | १३ | २५.४९ |
| ५ | सेवांच्या दर्जावर परिणाम | | |
| | १) दर्जात सुधारणासाठी | ४३ | ८४.३१ |
| | २) घट झाली | ०१ | १.९६ |
| | ३) दर्जा आहे तेवढाच राहिला | ०७ | १३.७२ |

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने ग्रंथपालांच्या प्रश्नावलीमध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव आपल्या ग्रंथालयावर पडला आहे काय ? असा विचारण्यात आला होता. याची माहिती सारणी क्र. ६.४० मध्ये देण्यात आली आहे. यानुसार १०० % ग्रंथालयावर आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव पडला आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे वाचकवर्ग वाढला आहे असे ७२.५४ % ग्रंथपालांचे मत आहे तर २७.४५ % ग्रंथपालाच्या मते वाचक वर्ग आहे तेवढाच राहिला आहे. सेवांच्या दर्जात ८४.३१ % वाढ झाली आहे. तर १.९६ % ग्रंथपालांच्या मते सेवांच्या दर्जात घट झाली आहे व १३.७२ % ग्रंथपालांच्या मते सेवांचा दर्जा आहे तेवढाच राहिला आहे.

**अर्थनिर्वचन**

वरील सारणीवरून बहुतांशी ग्रंथालयावर माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव पडल्याचे स्पष्ट होते. माहिती संगणकाच्या माध्यमातून साठवून ठेवणेची सोय झालेने ग्रंथालयातील माहिती वाचकांना जलद गतीने मिळण्यास मदत झाली आहे. यामुळे ग्रंथालयातील वाचक वर्ग ग्रंथालयाकडे आकर्षीत होवून वाचकांची संख्या वाढली आहे. परिणामी ग्रंथ संग्रहात वाढ झाल्याचे दिसून येते. तसेच ग्रंथालयीन सेवांच्या दर्जावर परिणाम होवून सेवांच्या दर्जात सुधारणा झाली आहे असे मत ४३ (८४.३१ %) ग्रंथालयातील ग्रंथपालानी मांडले आहे. तर ०१ (१.९६) ग्रंथालयातील ग्रंथपालांनी सांगितले कि तांत्रीक बिघाड वारंवार होत असलेने सेवांचा दर्जा घटला आहे असे वाटते तर ०७ (१३.७२ %) ग्रंथालयामध्ये सेवांचा दर्जा आहे तेवढाच राहिला आहे असे मत आहे एकूणच ८४.५१ ग्रंथालयातून सेवांच्या दर्जात माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे वाढ झाल्याचे दिसते.

## ६.४१ ग्रंथालय सॉफ्टवेअर, डिजीटल फॉर्ममध्ये रूपांतर

**विश्लेषण**

संकलीत झालेल्या माहितीच्या अनुषंगाने लायब्ररी सारणी क्र. ६.४१ मध्ये ग्रंथालयातील सॉफ्टवेअर व डिजीटल फार्म विषयीची माहिती दिली आहे. ही माहिती प्रश्नावलीव्दारे व मुलाखतीच्या माध्यमातून मिळाली आहे ३९.२१ % ग्रंथालयामध्ये लायब्ररी सॉफ्टवेअरचा वापर होत असल्याचे दिसून येते. तर २९.२१ % ग्रंथालयामध्ये ग्रंथालय सॉफ्टवेअरचा वापर होत नाही हे दिसून येते. २५.४९ % ग्रंथालयामध्ये ग्रंथालयातील

वाचनसाहित्याचे डिजीटल फॉर्ममध्ये रूपांतर करण्याचे चालू आहे तर ७४.५० % ग्रंथालयामध्ये अजूनही ग्रंथालयीन वाचनसाहित्याचे डिजीटल फॉर्ममध्ये अजूनही ग्रंथालयीन वाचनसाहित्याचे डिजीटल फॉर्मध्ये रूपांतर केले नसल्याचे निदर्शनास येते.

**सारणी क्र. ६.४१**

**ग्रंथालय सॉफ्टवेअर, डिझीटल फॉर्ममध्ये रूपांतर**

| अ.क्र. | घटक | होय | नाही | शेकडा प्रमाण (होय) |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथालयात Library Software आहे काय ? | ३१ | २० | ६०.७८ |
| २ | ग्रंथालयातील साहित्याचे डिजीटल फॉर्ममध्ये रूपांतर केले आहे का ? | १३ | ३८ | २५.४९ |

**आलेख क्र. ६.४०**

**ग्रंथालय सॉफ्टवेअर डिजीटल फॉर्म**




**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यावरून असे स्पष्ट दिसते कि, ३१ (६०.७८ %) लायब्ररी सॉफ्टवेअर वापर होत आहे तर २० (३९.२१ %) ग्रंथालयातून होत नसल्याचे दिसून येते. परंतु ग्रंथालयात सॉफ्टवेअरचा वापर करण्याच्या दिशेने प्रयत्न चालू आहेत. वेगवेगळ्या कारणांनी ग्रंथालय सॉफ्टवेअर वापराबाबत अडचणी आहेत त्या दूर करून ग्रंथालयीन

कामकाजासाठी सॉफ्टवेअरचा वापर करण्यात येणार आहे, जसे तेथील ग्रंथपालांनी नमूद केले आहे. तसेच १३ (२५.४९ %) ग्रंथालयातील साहित्याचे डिजीटल फॉर्ममध्ये रूपांतर केले आहे. तरी ज्या ग्रंथालयांमध्ये ग्रंथालय सॉफ्टवेअरचा वापर होत नाही त्या ग्रंथालयांतून सॉफ्टवेअरचा वापर व्हावा असे संशोधकाचे मत आहे. आज बाजारात विविध स्वरूपात Open Source Software उपलब्ध आहेत.

## ६.४२ ग्रंथालयीन सेवा-सुविधा

**विश्लेषण**

ग्रंथपालांच्या प्रश्नावलीमध्ये ग्रंथालयामार्फत कोणकोणत्या सेवा दिल्या जातात असा प्रश्न विचारण्यात आला होता. संकलित झालेल्या सर्व प्रश्नावलीतील सदर प्रश्नाबाबतची माहिती संकलित करून सारणी क्र. ६.४२ मध्ये दिलेली आहे. प्रस्तुत माहिती आलेख क्र. ६.४१ मध्ये आलेख स्वरूपात दिली आहे.

**सारणी क्र. ६.४२**

**ग्रंथालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा**

| अ.क्र. | सेवांचा प्रकार | होय मते | नाही मते | शेकडा प्रमाण (होय) |
|---|---|---|---|---|
| १ | संदर्भ आणि माहिती सेवा | ५१ | ०० | १०० |
| २ | देवघेव सेवा | ५१ | ०० | १०० |
| ३ | प्रतिलिपी सेवा | ३५ | १६ | ६८.६२ |
| ४ | सी. ए. सर्व्हीस | ३८ | १३ | ७४.५० |
| ५ | एस. डी. आय. सेवा | ३७ | १४ | ७२.५४ |
| ६ | निर्देशित व सारसेवा | ४२ | ०९ | ८२.३५ |
| ७ | भाषांतर सेवा | ७ | ४४ | १३.७२ |
| ८ | कात्रण सेवा | ५१ | ०० | १०० |
| ९ | सारांश सेवा | ११ | ४० | २१.५६ |
| १० | ग्रंथालय सहकार | १३ | ३८ | २५.४९ |
| ११ | प्रलेखन सेवा | ०९ | ४२ | १७.६४ |
| १२ | Online सेवा | ४३ | ०८ | ८४.३१ |
| १३ | OPAC सेवा | ३७ | १४ | ७२.५४ |

या सारणीमध्ये होय मते, नाही मते व होय मतांचे प्रमाण टक्केवारीमध्ये दिले आहे. यामध्ये संदर्भ आणि माहिती सेवा, देवघेव सेवा आणि कात्रण सेवा ५१ (१०० %) ग्रंथालयातून पुरविल्या जातात. तर ३८ (७४.५० %) ग्रंथालयातून CAS सेवा व ३७ (७२.५४ %) ग्रंथालयातून SDI सेवा दिली जाते.

**अर्थनिर्वचन**

यामध्ये आलेख क्र. ६.४१ नुसार सर्व ग्रंथालयातून १०० प्रमाणात संदर्भ आणि माहिती सेवा, देवघेव सेवा, आणि कात्रण सेवा दिल्या जातात. ७२.५४ % ग्रंथालयातून SDI सेवा दिल्या जातात तर ७४.५० % ग्रंथालयातून CAS सेवा दिली जाते. ७२.५४ % ग्रंथालयातून OPAC सेवा दिली जाते व ६८.६२ % ग्रंथालयातून प्रतीलिपी सेवा दिली जाते. तसेच ८४.३१ % ग्रंथालयातून Online सेवा दिल्या जातात. कात्रण सेवा ही ग्रंथालयात ५१ (१०० %) दिली जाते. कात्रण सेवा ही सुविधा उपलब्ध असलेने त्या-त्या आयुर्वेद महाविद्यालयातील ठळक घडामोडीची म्हणजे अभ्यासक्रमावर आधारीत कात्रणे, संस्थेसंबंधीची महत्वाची बातमीपत्रे, काही आवश्यक लेखसंग्रह कात्रण संग्रहामुळे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचला जातो. OPAC सेवेमुळे ग्रंथालयीतल वाचनसाहित्याची माहीती ग्रंथालयांच्या वाचाकंना मिळते यावरून असे दिसून येते कि ग्रंथालयामार्फत वाचकांना दिल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या सेवांमुळे ग्रंथालयाचे महत्व वाढून वाचक ग्रंथालयांकडे आकर्षीत होतात.

**आलेख क्र. ६.४१**

**ग्रंथालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा**



## ६.४३ ग्रंथालयात वापरली जाणारी साधने

**विश्लेषण**

ग्रंथालयीन सेवा गुणवत्तापुर्ण व जलद गतीने होण्यासाठी आपण खालीलपैकी कोणत्या साधनांचा उपयोग करता असा प्रश्न विचारला होता. त्याची संकलित माहिती सारणी क्र. ६.४३ मध्ये दिली आहे. या सारणीमध्ये एकूण होय मते नाही मते होय मतांचे प्रमाण टक्केवारी मध्ये आहे. संगणक, दुरध्वनी, मोबाईल, झेरॉक्स, प्रिंट, प्रोजेक्टर यांचा ग्रंथालयीन सेवा गुणवत्तापूर्ण व जलद गतीने होण्यासाठी सर्व ग्रंथालयामध्ये १०० % वापर केला जातो. तर ८४.३१ % ग्रंथालयांमध्ये इंटरनेट, इमेल या सुविधांचा वापर करणेसाठी ग्रंथालयात संगणकांचा वापर केला जातो. यानुसार आलेख क्र. ६.३५ मध्ये माहिती आलेख स्वरूपात दिली आहे.

**सारणी क्र. ६.४३**

**ग्रंथालयात वापरली जाणारी साधने**

| अ.क्र. | साधनांचे प्रकार | होय मते | नाही मते | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | संगणक | ५१ | ०० | १०० |
| २ | इंटरनेट | ४३ | ०८ | ८४.३१ |
| ३ | ई-मेल | ४३ | ०८ | ८४.३१ |
| ४ | फॅक्स | ४१ | १० | ८०.३९ |
| ५ | दुरध्वनी | ५१ | ०० | १०० |
| ६ | मोबाईल | ५१ | ०० | १०० |
| ७ | झेरॉक्स | ५१ | ०० | १०० |
| ८ | प्रिंट | ५१ | ०० | १०० |
| ९ | प्रोजेक्टर | ५१ | ०० | १०० |
| १० | अन्यसाधने | २० | ३१ | ३९.२१ |

**आलेख क्र. ६.४२**

**ग्रंथालयात वापरण्यात येणाऱ्या साधनांचे प्रमाण**




**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यामधील माहितीनुसार ग्रंथालयामध्ये ग्रंथालयीन सेवा गुणवत्तापूर्ण व जलद गतीने देण्यासाठी संगणक, इंटरनेट ई-मेल, दुरध्वनी, मोबाईल, झेरॉक्स या साधनांचा वापर केला जातो. तसेच प्रिंटर, प्रोजेक्टर व अन्य आवश्यक साधनांचाही वापर केला जातो. या साधनांचा माध्यमातून ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात.

## ६.४४ ग्रंथालयात ग्रंथालय नेटवर्क, ई-बुक्स, ई-जर्नलचा वापर

**सारणी क्र. ६.४४**

**ग्रंथालयात ग्रंथालय नेटवर्क, ई-बुक्स, ई-जर्नलचा वापर**

| अ.क्र. | घटक | होय मते | नाही मते | शेकडा प्रमाण (होय) |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथालयात ग्रंथालय नेटवर्कची सोय आहे का ? | ४३ | ०८ | ८४.३१ |
| २ | ग्रंथालयात ई-बुक्सचा वापर केला जातो का ? | ३१ | २० | ६०.७८ |
| ३ | ई-बुक्स खरेदी केली जातात का ? | ०३ | ४८ | ५.८८ |
| ४ | मोफत ई-बुक्सचा वापर | ३१ | २० | ६०.७८ |
| ५ | मोफत ई-जर्नलसचा वापर | ३९ | १२ | ७६.४७ |
| ६ | वर्गणी स्वरूपातील ई-जर्नलस | ०९ | ४२ | १७.६४ |

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.४४ मध्ये ग्रंथालयातील ग्रंथालय नेटवर्क ई-बुक्स व ई-जर्नलचा वापर याविषयीची माहिती दिली आहे. ग्रंथपालांच्या प्रश्नावलीमध्ये ग्रंथालयात ग्रंथालय नेटवर्कची होय आहे काय ? असा प्रश्न विचारण्यात आला होता. यानुसार ८४.३१ % ग्रंथालयामध्ये ग्रंथालय नेटवर्कची सोय आहे. तर १५.६८ % ग्रंथालयामध्ये नसल्याचे दिसून येते. ६०.७८ % ग्रंथालयामध्ये मोफत ई-बुक्सचा वापर केला जातो. तसेच ७६.४७ % ग्रंथालयातून मोफत ई-जर्नलसचा वापर होत आहे. व वर्गणी स्वरूपातील ई-जर्नल्स वापर १७.६४ % ग्रंथालयांमध्ये होत आहे. ती माहिती आलेख क्र. ६.३६ मध्ये आलेख स्वरूपात दाखविली आहे.

**आलेख क्र. ६.४३**

**ग्रंथालयात ई-बुक्स, ई-जर्नलसचा वापर**




**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेखावरून ग्रंथालयातील ग्रंथालय नेटवर्क, ई-बुक्सचा वापर व मोफत ई-जर्नलसचा वापर तसेच वर्गणी स्वरूपातील ई-जर्नल्स विषयीची माहिती मिळते. बहुतांश ग्रंथालयामध्ये म्हणजे ४३ (८४.३१ %) ग्रंथालयातून ग्रंथालय नेटवर्कची सोय आहे. तसेच ३१ (६०.७८ %) ग्रंथालयातून मोफ ई-बुक्सचा वापर केला जातो. तसेच ७६.४७ % ग्रंथालयात मोफत ई-जर्नल्सचा वापर होत आहे. व वर्गणी स्वरूपातील ई-जर्नलस वापर १७.६४ % ग्रंथालयामध्ये होत आहे.

## ६.४५ ग्रंथालयीन सेवा-सुविधा देण्यातील अडचणी

**सारणी क्र. ६.४५**

**ग्रंथालयीन सेवा देताना येणाऱ्या अडचणी**

| अ.क्र. | येणाऱ्या अडचणी | होय मते | नाही मते | होय प्रमाण % मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | सेवकवर्ग कमी पडतो | ०७ | ४४ | १३.७२ |
| २ | साधनांची कमतरता | ०४ | ४७ | ७.८४ |
| ३ | संवाद कमी होतो | ०४ | ४७ | ७.८४ |
| ४ | वेळ कमी पडतो | ०० | ०० | ०० |
| ५ | अन्य अडचणी | ०३ | ४८ | ५.८८ |

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.४५ मध्ये ग्रंथालयातील सेवा सुविधा देताना ज्या अडचणी येतात याबाबतची माहिती देण्यात आली आहे. ही माहिती प्रश्नावलीच्या साहाय्याने मिळाली आहे. या अनुषंगाने ग्रंथालयीन सेवा देताना १३.७२ % ग्रंथालयामध्ये सेवकवर्ग कमी पडतो व अन्य अडचणी येतात व ७.८४ % ग्रंथालयामध्ये ग्रंथालयीन सेवा-सुविधा देण्यासाठी साधनांची कमतरता आहे हे दिसून येते. प्रस्तुत माहिती आलेख क्र. ६.३७ मध्ये आलेख स्वरूपात दिली आहे.

**आलेख क्र. ६.४४**

**ग्रंथालयीन सेवा देताना येणाऱ्या अडचणी**



**अर्थनिर्वचन**

आलेख क्र. ६.३७ मध्ये ही माहिती आलेख स्वरूपात दाखविली आहे. ग्रंथालयीन सेवा देताना संवाद कमी होतो याचे प्रमाण ०४ (७.८४ %) आहे म्हणजे जवळजवळ ४७ (९२.१५ %) संवाद घडून येण्याचे प्रमाण आहे. असा संवाद वाचकांना हवी ती माहिती मिळणेसाठी फायदेशीर ठरतो. ०७ (१३.७२ %) ग्रंथालयामध्ये सेवा देण्यासाठी सेवकवर्ग कमी आहे. तसेच ०४ (७.८४ %)ग्रंथालयामध्ये सेवा देताना साधनांची कमतरता आहे. यासाठी ग्रंथालयीन सेवा देताना निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करून ग्रंथालयीन सेवा द्याव्यात.

**सारणी क्र. ६.४५.१**

**अडचणी दूर करण्यासाठी उपाय योजना**

| अ.क्र. | उपाययोजना | होय | नाही | होय प्रमाण % मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | सेवकवर्ग वाढवावा लागले | ०७ | ४४ | १३.७२ |
| २ | वेळेचे योग्य नियोजन करावे | ०९ | ४२ | १७.६४ |
| ३ | उपयुक्त साधने उपलब्धता | ०८ | ४३ | १५.६८ |
| ४ | संप्रेषण माध्यमांचा उपयोग | १९ | ३२ | ३७.२५ |
| ५ | अन्य उपाययोजना | ०३ | ४८ | ५.८८ |

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.४५.१ मध्ये ग्रंथालयातील अडचणी दूर करणेसाठी उपाययोजना बाबतची माहिती दिली आहे. यावरून ६.३८ हा आलेख तयार केला आहे. यावरून असे दिसते कि ०७ (१३.७२ %) ग्रंथपालांचे मत असे आहे कि ग्रंथालयातील अडचणी दूर करणेसाठी सेवकवर्ग वाढवावा लागेल. प्रस्तुत माहिती आलेख क्र. ६.४५ मध्ये आलेख स्वरूपात दिली आहे.

**आलेख क्र. ६.४५**

**अडचणी दूर करण्यासाठी उपाय योजना**




**अर्थनिर्वचन**

ग्रंथालयातील अडचणी दूर करणेसाठी ०९ (१७.६९ %) ग्रंथपाल म्हणतात कि वेळेचे योग्य नियोजन केले पाहिजे. ग्रंथालयांसाठी आवश्यक असणारी उपयुक्त साधनसामुग्री उपलब्ध असेल तर ग्रंथालयातील अडचणी दूर होण्यास मदत होते. असे मत ०८ (१५.६८ %) ग्रंथपालांनी मांडले आहे. १९ (३७.२६%) ग्रंथपाल म्हणतात की संप्रेषण माध्यमांचा उपयोग केला पाहिजे तसेच ०३ (५.८८ %) जणांचे म्हणजे आहे कि अन्य उपाययोजनांचा अवलंब करून देखील ग्रंथालयातील सेवा देण्यामधील अडचणी दूर करता येतात.

## ६.४६ ग्रंथालयातील माहितीचे जतन व प्रसारण

**सारणी क्र. ६.४६**

**ग्रंथालयातील माहितीचे जतन व प्रसारण**

| अ.क्र. | उपाययोजना | होय मते | नाही मते | होय प्रमाण % मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | माहितीची जलद गतीने देवाण घेवाण | ५१ | ०० | १०० |
| २ | वाचकांचा वेळ वाचला का ? | ५१ | ०० | १०० |
| ३ | सेवकांचा वेळ वाचला का ? | ४७ | ०४ | ९२.१५ |
| ४ | वाचकांना दर्जेदार सेवा | ५१ | ०० | १०० |
| ५ | वाचकांना हव्या त्या ठिकाणी सेवा | ४९ | ०२ | ९६.०७ |

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.४६ मध्ये ग्रंथालयातील माहितीचे जतन व प्रसारणाच्या सुविधांमध्ये झालेल्या वाढीमुळे वाचकांना जे लाभ झाले याविषयीची माहिती दिली आहे. प्रस्तुत माहिती आलेख क्र. ६.३१ मध्ये आलेख स्वरूपात दिली आहे.

**आलेख क्र. ६.४६**

**ग्रंथालयातील माहितीचे जतन व प्रसारण**




**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यावरून ग्रंथालयतील माहितीचे जतन व प्रसारण केल्याने माहितीची जलद गतीने देवाण घेवाण होत असे ५१ (१०० %) ग्रंथपालाचे मत आहे. तर ४७ (९२.१५ %) ग्रंथालयामध्ये सेवकांचा वेळ वाचला जातो. ५१ (१०० %) ग्रंथालयातून वाचकांना दर्जेदार सेवा दिली जाते.

## ६.४७ ग्रंथालयातील देवाण घेवाण

**सारणी क्र. ६.४७**

**ग्रंथालयातील देवाण घेवाण**

| अ.क्र. | घटक | होय मते | नाही मते | होय प्रमाण % मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | ब्राऊन देवाणघेवाण पध्दती | ४४ | ०७ | ८६.२७ |
| २ | नेवार्क पध्दती | -- | -- | -- |
| ३ | रजिस्टरनोंद पध्दती | -- | -- | -- |
| ४ | संगणकीकृत पध्दती | ०७ | -- | १३.७२ |
| ५ | इतर पध्दतीत | -- | -- | -- |

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.४७ मध्ये ग्रंथालयातील देवाणघेवाण कोणत्या पध्दतीने केली जाते याविषयीची माहिती दिली आहे. यावरून ६.४० हा ग्रंथालयातील देवाण-घेवाण आलेख तयार केला आहे. यावरून असे दिसून येते कि ४४ (८६.२७ %) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये ग्रंथ देवघेव ही ब्राऊन देवाण घेवाण पध्दतीने होते. तर संगणकीकृत पध्दतीने ०७ (१३.७२ %) ग्रंथालयांमध्ये ग्रंथ देवघेव होते.

**आलेख क्र. ६.४७**

**ग्रंथालयातील देवाण घेवाण**



**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यावरून असे स्पष्ट दिसते कि, ४४ (८६.२७ %) ग्रंथालयातून ग्रंथांची देवाण-घेवाण ही ब्राऊन देवघेव पध्दतीने केली जाते तर ०७ (१३.७२ %) ग्रंथालयातून ही देवाण-घेवाण संगणकीकृत पध्दतीने केली जाते.

### ६.४७.१ ग्रंथालयातील बुक-बँक योजना

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.४७.१ मध्ये आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील बुक-बँक योजना संबंधी माहिती दिली आहे. आलेख क्र. ६.४१ मध्ये ती माहिती आलेख स्वरूपात दाखविणेत आली आहे. यानुसार ४३. (८४.३१ %) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात बुक-बँक योजना कार्यान्वीत आहे तर ०८ (१५.६७ %) ग्रंथालयात कार्यान्वीत नसल्याचे दिसते.

**सारणी क्र. ६.४७.१**

**ग्रंथालयातील बुक-बँक योजना**

| अ.क्र. | बुक-बँक योजना | ग्रंथालये | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४३ | ८४.३१ |
| २ | नाही | ०८ | १५.६८ |

**आलेख क्र. ६.४८**

**ग्रंथालयातील बुक बँक योजना**



**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यावरून ग्रंथालयातील बुक-बँक योजनेविषयीची माहिती मिळते ४३ (८४.३१) ग्रंथालयातून बुक-बँक योजना चालू आहे. तर ०८ (१५.६८) ग्रंथालयातून ही सेवा उपलब्ध नाही. तरी उर्वरीत ग्रंथालयांनी बुक-बँक योजना सुरू करून विद्यार्थ्यांना ह्या योजनेचा लाभ मिळवून द्यावा. तसेच या योजनेचा लाभ काही ठराविक विद्यार्थ्यांनाच होतो तो सर्वांना उपलब्ध करून द्यावा.

## ६.४८ ग्रंथालयातील वर्गीकरण पध्दती

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.४८ मध्ये ग्रंथालयातील वर्गीकरण पध्दती विषयीची माहिती दिली आहे. आलेख क्र. ६.४२ मध्ये ती माहिती आलेख स्वरूपात दिली आहे.

**सारणी क्र. ६.४८**

**ग्रंथालयातील वर्गीकरण पध्दती**

| अ.क्र. | घटक | होय मते | नाही मते | होय प्रमाण % मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | दशांश | ४८ | ०३ | ९४.११ |
| २ | व्दिबिंदू | ०२ | ४९ | ३.९२ |
| ३ | यु. डी. सी. | -- | -- | -- |
| ४ | सब्जेक्ट वर्गीकरण | -- | -- | -- |
| ५ | लायब्ररी ऑफ कॉग्रेस | -- | -- | -- |
| ६ | नॅशनल लायब्ररी ऑफ मेडीसीन | ०१ | ५० | १.९६ |

**अर्थनिर्वचन**

यानुसार ४८ (१९.११ %) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात दशांश वर्गीकरण पध्दतीचा अवलंब केला जातो. तर ०२ (३.९२) ग्रंथालयात व्दिबिंदू वर्गीकरण पध्दतीचा वापर केला जातो. तसेच ०१ (१.९६ %) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून नॅशनल लायब्ररी ऑफ मेडीसीन या वर्गीकरण पध्दतीचा वापर केला जातो. यावरून असे दिसून येते की, दशांश वर्गीकरण पध्दतीचा वापर हा जास्तीत जास्त आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात होत आहे. व्दिबिंदू वर्गीकरण पध्दती व नॅशनल लायब्ररी ऑफ मेडीसीन या दोन्ही वर्गीकरण पध्दतीचा वापर कमी होत असल्याचे दिसून येते.

**आलेख क्र. ६.४९**

**ग्रंथालयातील वर्गीकरण पध्दती**




## ६.४९ ग्रंथालयातील तालिकीकरण

### विश्लेषण

सारणी क्र. ६.४९ मध्ये आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथसाहित्याच्या तालीकीकरणाविषयी माहिती दिली आहे. आलेख क्र. ६.५० मध्ये ती माहिती आलेख स्वरूपात दिली आहे.

**सारणी क्र. ६.४९**

**ग्रंथालयातील तालिकीकरण**

| अ.क्र. | घटक | होय मते | नाही मते | होय प्रमाण % मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथसाहित्याचे तालीकीकरण | ५१ | -- | १०० |
| २ | ए. ए. सी. आर. पध्दतीने | ५१ | -- | १०० |
| ३ | सी. सी. पध्दती | ०२ | ४९ | १.०२ |
| ४ | संगणकीकृत तालीका | ०४ | ४७ | २.०४ |
| ५ | इतर | -- | -- | -- |

**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यानुसार ५१ (१०० %) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालायतून ग्रंथसाहित्याचे तालिकीकरणाची सोय आहे. ५१ (१०० %) ग्रंथालयातून तालीकीकरणासाठी ए. ए. सी. आर. (AACR) या पध्दतीचा वापर होत आहे. ०२ (१.०२ %) आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून सी. सी. पध्दतीचा वापर होत आहे तसेच ०४ (०२.०४ %) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात संगणकीकृत तालीका आहे. यावरून असे निदर्शनास येते कि AACR या तालिकीकरण पध्दतीच्या जास्तीत जास्त ग्रंथालयात वापर करीत असल्याचे दिसून येते. सी. सी. व संगणकीकृत तालीकेचा वापर कमी होत असल्याचे दिसते.

**आलेख क्र. ६.५०**

**ग्रंथालयातील तालिकीकरण**




## ६.५० ग्रंथालयातील ग्रंथपरिगणन

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.५० मध्ये आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथसाहित्याच्या ग्रंथ परीगणना विषयीची माहिती दिली आहे. आलेख क्र. ६.५१ मध्ये ती माहिती आलेख स्वरूपात दिली आहे.

**सारणी क्र. ६.५०**

**ग्रंथालयातील ग्रंथपरिगणन**

| अ.क्र. | घटक | होय | नाही | होय प्रमाण % मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | दाखल नोंद वही | २७ | २४ | ५२.९४ |
| २ | बार कोडींग | ०३ | -- | ५.८८ |
| ३ | सेल्फ लिस्ट | -- | -- | -- |
| ४ | दाखल अंक सीटस | २१ | -- | ४१.१७ |
| ५ | इतर पध्दतीने | -- | -- | -- |

**आलेख क्र. ६.५१**

**ग्रंथालयातील ग्रंथपरिगणन**




**अर्थनिर्वचन**

यानुसार २७ (५२.९४ %) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून ग्रंथ परीगणनासाठी दाखल नोंद वहीचा वापर होतो तर ०३(५.८८ %) ग्रंथालयातून बार कोडींगच्या साहाय्याने ग्रंथपरीगणन होते. २१ (४१.७१ %) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये दाखल अं सीटसच्या साहाय्याने ग्रंथपरीगणन केले जाते. यावरून असे दिसून येते कि ग्रंथपरीगणनासाठी दाखल नोंद वही व दाखल अंक सीटसचा वापर जास्तीत जास्त होत आहे. तर बार कोडींगच्या साहाय्याने कमी ग्रंथपरीगणन होत आहे. सध्या ग्रंथालयात बारकोडींगला महत्व आले आहे.

## ६.५१ ग्रंथालय वेळ, कार्यसमाधान आव्हाने आणि कामे

**विश्लेषण**

आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथपालांना ग्रंथालय वेळेविषयी त्यांचे कार्यसमाधान आव्हाने आणि कामे याविषयी मुलाखत अनुसुचीमध्ये प्रश्न विचारला होता. त्याची माहिती सारणी क्र. ६.५१ मध्ये देण्यात आलेली आहे.

**सारणी क्र. ६.५१**

**ग्रंथालय वेळ, कार्यसमाधान, आव्हाने आणि कामे.**

| अ.क्र. | घटक | होय | नाही | होय प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथालय वेळ योग्य आहे का ? | १९ | ०३ | ८६.३६ |
| २ | कार्यसमाधान मिळते का ? | १७ | ०५ | ७७.२७ |
| ३ | ग्रंथालयामध्ये नवीन आव्हाने आहेत का ? | | | |
| | १) ग्रंथालय संगणकीकरण | ०८ | १४ | ३६.३६ |
| | २) सेवकांना संगणक साक्षरतेची गरज | १७ | ०५ | ७७.२७ |
| | ३) वाचकांना संगणकामार्फत सेवा देणे | १६ | ०६ | ७२.७२ |
| ४ | ग्रंथालयातील कोणकोणती कामे करावी लागतात | | | |
| | १) ग्रंथ देवाण घेवाण | ०७ | १५ | ३१.८१ |
| | २) संदर्भ सेवा | ०९ | १३ | ४०.९० |
| | ३) ग्रंथालयातील सर्व दैनंदिन कामे | ०७ | १५ | ३१.८१ |

(मुलाखतीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे)

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथालयांना ग्रंथालयाची वेळ, ग्रंथपालांचे कार्यसमाधान तसेच ग्रंथालयातील आव्हाने आणि कामाविषयी मुलाखतीमध्ये प्रश्न विचारण्यात आले होते. त्याची माहिती सारणी क्र. ६.५१ मध्ये देण्यात आली आहे. या माहितीवरून असे दिसून येते की, जवळजवळ (८६.३६ %) ग्रंथपालांचे असे म्हणणे आहे की ग्रंथालयांची वेळ योग्य आहे. योग्य वेळेत ग्रंथालय खुले असलेने ग्रंथालयातील येणाऱ्या वाचकांना त्यांना हवी ती सेवा त्यांच्या वेळेनुसार पुरविणे सोयीचे झाले आहे. तर (१३.६३ %) ग्रंथपालाचे मत नाही असे समजते. तसेच ग्रंथपालांना ग्रंथालयातील

केलेल्या कामकाजाविषयी कार्यसमाधान मिळते का असा प्रश्न विचारला होता. त्यावरून (७७.२७ %) ग्रंथपालांनी ग्रंथालयातील कामकाजाबाबत कार्यसमाधान मिळते असे मत व्यक्त केले आहे. त्यांनी केलेल्या दैनंदिन कामकाजातून त्यांना हवे असे कार्यसमाधान होत आहे. त्यामुळे त्यांना कामाचा आनंद घेता येतो. त्यांचे समाधान होते. त्यांनी केलेल्या कामाचा योग्य मोबदला त्यांना मिळतो. तर (२२.७२ %) ग्रंथपालाचे मत नाही असे समजते. त्यांना त्यांचे कामातून कार्यसमाधान होत नाही. तसेच ग्रंथालयासमोर काही नवीन आव्हाने आहेत काय असा प्रश्न विचारला होता. त्यानुसार ग्रंथालय संगणकीकरणाबाबत (३६.३६ %) ग्रंथपालाचे मत असे आहे की, त्यांना ग्रंथालयाचे पुर्णतः संगणकीकरण गरजेचे आहे. ग्रंथालयातील सेवा-सुविधा संगणकाच्या सहाय्याने देण्यासाठी ग्रंथालयातील विविध विभागातील दैनंदिन काम सुरळीत पार पाडणेसाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण एक मोठे आव्हान आहे. त्याचबरोबर या सेवा देण्यासाठी ग्रंथालयातील सेवकांना संगणकांचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. (७७.२७ %) ग्रंथपालांचे असे मत आहे की ग्रंथालयातील सेवा संगणकाच्या सहाय्याने देण्यासाठी ग्रंथालयातील सेवक संगणक प्रशिक्षित असले पाहिजेत. त्यासाठी सेवकांना प्रोत्साहित करून त्यांना संगणकाचे प्रशिक्षण दिले गेले पाहिजे.

यामुळे ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांना संगणकाचा सहाय्याने सेवा दिल्यामुळे वाचकांचा वेळ वाचून त्यांना हावी ती माहिति योग्य वेळेत उपलब्ध होईल. (७२.७२ %) ग्रंथपालांनी असे मत व्यक्तकेले आहे की त्यांच्या ग्रंथालयातून वाचकांना संगणकाचा सहाय्याने सेवा दिल्या जातात. त्यांना ई-मेल, इंटरनेट, ई-जर्नल सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. याचबरोबर ग्रंथालयात ग्रंथपालांना कोणकोणती कामे करावी लागतात असे विचारले असता (३२.८१ %) ग्रंथालांनी ग्रंथालयात ग्रंथ देवाण घेवाण करावी लागते असे मत व्यक्त केले आहे. तसेच (४०.९० %) ग्रंथपालांनी ग्रंथालयात संदर्भ सेवा द्यावी लागते असे म्हटले आहे. तसेच (३१.८१ %) ग्रंथपालांना ग्रंथालयातील सर्व दैनंदिन कामे करावी लागतात असे दिसून येते.

**अर्थनिर्वचन**

वरील सारणी वरून असे दिसून येते की, आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथपालांनी ग्रंथालयातील वेळेविषयी कार्यसमाधाना बाबत सकारात्मक मत नोंदविले आहे. (८६.३६%) ग्रंथपालांनी वेळे विषयी सकारात्मक मत नोंदविले आहे. तसेच (७७.२७ %) ग्रंथपालांनी कार्यसमाधाना बाबत मत व्यक्त केले आहे. त्याचे कार्यसमाधान होत आहे. त्यांना

त्यांनी केलेल्या कामाचा आनंद घेता येत आहे. ग्रंथालयीन सेवा सुविधा संगणकाच्या सहाय्याने देण्यासाठी ग्रंथालयातील सेवकांना संगणक प्रशिक्षित केले पाहिजे असे त्यांचे मत आहे. संगणकाच्या सहाय्याने ग्रंथालयातील सेवा दिल्याने वाचकांचा व सेवकांचा वेळ वाचण्यास मदत होईल असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. तसेच (४०.९० %) ग्रंथपालांना संदर्भ सेवा देण्याचे काम करावे लागते. आणि (३१.८१ %) ग्रंथपालांना ग्रंथालयातील सर्व कामे करावी लागतात.

## ६.२.१ अध्यापक प्रश्नावली माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची जास्तीत जास्त माहिती मिळविण्यासाठी महाविद्यालयातील अध्यापकांना प्रश्नावली वितरीत करण्यात आली होती. त्या प्रश्नावली वेळेत भरून प्राप्त झाल्या. प्रश्नावली मार्फत संकलीत केलेली माहिती देण्यात आलेली आहे.

ग्रंथालयात येणाऱ्या वाचकापैकी अध्यापक वाचक घटकाला ग्रंथालयात अनन्य साधारण महत्व आहे. अभ्यासक्रमासाठी उपयुक्त वाचन साहित्य, ग्रंथसंपदा, नियतकालिके इत्यादी विविध विषयातील निवडक व योग्य माहिती हा घटक विद्यार्थ्यांना देत आहे. त्यानुसार मार्गन टेबलच्या सहाय्याने नमुना निवड केली आहे व एकूण १७३९ अध्यापकापैकी ३१५ अध्यापकांना प्रश्नावल्या पाठविण्यात आल्या होत्या. त्यापैकी ५१ आयुर्वेद महाविद्यालयातून २५५ (८०.९५ %) प्रश्नावली भरून मिळाल्या त्या प्रश्नावलीतून मिळालेली माहिती पुढे दिली आहे.

## ६.२.२ अध्यापकांचा ग्रंथालय वापर व भेट देण्याचे कारण

**विश्लेषण**

प्रस्तुत प्रश्नावलीत अध्यापक वाचकांनी ग्रंथालयांचा वापर, ग्रंथालयाचा वापर करीत असल्यास किती दिवसातून भेटी देता याची माहिती विचारली होती. ती माहिती अध्यापक वाचकांनी व्यवस्थीत भरून सहकार्य केलेले आहे. संकलीत केलेली माहिती सारणी क्र. ६.५२ मध्ये देण्यात आलेली आहे. ग्रंथालयाला दररोज भेट देण्याचे प्रमाण १०३ (४०.३९ %) इतके आहे. ग्रंथ देवघेवीसाठी प्रमाण १०० % आहे.

**सारणी क्र. ६.५२**

**अध्यापकांचा ग्रंथालय वापर व भेट**

| अ.क्र. | घटक | होय २५५ पैकी | होय प्रमाण % मध्ये |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथालयाचा वापर | | |
| | १.१) ग्रंथालयास भेट दररोज | १०३ | ४०.३९ |
| | १.२) दोन दिवसातून एकदा | ५७ | २२.३५ |
| | १.३) याहून अधिक | ९५ | ३७.२५ |
| २ | ग्रंथालयास भेट देण्याचे कारण | | |
| | १) ग्रंथ देवघेवीसाठी | २५५ | १०० |
| | २) संदर्भग्रंथ पाहणेसाठी | १०७ | ४१.९६ |
| | ३) नियतकालीके वाचणेसाठी | १३३ | ५२.१५ |
| | ४) नवीन ग्रंथ पाहणेसाठी | १६१ | ६३.१३ |
| | ५) अभ्यासिकेत बसणेसाठी | १२३ | ४८.२३ |
| | ६) इतर कारणांसाठी | १९ | ७.४५ |

## ६.२.३ ग्रंथालयातील वाचन साहित्यविषयक माहिती

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावलीत अध्यापकांना ग्रंथालयातील वाचन साहित्याची माहिती कशा प्रकारे मिळते अशी विचारणा केली आहे. ती संकलित केलेली माहिती सारणी क्र. ६.५३ मध्ये देण्यात आली आहे. आलेख क्र. ६.५२ मध्ये ही माहिती आलेख स्वरूपात दाखविली आहे.

**सारणी क्र. ६.५३**

**वाचनसाहित्य विषयक माहिती**

| अ.क्र. | वाचनसाहित्य माहिती | होय | होय प्रमाण % मध्ये |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथसूची | ०८ | ३.१३ |
| २ | तालिकेमार्फत | २३ | ०९.०१ |
| ३ | सेवकामार्फत | २१७ | ८५.०९ |
| ४ | संगणकामार्फत | ०७ | २.७४ |

**आलेख क्र. ६.५२**

**वाचनसाहित्य विषयक माहिती**




**अर्थनिर्वचन**

यावरून असे दिसून येते की २१७ (८५.०९ %) आयुर्वेद ग्रंथालयातील वाचनसाहित्याची माहिती ही अध्यापकांना वाचाकंना ही ग्रंथालयातील सेवकांकडून मिळते. तर ०७ (०२.७४ %) ग्रंथालयातील वाचनसाहित्याची माहिती ही संगणकामार्फत मिळत असल्याचे दिसून येते. तसेच २३ (०९.०१ %) ग्रंथालयातील वाचन साहित्याची माहिती तालीकेमार्फत मिळते हे निदर्शनास येते.

## ६.२.४ ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रहाबाबत समाधानी

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावलीत अध्यापकांना आपण ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रहाबाबत समाधानी आहात का अशी विचारणा केली होती. त्याची संकलीत केलेली माहिती सारणी क्र. ६.५४ मध्ये देण्यात आली आहे. आलेख क्र. ६.५३ मध्ये ही माहिती आलेख स्वरूपात दिलेली आहे.

**सारणी क्र. ६.५४**

**वाचन साहित्य संग्रहाबाबत समाधानी**

| अ.क्र. | घटक | होय | नाही | होय प्रमाण % मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | वाचनसाहित्य संग्रहाबाबत समाधानी आहात का ? | १८६ | ६९ | ७२.९४ |
| २ | नियतकालीक संग्रहाबाबत समाधानी आहात का ? | १५९ | ९६ | ६२.३५ |

**आलेख क्र. ६.५३**

**वाचन साहित्य संग्रहाबाबत समाधानी**




**अर्थनिर्वचन**

यावरून असे दिसून येते कि १८६ (७२.९४ %) अध्यापकांच्या मते वाचनसाहित्यसंग्रह समाधानकारक आहे तर ६९ (२७.०५ %) अध्यापकांच्या मते वाचनसाहित्य कमी प्रमाणात असल्याचे दिसते. तसेच १५९ (६२.३५ %) अध्यापकांच्या मते नियतकालीक संग्रह हा समाधानकारक आहे तर ९६ (३७.६४ %) ग्रंथालयातील नियतकालीक संग्रह हा पुरेशा प्रमाणात नसल्याचे दिसून येते.

आलेख क्र. ६.५४

नियतकालीक संग्रह




## ६.२.५ ग्रंथालय समिती सदस्य

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावलीमध्ये अध्यापकांना आपण ग्रंथालय समितीचे सदस्य आहात का ? असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यानुसार संकलित माहिती सारणी क्र. ६.५५ मध्ये देण्यात आली आहे. यावरून अशी माहिती मिळते की ५३.७२ % अध्यापक हे ग्रंथालय समितीचे सदस्य आहेत तर ४६.२७ % अध्यापक हे ग्रंथालय समितीचे सदस्य नसल्याचे दिसते.

सारणी क्र. ६.५५

ग्रंथालय समिती सदस्य

| अ.क्र. | घटक | होय | नाही | होय प्रमाण % मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथालय समिती सदस्य आहात का ? | १३७ | ११८ | ५३.७२ |

**आलेख क्र. ६.५५**

**ग्रंथालय समिती सदस्य**




**अर्थनिर्वचन**

वरील सारणी व आलेख यावरून अध्यापकांच्या ग्रंथालय समितीमध्ये सभासद असल्याची माहिती मिळते. यावरून असे स्पष्ट दिसते कि, १३७ (५३.७२ %) अध्यापक ग्रंथालय समितीचे सदस्य आहेत. तर ११८ (४६.२७ %) अध्यापक हे ग्रंथालय समितीचे सदस्य नसल्याचे दिसून येते.

## ६.२.६ अध्यापकांचा सेवाबाबत अभिप्राय

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावलीमध्ये अध्यापकांना ग्रंथालयातील सेवाबाबत अभिप्राय नोंदवा असा प्रश्न विचारला होता. त्यानुसार संकलित माहिती सारणी क्र. ६.५६ मध्ये देण्यात आली आहे. आलेख क्र. ६.५९ मध्ये ही माहिती आलेख स्वरूपात दिली आहे.

## सारणी क्र. ६.५६

## वाचकांचा सेवाबाबत अभिप्राय

| अ.क्र. | घटक | समाधानकारक | सर्वसाधारण | असमाधानकारक | समाधानकारक टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | देवघेव | १९४ | ६१ | - | ७६.०७ |
| २ | संदर्भ सेवा | १६७ | ८४ | ०४ | ६५.४९ |
| ३ | भाषांतर सेवा | ३५ | - | २२० | १३.७२ |
| ४ | इंटरनेट सेवा | १६१ | १३ | ८१ | ६३.१३ |
| ५ | ई-डेटाबेस | ६५ | - | १९० | २५.४९ |
| ६ | संगणकीकरण | २१५ | - | ४० | ८४.३१ |
| ७ | प्रतिलिपी सेवा | १७५ | - | ८० | ६८.६२ |
| ८ | ई-बुक | १३९ | - | ११६ | ५४.५० |
| ९ | ई-जर्नल | २१५ | - | ४० | ८४.३१ |

## आलेख क्र. ६.५६

## अध्यापकांचा सेवाबाबत अभिप्राय



**अर्थनिर्वचन**

यावरून असे दिसून येते की ७६.०७ % ग्रंथालयातील देवघेव सेवा ही समाधानकारक असल्याचे दिसून येते तर ६५.४९ % ग्रंथालयामध्ये संदर्भ सेवाही समाधानकारक असल्याचे दिसून येते तर १.५६ % ग्रंथालयामध्ये असमाधानकारक असल्याचे दिसून येते. ८४.३१ % ग्रंथालयांमध्ये इंटरनेट सेवा समाधानकारकरित्या दिली जात असल्याचे निदर्शनास येते.

## ६.२.७ ग्रंथालयातील उणिवा

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने अध्यापकांना प्रश्नावलीमध्ये आयुर्वेद ग्रंथालयात कोणत्या उणीवा जाणवतात असा प्रश्न विचारला होता. त्या अनुषंगाने अशी माहिती मिळते की काही ग्रंथालयामध्ये पुरेसा प्रमाणात ग्रंथालय सेवक नाहीत. त्यामुळे ग्रंथालयीन सेवा सुरळीतपणे पार पडत नाहीत. तसेच आयुर्वेद ग्रंथालयामध्ये संगणकीकरणाचे अतिशय महत्वाचे काम पूर्ण झालेले कारण ते पूर्ण केले पाहिजे. ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांना त्यांना अभ्यासीकेची प्रशस्त व्यवसथा नाही ती केली पाहिजे. ग्रंथालयातून बुक-बँक सुविधा सर्वांना उपलब्ध केली पाहिजे. आज ती ठराविक विद्यार्थ्यांनाच देत असल्याचे निदर्शनास येते. तसेच ग्रंथालयात स्थानिक तसेच राष्ट्रीय नियतकालीका बरोबरच आंतरराष्ट्रीय नियतकालीकेची विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी उपलब्ध करून द्यावीत त्यातून विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय माहिती मिळण्यास मदेत होते.

## ६.२.८ ग्रंथालयातील सुधारणा

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी स्पष्ट केलेल्या प्रश्नावलीमध्ये अध्यापकांना संशोधकाने ग्रंथालयात कोणत्या सुधारणा व्हाव्यात अशी विचारणा केली होती. यावरून अशी माहिती मिळते की अध्यापकाचे सर्वसाधारण मत असे आहे की प्रथम ग्रंथालयीन सेवा चांगल्या प्रकारे देता येणेसाठी ग्रंथालयामध्ये CCIM Stafing Pottern प्रमाणे सेवक वर्ग नेमण्यात यावा. तसेच आधुनिक पध्दतीने ग्रंथालयांचे संगणकीकरण करण्यात यावे. ग्रंथालयामध्ये संगणकाचा वापर करण्यात यावा. त्यामुळे इंटरनेट सेवा चांगल्या प्रकारे देता येईल. ग्रंथालयामध्ये ई-

जर्नल, ई-बुक सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावी. ग्रंथालयामध्ये वाचकांसाठी अभ्यासिकेची योग्य व्यवस्था करावी. ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह हा अधिकाधिक असावा विद्यार्थ्यांना उपयुक्त असावा.

## ६.२.९ ग्रंथालयाविषयी अध्यापकांचे मत

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावलीमध्ये अध्यापकांना प्रश्न विचारला होता. त्याची माहिती अशी की काही अध्यापकांचे ग्रंथालयाविषयी मत असे आहे की महाविद्यालयीन ग्रंथालयात काही बाबतीत अपूर्णता असूनही ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या सेवांमुळे आम्ही समाधानी आहोत. तसेच ग्रंथालयामुळेच विद्यार्थ्यांना हवे ते वाचनसाहित्य नियतकालीकांमधून नवीन माहिती उपलब्ध होत असते. तर काही अध्यापकांचे मत असे आहे की ग्रंथालयांचा वाचकांसाठी भरपूर उपयोग करता यावा म्हणून ग्रंथालयांची वेळ वाढवावी. ग्रंथालयांचे पूर्णतः संगणकीकरण करावे. ग्रंथसंग्रह अधिकाधिक असावा ग्रंथालयातून विद्यार्थ्यांना आधुनिक सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात ग्रंथालये सुस्थितीत असावीत.

## ६.३.१ विद्यार्थी प्रश्नावलीवरून प्राप्त माहितीचे विश्लेषण व सादरीकरण

**विश्लेषण**

“ महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास” ह्या संशोधन विषयाचा अभ्यास करीत असताना विद्यार्थी वाचक हा महत्वाचा घटक असतो. त्यासाठी महाविद्यालयांतील ग्रंथालयातील विद्यार्थ्यांना प्रश्नावली भरणेसाठी दिल्या होत्या. त्यातील ७०.८६ % विद्यार्थ्यांनी प्रश्नावलीस प्रतिसाद दिला व उर्वरीत २९.१३ % विद्यार्थ्यांनी प्रश्नावलीस प्रतिसाद दिला नाही. मॉर्गन टेबलच्या सहाय्याने नमुना निवड करून एकूण ५३०९ विद्यार्थ्यांपैकी ३५७ विद्यार्थ्यांना प्रश्नावल्या पाठविल्या होत्या त्यापैकी २५३ प्रश्नावली भरून मिळाल्या

## ६.३.२ विद्यार्थ्यांची प्राथमिक माहिती

**विश्लेषण**

विद्यार्थी वाचकांची प्राथमिक माहिती समजणेसाठी व प्रतीसादात्मक स्वरूप आजमावण्यासाठी त्याचे नाव व कोणत्या वर्गात शिकत आहे. कोणत्या वर्षात शिकत आहे. ही माहिती विचारण्यात आली होती. ही सर्व माहिती सर्वच्या सर्व विद्यार्थ्यांनी भरली आहे म्हणजेच ७०.८६ % विद्यार्थ्यांनी व्यवस्थीत भरली आहे. २९.१३ विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला नाही.

## ६.३.३ ग्रंथालयाचा वापर

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावलीमध्ये विद्यार्थी वाचाकांना तुम्ही ग्रंथालयाचा वापर करता का असा प्रश्न विचारला होता. ती माहिती सारणी क्र. ६.५७ मध्ये देण्यात आली आहे. आलेख क्र. ६.५४ मध्ये ही माहिती आलेख स्वरूपात दिलेली आहे.

**सारणी क्र. ६.५७**

**ग्रंथालयाचा वापर**

| अ.क्र. | घटक | होय मते (२५३ पैकी) | नाही मते | होय प्रमाण % मध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथालयाचा वापर | २२९ | २४ | ९०.५१ |
| २ | ग्रंथालयाची वेळ सोयीस्कर आहे का ? | १८९ | ६४ | ७४.७० |
| ३ | ग्रंथालयास नियमित भेट | १७७ | ७६ | ६९.९६ |
| ४ | दोन दिवसातून एकदा | २०३ | ४७ | ८०.२३ |
| ५ | आठवड्यातून एकदा | १२६ | १२७ | ४९.८० |
| ६ | कधीच नाही | -- | -- | -- |

आलेख क्र. ६.५७

ग्रंथालयाचा वापर




**अर्थनिर्वचन**

यावरून असे दिसून येते की ९०.५१ % विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा वापर करतो असे मत व्यक्त केले आहे. ग्रंथालयास नियमित भेटीविषयी विद्यार्थ्यांना विचारले असता ६९.९६ % विद्यार्थी ग्रंथालयास नियमित भेट देतात असे निदर्शनास येते. ८०.२३ % विद्यार्थी ग्रंथालयास दोन दिवसातून एकदा भेट देतात. ग्रंथालयाची वेळेविषयी विचारले असता ७४.७० % विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाची वेळ सोयीस्कर आहे असे सांगीतले आहे.

## ६.३.४ ग्रंथालयांना भेटी देण्यामागचे प्रयोजन प्रस्तुत

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावलीत आपण ग्रंथालयाला भेटी देण्यामागचे कारण काय ? असा प्रश्न विचारला होता. त्याची संकलित माहिती सारणी क्र. ६.५८ मध्ये देण्यात आली आहे. आलेख क्र. ६.५८ मध्ये ही माहिती आलेख स्वरूपात दिलेली आहे.

**सारणी क्र. ६.५८**

**ग्रंथालय भेटीचे प्रयोजन**

| अ.क्र. | ग्रंथालय भेटीचे कारण | प्रतिसाद | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथ देव घेवीसाठी | ८० | ८० % |
| २ | संदर्भ ग्रंथ घेवीसाठी | ६७ | ६७ % |
| ३ | नियतकालीके वाचणेसाठी | ५९ | ५९ % |
| ४ | अभ्यासिकेत बसणेसाठी | ७१ | ७१ % |

**अर्थनिर्वचन**

वाचक ग्रंथालयात वेगवेगळ्या उद्देशाने येत असतात. प्रत्येक वाचकांचा ग्रंथालयात येण्याचा उद्देश वेगळा असू शकतो. विद्यार्थ्यांचा ग्रंथालयात जाण्याचा हेतू कोणता आहे. हे पुढील माहिती वरून प्राप्त होते. यावरून असे निदर्शनास येते की ८० % विद्यार्थी हे ग्रंथ देवघेवीसाठी ग्रंथालयास भेट देत असतात. तर संदर्भग्रंथ पाहणेसाठी ६७ % विद्यार्थी येत असतात. ५९ % विद्यार्थी हे नियतकालीक वाचणेसाठी व ७१ % विद्यार्थी हे अभ्यासिकेत बसण्यासाठी येत असतात.

**आलेख क्र. ६.५८**

**ग्रंथालय भेटीचे प्रयोजन**



### ६.३.५ ग्रंथालयात स्वतंत्र अभ्यासिका आहे काय? नियतकालीके/वर्तमानपत्रे वाचतात काय?

### विश्लेषण

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावलीमध्ये विद्यार्थ्यांना ग्रंथालयात स्वतंत्र अभ्यासिका आहे काय ? असा प्रश्न विचारला होता. याची माहिती सारणी क्र. ६.५९ मध्ये देण्यात आलेली आहे. तसेच ही माहिती आलेख क्र. ६.५९ मध्ये आलेख स्वरूपात देण्यात आलेली आहे.

**सारणी क्र. ६.५९**

| अ.क्र. | तपिशल | होय | नाही | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | स्वतंत्र अभ्यासिका | २२७ | २६ | ७० % |
| २ | नियतकालीके वाचन | १९३ | ६० | ८४ % |
| ३ | वर्तमानपत्रे वाचन | १७६ | ७७ | ७८ % |

**आलेख क्र. ६.५९**

**स्वतंत्र अभ्यासिका, नियतकालीके व वर्तमानपत्रे**




### अर्थनिर्वचन

ग्रंथालयाची इतर माहिती मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना नियतकालीके व वर्तमानपत्रे नियमित वाचता का याबाबत विचारणा केली आहे. यावर स्वतंत्र अभ्यासिका आहे असे मत २२७ विद्यार्थ्यांनी नोंद केली आहे तर नाही असे मत १०.२७ % विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले आहे. तर नियतकालीके वाचन करणारे विद्यार्थी ७६.२८ % तर २३.७१ % वाचकांनी नाही असे मत व्यक्त केले आहे. याची संकलीत माहिती सारणी क्र. ६.५९ मध्ये देण्यात आली आहे. प्रस्तुत ६९.५६ % विद्यार्थी वर्तमानपत्रे वाचणेसाठी ग्रंथालयाचा वापर करतात.

## ६.३.६ ग्रंथालय सेवक वर्गाचे सहकार्य इंटरनेट / ई-जर्नल सुविधा

**विश्लेषण**

प्रस्तुत प्रश्नावलीत ग्रंथालयातील सेवक वर्गाच्या सहकार्याची माहिती जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील सेवक वर्गाचे सहकार्य योग्य प्रकारे मिळते का असा प्रश्न विचारला होता. तसेच ग्रंथालयात इंटरनेटची सुविधा मिळते का ? आणि ई-जर्नल सुविधा वापरता काय ? अशी विचारणा करण्यात आली होती. सारणी क्र. ६.६० मध्ये ही माहिती दिलेली आहे. आलेख क्र. ६.५७ मध्ये ही माहिती आलेख स्वरूपात दिलेली आहे.

**सारणी क्र. ६.६०**

**ग्रंथालय सेवक वर्गाचे सहकार्य, इंटरनेट / ई-जर्नल सुविधा**

| अ.क्र. | घटक | होय | नाही | होय प्रमाण % |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथालय सेवक वर्ग सहकार्य | २२९ | २४ | ९०.५१ % |
| २ | इंटरनेट सुविधा | १८९ | ६४ | ७४.७० % |
| ३ | ई-जर्नल सुविधा | १४७ | १०६ | ५८.१० % |

**आलेख क्र. ६.६०**

**ग्रंथालय सेवक वर्ग सहकार्य, इंटरनेट आणि ई-जर्नल सुविधा**




**अर्थनिर्वचन**

यावरून ग्रंथालय सेवकवर्गाचे सहकार्य मिळते असे ९०.५१ % विद्यार्थी वाचकांनी नोंद केली आहे. तर सर्वात कमी ९.४८ % विद्यार्थ्यांनी आपले मते व्यक्त केलेले नाही. तसेच ७४.७० % विद्यार्थ्यांनी इंटरनेट सुविधा वापरता असे नमूद केले आहे. तर ५८.१० % विद्यार्थी ई-जर्नल सुविधा वापरतात असे दिसून येते. याची माहिती सारणी क्र. ६.६० मध्ये देण्यात आली आहे.

## ६.३.७ ग्रंथालयातील वाचन साहित्य विषयक माहिती

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावलीमध्ये ग्रंथालयातील वाचन साहित्य विषयक माहिती आपणाला कशी मिळते अशी विचारणा केली होती. संकलीत केलेली माहिती सारणी क्र. ६.६१ मध्ये देण्यात आली आहे. आलेख क्र. ६.५८ मध्ये ही माहिती आलेख स्वरूपात दिलेली आहे.

**सारणी क्र. ६.६१**

**वाचन साहित्य विषयक माहिती**

| अ.क्र. | तपशील | विद्यार्थी संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथ प्रदर्शनाव्दारे | ०७ | ०२.७६ % |
| २ | नवीन ग्रंथ सूची | ०४ | ०१.५८ % |
| ३ | तालिकेव्दारे | १३ | ०५.१३ % |
| ४ | सेवकाकडून | २२६ | ८९.३२ % |
| ५ | संगणकामार्फत | ०३ | ०१.१८ % |
| ६ | इतर पध्दतीने | -- | ० % |

**आलेख क्र. ६.६१**

**वाचन साहित्य विषयक माहिती**



**अर्थनिर्वचन**

या माहितीवरून असे दिसून येते की ग्रंथालयातील वाचनसाहित्याची ०२.७६ % माहिती ही ग्रंथ प्रदर्शनाव्दारे होते तर ०५.१३ % माहिती तालीकेव्दारे होते. ८९.३२ % वाचनसाहित्याची माहिती ही सेवकांकडून होते. तसेच ०१.५८ % वाचनसाहित्याची माहिती ही नवीन ग्रंथसूचीव्दारे होते. तर संगणकामार्फत ०१.१८ % वाचनसाहित्याची माहिती मिळते.

## ६.३.८ ग्रंथालयातील पुस्तक पेढी योजना

**विश्लेषण**

सारणी क्र. ६.६२ मध्ये आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील पुस्तक पेढी योजने विषयीची माहिती दिलेली आहे. आलेख क्र. ६.६२ मध्ये ही माहिती आलेख स्वरूपात दिलेली आहे.

**सारणी क्र. ६.६२**

**ग्रंथालयातील पुस्तक पेढी योजना**

| अ.क्र. | तपशील | विद्यार्थी संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १५९ | ६२.८४ % |
| २ | नाही | ९४ | ३७.१५ % |

**आलेख क्र. ६.६२**

**ग्रंथालयातील पुस्तक पेढी योजना**



**अर्थनिर्वचन**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावलीमध्ये विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तक पेढी योजनेचा लाभ होता का असा प्रश्न विचारला होता. त्याला १५९ विद्यार्थांनी होय असे उत्तर दिलेले आहे. त्याचे शेकडा प्रमाणे ६२.८४ % इतके आहे. तर नाही म्हणून ९४ विद्यार्थ्यांनी आपले मत नोंदवले आहे. त्याचे शेकडा प्रमाण ३७.१५ % आहे. यावरून असे दिसून येते की, पुस्तक पेढी योजनेचा लाभ हे ६२.८४ % विद्यार्थी घेत आहेत. काही विद्यार्थ्यांनी सांगितले कि या योजनेचा लाभ सर्वांना मिळाला पाहिजे काही ठराविक विद्यार्थ्यांनाच या योजनेचा लाभ मिळतो. तरी सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून या योजनेचा लाभ मिळावा असे नमूद केले आहे.

## ६.३.९ ग्रंथ खरेदी बाबतचे मत

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने विद्यार्थ्यांना प्रश्नावलीमध्ये ग्रंथालयात ग्रंथखरेदीसाठी तुमचे मत विचारात घेतले जाते का ? असा प्रश्न विचारला होता. त्यास ७९ (३१.२२ %) इतक्या विद्यार्थ्यांनी होय असे उत्तर दिले आहे. तर १७४ (६८.७७ %)विद्यार्थ्यांनी आपले मत नाही असे व्यक्त केले आहे. यावरून ग्रंथ खरेदीमध्ये विद्यार्थ्यांचे मत विचारात घेतले जात नाही असे स्पष्ट होते.

ग्रंथालयात ग्रंथखरेदी ही वाचकाच्या मागणीनुसार करणे आवश्यक असते कारण त्यामुळे प्रत्येक ग्रंथास वाचक मिळतो अनावश्यक ग्रंथांची खरेदी टाळली जाते.

## ६.३.१० ग्रंथालयात सुचना / तक्रार पेटी

**विश्लेषण**

प्रस्तुत प्रश्नावलीमध्ये विद्यार्थ्यांना ग्रंथालयात वाचकांच्या काही सूचना किंवा तक्रारी असल्यास त्या वेळीच माहीत व्हाव्यात यासाठी सूचना पेटी आहे काय ? असा प्रश्न विचारला होता. यापैकी १५७ (६२.०५ %) विद्यार्थ्यांनी होय असे उत्तर दिलेले आहे तर (४०.८५ %) वाचकांनी नाही असे नमूद केले आहे.

### ६.३.११ ग्रंथालयातील सुधारणा

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावलीत विद्यार्थ्यांना ग्रंथालयात काही सुधारणा आवश्यक आहेत का? याबद्दल तुमचे मत व्यक्त करा अशी विचारणा केली होती. त्याची संकलित केलेली माहिती सारणी क्र. ६.६३ मध्ये देण्यात आली आहे. आलेख क्र. ६.६० मध्ये प्रस्तुत माहिती आलेख स्वरूपात देण्यात आलेली आहे.

**सारणी क्र. ६.६३**

**ग्रंथालयातील सुधारणा**

| अ.क्र. | घटक | होय | नाही | होय प्रमाण % |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथालय संगणकीकरण | १७७ | ७६ | ६९.९६ % |
| २ | मुक्तव्दार पध्दत | २०३ | ५० | ८०.२३ % |
| ३ | विलंबशुल्क माफ | २३९ | १४ | ९४.४६ % |
| ४ | इंटरनेट सेवा | १५७ | ९६ | ६२.०५ % |
| ५ | स्वच्छतागृहे | १३३ | १२० | ५२.५६ % |
| ६ | पिण्याचे पाणी | १६९ | ८४ | ६६.७९ % |
| ७ | नियतकालीक स्वतंत्र विभाग | १७९ | ७४ | ७०.७५ % |

**आलेख क्र. ६.६३**

**ग्रंथालयातील सुधारणा**



**अर्थनिर्वचन**

प्रस्तुत आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील विद्यार्थी वाचकांनी ग्रंथालय सुधारणाबाबत ग्रंथालय संगणकीकरण, मुक्तव्दार पध्दत, विलंबशुल्क माफ, इंटरनेट सेवा, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, नियतकालीकांचा स्वतंत्र विभाग, याची व्यवस्था व्हावी असे नमूद केले आहे. ते खालील सारणी वरून स्पष्ट होते.

## ६.३.१२ ग्रंथालयीन सेवा बाबतचे मत

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावलीत विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील सेवा याबद्दल तुमचे मत सांगा असा प्रश्न विचारला होता. त्यानुसार संकलीत झालेली माहिती खालील प्रमाणे आहे.

१) सध्याची ग्रंथालयाची वेळ वाढवून देऊन रात्री वेळेपर्यंत अभ्यासिका उपलब्ध करून द्यावी असे ६० % वाचकांनी आपले मत व्यक्त केले आहे.

२) ग्रंथालयांचे पुर्णता संगणकीकरण व्हावे असे ७० % विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

३) ग्रंथालयात मुक्तव्दार पध्दती वापरावी असे ७७ % विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

४) ग्रंथालयात विलंब शुल्क आकारले जाऊ नये असे ८१ % विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

५) ग्रंथालयाजवळ स्वच्छतागृहे असावीत असे ७८ % विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

६) ग्रंथालयात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी असे ८७ % विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

७) ग्रंथालय हे वातानुकुलित व्हावे असे ५९ % विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

८) ग्रंथालयात इंटरनेट सेवा उपलब्ध करून द्यावी असे ९० % विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

## समारोप

सदर संशोधन विषयासाठी निवडलेल्या ५१ आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून ग्रंथपाल प्रश्नावली, ग्रंथपाल मुलाखत अनुसूची, अध्यापक प्रश्नावली तसेच विद्यार्थी प्रश्नावली चा वापर करून ग्रंथालयातील माहितीचे संकलन केले होते. ही संकलीत केलेली माहिती सारणी स्वरूपात देवून त्याखाली आलेखाव्दारे या माहितीचे स्पष्टीकरण दिले आहे. यावरून असे दिसून येते कि आयुर्वेद महाविद्यालयामध्ये वाचकांना सेवा-सुविधा देण्याची महत्वाची भूमिका ग्रंथालये पार पाडीत आहेत.

सदर माहितीचा आधार घेवून पुढील प्रकरण क्र. ७ मध्ये निष्कर्ष काढून शिफारशी केल्या आहेत.

प्रकरण ७ वे

# सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

## ७.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात संशोधन प्रबंधाचा थोडक्यात सारांश घेण्यात आला आहे. तसेच संशोधन उद्दिष्टांच्या अनुषंगाने एकत्रीत निष्कर्ष व शिफारशी दिल्या आहेत.

'महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास' या संशोधन विषयाच्या निवडीपासूनच सदर संशोधन कार्यास सुरूवात झाली आहे. प्रकरण एक मध्ये प्रस्तावना, प्रकरण दोनमध्ये संशोधन साहित्याचा पुर्वाभ्यास दिला आहे. तर सदर संशोधन आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांशी सबंधित असल्याने प्रकरण तीन मध्ये आयुर्वेदाचा इतिहास व विकास हे प्रकरण लिहिले. प्रकरण चारमध्ये आयुर्वेद ग्रंथालयाची संकल्पना आणि कार्ये दिली आहेत. प्रकरण पाच मध्ये आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील नवे प्रवाह दिले आहेत. यात माहिती संकलनासाठी निवडलेल्या नमुन्यातील ग्रंथालयांची माहिती दिली आहे. प्रकरण सहामध्ये माहिती संकलन आणि विश्लेषण यामध्ये तथ्यांचे वर्गीकरण, सांकेतिकीकरण, सारणीकरण करून संख्याशास्त्रीय विश्लेषण केले आहे. आशय विश्लेषण केले आहे. आणि शेवटी या प्रकरणामध्ये सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी दिल्या आहेत.

संशोधनातील उद्दिष्टाला अनुसरून तयार केलेल्या प्रश्नावली, मुलाखत, अनुसुची या संशोधन साधनांच्या आधारे व निरीक्षण तंत्राचा वापर करून व प्राथमिक आणि दुय्यम माहिती स्त्रोतांचा उपयोग करून माहितीचे संकलन सदर संशोधकाने केले आहे. त्याचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून त्याआधारे या प्रकरणात संशोधनासबंधी निष्कर्ष मांडलेले आहेत. निष्कर्षाच्या आधारे आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयात सुधारणा होवून त्यांचा विकास होण्यासाठी आणि हे संशोधन कार्य पुढे अव्याहतपणे चालू राहणेसाठी शिफारशी मांडून भविष्यवेध घेतला आहे. संशोधकाला संशोधन कार्य करताना अनेक प्रक्रियांमधून जावे लागले. विविध अडथळे व समस्यांना तोंड देत उत्तरे शोधत पुढे जावे लागते. याबाबतचे अनुभव कथन सारांशरूपाने संशोधनासंबंधी सारांश या मुद्यांमध्ये केले आहे.

शेवटी समारोपामध्ये संशोधकाचे संशोधनासंबंधीत थोडक्यात मत, अनुभव लिहिला आहे. या संशोधन कार्यासाठी अनेक संदर्भ ग्रंथ, संशोधन प्रबंध, अहवाल, नियतकालीके यांचा आधार घेतला आहे. त्यांची वर्णानुक्रमे संदर्भ-सूची शेवटी दिलेली आहे.

थोडक्यात, संशोधकाने हाती घेतलेल्या संशोधन कार्याद्वारा जे निष्कर्ष निघतात किंवा त्या विषयाशी सबंधित संशोधन केले जाते त्याबद्दल काही सूचना आणि शिफारशी संशोधकाला सुचवाव्याशा वाटतात. संशोधनात निष्कर्ष काढणे आणि शिफारशी नोंद करणे हे अतिशय महत्वाचे काम अंतिम टप्यातील या प्रकरणांमध्ये केले आहे.

## ७.२ संशोधनासबंधी सारांश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील (पीएच. डी.) विद्यावाचस्पतीच्या या शोध प्रबंधासाठी सदर संशोधकाने ''महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास'' हा विषय निवडला.

या संशोधनातील प्रकरणनिहाय संशोधन सारांश पुढीलप्रमाणे आहे.

**प्रकरण एक : प्रस्तावना**

या प्रकरणात सुरूवातीलाच प्रस्तावना दिलेली आहे. या संशोधनाकडे सदर संशोधक कसा वळला याची माहिती दिली. संशोधन समस्येची निवड, महत्व तसेच संशोधनाची उद्दिष्टे दिली आहेत. ही उद्दिष्टे व्यापक स्वरूपाची, संशोधनातून ठोस निष्कर्षापर्यंत जाण्यासाठी उपयोगी असणारी आहेत. संशोधनाच्या निष्कर्षाप्रत जाण्यासाठी गृहीतकांची मदत घेतली. संशोधन विषयाच्या व्याप्ती व मर्यादा ठरवून घेतली. संशोधनाची संशोधन पध्दती, कार्यपध्दती तसेच अहवाल लेखनाविषयी माहिती दिली.

**प्रकरण दोन : संशोधन पुर्वाभ्यास व वाचन साहित्य शोध.**

संशोधनाला अनुसरून विविध उपयुक्त ग्रंथ, नियतकालिके यांचा आधार घेतला. तसेच पीएच. डी. प्रबंध, शोधनिबंध अहवाल व इंटरनेटवरून माहिती घेत शोधण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधन कार्याला पुर्णत्वास नेण्यासाठी, पीएच. डी. चे एम. फिल. चे व इतर संशोधन लघुप्रबंध अहवाल व संशोधन पेपरचे वाचन केले आहे. त्यांची माहिती घेवून सायटेशन दिले. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व इतर संदर्भ ग्रंथांचे, नियतकालीकांचे वाचन करून पुर्वाभ्यासात संदर्भ दिले आहेत.

**प्रकरण तीन :- आयुर्वेदाचा इतिहास व विकास.**

या प्रकरणामध्ये आयुर्वेद अर्थ व स्वरूप आयुर्वेदाचा आढावा आयुर्वेदाचा इतिहास, उदय व विकास, आयुर्वेदाची सद्यस्थिती, आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचे उच्च

शिक्षणातील महत्व, तसेच महाराष्ट्रातील वैद्यकिय शिक्षण यांची माहिती दिली आहे. आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयाची माहिती घेतली आहे.

**प्रकरण चार :- आयुर्वेद ग्रंथालये आणि त्याचे कार्य.**

या प्रकरणात प्रस्तावना, ग्रंथालय संकल्पना, ग्रंथालयांचे प्रकार, आयुर्वेद ग्रंथालयाची संकल्पना त्यांची कार्ये या विषयी माहिती दिली आहे.

**प्रकरण पाच :- आयुर्वेद ग्रंथालयातील नवे प्रवाह.**

या प्रकरणांमध्ये आयुर्वेद ग्रंथालयातील माहिती सेवा, माहिती प्रक्रिया, साहित्य संग्रह, साहित्य संग्रहाचे व्यवस्थापन, आयुर्वेद ग्रंथालयातील नवे प्रवाह आयुर्वेद ग्रंथपालाकडे आवश्यक कौशल्य, ग्रंथापालाना करावी लागणारी कामे यांचा आढावा घेतला आहे. या ग्रंथालयातील काही ग्रंथालयांना भेटी देऊन ग्रंथपालांची मुलाखत घेतली आहे. प्रश्नावल्या भरून घेतल्या आहेत काही ग्रंथालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून असहभागी स्वरूपाचे निरीक्षण केले.

**प्रकरण सहा :- माहितीचे संकलन, विश्लेषण व सादरीकरण.**

माहितीचे विश्लेषण केल्याशिवाय वस्तुस्थितीचा बोध होत नाही. संकलीत केलेली माहिती ही विस्कळीत स्वरूपाची असते. त्यासाठी माहितीचे विश्लेषण केले जाते. या प्रकरणात संशोधकाने प्रश्नावली, मुलाखती, निरीक्षणे याव्दारे माहितीचे संकलन सारणी स्वरूपात दिले आहे. संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही प्रकारे केले आहे. विश्लेषणाखाली अर्थनिर्वचन केले आहे. प्रस्तुत संशोधनात माहितीचे सादरीकरण योग्य होण्यासाठी गणितिय व सांख्यिकी तंत्राचा वापर केला आहे. व त्यानुसार योग्य निष्कर्ष व शिफारशी नोंदविल्या आहेत.

**प्रकरण सात :- सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी.**

या प्रकरणामध्ये संशोधकाने संकलित केलेल्या माहितीच्या व तथ्यांच्या शास्त्रीय विश्लेषणातून निष्कर्ष काढले आहेत. हे निष्कर्ष वस्तुनिष्ठपणे मांडले आहेत. संशोधन कार्याचा सबंधित ग्रंथपालांना उपयोग होण्यासाठी शिफारशी केल्या आहेत. ज्ञानाच्या एका बिंदूपासून सुरू झालेले संशोधन दुसऱ्या बिंदूपर्यंत येऊन थांबले आहे. या संशोधनातून संशोधनास काही मर्यादा पडतात. संशोधनाच्या अनुषंगाने इतर समस्यांना स्पर्श करून उत्तरे शोधता येत नाहीत. यासाठी पुढे संशोधन कार्य सुरू राहणेसाठी, नवीन संशोधकांना संशोधन

विषयाचा उपयोग होण्यासाठी भविष्यवेध मांडला आहे. यामुळे पुढील संशोधनास योग्य दिशा मिळणार आहे. अपूर्ण विषयाबाबतचे संशोधन करणे शक्य होणार आहे.

**संदर्भसूची**

प्रस्तुत संशोधन कार्यात जेथे-जेथे तात्वीक सैदधांतिक आधार संशोधनासाठी मिळाला आहे अशा संदर्भ ग्रंथांचा, नियतकालीकांचा, संशोधन प्रबंध, लघु शोधप्रबंध, वेबसाईटसचा उल्लेख सदर संदर्भसूचीमध्ये केला आहे. संदर्भसूचीसाठी अमेरिकन सायकॉलॉजिकल असोसिएशन (A.P.A.) स्टाईलचा वापर केलेला आहे. डॉ. सत्यप्रकाश निकोसे यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती या पुस्तकात A.P.A. स्टाईल मॅन्युअल बद्दल म्हटंले आहे कि, ही पध्दत वैज्ञानिक व स्पष्टीकरणात्मक आहे. त्यांनी दिलेल्या उदाहणानुसार व इंटरनेटवरील एपीए स्टाईलप्रमाणे रचना केली आहे.

**परिशिष्ठे**

संशोधकास संशोधनाअंती आलेल्या अनुभवावरून व या क्षेत्रातील तज्ञांच्या सहकार्याने आयुर्वेद ग्रंथालयांच्या विकासासाठी एक उपयुक्त मार्गदर्शिका तयार केली आहे. ही मार्गदर्शिका परिशिष्ठांमध्ये पहिल्यांदा जोडली आहे. संशोधन कार्यात माहिती संकलनासाठी वापरलेल्या ग्रंथापालाच्या प्रश्नावल्या, अध्यापक प्रश्नावली, ग्रंथपालांची मुलाखत अनुसुची, विद्यार्थी प्रश्नावली परिशिष्ठात दिल्या आहेत.

## ७.३ संशोधनाचे निष्कर्ष

सबळ पुराव्याच्या आधारावर, विशदी करणाचा आधार घेवून अत्यंत काळजीपूर्वक, साध्या शब्दांमध्ये संशोधन समस्यांच्या संदर्भात उपलब्ध झालेली उत्तरे म्हणजे निष्कर्ष होय.

समस्या कथनाच्या वेळी निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास हे निष्कर्ष समर्थ असावेत आणि या निष्कर्षाने गृहीतके अथवा परीकल्पनांना संकलित माहितीच्या आधारे पुष्ठी द्यावी किंवा विरोध करावा असे निष्कर्ष संशोधन कार्यामधून निघणे आवश्यक असते.

‘महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास’ ह्या प्रस्तुत संशोधन अभ्यासामध्ये प्रश्नावलीतून संकलीत झालेल्या माहितीनुसार तसेच काही ग्रंथपालांच्या मुलाखतीतून मिळालेल्या माहितीनुसार संशोधकाने निवडलेल्या महाराष्ट्रातील ५१ महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या अभ्यासावरून काही निष्कर्ष निघाले ते पुढीलप्रमाणे आहेत.

संशोधकाने ‘महाराष्ट्रातील ५१ आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास करून पुढीलप्रमाणे निष्कर्ष मांडले आहेत.

**आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.**

- वैद्यकिय शास्त्रामध्ये आयुर्वेद, होमिओपॅथिक, ॲलोपॅथीक अशा विविध उचार पद्धती आहेत. यापैकी आयुर्वेद ही भारतीय उपमहारीपातील एक पारंपारीक व मूळ चिकित्सा पद्धती असून ती खिस्तपूर्व ५ व्या शतकातील आहे. बुध्दकालीन आहे.

- भारतात आयुर्वेद शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार मोठ्या प्रमाणात झालेला असून याकरीता प्रशिक्षित आयुर्वेद तज्ञ, महाविद्यालये, हॉस्पीटल्स इ. सुविधा भारतात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

- भारतात २४० महाविद्यालये आयुर्वेद या पारंपारिक उपचार पद्धतीचा प्रसार, प्रचार आणि भविष्यासाठी जतन या उद्देशाने स्थापन करण्यात आलेली असून महाराष्ट्र शासनाने स्वतःची ४ आयुर्वेद महाविद्यालये स्थापन करून तसेच महाराष्ट्रातील १६ खाजगी महाविद्यालयांना अनुदान देवून आयुर्वेद या उपचार पद्धतीला चालना दिलेली आहे.

- आयुर्वेद या उपचार पद्धतीचा वापर दक्षिण आशिया मध्ये विशेषतः भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, नेपाळ, श्रीलंका, मॉरीशिअस, म्यानमार, थाईलंड आणि मलेशिया या देशात मोठ्या प्रमाणात करण्यात येतो.

- असे आयुर्वेद विषयातील वाचनसाहित्य भारत, श्रीलंका, पाकिस्तान, चीन यासारख्या देशामधील ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहे.

- संशोधन कार्यासाठी अभ्यासण्यात आलेल्या ग्रंथालयांमध्ये १९१० ते १९२५ या वर्षामध्ये (३.९२ %) ग्रंथालये, १९२५ ते १९४० या वर्षामध्ये (५.८८ %), १९४१ ते १९५५ वर्षामध्ये (११.७६ %) ग्रंथालये, तसेच १९५६ ते १९७० या वर्षामध्ये (७.८४ %) ग्रंथालये, १९७१ ते १९८५ मध्ये (२९.४१ %) ग्रंथालयांची स्थापना झालेली आहे.

१९८६ ते २००० या वर्षामध्ये (३१.३७ %) ग्रंथालयाची तर २००१ ते २०१५ या वर्षामध्ये (९.८८) ग्रंथालयाची स्थापना झालेली आहे.

- महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास या संशोधन विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथपालाकडून ८०.९५ % इतका प्रतिसाद मिळाला आहे.
- शहरी भागातील ४० महाविद्यालयांच्या ग्रंथालयांपैकी ०४ (१० %) शासकिय महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत. १४ (३५ %) शासन अनुदानित महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत. तसेच २२ (५५ %) विनाअनुदानित महाविद्यलयांची ग्रंथालये आहेत. शहरी विभागातील आयुर्वेद ग्रंथालयांमध्ये सर्वात जास्त प्रमाणात विनाअनुदानित महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत. तर सर्वात कमी प्रमाणात शासकिय महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत.
- ग्रामीण विभागातील ११ महाविद्यालयांच्या ग्रंथालयांपैकी शासन अनुदानित महाविद्यालयांची ग्रंथालये २ (१८.१८ %) व विनाअनुदानित महाविद्यालयांची ग्रंथालये ९ (८१.८१%) आहेत. ग्रामीण विभागात शासकिय महाविद्यालये अस्तित्वात नसून सर्वात जास्त प्रमाणात विना अनुदानित महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत.
- सदर संशोधनासाठी अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद वैद्यकिय महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाविषयी माहिती दिली आहे. ही माहिती आलेख स्वरूपात दाखविणेत आली आहे. यानुसार (५८.८२ %) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये १०००१ ते १२००० हजारच्या पटीत इतका भाषानिहाय ग्रंथसंग्रह आहे. तर आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये १२००१ ते १४००० हजार या प्रमाणात ग्रंथसंग्रह असल्याचे दिसून येते. १४००१ ते १६००० हजार या पटीत (७.८४ %) इतका ग्रंथसंग्रह आहे. तर (३.९२ %) आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये १६००१ ते १८००० हजारच्या पटीत आहे. तसेच १८००१ ते २०००० च्या पटील (३.९२ %) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये, (१.९३ %) आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयांमध्ये २०००१ ते २२००० हजार या प्रमाणात व २२००१ ते २४००० हजार या पटीत (३.९२%) इतका ग्रंथसंग्रह आहे.

- शासकिय आयुर्वेद महाविद्यालये ग्रंथालये (७.८४ %) शासन अनुदानित महाविद्यालये (३१.३७ %) विनाअनुदानीत महाविद्यालयांची ग्रंथालये (६०.७८ %) आहेत. ग्रामीण व शहरी विभागात मिळून सर्वात कमी प्रमाणात शासकीय महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत. तर सर्वात जास्त प्रमाणात विना अनुदानीत महाविद्यालयांची ग्रंथालये आहेत.
- ग्रंथालयातील मागील दहा वर्षातील ग्रंथसंख्येची माहिती मिळते. यावरून असे दिसून येते की, ग्रंथालयातील ग्रंथसंख्या ही वाढत गेली आहे. वर्षानुवर्षे ग्रंथसंख्येत भर पडला असल्याचे दिसते. सन २००१ ते २००३ या वर्षामध्ये ग्रंथसंग्रह हा ३,८३,७९४ इतका होता. तर तो २००५ ते २००७ मध्ये तो ४,७९,४७० एवढा असल्याचे दिसते. २००९-२०११ मध्ये ह्या ग्रंथसंख्येत भर पडून तो ५,९६,२०१ इतका वाढल्याचे दिसून येते.
- या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नियतकालीकांचा संग्रह असलेली ग्रंथालये ही (५१ %) आहेत. ०१ ते २० या प्रमाणात आंतरराष्ट्रीय नियतकालीके असणारी ग्रंथालये (९२.१५ %) आहेत तर ०१ ते ४० हे प्रमाण असणारी (७.८४ %) ग्रंथालये आहेत.
- या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये ग्रंथालय संगणकीकरणासाठी वेगवेगळी सॉफ्टवेअर्स वापरलेली दिसून येतात. यामध्ये Autolib, Slim ई-ग्रंथालय, सोल, लिवसीस, लोकल आणि इतर Free सॉफ्टवेअरच्या माध्यमातून ग्रंथालयांनी संगणकीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. ८४.३१ % ग्रंथालयाचे संगणकीकरण पूर्णत्वाच्या मार्गावर असल्याचे दिसते तर १५.६८ % ग्रंथालयामध्ये अजूनही संगणकीकरण झालेले नाही असे दिसते.

**आयुर्वेद महाविद्यालयामध्ये चालविण्यात येणारे अभ्यासक्रम याबाबतचे निष्कर्ष**

- महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये आयुर्वेद विषयातील वेगवेगळे अभ्यासक्रमाची सोय आहे. यामध्ये सर्टीफिकेट डिप्लोमा, पदवी, पदव्युत्तर, एम. फिल. आणि पीएच. डी. इ. अभ्यासक्रमांचा समावेश केलेला दिसून येतो. एम. फिल. व पीएच. डी. अभ्यासक्रम सर्वात कमी महाविद्यालयांमध्ये सुरू असल्याचे दिसून येते. पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण बहुतांश म्हणजे सर्वच आयुर्वेद महाविद्यालयामध्ये चालू आहे.

**आयुर्वेद महाविद्यालयास आयुर्वेद कौन्सीलची मान्यता याबाबतचे निष्कर्ष**

- अभ्यासण्यात आलेल्या ५१ आयुर्वेद महाविद्यालयापैकी ४३ (८४.३१ %) आयुर्वेद महाविद्यालयांना आयुर्वेद कौन्सीलची मान्यता आहे. असते दिसून येते.

**आयुर्वेद महाविद्यालयांचे प्रमाणीकरण / मुल्यांकन याबाबतचे निष्कर्ष**

- आयुर्वेद महाविद्यालयांच्या मुल्यांकनाबाबत असे दिसून येते कि ५१ पैकी ३३ (६४.७० %) आयुर्वेदांची महाविद्यालयांचे मुल्यांकन झालेले आहे.
- आयुर्वेद महाविद्यालयांचे मुल्यांकन झाल्यामुळे त्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या दर्जा वाढण्यास मदत होवून त्या महाविद्यालयांकडे दर्जा वाढण्यास मदत होवून त्या महाविद्यालयांकडे विद्यार्थी आकर्षित होतात. परिणामी अध्यापकांचा ज्ञानात वाढ होते. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होवून चांगले विद्यार्थी अडविले जातात.

**आयुर्वेद ग्रंथालयातील ग्रंथ संग्रहाची भाषा याबाबतचे निष्कर्ष**

- आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात आयुर्वेद विषयांची संबंधित विषयावरील अनेक ग्रंथ वाचकांच्या मागणीनुसार येत असतात. त्या ग्रंथांचे विषयनिहाय संकलन केलेले आहे.
- ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांना अनेकविध भाषेतील ग्रंथसंग्रह उपलब्ध करून दिला आहे. ग्रंथालयांच्या वाचकांना हा ग्रंथसंग्रह खूप महत्वाचा आहे.

**आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयातील ग्रंथ संग्रहाबाबतचे निष्कर्ष**

- अभ्यासण्यात आलेल्या महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयापैकी सर्वाधिक ग्रंथसंग्रह हा टिळक आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात आहे. या ग्रंथालयात २३१२७ इतक ग्रंथसंग्रह आहे.
- अभ्यासण्यात सर्वच आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये वाचकांच्या मागणीनुसार ग्रंथ उपलब्ध करून दिले जातात. त्यामुळे ग्रंथसंग्रहात वाढ होत असल्याचे दिसून येते. या ग्रंथसंग्रहाव्दारे ही ग्रंथालये ग्रंथ देवघेव, संदर्भ सेवा, बुक-बँक योजना तसेच इतर सेवा देण्याचे कार्य करीत आहेत.

**आयुर्वेद ग्रंथालयातील ई-स्त्रोत साहित्य संग्रह याबाबतचे निष्कर्ष**

- अभ्यासण्यात आलेल्या सर्वच आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये ई-डेटाबेस, ई-जर्नल तसेच ई बुकांचा वापर केला जातो. ६०.७८ % ग्रंथालयातून ई-जर्नलचा वापर

केला जातो. १३.७२ % ग्रंथालयातून ई-बुकाचा वापर केला जातो. यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

- अभ्यासण्यात सर्वच आयुर्वेद ग्रंथालयामध्ये ग्रंथपाल कार्यरत आहेत. तसेच ३३.३३ % ग्रंथालयामध्ये सहाय्यक ग्रंथपालही कार्यरत असल्याचे दिसते. १३.७२ % कॉम्प्युटर ऑपरेटर ग्रंथालय संगणकीकरणात मदत करीत आहेत. अभ्यासण्यात आलेल्या बहुतांश ग्रंथालयामध्ये सेवकांची संख्या चागली बहुतांश ग्रंथालयामध्ये असल्याचे दिसून येते.
- सर्वच ग्रंथालयामध्ये वाचकांची संख्या वाढल्याचे दिसून येते. ग्रंथालयातून आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा होणारा वापर यामुळे इंटरनेट, ई-मेल तसेच ई-जर्नल, ई-बुक्सचा वापर करण्यासाठी वाचकांचे ग्रंथालयात येण्याचे प्रमाण वाढले आहे.
- अभ्यासण्यात आलेल्या ४५.०९ % आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांना स्वतंत्र इमारत उपलब्ध करून दिलेली आहे. ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत असलेने वेगवेगळे विभाग पाडण्यास मदत होते. नियतकालीक विभाग, देवघेव विभाग, संदर्भ सेवा विभाग, वाचकांसाठी स्वतंत्र अभ्यासिका, संगणक विभाग यामुळे वाचकांना योग्य दर्जाच्या सेवा देण्यास मदत होते.
- या आयुर्वेद महाविद्यालयापैकी ४३ (८४.३१ %) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये स्वतंत्र वाचनकक्षाची सोय उपलब्ध आहे.
- ४३ (८४.३१) आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये वाचकांसाठी स्वतंत्र वाचनकक्षाची सोय आहे. तर ८ (१५.६८) ग्रंथालयामध्ये अपुऱ्या जागेमुळे वेगळी व्यवस्था करता येत नसल्याचे ग्रंथपालांचे म्हणणे आहे. तरी जागेचा योग्य वापर करून स्वंतत्र वाचन कक्षासाठी प्रयत्न चालू आहेत असे सांगितले.

**ग्रंथालयांमध्ये ग्रंथालय समिती याबाबतचे निष्कर्ष**

- या अभ्यासण्यात सर्व ग्रंथालयांमध्ये ग्रंथालय समिती नेमली आहे या ग्रंथालय समितीमार्फत ग्रंथालयातील धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी व ग्रंथालयीन सेवा देणेसाठी मार्गदर्शन केले जाते. या ग्रंथालय समितीतर्फे ग्रंथालयात वेळोवेळी सभा घेवून ग्रंथालय व्यवस्थापन व नियोजन, ग्रंथखरेदी ग्रंथालयीन सेवा व ग्रंथालयातील अडचणीवर चर्चा करून निर्णय घेतले जातात.

- या ग्रंथालय समितीमध्ये आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य, महाविद्यालयातील अध्यापक, विभाग प्रमुख, ग्रंथपाल तसेच विद्यार्थी प्रतिनिधी हे सभासद असतात. महाविद्यालयाचे प्राचार्य या ग्रंथालय समितीचे अध्यक्षपद भूषवितात. तर ग्रंथपाल हे या समितीचे सचिव म्हणून काम पाहतात. या समितीने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे काम ग्रंथपाल करीत असतात.
- या ग्रंथालय समितीमार्फत ग्रंथालयातील विविध स्वरूपाची कार्ये पाड पाडली जातात. ४३ (८४.३१ %) ग्रंथालयातून वाचनसाहित्याची निवड, ५१ (१०० %) ग्रंथालयामध्ये प्रशासन आणि संगठनाचे कार्य पार पाडले जाते. ३१ (६०.७८ %) ग्रंथालयातून वार्षीक अहवाल तयार करण्याचे कार्य केले जाते. एकूणच ग्रंथालय व्यवस्थापन व नियोजनामध्ये या समितीचे महत्वाचे कार्य आहे. ग्रंथालयीन सेवांचा दर्जा वाढविण्यासाठी ही समिती नेहमी आग्रही असते.

**आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील समस्यांचा शोध याबाबतचे निष्कर्ष.**

- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ५४.९० % ग्रंथालयांसाठी स्वतंत्र इमारत नसल्याचे दिसून येते. ग्रंथालयाला जर स्वतंत्र इमारत असेल तर ग्रंथालयातील विविध विभागाचा विकास करणे शक्य आहे. अपुऱ्या जागेमुळे ग्रंथालयाचा विकासास अडथळा होतो. नवनवीन वाचनसाहित्याची भर ग्रंथालयात होत असते.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील अडचणी दूर करणेसाठी (१७.६९ %) ग्रंथपाल म्हणतात कि वेळेचे योग्य नियोजन केले पाहिजे. ग्रंथालयांसाठी आवश्यक असणारी उपयुक्त साधनसामुग्री उपलब्ध असेल तर ग्रंथालयातील अडचणी दूर होण्यास मदत होते. असे मत (१५.६८ %) ग्रंथपालांनी मांडले आहे. (३७.२६%) ग्रंथपाल म्हणतात की संप्रेषण माध्यमांचा उपयोग केला पाहिजे तसेच (५.८८ %) जणांचे म्हणजे आहे कि अन्य उपाययोजनांचा अवलंब करून देखील ग्रंथालयातील सेवा देण्यामधील अडचणी दूर करता येतात.
- ७६.४७ % ग्रंथालयामध्ये उपयुक्त साधन सामुग्री उपलब्ध आहे. या साधनसामुग्रीच्या साहाय्याने ग्रंथालयीन कामकाज व सेवा कार्यरत आहेत.

- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये ३६ (७०.५८ %) स्थानिक ग्रंथ विक्रेत्यामार्फत ग्रंथखरेदी केली जाते. ०९ (१७.६४ %) ग्रंथालयामध्ये प्रकाशकामार्फत ग्रंथखरेदी केली जाते. स्थानिक ग्रंथविक्रेत्याकडून ग्रंथखरेदी केली जात असलेने ग्रंथ वेळेवर उपलब्ध होण्यास मदत होते.
- आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील अडचणी दूर करणेसाठी ग्रंथालय व्यवस्थापणाने आवश्यक तेवढे प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविले पाहिजे. ग्रंथपालपदी नव्याने निवड करताना उमेदवार हा ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयाची उच्च पदवीधारक असावा. ग्रंथपालपदी निवड होण्यासाठी जी पात्रता लागते. ती पात्रता त्याच्याकडे असायला हवी.
- या अभ्यासण्यात ग्रंथालयामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ नसेल तर त्यांना प्रगत शिक्षणासाठी प्रोत्साहन द्यावे. माहिती संप्रेषणाच्या माध्यमांचा वापर करावा. ग्रंथालयीन सेवा देण्यासाठी उपयुक्त साधनसामुग्री उपलब्ध करून द्यावी. वाचकांशी माहिती संप्रेषणाच्या माध्यमातून योग्य संवाद साधून देखील अडचणी दूर करता येतात. अडचणी दूर करणेसाठी वेळेचे योग्य नियोजन केले पाहिजे.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये पुस्तकांची देवाण-घेवाण ही ब्राऊन देवघेव पध्दतीनुसार होते. काही ग्रंथालयातून ही पुस्तकांची देवाण घेवाण संगणकाच्या साहाय्याने केली जाते यावरून माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव ग्रंथालयावर पडल्याचे दिसून येते.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ५४.९० % ग्रंथालयांसाठी स्वतंत्र इमारत नसल्याचे दिसून येते. ग्रंथालयाला जर स्वतंत्र इमारत असेल तर ग्रंथालयातील विविध विभागाचा विकास करणे शक्य आहे. अपुऱ्या जागेमुळे ग्रंथालयाचा विकासास अडथळा होतो. नवनवीन वाचनसाहित्याची भर ग्रंथालयात होत असते.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या काही आयुर्वेद ग्रंथालयातून बुक बँक सेवा उपलब्ध नसल्याने निर्माण होणारी समस्या. (१५.६८ %) ग्रंथालयातून ही सेवा उपलब्ध नाही. तरी उर्वरीत ग्रंथालयांनी बुक-बँक योजना सुरू करून

विद्यार्थ्यांना ह्या योजनेचा लाभ मिळवून द्यावा. तसेच या योजनेचा लाभ काही ठराविक विद्यार्थ्यांनाच होतो तो सर्वांना उपलब्ध करून द्यावा.

- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या (१३.७२ %) ग्रंथालयामध्ये सेवा देण्यासाठी सेवकवर्ग कमी आहे. तसेच (७.८४ %)ग्रंथालयामध्ये सेवा देताना साधनांची कमतरता आहे.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील अडचणी दूर करणेसाठी (१७.६९ %) ग्रंथपाल म्हणतात कि वेळेचे योग्य नियोजन केले पाहिजे. ग्रंथालयांसाठी आवश्यक असणारी उपयुक्त साधनसामुग्री उपलब्ध असेल तर ग्रंथालयातील अडचणी दूर होण्यास मदत होते. असे मत (१५.६८ %) ग्रंथपालांनी मांडले आहे. (३७.२६%) ग्रंथपाल म्हणतात की संप्रेषण माध्यमांचा उपयोग केला पाहिजे तसेच (५.८८ %) जणांचे म्हणजे आहे कि अन्य उपाययोजनांचा अवलंब करून देखील ग्रंथालयातील सेवा देण्यामधील अडचणी दूर करता येतात.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून ग्रंथालयीन सेवा देताना संवाद कमी होतो याचे प्रमाण (७.८४ %) आहे म्हणजे जवळजवळ (९२.१५ %) संवाद घडून येण्याचे प्रमाण आहे. असा संवाद वाचकांना हवी ती माहिती मिळणेसाठी फायदेशीर ठरतो. (१३.७२ %) ग्रंथालयामध्ये सेवा देण्यासाठी सेवकवर्ग कमी आहे. तसेच (७.८४ %)ग्रंथालयामध्ये सेवा देताना साधनांची कमतरता आहे. यासाठी ग्रंथालयीन सेवा देताना निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करून ग्रंथालयीन सेवा द्याव्यात.

**आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव याबाबतचे निष्कर्ष**

- अभ्यासण्यात आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह वाचक आणि सेवक या घटकांवर माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव पडला आहे. ७९ % आयुर्वेद ग्रंथालयातील वाचकवर्ग वाढला आहे. ६१ % ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहात वाढ झाली आहे. ७१ % ग्रंथालयातून सेवांच्या दर्जात वाढ झालेली आहे. परंतु गेल्या काही वर्षापासून सेवकांची संख्या कमी होत आहे.

- आधुनिक माहिती तंत्रज्ञानामुळे अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयापैकी ८४.३१ % ग्रंथालयाचे संगणकीकरण पूर्ण झाले असून इतर ग्रंथालयाचे संगणकीकरण चालू आहे. तर काही ग्रंथालयांमध्ये ग्रंथालयातील महत्वाच्या साहित्याचे डिजीटल फॉर्ममध्ये रूपांतर करणे सुरू आहे.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ७२.५४ % ग्रंथालयातून OPAC सेवा दिली जाते. तसेच ८४.३१ % ग्रंथालयातून Online सेवा दिल्या जातात. OPAC सेवेमुळे ग्रंथालयीतल वाचनसाहित्याची माहीती ग्रंथालयांच्या वाचकांना मिळते यावरून असे दिसून येते कि ग्रंथालयामार्फत वाचकांना दिल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या सेवांमुळे ग्रंथालयाचे महत्व वाढून वाचक ग्रंथालयांकडे आकर्षीत होतात.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील इंटरनेट सुविधा ही (८४.३१ %) ग्रंथालयातून दिली जाते तर १५.६८ % ग्रंथालयांमध्ये इंटरनेट सुविधा दिली जात नाही. ग्रंथपालांच्या म्हणण्यानुसार याही ग्रंथालयामध्ये इंटरनेट सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये ग्रंथालयीन कामकाजासाठी (९६.६७ %) ग्रंथालयातून संगणकाचा वापर होत आहे तर काही तांत्रिक अडचणी अभावी (३.९२ %) ग्रंथालयामध्ये संगणकाचा वापर होत नाही असे दिसते. या ग्रंथालयातील ग्रंथपालांनी लवकरच संगणकाचा वापर ग्रंथालयीन कामकाजासाटी करणार असल्याचे नमूद केले आहे.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ७२.५४ % ग्रंथालयातून OPAC सेवा दिली जाते. २१.५६ % ग्रंथालये सारांश सेवा देतात. १७.६४ % ग्रंथालयातून प्रलेखन सेवा दिली जाते. ७.८४ % ग्रंथालयामध्ये साधनांची कमतरता भासत आहे. ५.८८ % ग्रंथालयामध्ये अन्य अडचणींना सामोरे जावे लागत आहे.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ८४.३१ % आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामधून ई-जर्नल सुविधा दिली जाते तर १५.६८ % आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामधून ती दिली जात नाही. ८४.३१ % ग्रंथालयांमध्ये

इंटरनेट सुविधा दिली जाते. तर १५.६८ % ग्रंथालयांमध्ये इंटरनेट सुविधा दिली जात नाही.

- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून माहिती संगणकाच्या माध्यमातून साठवून ठेवणेची सोय झालेने ग्रंथालयातील माहिती वाचकांना जलद गतीने मिळण्यास मदत झाली आहे. यामुळे ग्रंथालयातील वाचक वर्ग ग्रंथालयाकडे आकर्षीत होवून वाचकांची संख्या वाढली आहे. परिणामी ग्रंथ संग्रहात वाढ झाल्याचे दिसून येते. तसेच ग्रंथालयीन सेवांच्या दर्जावर परिणाम होवून सेवांच्या दर्जात सुधारणा झाली आहे असे मत (८४.३१ %) ग्रंथालयातील ग्रंथपालानी मांडले आहे.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून १०० % संदर्भ आणि माहिती सेवा, देवघेव सेवा, आणि कात्रण सेवा दिल्या जातात. ७२.५४ % ग्रंथालयातून SDI सेवा दिल्या जातात तर ७४.५० % ग्रंथालयातून CAS सेवा दिली जाते. ७२.५४ % ग्रंथालयातून OPAC सेवा दिली जाते व ६८.६२ % ग्रंथालयातून प्रतीलिपी सेवा दिली जाते. तसेच ८४.३१ % ग्रंथालयातून Online सेवा दिल्या जातात. कात्रण सेवा ही ग्रंथालयात (१०० %) दिली जाते.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून संगणक, दुरध्वनी, मोबाईल, झेरॉक्स, प्रिंट, प्रोजेक्टर यांचा ग्रंथालयीन सेवा गुणवत्तापूर्ण व जलद गतीने होण्यासाठी सर्व ग्रंथालयामध्ये १०० % वापर केला जातो. तर ८४.३१ % ग्रंथालयांमध्ये इंटरनेट, इमेल या सुविधांचा वापर करणेसाठी ग्रंथालयात संगणकांचा वापर केला जातो.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ८४.३१ % ग्रंथालयामध्ये ग्रंथालय नेटवर्कची सोय आहे. तर १५.६८ % ग्रंथालयामध्ये नसल्याचे दिसून येते. ६०.७८ % ग्रंथालयामध्ये मोफत ई-बुक्सचा वापर केला जातो. तसेच ७६.४७ % ग्रंथालयातून मोफत ई-जर्नलसचा वापर होत आहे. व वर्गणी स्वरूपातील ई-जर्नल्स वापर १७.६४ % ग्रंथालयांमध्ये होत आहे.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाच्या (८४.३१) ग्रंथालयातून बुक-बँक योजना चालू आहे. तर ०८ (१५.६८) ग्रंथालयातून ही सेवा उपलब्ध नाही. तरी उर्वरीत ग्रंथालयांनी बुक-बँक योजना सुरू करून विद्यार्थ्यांना ह्या योजनेचा लाभ

मिळवून द्यावा. तसेच या योजनेचा लाभ काही ठराविक विद्यार्थ्यांनाच होतो तो सर्वांना उपलब्ध करून द्यावा.

- अभ्यासण्यात आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून आधुनिक माहिती तंत्रज्ञानामुळे सेवांमध्ये सुधारणा झाली आहे. काही ग्रंथालयात ती पुर्णपणे विकसीत झाल्याचे दिसून येत नाही. सर्व ग्रंथालयांतून माहितीचे जलद देवाण-घेवाण होण्यासाठी संगणक, इंटरनेट, ई-मेल, दूरध्वनी, मोबाईल, झेरॉक्स या साधनांचा वापर केला जातो. तसेच अन्य प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर केला जातो.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयापैकी ४३ ग्रंथालयाचे संगणकीकरण पूर्ण झाले असून इतर ग्रंथालयाचे संगणकीकरण चालू आहे. तर काही ग्रंथालयांमध्ये ग्रंथालयातील महत्वाच्या साहित्याचे डिजीटल फॉर्ममध्ये रूपांतर करणे सुरू आहे.
- ग्रंथालयात ई-स्त्रोत साहित्य संग्रह विकसीत होऊ लागला आहे.
- अभ्यासण्यात आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून संदर्भ आणि माहिती सेवा, देवघेव सेवा, दिल्या जातात. ३५ ग्रंथालयातून प्रतिलिपी सेवा, ३८ (७४.५० %) ग्रंथालयातून प्रचलीत जागरूकता सेवा (सी.ए.एस.), ३७ ग्रंथालयातून निवडक माहिती सेवा (एस. डी. आय.), ५१ ग्रंथालयातून कात्रण सेवा, १७ ग्रंथालयातून भाषांतर सेवा, ४३ ग्रंथालयातून Online सेवा दिल्या जातात.
- अभ्यासण्यात आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून, ग्रंथालयीन सेवा गुणवत्तापूर्ण व जलद गतीने होण्यासाठी संगणक इंटरने, ई-मेल, फॅक्स, दूरध्वनी, मोबाईल इ. चा वापर केला जात आहे.
- ७२.५४ % ग्रंथालयातून OPAC सेवा दिली जाते. २१.५६ % ग्रंथालये सारांश सेवा देतात. १७.६४ % ग्रंथालयातून प्रलेखन सेवा दिली जाते. ७.८४ % ग्रंथालयामध्ये साधनांची कमतरता भासत आहे. ५.८८ % ग्रंथालयामध्ये अन्य अडचणींना सामोरे जावे लागत आहे.
- माहितीचे जतन व प्रसारणांच्या सुविधामध्ये झालेल्या वाढीमुळे वाचकांना माहितीची जलद गतीने देवाण-घेवाण होण्यास मदत झाली आहे. तसेच ग्रंथालयातील वाचकांना योग्य माहिती कमी वेळेत मिळाल्याने वाचकांचा वेळ वाचण्यास मदत

झाली आहे. त्यामुळे ग्रंथालयीन सेवकांचाही वेळ वाचला आहे. वाचकांना दर्जेदार सेवा मिळू लागली.

- या आयुर्वेद महाविद्यालयांतील ४३ (८४.३७ %) संगणकीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. संगणकीकरणासाठी बहुतांश ग्रंथालय Local Softwares वापरली आहेत. तसेच Autolib, Slim, E-Granthalay सोल, लिबसीस आणि इतर Open Source free Software चा वापर केलेल दिसून येतो.
- या अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयापैकी ४३ (८४.३१ %) ग्रंथालयांचे संगणकीकरण पूर्ण झाले असून २५.४९ % ग्रंथालयांमध्ये महत्वाच्या ग्रंथालयीन साहित्याचे डिजीटल फॉर्ममध्ये रूपांतर करण्याचे काम चालू आहे.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील सेवा गुणवत्तापूर्ण व जलद गतीने होण्यासाठी संगणक, इंटरनेट, ई-मेल, फॅक्स, दूरध्वनी, मोबाईल, झेरॉक्स, प्रिंटर इ. साधनांचा वापर केला जातो.
- अभ्यासण्यात आयुर्वेद ग्रंथालयातील जलद गतीने माहितीची देवाण घेवाण झाल्यामुळे ग्रंथालयातील सेवक व वाचकांचा वेळ वाचण्यास मदत झाली. यासाठी संगणक, इंटरनेट, ई-मेल, झेरॉक्स, मोबाईल, प्रिंटर, दुरध्वनी व अन्य साधनांचा वापर करतात.
- अभ्यासण्यात ग्रंथालयांमध्ये ग्रंथालयीन साहित्याचे तालीकीकरण करताना AACR पध्दतीचा वापर केला जातो. तसेच सर्व ग्रंथालयांमधील साहित्याचे तालीकीकरण केले जाते. ग्रंथालयामध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव पडल्याने ग्रंथालयामध्ये संगणकीकृत तालीकाही उपलब्ध आहे.
- अभ्यासण्यात आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथसाहित्याचे परिगणन केले जाते. हे ग्रंथपरीगणन करण्यासाठी दाखलनोंदवही, बार कोडींग तसेच दाखल लीटसच्या साहाय्याने केले जाते. बहुतांश ग्रंथालयामध्ये ग्रंथपरीगणनासाठी दाखलनोंदवही व दाखलअंक सीटसचा वापर होतो. सध्या माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ग्रंथालयातून संगणकाच्या साहाय्याने बारकोडींगच्या माध्यमातून ग्रंथपरीगणन करण्याची सोय उपलब्ध झाली.

- ग्रंथालयात आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रंथालयाच्या वाचकांना जास्तीत-जास्त प्रमाणात योग्य ती माहिती कमी वेळेत कशी मिळेल याकडे ग्रंथपालाचे लक्ष आहे. ग्रंथालयांचे पूर्णतः संगणकीकरण करण्याच्या दिशेने ते पाऊले उचलत आहेत.

**ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह, वाचक आणि सेवा यांचा अभ्यास करणे याबाबतचे निष्कर्ष**

- आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह वाचक आणि सेवक या घटकांवर माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव पडला आहे. ७९ % आयुर्वेद ग्रंथालयातील वाचकवर्ग वाढला आहे. ६१ % ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहात वाढ झाली आहे. ७१ % ग्रंथालयातून सेवांच्या दर्जात वाढ झालेली आहे.
- आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून आधुनिक माहिती तंत्रज्ञानामुळे सेवांमध्ये सुधारणा झाली आहे. काही ग्रंथालयात ती पुर्णपणे विकसीत झाल्याचे दिसून येत नाही. सर्व ग्रंथालयांतून माहितीचे जलद देवाण-घेवाण होण्यासाठी संगणक, इंटरनेट, ई-मेल, दूरध्वनी, मोबाईल, झेरॉक्स या साधनांचा वापर केला जातो. तसेच अन्य प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर केला जातो.
- आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव होत असलेने ग्रंथालयातील वाचकांच्या संख्येत वाढ झाली आहे. वाचकांना त्याना हवी ती माहिती कमी वेळेत ग्रंथालयातील सेवकाकडून मिळू लागली आहे.
- ग्रंथालयामध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढला आहे. त्यामुळे वाचकांना दर्जेदार सेवा जलद गतीने मिळण्यास मदत झाली आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या वाचकांना ग्रंथालयातून अचूक माहिती विनाविलंब व अद्ययावत माहितीची देवाण घेवाण जलद होत आहे.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयापैकी काही ग्रंथालयामध्ये सेवकांची संख्या पुरेशी नाही. त्यांना पुरेशे वेतन दिले जात नाही. त्यामुळे ते आपल्या कामामध्ये समाधानी नसल्याचे दिसून येते.
- अभ्यासण्यात आलेल्या ४३ (८४.३१ %) आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून नियतकालीकांसाठी Online सेवा दिली जाते. ही सुविधा उपलब्ध झालेने आयुर्वेद

विषयांशी संबंधित असंख्य नियतकालीके संगणकाच्या साहाय्याने पाहता येऊ लागली आहेत. यामुळे वाचकांस हवी ती माहिती त्वरीत मिळू लागली आहे.

- या आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील वर्तमानपत्रे येत आहेत.
- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील सेवा गुणवत्तापूर्ण व जलद गतीने होण्यासाठी संगणक, इंटरनेट, ई-मेल, फॅक्स, दूरध्वनी, मोबाईल, झेरॉक्स, प्रिंटर इ. साधनांचा वापर केला जातो.
- संगणकामध्ये ग्रंथालयातील माहितीच्या साठा साठवून ठेवणेची सोय उपलब्ध असलेने या सर्व ग्रंथालयातील सेवकांचे काम सोप झाले आहे. यामुळे ग्रंथालयांच्या सेवांच्या दर्जात वाढ झाली आहे.
- अभ्यासण्यात आलेल्या बहुतांश ग्रंथालयांमध्ये ग्रंथालयीन सेवा देताना अडचणी दिसून येत नाहीत. इतर ग्रंथालयातून अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साधनांची व आज्ञावलींची कमतरता असल्याने ग्रंथालयीन सेवा देताना अडचणी दिसून येतात.
- अभ्यासण्यात असलेल्या ४७ (९२.४५ %) ग्रंथालयांमध्ये सेवकांचा व वाचकांचा व्यवस्थीतपणे संवाद घडून येतो. त्यामुळे वाचकांना हवी ती माहिती मिळणेसाठी संवाद हा अतिशय उपयुक्त ठरतो. संवादाच्या माध्यमातून ग्रंथालयातील विविध वाचनसाहित्याची माहिती Face to Face मिळते.
- आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील अडचणी दूर करणेसाठी ग्रंथालय व्यवस्थापणाने आवश्यक तेवढे प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविले पाहिजे. ग्रंथपालपदी नव्याने निवड करताना उमेदवार हा ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयाची उच्च पदवीधारक असावा. ग्रंथपालपदी निवड होण्यासाठी जी पात्रता लागते. ती पात्रता त्याच्याकडे असायला हवी.
- या सर्वच ग्रंथालयामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ नसेल तर त्यांना प्रगत शिक्षणासाठी प्रोत्साहन द्यावे. माहिती संप्रेषणाच्या माध्यमांचा वापर करावा. ग्रंथालयीन सेवा देण्यासाठी उपयुक्त साधनसामुग्री उपलब्ध करून द्यावी. वाचकांशी माहिती संप्रेषणाच्या माध्यमातून योग्य संवाद साधून देखील अडचणी दूर करता येतात. अडचणी दूर करणेसाठी वेळेचे योग्य नियोजन केले पाहिजे.

- अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांमध्ये ग्रंथालयातील साहित्याचे, माहितीचे जतन व प्रसारण करण्याच्या सुविधांमध्ये झालेल्या वाढीमुळे ग्रंथालयातील वाचकांना माहितीचे जलद गतीने देवाण-घेवाण करण्यास मदत झाली. सर्वच ग्रंथालयातील वाचक व सेवकांचा वेळ वाचण्यास मदत झाली.
- ग्रंथालयांनी आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर केल्याने ग्रंथालयातील साहित्याची माहिती संगणकात साठवून ठेवली जाते. ग्रंथालयातील सेवक ग्रंथालयातून जलद गतीने माहिती घेण्यासाठी दूरध्वनी, मोबाईल, संगणक, ई-मेल, इंटरनेट, झेरॉक्स, प्रिंटर या साधनांचा वापर करतात. त्यामुळे ग्रंथालयाच्या वाचकांना हवी ती सेवा हव्या त्या ठिकाणी मिळण्यास मदत झाली. वाचकांना दर्जेदार सेवा मिळण्यास मदत झाली.
- ग्रंथालयांनी आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर केल्याने ग्रंथालयातील साहित्याची माहिती संगणकात साठवून ठेवली जाते. ग्रंथालयातील सेवक ग्रंथालयातून जलद गतीने माहिती घेण्यासाठी दूरध्वनी, मोबाईल, संगणक, ई-मेल, इंटरनेट, झेरॉक्स, प्रिंटर या साधनांचा वापर करतात. त्यामुळे ग्रंथालयाच्या वाचकांना हवी ती सेवा हव्या त्या ठिकाणी मिळण्यास मदत झाली. वाचकांना दर्जेदार सेवा मिळण्यास मदत झाली.
- अभ्यासण्यात आलेल्या सर्वच ग्रंथालयातून वाचकांना वाचनसाहित्याच बाबत योग्य प्रकारे सेवकांचे सहकार्य मिळते. त्यामुळे त्यांना ग्रंथालयातील वाचनसाहित्याची माहिती मिळण्यात मदत होते.
- या आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयातील वाचकांनी विलंबशुल्क माफ झाले पाहिजे असे मत मांडले तसेच ग्रंथालयामध्ये पिण्याचे पाणी असावे, मुक्तव्दार पध्दतीचा असावी असे नमूद केले.
- ग्रंथालयाची वेळ वाढवून देवून रात्री वेळेपर्यंत अभ्यासीका उपलब्ध करून द्यावी असे बहुतांश वाचकांनी आपले मत व्यक्त केले.
- या ग्रंथालयातून ग्रंथपाल व ग्रंथालयातील सेवक वाचकांना सेवा देण्याची महत्वाची भूमिका पार पाडीत आहेत. ग्रंथालयातील सेवांचा दर्जा वाढवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

## ७.४ शिफारशी

सदर संशोधनामध्ये संकलित माहितीच्या आधारे विश्लेषणाद्वारे जे निष्कर्ष प्राप्त झाले त्यांचे संकलन करताना काही शिफारशी कराव्यात असे संशोधकाला वाटते. संशोधन प्रबंधाकरीता निवडलेल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाराष्ट्र राज्यातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील समस्यांचा अभ्यास करून ग्रंथालयांच्या सद्यस्थितीपेक्षा उत्कृष्ट व गुणवत्तापूर्ण सेवा वाचकांना देता याव्यात या दृष्टीने काही शिफारशी कराव्याशा वाटतात त्या पुढीलप्रमाणे.

'महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास' या संशोधनातील निष्कर्षावरून संशोधकाने पुढीलप्रमाणे एकत्रित शिफारशी मांडलेल्या आहेत.

'महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास' या संशोधनातील निष्कर्षावरून संशोधकाने पुढील शिफारशी मांडलेल्या आहेत.

- ग्रंथालयात आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रंथालयाच्या वाचकांना जास्तीत-जास्त प्रमाणात योग्य ती माहिती कमी वेळेत कशी मिळेल याकडे ग्रंथपालाचे लक्ष आहे. ग्रंथालयांचे पूर्णतः संगणकीकरण करण्याच्या दिशेने ते पाऊले उचलत आहेत.
- आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयांना स्वतंत्र इमारत असावी.
- ग्रंथालयात प्रशिक्षित सेवक असावेत त्यांना संगणकाचे प्रशिक्षण देण्यात यावे.
- ग्रंथालयात मुक्तद्वार पद्धतीचा वापर करावा.
- ग्रंथालयात किंवा शेजारी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करण्यात यावी.
- डिजीटल लायब्ररी सुरू करून ग्रंथालयातील सर्व सेवा संगणकीकृत करण्यात याव्यात.
- ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांना विशेषता विद्यार्थी व प्राध्यापक तसेच संशोधकांना Online Research Journals उपलब्ध करून देण्यात यावीत.
- आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयात स्वतंत्र नियतकालीक विभाग असावा.
- आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वैद्यकियशास्त्र व्यतीरिक्त इतर संदर्भग्रंथ व नियतकालिके यांची संख्या वाढवावी.

- आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील वाचन साहित्याचे विषयानुसार वर्गीकरण करण्यात यावे.
- सध्या वाचनसाहित्याचे वर्गीकरण बहुतेक आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात झालेले दिसू येत नाही. परंतु भविष्यात या वाचनसाहित्याचे वर्गीकरण करणे आवश्यक आहे.
- आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात सुचनापेटी असावी, व आलेल्या सुचनांचा विचार व्हावा
- काही ग्रंथालयात पुस्तक पेढी योजना राबवली जाते पण त्याचा फायदा फक्त ठराविक विद्यार्थ्यांना होतो. तरी सर्व विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता यावा यासाठी प्रयत्न करावेत.
- ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करून आजच्या स्पर्धात्मक युगात चांगल्या गुणवत्तेची सेवा वाचकांना देणेसाठी ग्रंथालयामार्फत इंटरनेट सेवा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तसेच वाय-फाय ची सोयही करणे आवश्यक आहे.
- सदर आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात उच्च प्रशिक्षित ग्रंथपाल नेमावेत.
- या महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून OPAC ची सोय असणे आवश्यक आहे.
- या आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयातील सेवकांना योग्य ते वेतन देण्याची व्यवस्था करावी. त्यामुळे त्यांना कामात प्रोत्साहन मिळेल व त्यांचे कार्यसमाधान होईल.
- या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात येणाऱ्या सर्व स्तरावरील वाचकांना योग्य त्या सेवा देता येण्यासाठी आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर जास्तीत-जास्त होणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक त्या साधनांची उपलब्ध करून देण्यात यावी. यासाठी ग्रंथसंग्रहात ई-रिसोर्सेस वाढवावेत. ई-जर्नल, ई-डेटाबेसची खरेदी करावी.
- या अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामध्ये वाचकांना अनेकविध भाषेत उपलब्ध असलेल्या ग्रंथाची सोय उपलब्ध करावी.
- या सर्वच आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून जास्तीत जास्त प्रमाणात Online सेवांच्या वापराच्या दृष्टीने पाऊले उचलावीत त्यासाठी प्रयत्नशील रहावे.

- ग्रंथालयात येणाऱ्या प्रत्येक वाचकांशी योग्य संवाद साधून त्यांना ग्रंथालय साहित्याची माहिती देणेसाठी प्रयत्न करावेत. माहिती होण्यास मदत होईल. यासाठी प्रत्येक वर्षी पहिल्या वर्षीच्या विद्यार्थ्यांना ओरिएंटेशन प्रोग्रॅमच्या सहाय्याने माहिती द्यावी.
- या सर्व ग्रंथालयांमध्ये वाचनकक्षाची स्वतंत्र व्यवस्था करावी. वाचनकक्षामध्ये ई-रिसोर्सेस वाचण्याची व्यवस्था असावी.
- ग्रंथालयांनी आपल्या ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ संग्रह वाढवावा.
- ग्रंथालयांमध्ये वेगवेगळे उपक्रम (उदा. माहिती साक्षरता, ग्रंथ प्रदर्शन) राबवून वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षीत करावे त्यामुळे वाचकांच्या संख्येत वाढ होईल.
- ग्रंथालय संगणकीकरण्यासाठी ग्रंथालय व्यवस्थापणाने ग्रंथालय बजेटची व्यवस्था करावी आर्थिक नियोजन करावे.
- या ग्रंथालयांनी आर्थिक नियोजन करून योग्य त्या ग्रंथालय सॉफ्टवेअरची निवड करून संगणकीकरण करावे. (उदा. Libsys, Soul / Biomedical इ.)
- संगणकीकरण व ग्रंथालयातील ग्रंथसाहित्याचे डिजीटलाझेशन न केलेल्या ग्रंथालयांनी ते लवकर पूर्ण करू घ्यावे.
- ग्रंथालयीन सेवा देताना येणाऱ्या अडचणीवर वेळीच उपाययोजना करावी. त्यामुळे अडचणीचा सामना करावा लागणार नाही.
- सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावाचा विचार करून ग्रंथालयांमधील सेवकांना प्रशिक्षित करावे. (उदा. RFID, Digital Library, Cloud Computing, ICT) यावरील ट्रेनिंग्ज विविध ठिकाणी आयोजित केली जातात. त्यासाठी कर्मचाऱ्यांना पाठवावे.
- ग्रंथालयामध्ये ग्रंथालयातील साहित्याचे, माहितीचे जतन व प्रसारण करावे. त्यासाठी योग्य त्या साधनांची सोय करावी. (उदा. आयुर्वेदीक दुर्मिळ साहित्याचे डिजीटायझेशन करून जतन करावे.)
- ग्रंथालयातील ग्रंथपरीगणन हे बारकोडींगच्या साहाय्याने करावे त्यामुळे सेवकांचा वेळ वाचण्यास मदत होईल.

- ग्रंथालयामध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून वाचकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी ग्रंथपाल व ग्रंथालय सेवकांनी नेहमी प्रयत्नशील रहावे. आयुर्वेदीक ग्रंथालयामध्ये ई-रिर्सोसची खरेदी करून ऑनलाईन सेवा देता येईल. देवघेव विभागातून सॉफ्टवेअरच्या माध्यमातून एसएमएस अलर्ट सेवा देता येईल.

## ७.५ उद्दिष्टांची पूर्तता

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन करताना संशोधकाने काही उद्दिष्टे समोर ठेवली होती. ही संशोधनाची उद्दिष्टे साध्य करताना प्रश्नावली, मुलाखत या साधनांचा आणि निरीक्षण या तंत्राचा वापर करून सदर संशोधकाने संशोधन कार्य केलेले आहे. संकलित केलेल्या माहितीचे योग्य पद्धतीने सारणीकरण, आलेखांद्वारे प्रेझेंटेशन, विश्लेषण केले आहे. या सर्वांतून निष्कर्ष काढले आहेत व शिफारशी केल्या आहेत. यामधून संशोधनासाठी समोर ठेवलेली उद्दिष्ठे कशी साध्य झाली, त्याची पूर्तता कशी झाली हे खालीलप्रमाणे निदर्शनास येते.

**उद्दिष्ठ क्र. १ :- आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.**

सदर संशोधन कार्यात महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे. ग्रंथालयीन कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. ग्रंथालयात पुरविल्या जाणाऱ्या सेवा सुविधांचा परामर्श घेण्यात आला आहे. ग्रंथालयात सेवकवर्ग पुरेसा आहे काय वाचकांना सेवा देण्यासाठी कोणकोणत्या साधनांचा वापर केला जात आहे. वाचकांना हव्या त्या सेवा पुरविल्या जातात कि नाही हे आजमावण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

ग्रंथालयीन कामामध्ये संगणकाचा वापर करतात कि नाही. संगणकीकरण झाले आहे कि नाही ग्रंथालयाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती पावले उचलली आहेत. ग्रंथालयात सुधारणा करणेसाठी काही उपाययोजना केल्या आहेत कि नाही हे पाहिले हे आहे.

ग्रंथालयातून ई-जर्नल, ई-बुक, इंटरनेट सुविधा दिली जाते कि नाही हे पाहिले आहे. ग्रंथपाल प्रशिक्षित, योग्य पात्रता आहे कि नाही तसेच त्यांच्याकडे ग्रंथालयीन कामासाठी लागणारी आवश्यक कौशल्ये आहेत कि नाहीत हे पडताळून पाहिले आहे जाणून घेतले आहे.

**उद्दिष्ठ क्र. २ :- आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयातील विविध समस्यांचा शोध घेणे.**

आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांत कोणकोणत्या समस्या आहेत याचा शोध घेवून त्यावर उपायही सुचविले आहेत. सध्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयाना वेगवेगळ्या समस्यांना, आव्हानाना सामोरे जावे लागत आहे. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी काही ठोस उपाययोजना केल्या आहेत का हे समजावून घेवून उपाय ही सूचविले आहेत. बहुतांशी ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून वाचकांना योग्य त्या सेवा सुविधा पुरविण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येते. माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ग्रंथालयांची कार्यक्षमता वाढल्याचे दिसून येत आहे. ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे ग्रंथालयीन कामात सुधारणा झाल्याचे दिसून येते. काही ग्रंथालयात पुरेसा सेवकवर्ग नाही अशा ठिकाणी तेथील वाचकांना सेव सुविधा देताना तारे वरची कसरच करावी लागत आहे. तरीही त्या त्या ग्रंथालयातील समस्यांचा शोध घेवून त्यावर उपाय योजना सांगितल्याने या उद्दिष्टांची पूर्तता झाली आहे.

**उद्दिष्ठ क्र. ३ :- आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो का याचा शोध घेणे.**

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर ग्रंथालयीन कामामध्ये होतो की नाही याचा वेध घेण्यात आला आहे. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह, ग्रंथेत्तर साहित्याचा संग्रह कात्रणसंग्रह, ग्रंथालयीन सेवक वर्गावरील परिणाम, वाचकांचा व सेवकांचा वेळ, ग्रंथालयाची वाढ व विकास यावरील परिणामांचा अभ्यास सदर संशोधनामध्ये निष्कर्षात मांडणेत आलेला आहे. ज्या ग्रंथालयांनी आपल्या ग्रंथालयाचे संगणकीकरण केलेले नाही, तसेच ग्रंथालयीन साहित्याचे ई-स्त्रोत उपलब्ध नाहीत त्या ग्रंथालयानी ते उपलब्ध करून द्यावेत. त्यामुळे माहिती तंत्रज्ञान हे ग्रंथालयास कसे उपयुक्त आहे हे सिध्द झालेले आहे. हे शिफारशीमध्ये नमूद करणेत आले आहे. यामुळे या उद्दिष्ठांचीही पूर्तता झाली आहे.

**उद्दिष्ठ क्र. ४ :- ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह, वाचक आणि सेवा यांचा अभ्यास करणे.**

सदर संशोधनासाठी अभ्यासण्यात आलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून कोणकोणत्या सेवा दिल्या जातात यांची माहिती घेणेत आली आहे. या सेवांमध्ये संदर्भ आणि माहिती सेवा, देवघेव सेवा, निवडक माहिती सेवा, प्रचलित जागरूता सेवा, झेरॉक्स सेवा, कात्रणसेवा, भाषांतर सेवा, OPAC सेवा, Online सेवा, सारांश सेवा व इतर सेवांचा यात

समावेश आहे. या सेवांचा ग्रंथालयातील वाचकांना योग्य व कितपत उपयोग होतो हे ही निष्कर्षामध्ये मांडले आहे.

तसेच या ग्रंथालयीन सेवा ह्या गुणवत्तापूर्ण व जलद गतीने होण्यासाठी कोणकोणत्या साधनांचा वपार होतो याचाही वेध घेण्यात आला आहे. यासाठी ग्रंथालायंचे संगणकीकरण होणे महत्वाचे आहे. त्यामुळे ग्रंथालयीन कामाच्या दर्जात सुधारणा झालेली दिसते. इंटरनेट, ई-मेल, फॅक्स, मोबाईल, दुरध्वनी प्रोजेक्टर, प्रिंटर तसेच अन्य साधनांच्या वापरामुळे ग्रंथालयीन सेवा-सुविधा जलद गतीने होवून वाचकांचा व सेवकांचा वेळ वाचतो. वाचकांना हवी ती माहिती लवकर मिळण्यास मदत होते. बहुतांशी ग्रंथालयात या साधनांचा वपर होत असल्याचे दिसून येते ज्या ग्रंथालयीन कामामध्ये या सेवा सुविधा व साधनांचा वापर होत नाही त्यांनी योग्य उपाय योजना करून त्या देण्याचा प्रयत्न करावा हे निष्कर्षामध्ये मांडले आहे. त्यामुळे याही उद्दिष्ठांची पूर्तता झाली आहे.

सदर संशोधनासाठी अभ्यासण्यास आलेल्या ग्रंथालयांमध्ये वाचनसाहित्य, ग्रंथसंग्रह, वाचक आणि सेवा यांची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रंथालयात एकुण ग्रंथसंग्रह किती आहे. ई-स्त्रोत वाचनसाहित्य संग्रह उपलब्ध आहे काय. ग्रंथालयातील वाचकांनी संख्या किती आहे. ग्रंथालयीन वाचनसाहित्यामध्ये मुद्रीत स्वरूपातील वाचनसाहित्या बरोबरच अमुद्रीत स्वरूपाचे ग्रंथसाहित्य उपलब्ध करून दिले जाते का याचाही वेध घेतला आहे. वाचकांना ग्रंथालायतून उपयुक्त सेवा दिल्या जातात कि नाही याचाही परामर्श घेण्यात आला आहे. या ग्रंथालयातील ग्रंथ साहित्यामध्ये कोणकोणते वाचन साहित्य समाविष्ठ आहे याचाही वेध घेण्यात आला आहे. या सर्वामध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर होतो कि नाही हे जाणून घेतले आहे. यामुळे याही उद्दिष्ठाची पूर्तता झाली आहे.

## ७.५ गृहीतकांची पडताळणी

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी उद्दिष्ठाला अनुसरून निष्कर्षाप्रत पोहचण्यासाठी काही गृहीतके समोर ठेवली होती. माहिती संकलन, विश्लेषण सादरीकरण करून आलेले निष्कर्ष गृहीतकांशी सुसंगत असल्याने ही गृहीतके स्वीकारण्यात आलेली आहेत. गृहीतके कोणती व ती कशी स्वीकारली हे खालीलप्रमाणे दिले आहे.

**गृहीतक क्र. १ :- आयुर्वेद महाविद्यालयांची ग्रंथालये आपले पारंपारीक स्वरूप बदलून आधुनिक पद्धतीने सेवा देत आहेत.**

सदर संशोधनाच्या अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्यातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा अभ्यास करण्यात आला आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाशी संलग्न असलेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची माहिती यामध्ये आहे. या ग्रंथालयाचे कार्य कसे चालते हे ग्रंथपालाची मुलाखत व प्रश्नावली भरून घेऊन माहिती संकलीत केली आहे. या माहितीचे योग्य पद्धतीने विश्लेषण व सादरीकरण केले आहे व योग्य निष्कर्ष मांडले आहेत. या ग्रंथालयांनी आपली पारंपारीक भूमिका बदलून नाविन्यतेचा स्वीकार केलेला आहे कि नाही तसेच नवीन आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा स्विकार ग्रंथालयीन कार्ये पार पाडणेसाठी केलेला आहे कि नाही याचा वेध घेतला आहे. परंतु बहुतांशी ग्रंथालयानी ग्रंथालयीन सेवा देतनाना आधुनिक पद्धतीचा उपयोग केल्याचे दिसून येते. ग्रंथालयांचे संगणकीकरण केल्याचे आढळते. तसेच वेगवेगळ्या सॉफ्टवेअरचा वापर केल्याचे दिसते. या आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयीन सेवा-सुविधा वाचक व सेवक यांच्यावर परिणाम झाल्याचे दिसून येते. परिणामतः ग्रंथालयीन कामकाजामध्ये सुधारणा झालेली दिसून येते. ग्रंथालयांचा गुणवत्तपूर्ण दर्जा सुधारलेला आहे याची माहिती मिळते.

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या युगात आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयांनी ही आधुनिकतेचा स्वीकार केलेला दिसून येतो. यामुळे हे गृहीतक सिद्ध झाले आहे. यामुळे सदर गृहीतक स्वीकारण्यात आले आहे.

**गृहीतक क्र. २ :- आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयात नवीन तंत्रज्ञान व साधनांचा समावेश होत आहे.**

सदर संशोधनाच्या अभ्यासासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाराष्ट्र राज्यातील आयुर्वेद मेडीकल महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील नवीन तंत्रज्ञान व साधनांची माहिती यामध्ये आहे. या ग्रंथालयांमध्ये वाचकांना सेवा-सुविधा पुरविताना आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा व साधनांचा समावेश केला आहे कि नाही याचा वेध घेतला आहे. व या माहितीचे योग्य पद्धतीने विश्लेषण करून सादरीकरण केले आहे. ग्रंथालयाचे संगणकीकरण झाले असलेने वाचकांना योग्य वेळी योग्य माहिती त्यांना हव्या त्या स्वरूपात गुणवत्तापूर्ण ग्रंथालयीन सेवा मिळण्यास मदत झाली आहे.

ग्रंथालयात संगणक, इंटरनेट, ई-मेल, फॅक्स, दुरध्वनी, मोबाईल, झेरॉक्स, प्रिंटर, प्रोजेक्टर व अन्य साधनांचा वापर केल्यामुळे ग्रंथालयीन सेवा गुणवत्तापूर्ण व जलद गतीने होण्यासाठी मदत झाली आहे. नवीन माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वावरताना ग्रंथालयीन कामकाजामध्ये महत्वाची भूमिका पार पाडत आहेत. यासाठी आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयात, नवीन तंत्रज्ञान व साधनांचा समावेश आवश्यक आहे हे सिद्ध झाले आहे. त्यामुळे हे गृहीतक स्विकारणेत आले आहे.

## ७.७ भविष्यवेध

संशोधन कार्यासाठी निवडलेल्या संशोधन विषयाचे संशोधन करीत असताना संशोधनास काही मर्यादा पडतात. त्यामुळे काही घटकांची माहिती संकलीत करणे शक्य होत नाही. तसेच त्या अनुषंगाने काही विषयाबाबत माहिती संकलीत करणे अशक्य होते. आणि त्या अनुषंगाने काही विषय अस्पर्शित राहतात. अशा विषयांवर संशोधन व्हावे असे संशोधकास वाटते.

आज भारतामध्ये आयुर्वेद शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करून भविष्यकाळासाठी त्याची वाढ व विकास करण्यासाठी पायाभूत सुविधा खूप मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. भारतातील प्रत्येक राज्यात आयुर्वेद शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार स्थानिक भाषामधून करण्यात येत आहे. यामुळे प्रत्येक राज्यात आयुर्वेद ग्रंथालयातील लिखित व अलिखित वाचन साहित्य प्रत्येक राज्याच्या स्थानिक भाषेत उपलब्ध आहे. तसेच भारताबाहेर चीन, पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, नेपाळ, मॅनमार, मलेशिया, थायलंड, फ्रान्स, जर्मनी इ. अनेक देशांमध्ये आयुर्वेद शिक्षण त्या-त्या देशाच्या भाषेमध्ये देण्यात येते. त्यामुळे त्या-त्या देशात आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. म्हणूनच अशा विषयांवर संशोधन होण्यासाठी पुढील विषय संशोधनाकरीता सदर संशोधकाने सुचविले आहेत.

१) महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांतील ग्रंथसंग्रहाचे मुल्यमापन करणे.

२) आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्य समाधानांचा अभ्यास करणे.

३) महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील वाचकांच्या वाचन सवयींचा अभ्यास.

४) महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयातील नियतकालिकांचे व्यवस्थापन.

५) भारतातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयाचा अभ्यास.

६) महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयातील ग्रंथसाहित्याचा वर्गीकरणाचा अभ्यास.

